


क्रौंचांची दक्षिण भरारी

क्रौंचांची दक्षिण भरारी

सुशील परभृत

*

परभृत प्रकाशन

मूल्य दोन रुपये.

प्रकाशक

गं. गो. कुंटे

परभृत प्रकाशन

११०/५ सदाशिव पेठ,

पुणें २.

★

प्रथम मुद्रण

एप्रिल १९५२.

★

मुद्रक

व. वि. आपटे, बी. कॉम्.

हिंदुस्थान मुद्रणालय,

८६५ सदाशिव पेठ,

पुणें २.

चि. दिलीप व श्रीनिवास

यांस :—

भरारी पूर्वी —

एन्. नॅरॅझिन यांच्या मूळ रशियन पुस्तकावरून भाषांतरित केलेल्या 'क्रेन्स ल्फाइंग साऊथ' या इंग्रजी अनुवादावरून प्रस्तुत अनुवाद तयार केला आहे. हिवाळ्यापूर्वी मॉस्कोच्या उत्तरेचे क्रौंच मजल दर मजल करीत नाईलचा मध्य भाग गांठतात व वसंतापूर्वी आपल्या मायदेशीं परत जातात. हें प्रवासवृत्त अक्षरशः विहंगम दृष्ट्याच मूळ लेखकानें मोठ्या मनोरंजक पद्धतीनें वर्णिलें आहे. मराठी भाषेंत असलें पुस्तक निःसंशय अभिनव असेंच आहे. आणि म्हणूनच मी तें मराठींत अनुवादित केलें. त्यानंतर तें प्रकाशांत यावयाचें, परंतु कोणी प्रकाशक न मिळाल्यामुळें—कारण 'मार्गदर्शिका' 'टिप्पणी' 'सोबती' वगैरे पुस्तकांच्या प्रकाशनाच्या भाऊ गर्दींत ते गुंतले होते--तें इतके दिवस लांबणीवर पडलें. अखेरीस परभृत प्रकाशनाच्या जुन्या ऋणानुबंधीयानीं मनावर घेतल्यामुळें सदर पुस्तक मराठी वाचकांच्या हातीं देण्याचा योग येत आहे. त्याबद्दल मी प्रकाशकांचा अत्यंत ऋणी आहें. असो केवळ कुमार वाचकांसच नव्हे तर सर्व सामान्य मराठी वाचकांसही सदरहू पुस्तक आवडेल अशी आशा प्रदर्शित करून हें निवेदन संपवितों.

— सुशील परभृत

: : १ : :

परमेश्वरानें मला स्मृति मोठी सुंदर दिली आहे. त्यामुळ मला माझ्या अगदीं जन्मदिनापर्यंतच्या साऱ्या गोष्टी चांगल्या आठवताहेत, आणि माझं निरीक्षण व अनुभवहि विविध असल्यामुळें, माझ्या त्या साऱ्या गतस्मृतींची उजळणी करून त्यांचा आनंद, तुमच्यासारख्या लांब चोंचीच्या नि आंखूड चोंचीच्या दोस्तांच्या संगतींत, परत एकदां लुटण्याचा माझा विचार आहे.

उच्च क्रौंच कुलांतील सामान्य पद्धतीप्रमाणें, आम्हीहि आमच्या कुटुंबांत दोनच मुलं होतों. माझी ताई नि मी, असा आमचा दोघांचाहि जन्म एकाच प्रहरीं झाला आणि आम्हीं जगाकडे पहिलावहिला दृष्टिक्षेप केला त्यावेळीं आमच्या घरट्यांत आमच्या जवळ हिरवट, तपकिरी ठिपक्यांचीं अशी अंड्यांचीं कवचं विखुरलीं होतीं, असं मला अगदीं सुस्पष्ट असं आठवतं आहे.

माझ्या सभोंवारच्या जगाकडे मी पहिला दृष्टिक्षेप टाकला आणि मी पार गोंधळून गेलों आणि आमच्या भोंवतीं काय चाललं आहे

याचा मला कांही म्हटल्या कांहींच बोध होईना. पण मग थोड्याच काळांत स्वानुभवानें आणि माझ्या सूज्ञ माता पितरांचे शिकवणुकीनें आसपासचं जग मला परिचित होऊं लागलं आणि त्यांत चाललेल्या घडामोडींची यथार्थ कल्पनाहि मला होऊं लागली म्हणजे, ज्या यथार्थ ज्ञानाच्या जोरावर आमचं हें क्रौंचकुल साऱ्या पक्षिजातींत आपलं मानाचं स्थान अगदीं रास्त अशा तऱ्हेनें आज तागायत संभाळून आहे, तें सर्व ज्ञान मीं लौकरच आत्मसात केलं.

आमचा जन्म झाला ती सकाळची वेळ होती. सूर्य नारायण अजून क्षितिजावर यायचा होता, पण त्याच्या किरणांची सुवर्णप्रभा, त्या पाणथळ मैदानावर पसरलेल्या रात्रीच्या धुक्याच्या दुलईवर केव्हांच प्रतिबिंबित झाली होती. याच पाणथळीच्या कांठावर आमच्या वीस एक कुटुंबांचा घरटा होता.

आरंभीं आरंभीं या पाणथळीभोंवतालचं कोणतंहि दृश्य मला क्षणभरहि मोह पाडीत नसे. शिवाय मला थंडीहि खूप खूप वाजत असल्यामुळें माझं कुठेच नीटसं लक्षहि लागत नसे, आणि आपण त्या पहिल्या, आंगाभोंवतींच्या घट्टघट्ट काळोखी जगांत जर पुन्हां गुडुप्प असे जाऊन बसलों तर काय मौज होईल, असाहि वेडा विचार माझ्या मनांत डोकावे. कसं घट्ट नि ऊबदार होतं तें कवचीचं घर! पण आतां त्याचीं ओलसर छकलं, माझ्या लटपटत्या तंगड्यांभोंवतीं पिस्करलीं होतीं!

सभोंवार नजर टाकली कीं आमच्या घरट्याजवळचे ते लहान लहान उंचवटेच काय ते माझ्या दृष्टीस पडायचे; किंवा मधूनच तीं चिमुरडीं झुडूपं डोळ्यांना दिसायचीं आणि धुक्याच्या पडद्याआडून दूर कुठेतरी चमकत असलेलं पाणी मला दिसे. वर डोक्यावर, पिवळीं, सोनेरी गुलाबी अशीं लहान लहान ढगं, उंच आकाशांत स्वच्छंद बागडतांना दिसत आणि त्यांतच पांखरांचा आनंदी किलबिलाट कानांवर

आला कीं तीं पांखरं जशीं त्या ढगांच्या अगदीं पोटांतूनच आपले लाडीक स्वर, शीळ घालीत किंवा चिवचिवत काढीत आहेत असंच मला वाटे.

पण सूर्यनारायण हळू हळू वर वर चढूं लागला नि थंडी पळून जाऊन ऊबदार असं वाटूं लागलं; धुक्याचा पडदा गुंडाळत गुंडाळत वर अदृश्य झाला आणि सभोंवतालच्या त्या निरतिशय सुंदर दृश्यानें--धुक्याच्या अवगुंठनांतून प्रकट झालेल्या त्या भव्य देखाव्याच्या दर्शनानें--माझं चिमुकलं हृदय आनंदानें भारावलं आणि मी मंद चीत्कार केला.

खूप लांब दिसणाऱ्या क्षितिजरेषेनें मर्यादित झालेलं असं एक विस्तीर्ण नि आश्चर्यजनक असं मैदान माझ्या डोळ्यासमोर पसरलेलं मला दिसत होतं. त्या विस्तीर्ण मैदानांत असंख्य मोहक उंचवटे चहूं-कडे विखुरले होते. कांहींच्या अंगावर लव्हाळे, वेत किंवा सेज झुडूपांचे कोंवळे कोंवळे कोंब आपले हिरवे माथे झुलवीत उभे राहिले होते. कांहींच्या आंगावर तांबूस तपकिरी शेवाळानें आपला मखमली गालीचा पसरला होता. तर कांहीं विविधरंगी वासंतिक पुष्पांनीं डवरलेल्या चिमुकल्या वेलीनीं पार झांकून गेले होते. किती सुंदर दिसत होतीं तीं चिमुकलीं निळीं, पांढरीं नि पिवळीं फुलें ! मधुनच कुठें कुठे चिमुकले निर्झर, पाण्यानें भरलेले खांच खळगे नि लहान मोठीं तळी आपलं चमकनं पाणी दाखवित होतीं. ओः! पण कांहीं तलाव तर इतके मोठे होते कीं त्यांचा परतीरहि माझ्या लहानग्या दृष्टीला दिसत नव्हता.

पांढरे शुभ्र मेघखंड, आपले आकार एकसारखे आलटीत पालटीत मंदपणें आकाशांत फिरत होते. आणि तेच मेघखंड त्या सरोवरांच्या पाण्यांतहि तरंगत होते. सर्व जातीचे पक्षी जोडयाजोडयांनी नि गटा-गटांनी आकाशांत भरारत होते आणि त्यांच्या कर्णकटु चीत्काराचा

गलका इतका मोठ्यानें होत होता कीं, सरोवरांतील त्यांची असंख्य प्रतिबिंबंच जणुं त्या चीत्काराचा प्रतिध्वनी चौफेर गर्जत होतीं, असं वाटत होतं.

बाबा कांही त्यावेळीं घरीं नव्हते. मागाहून मला कोणी तरी सांगितलं कीं, त्या दिवशीं ते खूप लौकर उठून शिकारीला गेले होते. पण आई मात्र घरीं आमच्या जवळच होती. तिनें आधीं आमच्या आंगावरची पिवळी पिवळी लव आपल्या चोंचीनें मोठ्या प्रेमानें साफसूफ केली आणि आमचे बिनपिसांचें पंख, ओढून सरळ केले. त्या बनपिशी पंखांचा आम्हाला त्यावेळी कांहीच उपयोग नव्हता. हो ! नाहीं म्हणायला, सभोंवार पसरलेले सृष्टिदेवतेचे ते नवीन चमत्कार पाहून खूष झाल्यावर, त्या पंखांची फडफड करून आम्ही आपला आनंद मात्र व्यक्त करीत असूं.

'हं ! ' आई आम्हांला सांगत होती, ' आतांपर्यंत तुम्ही आंवती भोंवती खूप पाहिलंत बरंका बाळांनों. पण आतां कांहीं तुम्ही आपल्या त्या अंड्यांच्या पाळण्यांत नाहीं आहांत, बरंका. तिथे तुम्हांला कांहीं करण्यासवरण्याचा मुळीच त्रास नव्हता. पण आतां तुमच्या त्या वखवखलेल्या पोटाला घांस द्यायला तुम्हांलाच आसपास शोधाशोध केली पाहिजे, बरं. '

खाण्यापिण्याची गोष्ट निघाल्याबरोबर माझ्या पोटांत काय आग पेटली आहे याची मला एकदम जाणीव झाली. आमच्या बहिणाबाईंना पण तशीच भूक लागली असावी, कारण आम्ही दोघांनीहि आपल्या पवळ्या चोंची वासून चीत्कार केला.

' आऽऽई ! खा–य–ला ! '

' बरं बरं, मिटा तोंड; ' आई म्हणाली. ' आत्तां देते बघा तुम्हांला खायला कांहीं तरी. आपल्या या मायभूमींत सगळी कांहीं

समृद्धी आहे. पण मी खायला कसं आणतें, तें बरीक पहा हं नीट, म्हणजे पुढल्या वेळीं तुम्हांला कळेल काय करायचं तें. नेहमी नको आहे तुमचा उच्छाद माझ्या मागें लागायला.'

आमची आई तशी मायाळू पण थोडी व्यवहारी बाई होती. तिचा हेतु नेहमीं चांगलाच असे; पण तिचं बोलणं मात्र कधीं कधीं बोंचे आणि तिची भाषाहि कित्येक वेळा खानदानीं अशीहि नसे. तिनें मग चारदोन पावलं टाकून जवळच्या एका शेवाळी तुकड्यावरील शेवाळे आपल्या चोंचीनें ओढली. त्या बरोबर गुबगुबीत असे कितीतरी किडे वळवळत खालीं पडले आणि आमच्या तोंडाला चांगलंच पाणी सुटलं. या गुलगुलीत खाद्याचे ताईला नि मला सारखेच घांस मिळाले. आईनें देखील आपली न्याहारी उरकली. तिनें त्यांतले आठ दहा प्राणी गट्ट केले आणि जवळच दिसलेली एक छोटी हिरवी बेडकी पण मटकावली.

पण आतां भरगच्च भरलेलं पोट नि सभोंवारचं तें सुखकारक गरम गरम ऊन यांनी आमचे डोळे मिटूं लागले नि आम्ही डुलूंहि लागलों. पण कुणाच्या तरी जोरदार पंखांची फडफड अवचितपणें आमच्या अगदीं डोक्यावरच झाली आणि आमची स्वप्नसृष्टी पार वितळून गेली.

एक भला मोठा करकोंचा, राखी–करडे पंख, शुभ्र छाती, तुकतुकीत काळी मान नि शेपूट, डोळ्यांवर लालचुटुक अशा रेघा आणि डोक्यावर एक ऐटदार मागें झुकलेला तुरा, असा भरारत आमच्या घरट्याजवळ उतरला नि म्हणाला :

'हा पहा मी आलों.'

ते आमचे बाबा होते.

'बा', आमच्याकडे पाहून ते म्हणाले. 'मजबूत आहेत नाहीं ! आणि मला वाटतं, थोडे कुरूपच पण ! छोकरे ना ?'

'एक छोकरा नि दुसरी छोकरी. पहा एकदां तिच्याकडे ! आपल्या आजीसराखी नाहीं दिसत ती अगदीं हुबेहुब ?' आईनें अभिमानानें सांगितलं आणि आमच्या अंगावरील लव ती परत साफ करूं लागली.

आमच्या या पहिल्या भेटीवरून बाबा कांहीं तसे विशेषसे मायाळू असे आम्हांला वाटले नाहींत, पण पुढें पुढें मग त्यांचं तें पितृप्रेम, मधुनच अगदीं उच्च दर्जाचं असं, आम्हांलाहि नीट कळून आलं. पण त्यांना फाजील मायाळूपणा मात्र ठाऊक नव्हता, आणि आमचं सारं शिक्षण त्यांनीं आपल्या चतुर नि अनुभवी अर्धांगावर सोंपवून आपला सारा वेळ सामाजिक कर्तव्यालाच वाहिला.

आमच्या त्या पहिल्या भेटीच्या वेळीं बाबांनीं आम्हांला आपल्या चोंचीनें, जसं तपासल्यासारखं, नुसतं ठाकून ठोकून पाहिलं, समाधानानें आपला तुरा त्यांनीं डोलवला आणि उडत उडत जरा पलीकडे जाऊन त्यांनीं कोणाला तरी आरोळी दिली.

'अरे, दोहोंची चार तोंडं झालीं आमच्या घरांत !'

त्यांच्या या जाहीरातीला कोणीतरी ओरडून घोगऱ्या स्वरांत उत्तर दिलं, 'अभिनंदन अभिनंदन,' आणि तें सेज झुडुप बाजूला करून दुसरा एक मोठा करकोंचा पुढें आला. हा नवागत बराच वृद्ध दिसला, पण चालत होता मात्र ताठ आणि त्याची एकंदर ऐट मोठी रुबाबदार नि डौलदार होती.

'बरेच लौकरचे आहेत हे,' ते पाहुणे म्हणाले, आणि त्यांनींहि आपल्या चोंचीनें आम्हांला ठोकून पाहिलें. 'देव दयेनें यंदा वसंत बराच ऊबदार आहे. या नवीन प्रजेची सारींच जण वाट पाहताहेत.

...... हीं पिलं यंदा लौकर आल्यानें आपली दक्षिणेकडे जायची वेळ होईपर्यंत हीं चांगलीं ताकदवान होतील; आणि म्हणजे, गेल्याच वर्षी आपली नवीन प्रजा पुष्कळच मृत्यूमुखीं पडली, तसं होणार नाहीं यंदा.'

आईनें एक जड सुस्कारा टाकला नि ती म्हणाली.

'हो, डॅन्यूबच्या मुखाशीं पोंचल्यापासूनच त्यांतून एकेक गळून पडूं लागला. माझीं दोनही गमावलीं त्यावेळीं—माझ्या धाकट्याला—बाल्कन पर्वतांतच सोडावा लागला आपल्याला, कारण त्याच्यानें मुळीं पुढे रेटवेचना. आम्हां साऱ्या आयांना भारी जड गेलं तें वर्ष.

तें 'दक्षिकडे जायचं,' 'डॅन्यूबचं मुख,' ते 'बाल्कन पर्वत,' हें काय प्रकरण आहे, आणि आम्हांला जड जाणार नाहीं, असं तें मागच्या वर्षीच्या बालकांना काय जड गेलं? आमच्या सारख्या नव्या पाहुण्यांना हें सारंच गूढ होतं. पण त्याच वेळीं एक मोठा काळा किडा, आपल्या लांब मिशा हालवीत गवताच्या पातीवरून चालला होता, त्याच्याकडे आमचं पोरांचं लक्ष गेलं. थोरांचं तें संभाषण विसरून जाऊन त्या छोट्या विक्षिप्त प्राण्याकडे आम्ही आपलं सारं लक्ष एकवटून पहात होतों.

आमच्या त्या वृद्ध शेजाऱ्याचं नांव, लॉंग नोझ दि वाइझ—पंडित लांबनाके—असं होतं. ते ब्रह्मचारी होते, पण त्यांना लहान मुलांची फार आवड होती; विशेषत: त्यांच्या जिवलग स्नेह्यांचीं, आमचे बाबा क्लॅरिअन ट्रंपेटर—सूर सनई—यांची आम्ही मुलं, म्हणून आमच्यावर तर त्यांचं फार प्रेम होतं.

लॉंग नोझ आमच्या घरीं रोज कितीतरी वेळां येत असत. घरीं आले कीं घरकामांत ते आईला मदत करायचे, बाबांजवळ जुन्या जुन्या गोष्टी काढून गप्पा मारायचे, आणि सायंकाळीं सूर्य अस्ता-

चलावर टेकला कीं बाबा नि ते त्याला निरोप देण्यासाठीं जोडीनें वंदन नाच नाचायचे. रात्रींसुद्धां कधीं जागा होऊन पाहिलं, तर आमच्या या वृद्ध दोस्ताची ताठ उभी असलेली रेखाकृती, सगळ्यांत उंच अशा जागीं उभी राहून आमच्या साऱ्या घरट्यांवर जागृत पहारा करीत असलेली, अशीच मला नेहमीं दिसायची.

त्यांची पंडीत ही पदवी मात्र त्यांना कांही कुणी उगीच दिली नव्हती. आमच्यांतल्या सुसंस्कृत क्रौंच पक्षांना अवगत असलेल्याच साऱ्या गोष्टी फक्त त्यांना माहीत होत्या असं नव्हे, तर त्याहूनहि कितीतरी जास्त माहिती लाँग नोझनां होती. दीर्घायुष्य, विशाल प्रवास, सुस्पष्ट विचारशक्ति आणि मायाळू हृदय, यांची जोड त्यांच्या सुंदर शिक्षणाला मिळाली असल्यामुळें लोक तर त्याना जादूगार असंच म्हणत. पण स्वभाव थोडा अबोल नि अघळपघळ नसल्यानें आपल्या कार्याची मिजास त्यानीं कधीं धरली नाहीं; आणि कधीं केल्या गोष्टींचा उल्लेख केलाच तर तो मोजक्या शब्दांत, आवश्यक तेवढाच आणि तो देखील जसा सहज, अगदीं जातां जातां, असाच असायचा. याच्या उलट, आमचे दुसरे शेजारी, ट्रायपलर –बढाईखोर आम्ही. या बेटचानें अजूनपर्यंत फक्त दोनदांच काय तो दक्षिणचा प्रवास केला होता. पण त्याचा उच्चार मात्र वारंवार व्हायचा आणि तसली एकही संधी वायां दवडायची नाहीं ही स्वारी. विशेषत: इजिप्तमधील एका मोठ्या शहरांतल्या अगदीं मध्यभागच्या एका उंच मनोऱ्यावार त्यानें कशी बैठक मारली होती, याचा उच्चार आपल्या श्रोत्यांना तो नेहमीं ऐकवायचाच.

एकदां रात्रीच्या पहाऱ्याबद्दल बाबा लाँगनोझपाशीं बोलतां बोलतां म्हणाले-- ' परमेश्वराचीच कृपा कीं इथें माणसांची वस्ती नाहीं कोणाची; त्यामुळें सर्व कांही सुरक्षित नि शांत शांत आहे आपल्या इथें. '

'आज नाहींत कोणी लोक,' पंडीत म्हणाले, 'पण लौकरच ते येतील हें मात्र निश्चित. काल कीं परवां त्या तिकडून धूराचा एक बारीकसा ढग इकडे लोटतांना पाहिला मी; आणि काल एक बैलहि गळ्यांतली घंटा हालवीत त्या मोठ्या तळ्यावर पाणी प्यायला आलेलाहि मी बघितला. म्हणजे त्यांची वस्ती जवळच आहे असं झालं.

'कोण, खेडूत ?'

'अगदीं बरोबर. पांच धनगर नि सहा कुत्रे.'

'अं:, निरुपद्रवी असतात ते,' आई म्हणाली. 'त्यांच्याजवळ नसतात लांब पल्याच्या बंदुका. पण आणखीं खालीं दक्षिणेला मात्र खरेखुरे राक्षस नि गळेकापू लोक आहेत हं.'

'मागल्या सालीं केला त्यानीं इथें यायचा प्रयत्न, पण या दलदलीपुढें त्यांचा कांही निभाव लागेना.'

हें देखील सारं संभाषण मोठं गूढ नि अतर्क्य असंच वाटलं आम्हांला. पण मग थोड्याच दिवसांनीं आम्ही उंचवटयांवरून चालायला लागलों आणि आमच्या प्रेमळ वृद्ध मित्राच्या देखरेखीखालीं थोडं थोडं उड्डाणहि करूं लागलों. आणि मग मात्र दर दिवशीं नवीन अनुभव नि नवीन ज्ञान आमच्या चिमुकल्या डोक्यांत झपाट्यानें भरती होऊं लागलं. हे सारं नवीन ज्ञान आम्ही मोठ्या चपळाईनें आत्मसात करूं लागलों आणि मग गूढ हा शब्दच मुळीं आमच्यापुढून अदृश्य झाला !

:: २ ::

माझा मायदेश खराच मोठा अजब होता ! पण त्याचं आतां मी वर्णनच करतों मुळीं साग्रसंगीत, आणि मग तुम्हींच ठरवा खरं खोटं काय तें.

मी मागे सांगितलं आहे कीं, आम्ही राहात असलेलं तें पाणथळ दलदलीचं मैदान विस्तीर्ण, अगदीं दृष्टी पोंचेपर्यंत विस्तीर्ण असं होतं; खरं म्हटलं तर त्याहूनहि तें कितीतरी विशाल, प्रचंड असं होतं. कोणत्याहि दिशेनें तुम्ही तीन दिवस एकसारखे सतत उडत राहिलात, तरी तेंच विस्तीर्ण, अनंत, दलदली, पाणथळ मैदान, आणि त्यांमधून दिसणारीं बीं सरोवरं नि त्या नद्याच तुम्हांला दिसत राहातील. लाँग नोझनीं याचं नांव आम्हांला दि ग्रेट ऑस्टँशकॅन्हो मार्शेस, असं सांगितलं आहे.

उन्हाळयाचे सुरवातीचे ते दिवस. त्यामुळें चित्रविचित्र रसरशीत फुलांचा सभोंवार जसा समुद्र उसळला होता. तें मऊ मखमली मैदान सरोवरांच्या नि पाणथळीच्या तुलनेनें मोठंच सुंदर दिसत होतं; आणि या मैदानावर बदकें, हंस, प्लव्हर नि इतर अनेक सजातीय पक्षांचं भलं मोठं संमेलन भरून त्यांचा आनंद महोत्सव चाले. मधून मधून आमच्या जातीचे, पुष्कळसे आमच्यासारखे दिसणारे असे पक्षी आम्हांला दिसत. पण हे साम्य फक्त दुरूनच दिसे हं. हे बलाक पक्षी– मोठी दुष्ट, गैदी नि अधाशी अशी ही बगळ्यांची जात होती हे नेहमीं एकएकटेच असायचे आणि वावर नेहमीं पाण्याच्या अगदीं जवळ, कांठावर; आणि पाण्यावर डोकावणाऱ्या वेडपट माशांना पकडून गट्ट करण्यांत यांचा अगदीं हातखंडा असे.

आमच्या घरट्यांच्या साऱ्या वसाहती अशा आडोशाला नि छपलेल्या असत आणि जिकडे पहावं तिकडे आपली आमच्याचसारखीं पिवळीं पिवळीं चिमुरडीं, वेडीवांकडी हालचाल करीत नि चिवचिवत असलेलीं दिसत. आमच्या करकोच्यांच्या या वस्तीशेजारीं बदकांचं एक गांव वसलेलं होतं, आणि त्यांची असंख्य पोरं आमच्या वसाहतीला भेट द्यायला नेहेमीं नि वारंवार येत. आम्ही करकोचें त्यांना कधींच दुखवीत नसूं. उलटपक्षीं, आमचे पहारेकरी आमच्याप्रमाणें त्यांचंहि संरक्षण करीत. कारण, लष्करी कामासाठीं हीं बदकं अगदींच कुचकामाची असत. सायंकाळीं आमचे करकोचे, गप्पागोष्टी करण्यासाठीं किंवा सल्लामसलतीसाठीं किंवा नाचण्यासाठीं एकत्र आले कीं, हीं बदकं आपल्या लव्हाळ्यांतून बाहेर पडून डुलत डुलत आमच्यांत येत. त्यांना एकच मोठी वाईट खोड होती : गप्पाष्टकांची मोठी नादी असत हीं बदकं, आणि एकमेकांची निंदा कुचाळकी करण्यांतहि मोठीं पटाईत.

आमच्या लाँगनोझनीं मला सांगितलं कीं, त्यांचा तो जातगुणच मुळीं. 'तसे लोक चांगले आहेत ते, पण बडे भोंदु आणि इकडचं तिकडे सांगणारे; आणि कोणत्याही शिष्ट अशा पक्षिकुळांत हे मोठेच दोष असं मानतात. पण देवदयेनें आपली ही क्रौंचकुळी या दोषांपासून अलिप्त आहे.'

आमचे सारे दिवस आतां अगदीं आंखीव नि शिस्तबद्ध असे चालले होते. दिवस उजाडतांच आम्ही उठत असूं नि मग एका ठराविक ठिकाणीं जाऊन आपल्या पंखांना चांगला तणावा देत असूं आणि झोंपेमुळे आंखडलेल्या आमच्या लांबलांब तंगड्यांना उड्या मारून आम्ही व्यायाम देत असूं. यानंतर मग आम्ही एक छोटीशी भरारी मारीत असूं; कधीं आमच्या बाबा–आईंच्या संगतींत, पण बहुतांशीं आमच्या वृद्ध दोस्तांबरोबरच. आमच्या या छोट्या

छोटया सहलींत सभोंवारच्या सर्व वस्तुजाताचं बारकाईनें निरीक्षण करून नि आमच्या त्या गुरुजींनीं दिलेल्या माहितीवरून आमच्या ज्ञानाची चांगलीच प्रगती होत होती. कारण कोणत्याही बारीक-सारीक गोष्टीची त्यांना म्हणून माहीती नव्हती, असं कधींच झालं नाहीं. यानंतर आमची मग पोटपूजा व्हायची आणि पहिल्या दिवसां-पेक्षां या पोटपूजेची गंमत नि लज्जत कांही और असे. कारण आमच्या आंवतींभोंवतीं हकलबेरी, लाल बिलबेरी आणि आमचीं आवडतीं क्रेनबेरी--अजून चांगलीं पिकलीं मात्र नव्हतीं हीं--अशा अनेक बेरींची अगदीं लयलूटच होती. कधीं कधीं तर सारा दिवस-भरच आम्ही घराबाहेर हिंडून काढीत असूं आणि रोजचं नृत्यमंडळ भरण्यापूर्वी जेमतेम एकदां परत घरीं येत असूं. पण म्हणून आमच्या आईवडीलांना आमची कधीं काळजी कांही वाटत नसे; कारण आमच्या पंडीत गुरुजींच्या शहाणपणावर, दूरदृष्टीवर नि मायाळूपणावर त्यांचा पूर्ण भरंवसा होता. पण आई मात्र घरीं आल्याबरोबर आम्ही साऱ्या दिवसांत काय काय पाहिलं, ऐकलं याचा समग्र इतिहास एकल्या-शिवाय आम्हांला सोडीत नसे.

थोडयाच दिवसांत मग आम्हांला वेगवेगळीं संकटं नि धोके अचूक ओळखतां येऊं लागले आणि मित्र कोण नि शत्रु कोण हें ओळखण्या-लाहि आम्ही शिकलों--आपल्या या जीवनांत सर्वांत आवश्यक अस-लेलं ज्ञान तें हेंच ! उदाहरणार्थ, आम्हांला आतां कळूं लागलं कीं ह्या गायी नि हे बैल दिसण्यांत जरी मोठे अवाढव्य नि भयंकर असे दिसले नि त्यांचीं शिगें मोठीं लांब तिखट असलीं, तरी ते अगदींच निरुपद्रवी आहेत; आणि आपल्याला त्यांच्या पाठीवर बैठक मारण्या-लाहि कांहि हरकत नाहीं. पण तें चिमुरडं नि सुरेख दिसणारं पोल कॅट--ध्रुवावरील मांजर--किंवा तो दिसण्यांत मोठा गोरागोमटा--पण घातकी लाल कोल्हा, हे अगदीं बिलंदर, अट्टल खुनी आणि

आपले शत्रु आहेत. कारण हे बेटे पक्षांची नुसतीं अंडींच नाहीं मटकावीत, तर विशेषतः त्यांचीं आमच्या सारखी लहानलहान पिलं नि खुद्द मोठ्या पक्षांवरहि हात मारण्याला ते मागेपुढें पहात नाहींत.

'आणि या कारणामुळेंच,' लाँगनोज आम्हांला म्हणाले होते, 'आणि तुमच्याहि लक्षांत आलंच असेल तें, कीं या बाजूचे सारे पक्षी आपलीं घरटीं कोरड्या जमीनीपासून अशीं लांब बांधतात. कारण म्हणजे या बदमाषांना आपले ते सुंदर मखमली कोट पाण्यांत ओलेचिंब केल्याशिवाय मुळीं इथें येतांच येऊं नये. आणि वर आणखी या दलदलींत बुडून गडप व्हायची धास्ती आहेच त्यांना.'

पण मग तो कोल्हा नि तें पोलकॅट यांहूनहि मोठा धोकेबाज अशा एका शत्रूची माहिती आम्हांला मिळाली. हे म्हणजे गरूड नि गिधाड. आमच्याच डोक्यावर आकाशांत हे खूप उंच भिरभिरत असायचे नि मग अवचित खालीं झडप घालून आपल्या पंजांत आपलं भक्ष झटकन पकडून परत वर निघून जायचे. या लुटारूंच्या नुसत्या दर्शनानेंच आमच्या साऱ्या वसाहतीच्या छातींत धसका बसायचा. हंसबालकं रानबदकं नि प्लव्हर यांची तर पारच दैना उडून जाई. अनेक प्रकारचे कर्णकटु, हृदयभेदी आवाज झंझावातासारखे चोंहोकडून उठून त्यानें आकाश जसं भेदल्यासारखं होई. आपले पंख पसरून आया, आपली पिलं झांकून टाकीत. नर आपलीं पिसं तुरबुरवून फूत्कारल्यासारखें करीत त्यांना भेवडावीत. आमचे शूर क्रौंच उच्च स्वरानें धोक्याची सूचना देत, आणि असा कांही भयंकर अवतार धारण करीत कीं ही सारी जय्यत लष्करी तयारी पाहून ते लुटारू हल्ला करण्याचं कधींच धाडस करीत नसत.

मनुष्यप्राणी हाहि आमच्या मित्रमंडळींत मोडत नसे, असं मोठ्यांच्या सायंकाळच्या गप्पांवरून मी अजमावलं होतं; आणि या

द्विपाद प्राण्यांच्या अवकृपेमुळें आम्हां पक्षांनांच फक्त त्रास होतो असं कांहीं नाहीं, हें पहाण्याचीहि मला लौकरच संधी मिळाली.

ती हकीगत अशी.

एकदां एका मोठ्या सरोवरावरून आम्ही उडत असतां कसल्या तरी घाणेरड्या धुराचा लोट सरोवराच्या एका वाळवंटी कांठावरून उठतांना आम्हांला दिसला.

' खालीं जाऊं या का उडत ? ' ताईनं हळूच विचारलं.

' कां, काय हरकत आहे ? ' लाँगनोझ म्हणाले. ' जरा पलीकडे त्या झुडूपांत उतरूं आपण. आपला जीव उगीच धोक्यांत न घालतां तिथून आपल्याला सारं कांहीं पहातां येईल. तुम्हीं दोघंजण करा नीट निरीक्षण नि काढा आपआपला निष्कर्ष. '

त्याप्रमाणें आम्ही खालीं त्या झुडुपांत उतरलों ताणि लगेच एक नीटशी जागा पाहुन एका शेकोटीभोंवतीं बसलेल्या त्या जमावाकडे नीट निरखून पाहूं लागलों. जवळ थोड्याच अंतरावर त्यांचा गाईंचा नि शेळ्यांचा कळपहि चरत होता. पलिकडे, वीस एक लहानखोरे रोडके घोडे आंगाभोंवतीं घोंघावणाऱ्या चावऱ्या माशांना शेपट्या जोरजोरानें फिरवून हांकलीत होते.

त्या लोकांचा कसला तरी उद्योग चालला होता—मला तरी तो भयंकर असा दिसला. त्यांनीं नुकतेच एक कोंकरूं मारलेलं दिसत होतं आणि त्याचं कातडं ते सोलीत होते. लाललाल रक्ताच्या चिळकांड्या वाळूवर उडाल्या होत्या आणि त्यांचे हात, कपडे नि तोंडंसुद्धां रक्तानें माखलीं होतीं. पण ते राक्षस मोठें खुशींत दिसत होतें आणि काम करतां करतां त्यांचं खिदळणं नि गाणंहि चाललं होतं; आणि त्यातलाच एकजण, आपल्या जवळच्या वाद्याच्या सुरावर वेडा विद्रा नाचत होता. त्यांचे कुत्रेंदेखील त्यांच्या भोंवतीं अर्धवर्तुळ

करून त्या कोंकरांकडे अगदीं टवकारून पहात बसले होते. त्यांना खूप भूक लागली असावी, कारण त्यांच्या त्या ओल्या लाल जिभा बाहेर लळलळत होत्या.

'ओः, काय हो करताहेत हे!' ताई भीतीनें शहारे देत किंचाळली 'खुनी मांग! गरूड नि गिधाडांपेक्षांदेखील वाईट आहेत हे!'

'अं हं, असेच नव्हे केवळ' थोडा वेळ विचार करुन लाँगनोझ म्हणाले. 'हे लोक आपलीं जनावरं वाढवतात, त्यांच्या वासरांची निगा राखतात, त्यांना खायला प्यायला घालतात आणि त्यांचं लांडग्यांबिडग्यांपासून संरक्षण पण करतात. याची भरपाई म्हणून त्यांच्या मांसाचा नि कातड्यांचा उपयोग करतात ते. पण ते मांसभक्षक पक्षी मात्र काम कांहीं करीत नाहींत, आणि कुणाचं पालनपोषणहि करीत नाहींत—आपले बळी असे बेफाटपणें उचलून नेऊन आपल्या स्वतःच्या पोटाचीच काळजी घेतात फक्त ते. म्हणजे ते नुसते लुटारूपणावर जगतात, आणि हे लोक आपल्या उद्योगावर. या दोन शब्दांतला फरक, पुढें मागें तुम्हांला कळेल बरं कां बाळांनो,

त्यांचं हे बोलणं पुरं होतं न होतं, तोंच त्या कुत्र्यांचं आमच्याकडे लक्ष गेलं आणि मोठ्या रागाने भुंकत भुंकतच ते आमच्या अंगावर धांवले. आम्हीहि अर्थातच पार घाबरुन वर उड्डाण केलं आणि हां हां म्हणतां त्यांच्यापासून खूप लांब गेलों.

त्या दलदलीच्या प्रदेशावर डांसाचिलटांचीं जशीं गडद ढगंच सारी रात्र एकसारखीं गुणगुणत उडत असत. पण आम्हांला मात्र त्यांचा अगदीं बिलकुल त्रास होत नसे. कारण आतां आम्हांला पीसं आलीं असल्यानें त्यांच्या चिवट थरांतून कडाडून घेतलेला चावा देखील आंत घुसूं शकत नव्हता. पण माणसांना, गाई—बैलांना, घोड्यांना, कुत्र्यांना, आणि आंगावर लव असलेल्या साऱ्या प्राण्यांना मात्र त्यांचा

मनस्वी त्रास होई. आणि त्यांतच मग त्या राखी, मोठ्या, घोड्यां-वरच्या माशा यांच्या मदतीला आल्या, कीं या साऱ्याजणांना तिकडे पश्चिमेकडे डोंगराच्या आड पळच काढावा लागे.

आमचीं पक्षिकुलं, मग त्या वैराण माळावर आपलं एकछत्री अधिराज्य गाजवीत आणि सुखानें कालक्रमणा करीत.

आमची आतां चांगली वाढ झाली होती आणि आम्ही जवळजवळ आईबापांएवढे दिसायला लागलों होतों. आमच्या वयाचे कितीतरी करकोंचे आमच्या वसाहतींत होते आणि आमच्या या आनंदी स्वच्छंदी बालगोपालांचे दिवस एकमेकांच्या संगतींत मोठ्या मजेंत नि गंमतींत चालले होते. आमच्यासारखींच बदकांच्या नि हंसांच्या पिलांच्या आंगावरहि आतां पीसं आलीं होतीं आणि आम्ही आतां नुसतेच वेडेवांकडे पिवळे गोळे नव्हतों राहिलों. आमच्या या तरुण मंडळींच्या आरडाओरडयानें नि खेळण्याबागडण्यानें आमचा तो सारा पाणथळी प्रदेश आतां कसा भरगच्च भरल्यासारखा दिसत होता.

आपल्या भटकंतीची लांबीरुंदीहि आम्ही आतां हळूहळू सारखी वाढवीत वाढवीत आणली होती, आणि मागें एका दिवसांत मोठ्या मुष्कीलीनें जेवढं अंतर आम्ही तोडीत होतों, तेवढं आतां फक्त एका तासांतच आम्ही सहज कापीत होतों. कधीं कधीं तर आम्ही एवढी भरारी मारीत होतों कीं रात्रीचा मुक्काम कोठल्यातरी परक्या प्रदेशांतच आम्हांला करावा लागे. आणि ती म्हण आहे तसं, एक डोळा उघडा ठेऊन आम्ही झोंप घ्यायलाहि शिकलों, आणि आळीपाळीनें आम्ही पहारा पण करूं लागलों. अशाच एका भटकंतींत एक मोठी भीषण घटना आमच्या डोळ्यांपुढे घडली; आणि आमच्या कोंवळ्या मनांवर त्याचा अविस्मरणीय असाच ठसा उमटला.

खूप लांबचा पल्ला मारला असल्यानें आम्ही खूप दमून गेलों होतों त्या दिवशीं. म्हणून आम्ही घाईघाईनें आपली अर्धवर्तुळाकार रचना केली आणि एका पायावर उभं राहून नि दुसरा पोटाशीं दुमडून घेऊन डुलकी घ्यायला लागलों. पण तेवढ्यांत आमच्या पहारेवाल्यांच्या कर्णकटु आरोळ्यांनी आम्ही जागे झालों आणि एकदम वर आकाशांत झेंप घेतली. आणि मग सभोंवार विखुरलेल्या चंद्रप्रकाशांत आम्ही खालीं नजर टाकली. एक मोठी गाय त्या दलदली मैदानावरून अवजडपणें दौडत होती, आणि भीतीनें वेडंपीसं झालेलं तिचं वासरूं तिच्या बाजूला पळत होतं. आणि–आणि चार लांडगे भेसूरपणें ओरडत, आपले शिवशिवत असलेले दांत करकरवीत नि जिभल्या चाटीत त्या मायलेकरांचा पाठलाग करीत होते. त्यांनीं आपले दुर्दैवी बळी केव्हांच गांठले होते आणि त्यांना वळसा घालून त्यांनीं त्यांचा मार्ग पार बंद करून टाकला होता.

'जरा जास्त जलद कां नाहीं पळत ती ?' तळमळून ताईनें विचारलं. पण उत्तराची वाट न पहातांच, ती गाय अशी आस्ते-आस्ते कां पळत आहे हें तिचं तिलाच कळून आलं. तिला आपला जीव अजूनहि बचावतां आला असता पण आपल्या असहाय वांसराला सोडून जाण्याची तिची इच्छा नव्हती.

त्या लांडग्यांना घाबरवून पळवून लावण्यासाठीं आम्ही शक्य तितका आरडा ओरडा केला आणि त्या गायीला मदत करण्याच्या खऱ्याखुऱ्या इच्छेनें त्यांच्या डोक्यावर पिसाटासारख्या चकराहि मारल्या. पण त्या क्रूर पशूनीं आमच्याकडे तिळभरहि लक्ष दिलं नाहीं. त्या गरीब बापड्या मातेवर त्यानीं आतां एकवटून हल्ला चढवला. तीहि आतां थांबून त्यांच्या आव्हानाचा स्वीकार करून उभी होती. नि मग तें भीषण विषमयुद्ध घनघोरपणें जुंपलं. त्या

चौघां क्रूर राक्षसांतल्या फक्त एकालाच आपल्या शिंगांनीं त्या गायीनें भोसकलेलं होतं. पण बाकीच्या तिघांनीं आपले दांत तिच्या नरडींत घुसवले नि ती बिचारी निरुपद्रवी गाय खालीं कोसळली. आणि मग तो कठोर राक्षसी खाना सुरू झाला नि त्याच्या नुसत्या दर्शनानेंच आमच्या आंगावरचीं पीसं ताठ उभी राहिलीं.

'कांही फारसं बिघडलं नाहीं,' कोणाचा तरी कर्णकटु आवाज आमच्या जवळच झाला. 'मला उरलं थोडं फार तर बरं होईल.'

एक मोठा लिंक्स–एक मांसभक्षक कोल्ह्यासारखा प्राणी–आपल्या कानांवरचे गोंडे हलवीत बुभुक्षित डोळ्यांनी तिकडे पहात उभा होता. आपल्या पायांचा आवाज न करतां एखाद्या मांजरासारखा, पळतपळत तो तिकडे आला होता आणि आपल्याला एक दोन उरले सुरले तुकडे मिळतील या आशेनें ती लढाई तो पहात होता.

'पाहिलंत ना रे,' आमचे गुरुजी म्हणाले, 'आपल्या या जगांत एकाच गोष्टीकडे पहाण्याचे भिन्नभिन्न दृष्टिकोन कसे असतात, तें पाहिलंत? जें पाहून आपल्याला घृणा नि भीति वाटली तेंच दृश्य पाहून या लांबकान्या बदमाषाला आनंद होतो आहे. एकाचा मृत्यु दुसऱ्याला जीवन देतो आहे. आणि वरवर पहातां, हे सर्व कांही जसं असावं तसं नि युक्तच आहे. तरी सुद्धां, आपण क्रौंच पक्षी वनस्पत्याहारी आहों; या गोष्टीचा मला आनंद वाटतो. आपल्या विवेकबुद्धीला तेवढंच जरा हलकं असं वाटतं!'

'आणि लहान लहान बेडक्या नि किडे?' आमच्या पोटपूजेची आठवण होऊन माझ्या मनांत आलं. पण आतां आमच्या डोळ्यांसमोर घडलेल्या त्या कठोर रक्तलांछित दुर्दैवी घटनेच्या मानानें, त्या बेडक्या नि ते किडे अगदींच क्षुद्र, नांव देखील न घेण्याइतके क्षुद्र असेच मला वाटले.

:: ३ ::

आम्हांला कळण्यापूर्वींच उन्हाळा संपतहि आला. दिवसेंदिवस सूर्योदय उशीरां होऊं लागला आणि संध्याछाया लौकर लौकर दाटूं लागल्या. रात्री सुखद उबाऱ्याच्या अशा वाटेनाशा झाल्या, आणि एक दिवस सकाळीं जागा होऊन पहातों तों आमच्या उंचवटयांवर मीठाची पूड विखुरल्यासारखी दिसली. हिमकणांची ही पहिली बरसात. माशा डांस नि चिलटं आतां चट सारीं अदृश्य झालीं. एक ती घोडयावरची माशीच काय ती दुपारच्या उन्हानें सुखाऊन एकाकी अशी भणभणूं लागे.

आमच्या दलदलीच्या कांठावर धनगरांच्या शेकोटयांचा धूर आतां बहुतेक दररोज दिसूं लागला आणि जळक्या पानांचा वास वाऱ्यालाहि कायमचाच येऊं लागला; नि सृष्टींत आतां कांहीतरी मोठाच बदल घडूं पहात आहे असं साऱ्यांनांच वाटूं लागलं.

'शरद् ऋतूची चाहूल, आणि त्याच्या पाठोपाठ कडक नि प्रदीर्घ अशा हेमंताची पाऊलं, सुरू झालीं आहेत," आमच्या वृद्ध दोस्तांनीं, लाँगनोझनीं आम्हांला सांगितलं, आणि त्या दिवशीं सायंकाळच्या बैठकींत दक्षिणवारीची शक्य तर तारीख ठरवावी, अशी त्यानीं सूचनाहि आणली.

बैठकींत लाँगनोझच्या सूचनस संमति मिळाली, पण आमच्या वसाहतीचं लढाऊ सामर्थ्य विचारांत घेतां असं ठरलं कीं, उत्तरच्या कुमकेचीं वाट पहावी आणि उत्तर क्रौंचांच्या टोळयांना आपल्या या पाणथळीवर एकदोन दिवस विश्रांति घेण्यास सांगून मग सगळयांनीं एकदमच दक्षिणेकडे कूच करावं.

'मोठमोठे जमाव करून उड्डाण करणं हें सर्व दृष्टीनेंच श्रेयस्कर आहे,' आमच्या गुरुजीनीं आम्हांला सांगितलं. 'कारण एक तर

त्यामुळें संगतीसोबतीचा आनंद लुटतां येतो; दुसरं म्हणजे, जबाबदार माणसांना वारंवार खांदे पालट झाल्यानें पुष्कळच हलकं वाटतं, आणि मुक्कामाच्या जागींहि त्यामुळें फायदाच होतो. कारण कधीं कधीं मुक्कामाच्या सोईस्कर जागा दुसऱ्या प्रवाशानीं आधींच अडवलेल्या असतात. आणि आपला जमाव जर लहान असला तर ते आपल्याला खालीं उतरूं देखील देणार नाहींत. पण तेंच आपला जमाव मोठा असला, तर तुम्हांला लागेल ती जागा मिळेल, आवश्यक तर, दंडेली करूनहि.'

'मी जेव्हां कैरोंत होतों—म्हणजे ईजिप्तमधें,' मधें बोलल्यावांचून न राहवल्यामुळें ट्रायफ्लर म्हणाला--'त्या वेळीं मी एकटा नि दुसऱ्या बाजूला हजारों कबूतरं नि स्वॅलो—एक प्रकारची पाकोळी--एका मशीदीच्या सोनेरी घुमटावर होतों, पण माझ्या मनाची क्षणभरदेखील चलबिचल नाहीं झाली, आणि-- '

'मेहेरबानी करून पुरे करा,' माझ्या बाबांनीं त्याला मधेंच गप केलं. 'आपल्या शौर्यशाली आगमनानें कच खाऊन माघार घतलेल्या त्या हजारो कबूतरांपेक्षांहि अधिक वेळां ऐकली आहे आम्ही ही गोष्ट.'

'मला वाटलं ही योग्य वेळ आहे तें सांगण्याची,' ट्रायफ्लर कुरकुरला, आणि तो बदकांच्या कंपूकडे सटकला. कारण आम्हा करकोंच्यांपेक्षां त्याच्या गप्पांना तेच लायक श्रोते होते.

त्या दिवशीं ठरल्याप्रमाणें मग चांगले विश्वासू असे वीसएक करकोंचे चहूंकडे वेगवेगळ्या दिशेला पाठवले गेले. दक्षिण दिशला निघालेल्या करकोच्यांच्या इतर टोळ्यांना शक्य तर गांठून नि त्यांच्याशीं बातचीत करून त्यानां या एकत्र मेळाव्यासाठीं आमच्या या पाणथळीवर येण्याचं आमंत्रण देण्याची कामगिरी या वीस जणांवर सोंपवली होती.

आमच्या या प्रयत्नाचं फळ म्हणून तीन दिवसांतच आमच्या या पाणथळीवर इतके करकोंचे गोळा झाले कीं मैदानावरील लहानमोठे सारे उंचवटे नि सपाट जागा आमच्या या सुंदर भाऊबंदांनीं पार झांकूनच गेल्या आणि चहूंकडे एकच गजबजाट उडाला.

आमच्या शेजारच्या बदकांनीं कांहीं दिवसांपूर्वींच दक्षिणेस प्रयाण केलं होतं. कारण त्यांची उडण्याची गति फार मंद असते नि त्यामुळें वेळ गमावण्याची त्यानां मुळीं सोयच नसते.

त्यांतूनहि हलक्या जातींच्या, स्नाइपसारख्या पाखरांनीं त्यांच्याहि पूर्वीं आपला हा वार्षिक प्रवास सुरू केला होता, आणि त्यांना निरोप देतांना आम्ही ' शिवास्ते पंथानः ' असं म्हणून, आलोंच आम्हीहि तुमच्या पाठोपाठ तुम्हांला भेटायला, असं त्यांना सांगितलं होतं.

आमची प्रयाणाची वेळ आज रात्रींची ठरली होती. त्यामुळें गेला सारा दिवस विश्रांतिसाठीं म्हणून आम्ही घरींच काढला होता. सर्व तयारी आतां पुरी झाली होती. आमच्या सर्व सैन्याचे अनेक त्रिकोन पाडले होते--प्रत्येक त्रिकोनांत तीस करकोंचे. प्रत्येक त्रिकोनाच्या म्होरक्यांची, नि विश्रांतिकालांतील पहारेकऱ्यांची यादी नि त्या प्रत्येकाचीं कामं, अगदीं सारा प्रवास पुरा होईपर्यंतचीं, अशी शिस्तबद्ध योजना आंखून तयार होती.

आम्हा बाबालोकांची तर गडबड विचारूंच नका. या दीर्घ प्रवासाची आम्हांला कांहींच कल्पना नसल्यानें, मनोरंजक मनोरथांच्या वावड्या उडवण्यांत तो सारा दिवस आम्ही अगदीं गुंग होतों. कारण त्या दिवसाची आम्ही कितीतरी दिवस वाट नव्हतों का पहात ? आणि म्हणूनच आमच्या वडीलधाऱ्या माणसांना शांतपणें डुलक्या घेतांना पाहून आणि सायंकाळ होत आली तसं आपली मायभूमि सोडून जाण्याचं त्यांच्या जीवावर येत असल्याचं पाहून आम्हांला मोठं नवलच वाटत होतं. आम्हांला तरी तो दिवस किती वेळचा संपतच नाहीं असं वाटत होतं नि तो सूर्यनारायण रेंगाळतो आहे म्हणून

त्याचा राग येत होता. आणि नवल म्हणजे, एके काळच्या आमच्या या आवडत्या मायभूमीचा आम्हांला कंटाळाच येत होता.

सायंकाळ झाली आणि सूर्यास्ताला सारं आकाश इतकं लाली-लाल झालं कीं ती सारी पाणथळ आगीचा लोळ उसळल्यासारखी दिसूं लागली. सारं वातावरण अगदीं शांत निश्चल होतं. आम्ही आपले त्रिकोन–गट तयार केले नि उड्डाण करण्याच्या खुणेची वाट पहात बसलों. सभोंवार मिट्ट काळोख पसरला. आमच्या सर्व सैन्याचे प्रमुख नेते म्हणून लाँगनोझची निवड झाली होती नि ते माझ्याच त्रिकोनांत होते. आमच्या त्रिकोनाचं नेतृत्व, माझे बाबा क्लॅरिअन ट्रंपेटर, यांचेकडे होतं.

प्रकाशाची उरलीसुरली छटा क्षितिजापलीकडे काळोखी धुक्यांत पार बुडाली, नि तत्क्षणीं म्होरक्याची खुणेची खणखणीत शीळ सभों-वार दुमदुमली. दुसऱ्या असंख्य शीळा प्रत्युत्तरादाखल वर उठल्या आणि आमचा त्रिकोन हळूहळू वर उठला नि लयबद्ध गतीनें साव-काश पंख हलवीत आरंभीं उंचवट्यांजवळच नि मग क्रमाक्रमानें उंचउंच असा झेंपाऊं लागला. माना कांहीशा आखडून चोंच सरळ पुढें खुपसल्यासारखी आणि आपले लांब पाय जुळून मागें फेकलेले, असे आम्ही आपली ओळ धरून चाललों होतों. आम्ही पुढले असे हवा कापीत सरळ ओळींत निघाल्यामुळें त्याचा फायदा मागल्यांना मिळून त्यांचं उड्डाण सुलभ होत होतं, नि त्यामुळें आमच्यापैकीं प्रत्येकालाच क्रमानें आघाडीवर येऊन उडावं लागत होतं. पण या योजनेमुळें उड्डाणांतील जादा श्रम सारखे वाटले जाऊन त्यांचा त्रास वाटत नव्हता.

आम्हीं वर आकाशांत जसजसे उंच जाऊं लागलों तसतसा खालचा भूभाग अधिकाधिक मिट्ट काळोखी असा दिसूं लागला. सरोवरांचं नि नदीनाल्यांचं पाणी मधूनच चमकत होतं नि मनुष्य

वस्तींतील झोंपड्यांतून अंधुक प्रकाश किरणहि आम्हांला मधूनमधून दिसत होते. यांच्या जोडीला कधीं कधीं खेडवळांचं संगीत नि कुत्र्यांच्या भुंकण्यांचा आवाज घुमत घुमत येत होता आणि त्यांतच दुरून कुठून तरी गाईच्या कळपाच्या अनुरोधानें निघालेल्या रक्त-पिपासू क्रूर लांडग्यांच्या आरोळ्याहि आमच्या कानीं येत होत्या. पण मग लौकरच हे सारे आवाज बंद झाले आणि फक्त आमच्या पंखांचा जोरदार आवाज, आणि आम्ही तो थंडगार हवेचा समुद्र कापीत जात असतां त्याचा होणारा सूं सूं असा आवाजच काय तो त्या दीर्घ शारदीय निशेची शांतता मोडीत होता.

किती गंभीर तो क्षण! आम्ही लहान मंडळी तर जशी श्वास घ्यायलाहि दचकत होतों. आमचे सारे विचार एक त्या उड्डाणावरच एकवटले होते. इतरांच्या बरोबरीनें, अगदीं त्याच गतीनें पंखांची हालचाल करायची, आपली ओळ दोरीसूत कायम टेऊन, अंतर बरो-बर राखायचं, याच गोष्टींचं फक्त आतां काय तें महत्त्व होतं. आम्ही अगदीं मुक्यानें अंतर काटीत होतों आणि आमची जागांची अदलाबदल देखील एक अवाक्षरहि न उच्चारतां आम्ही उरकीत होतों. सभोंवार पसरलेला रात्रीचा तो काळोख--आमच्या स्वतःच्या त्रिकोनाचा देखील आगापीछा आम्हांला दिसत नव्हता--आमच्या त्या लयबद्ध गतीचं गांभीर्य वाढवीतच होता. अखेरीस एकदां आमच्या त्या महान प्रवासाचा प्रारंभ आम्ही केला होता नि आमच्यांपैकीं एकालाहि प्रवासश्रम म्हणून भासत नव्हते. निशाकाल संपून पूर्वदिशेचे मुख उजळूं लागल्यावरच काय तें आमच्या लक्षांत आलं कीं आमचे पंख जड झाले आहेत, आमच्या पायांना ताठ राहाणं अवघड जात आहे, आणि आमच्या चोंचींच्या टोंकाला दगड बांधल्यासारखं वाटतं आहे नि त्या आमच्या निश्चयाला न जुमानतां खालीं खालीं वांकताहेत, आणि आमचीं

निद्राजड मस्तकंहि सुंद होऊन त्याच्याबरोबरच खालीं लोंबत आहेत.

विश्रांतीचा विचार करण्याची आतां वेळ झाली होती, आणि म्हणून लाँगनोझनीं इशाऱ्याचा आवाज करतांच आम्हीं हळूहळू तरंगत--पण हा सर्व वेळ आपली लष्करी रचना कायम ठेऊनच--खालीं येऊं लागलों आणि पूर्वीं कधींच न पाहिलेल्या त्या नवीन प्रदेशावर आम्ही पाऊल टाकलें.

आम्ही रात्रीं काटलेलं अंतर बरंच होतं कीं नाहीं हें मला कांही निश्चितपणें सांगतां येईना, म्हणून मी आपल्या बाबानांच प्रश्न केला. पण उलट तुझं काय मत आहे, असं त्यानींच मला विचारलं.

'आम्ही तीन दिवसांत जात असूं तितकं अंतर आपण तोडलं असं वाटतं मला,' मी म्हणालों.

'सुंदर ! म्हणजे याचा अर्थ पहिल्या झडपेंत आपण चांगलीच मजल मारली,' सभोंवार पहात बाबा प्रेमळपणें म्हणाले. 'हं, काय बाबा लोक ! दमलांत कायरे ?'

'मुळींच नाहीं,' आमची ताई चिर्वचिवली, आणि आपलं डोकं डाव्या पंखाखालीं खुपसून नि उजवा पाय वर दुमडून ती तावडतोब झोंपी गेली; आणि तिच्या जशी अगदीं नाकाजवळच बहरलेलीं तीं सुंदर रसाळ पिकीं क्रेनबेरीज, तिनें ढुंकून पाहिलीं देखील नाहींत.

पण मला मात्र नवीन दृश्यांची ओढ असल्यानें मी सभोंवार नजर टाकली, पण आमच्या या पहिल्या विश्रांतिस्थानीं कांही नवीन किंवा वेगळं असं मुळीं नव्हतंच. सारं दृश्य आमच्या घराच्या आसमंतासारखंच बहुतांशीं मला दिसलं. म्हणून आमच्या ताईचंच अनुकरण करण्याचं मी ठरवलं. पण त्यापूर्वीं उजवीडावीकडे आपली चोंच मात्र त्या बेरींमध्यें मी खुपसली. पण हें आपलं मोठ्या क्रौंचांचं अनुकरण करावं म्हणूनच; कारण झोंपेनें मी विलक्षणच पेंगुळलों होतों--मग खातों कसला !

:: ४ ::

आम्ही फार वेळ नव्हतों झोंपलों. आम्हीं जागे झालों तेव्हां सूर्य नुकताच उदयाचलावर आला होता आणि आम्ही आपले पेंगुळलेले जड डोळे आळसतच उघडले. पण किती तरी नवीन नि मनोरंजक गोष्टी सभोंवार पसरल्या असल्यामुळें साऱ्या दिवसांत आम्हांला मग डोळ मिटतांच नाहीं आले.

आम्ही एक लहानसंच उड्डाण केलं आणि एका घोघावणाऱ्या छोटचा ओढ्याजवळच्या दलदलीवर खालीं उतरलों. ओढ्याच्या कांठावर हिरवंगार गवत नि झुडपं पसरलीं होतीं. जवळच एक छोटंसं खेडेगांवहि दिसत होतं. त्यांतल्या त्या नवीनच बांधलेल्या लहानखोऱ्या घरांच्या कांचेच्या खिडक्या--सभोंवार जाळीदार खोदकाम केलेल्या—सूर्यप्रकाशांत चकाकत होत्या. गांवापलीकडे पिवळट शेतांच्या रांगा पसरल्या होत्या आणि त्यांमधून नीटस गंजींच्या रांगा लागल्या होत्या.

'कापलेल्या पीकांच्या या गंजी रचल्या आहेत ना,–' लँगनोझ आम्हांला सांगूं लागले, 'त्यांत चोंच मारण्याची मोठी गंमत असते–फायदेशीर असतं तें;' आणि त्यांचं म्हणणं अगदीं खरं होतं असं आम्हांलाहि लगेच कळलं.

त्या शेतांच्याहि पलीकडे अनेक वृक्षांच्या राई होत्या--आधीं काळसर फर वृक्षांचे पट्टे, आणि मग पिवळ्या पानांचे नि रुपेरी आंगाचे बर्च झाडांचें बेट. याच्याहि पलीकडे दूर दुसरींहि कांहीं गांवं दिसत होतीं आणि त्यांतील देवळांचे पोपटी रंगाचे घुमट नि सोनेरी क्रूस मोठे सुंदर वाटत होते. चहूं दिशांना पसरलेल्या, वळणा वांकणांच्या निरुंद रस्त्यांनीं ही खेडीं एकमेकांना सांधलीं होतीं एक-

रस्ता मात्र अगदीं जसा सरळ सोट गेला होता. याच्या दोन्ही अंगांना बारीक खांबांच्या रांगा आणि त्यांना तारा बांधलेल्या होत्या. आणि आम्ही पाहिलं कीं, त्या अरुंद रस्त्यानीं सहज नि आवाज न करतांना पळणाऱ्या गाड्या या सरळ सोट रस्त्यावरून पळूं लागल्या कीं त्यांचा जसा गडगडाट झाल्यासारखा आवाज येत होता; आणि या आवाजानें आम्ही आरंभीं तरी पार घाबरून गेलों.

आमच्याकडल्या पेक्षां इथे माणसंहि पुष्कळच दिसत होतीं. जिकडे पहावें तिकडे बायकांचे पांढरे ब्लाऊझ नि लाल रुमाल दिसत होते; आमच्या अगदीं जवळच--पंखांची बीसएक झडप म्हणा--गुरांचा एक कळप चरत होता नि त्यांच्या घंटा वाजत होत्या. त्यांचा तो ठेंगू गचाळ गुराखी मला मुळीच नाहीं आवडला. हातांतला लांबदोरीचा चाबूक ओढीत ओढीत नि भाकरीचे तुकडे चघळीत चालतां चालतां आमच्याकडे पहात होता कसा राक्षसासारखा. मुळींच आवडला नाहीं मला तो.

'गेल्या वर्षीं नव्हती एवढी गर्दी, नाहीं ?' लागनोझ माझ्या बाबांना म्हणाले.

'असल्या या दाटीवाटींत मुलांकडे लक्ष देणं कठीणच,' आई म्हणाली.

'हलूं या तर इथून,' बाबांनी सुचवलं.

आमच्या म्होरक्यांनीं मग एकत्र विचार केला आणि तावडतोब तळ हलविण्याचा हुकूमहि सुटला. नदीच्या पलीकडल्या तीराकडे आम्हीं मग उड्डाण केलं, ती बर्च वृक्षांची राई मागें टाकली आणि एका सुंदर अशा मैदानावर खालीं उतरलों. पहिल्यापेक्षां इथे आडोसाहि जास्त होता.

ट्रायफ्लरच्या नेतृत्वाखालचा दुसरा एक आमचा त्रिकोन आम्हांला तिथे भेटला. नाना चार करून त्या प्राण्याचं डोकंच फिरलं आहे,

असं त्यांतल्या करकोंच्यानीं सांगितलं. आम्ही काय म्हणतों समजलं का? महत्वाच्या ऐतिहासिक ठिकाणीं किंवा तशाच इतर मनोरंजक ठिकाणीं, मोठे मोठे प्रवासी आपलीं नांवं खोदून ठेवतात, असं त्यानें ऐकलं होतं. त्यांचं अनुकरण करावं म्हणून भल्या पहांटे लोक अजून उठलेले नाहींत याचा फायदा घेऊन गांवच्या मुख्य अधिकाऱ्याच्या–शेरीफच्या घराच्या चिमणींतूनच ही ट्रायपलरची स्वारी खालीं गेली. पण खालीं डोकं खुपसून या बुवांनीं तिथें आपलं नांव खोदण्याचा प्रयत्न केला मात्र, त्याच क्षणीं खालून धुराचा भला सपाटा लोट वर उसळूं लागला नि हे बुवा गुदमरले. सुंद होऊन हे महाराज खालीं अंगणांत आदळलेच होते जवळजवळ––आणि अंगणांत एक भला मोठा केंसाळ कुत्रा नि हातांत एक सोडगं घेऊन एक म्हातारी यांच्या स्वागतासाठीं उभी.

'तरीपण, मी आपल्या नांवाचं पहिलं अक्षर लिहिलंच तिथें,' ते "मोठे प्रवासी" ऐटींत म्हणाले.

पण तें खरं कीं खोटं हें ठरवण्याचं कांहींच साधन नसल्यामुळें आम्ही तें खरं असंच धरून चाललों.

'एखादे दिवशीं या प्राण्यानें सगळा त्रिकोन नाहीं खाड्यांत घातला तर सुसर मला गिळो किंवा गरुड मला फाडून मारो,' बाबा म्हणाले

'सुसर म्हणजे काय हो बाबा?' माझ्या ताईनें विचारलं.

'सुसर? दिसेल बरं का एखादे दिवशीं' बाबांनीं उडवाउडवी केली.

'सुसर, ऐकलंस का छबुताई, म्हणजे एक मोठ्ठा दुष्ट नि क्रूर प्राणी असतो.' एका वृद्ध करकोच्यानें माहिती पुरवली. पण याच वेळीं आकस्मिकपणें कसला तरी मोठा आवाज आमच्या कानीं आला. त्या फर वृक्षांत एक आगीची ज्योत चमकन चमकली आणि त्यांच्या काळ्या फांद्यांतून फिकट धूर वर चढला.

सुसरीची गोष्ट पुरी करण्याला आतां मुळीं वेळच नव्हता. कारण आम्ही एकदम वर उठून दूर उडालों आणि चांगले अर्धा एक तास उडाल्यानंतर एका सुरक्षित अशा जागीं येऊन खालीं उतरलों.

'हें, आत्तां तुम्हीं जें ऐकलंत ना रे बाळानों,–' आमच्याच वयाच्या क्रौंच बच्यांना बाबा म्हणाले, 'तेंच सर्वात भयंकर बरं का या जगांत. अगदीं भीषणांतला भीषण धोका यामध्येंच असतो. सारे शाबूत आहेत ना?'

सगळ्यांच्या आंगावरून एक घिरटी मारून येऊन नि साऱ्यांकडे नीट पाहून आलेले लाँग नोझ आम्हाला धीर देत पुढे आले.

'होय, देव दयेनें सारे सुरक्षित आहेत !'

'पण काय होतं हो तें ? आम्हाला कळायला हवं होनं.'

'शिकारी लोक' बाबा म्हणाले.

'हे लोक बरोबर बंदुकी बाळगतात, लाँगनोझनीं स्पष्टीकरण केलं, 'आणि माझा तुम्हां सर्वांना असा आग्रहाचा सल्ला आहे, कीं जेव्हां केव्हां तुम्हाला ते दिसतील––तेव्हां चार पावलं दूर रहा. ! जीव रक्षण आधीं.'

'पण पहाऱ्यावर कोण होतं? कोणाची होती पाळी?' मोठ्यांतल्या अनेकांनीं रागारागानें विचारलं.

तो ट्रायफ्लरचा गुन्हा ठरला आणि त्याला असा कांहीं हादरा देण्याची शिक्षा केली कीं मला नि ताईला त्याची कींव आली.

'आपल्या कायदे कानूंचा कठोरपणा आपण सांभाळलाच पाहिजे. अनेकांचा जमाव जेव्हां वागवायचा असतो, त्यावेळीं शिस्तीचं महत्व सर्वश्रेष्ठ असतं, आणि यावेळीं, सुदैवानें, कुणाला प्रत्यक्ष इजा जरी झाली नसली, तरी शिक्षा ही योग्यच होती,' एक वृद्ध करकोंचा म्हणाला.

ट्रायफ्लरनें आपले चुरगळलेले पंख उडवले आणि त्या तत्वज्ञान सांगणाऱ्या करकोंच्याकडे एकदां तिरस्कारानें पाहून तो आपल्या पहाऱ्यावर गेला.

तो सारा दिवस नि नंतरची सारी रात्र त्याच ठिकाणीं विश्रांती घेऊन घालवायची असं सर्वांचं ठरलं होतं. कारण दुसऱ्या दिवशीं सकाळपासून सायंकाळपर्यंत सतत प्रवास करण्याचा आमचा विचार होता.

'पुष्कळ वस्ती असलेल्या प्रदेशांवरून उडत असतांना ही पद्धति जास्त सोईस्कर असते,' आमच्यांतले वृद्ध म्हणाले.

त्या दिवसभरांत आम्ही आपला तळ बरेच वेळां हलवला, आणि सायंकाळच्या सुमारास ज्या शेतांत मळणी न काढलेल्या गंजी होत्या तिथे आम्ही गेलों; ते गोड गोड दाणे खात असतां, हें करण्याचा आम्हाला कांही हक्क पोंचतो का, आमचं हें कृत्य न्याय्य आहे का, असा विचार आम्हा लहान पोरांच्या मनांत आला. पण आमच्यांतल्या वयोवृद्धानीं आमच्या विवेकबुद्धीला शांत केलं. त्यांचं म्हणणं, जे लोक निष्कारण नि एकसारखे आमच्या जीवावर उठलेले असतात त्यांचा सूड आपण त्यांना असं लुटूनच काय तो घेऊं शकतों.

'हें ऐकून ठेवा, बरं का हो सारे लोक,' एक भरघोस बालींची लोंबी मटकावीत पंडीत लॉंगनोझ म्हणाले, 'कीं, हीं माणसं आपल्याला मारून खातात, आणि त्याशिवाय म्हणजे, त्याची पूर्वतयारी म्हणून व्हिनिगरमध्यें आपल्याला मुरवून ठेवतात.'

ती रात्र अगदीं शांतपणें पार पडली.

: : ५ : :

आमच्या प्रवासाच्या तिसरे दिवशीं आम्ही पाहिलेलीं दृश्यें इतकीं विलक्षण नि थक्क करणारीं होतीं कीं त्यांची मला विस्मृति होणंच अशक्य आहे.

त्या दिवशीं दिशा फांकतांच आम्ही उठलों आणि त्या फर-वृक्षांच्या माथ्यांजवळूनच उडत निघालों. दिवस उजाडतांच आम्ही उंच जाऊं लागलों. पंखांच्या प्रत्येक हालचालीबरोबरच जणूं काय खालील विहंगम दृश्याचं सौंदर्य आतां वाढूं लागलं. एका विशाल नदीच्या पात्रावरून आम्ही चाललों होतों. तिच्या दोन्ही थडींवर कितीतरी देवळांची नि घरांची गर्दी आम्हांला दिसत होती. यापूर्वी इतकी दाटी आम्ही कधींच पाहिली नव्हती. तसेंच ते सरळसोट रस्तेहि आम्हांला आतां बरेच दिसत होते आणि त्यावरून चाकं असलेल्या घरांच्या सबंध रांगाच धांवत सुटल्या होत्या नि त्यांच्या आघाडीला एक भला मोठा राक्षस धांवत होता. त्या राक्षसाला जळजळीत डोळे होते नि एक लांब धुराळ शेपूट होती. पण यानंतर दुपारीं जें कांहीं आमच्या दृष्टीस पडलं, त्या मानानें हें कांहींच नाहीं असंच म्हटलं पाहिजे.

आमच्या समोर एक विशाल नगर पसरलं होतं. त्याच्या देवळांचीं सुवर्ण शिखरं सूर्यप्रकाशांत झळाळत होतीं आणि तीं इतकीं दिसत होतीं, आणि तीं देखील एकाहून एक अधिक सरस, कीं, सारं नगर नुसत्या एक देवळांचंच वसवल्यासारखं दिसत होतं. उंच टेंकड्यांवर हें शहर विखुरलं होतं आणि वर मधूनमधून सुरेख पूल असलेल्या एका जलवाहिनीनें त्याचे जसे दोन सारखेच भाग करून

टाकले होते. कृष्णवर्ण बागांच्या पार्श्वभूमीवर, शारदीय शोभा आतां त्यांच्यावर पसरल्यामुळें, ते प्रशस्त दगडी राजवाडे मोठे मोहक दिसत होते लहानमोठ्या रस्त्यांचं एक जसं जाळंच सारं शहरभर पसरलं होतं. हजारों लोकांची पायदळ त्यावरून सारखी चालली होती आणि त्यांच्या बोलण्याचा आवाज आणि त्यांच्या गाड्यांची धडधडहि मधूनच आमच्या कानांवर येत होती. पण या सर्व आवाजांत, आम्ही शहराकडे येत असतां आमच्या कानांवर मंदपणें पण मोठ्या सुरेलपणें येऊन आम्हांला मुग्ध करून सोडीत असलेला एक नाद, आतां इतर सर्व आवाजांना मागें टाकून आमच्या सभोंवारच्या त्या सुखद शारदीय वातावरणांत जसा ओसंडून वहात होता, आणि आम्हीहि भारल्यासारखे त्या आवाजाच्या लयीचीच आपल्या पंखांनीं जणुं साथ करीत उडत होतों. आमच्या देशाची दिगंत कीर्ति नेणारा हाच तो देवळांतील घंटानाद.

'किती विलक्षण ! किती सुंदर !' आपले डोळे अर्धवट मिटून निरतिशय आनंदानें ताई पुटपुटत होती.

पण शहरांतल्या एका चौकांत आपल्या जातभाईंना पाहून मला जें कमालीचं आश्चर्य वाटलं, त्याची तुम्हांला कल्पना येणं अगदीं अशक्य आहे--मी काय म्हणतों कीं ते प्राणी आम्हा करकोंच्यांसारखेच एका पायावर उभे होते नि दुसरा त्यानीं खालीं मुडपला होता ! मी ती बातमी ताबडतोब त्रिकोनांतल्या माझ्या शेजाऱ्यांना दिली, आणि तशीच ती पसरत पसरत माझ्या बाबांच्या कानीं गेली आणि तो घंटानाद कानांत घुमत होता तरी त्यांच्या हंसण्याची तुफानी लाट नि लँगनोझचं वक्तव्य माझ्या कानावर आलंच.

'करकोंचे नाहींत ते; ते लढाऊ शिपाई !'

'म्हणजे कोण ?' आम्ही विचारलं.

' म्हणजे बंदुकी घेतलेले लोक; पण या बंदुकींची शिकाऱ्यांच्या बंदुकींइतकी आपल्याला धास्ती नाहीं.'

' पण ते असे आपल्यासारखे कां उभे राहातात ? ' आमच्या चौकस वहिणाबाईंना प्रश्न पडला.

' चांगल्याचं अनुकरण लोक नेहमींच करतात. ' लॅांगनोझनीं त्या प्रश्नाचा निकाल लावला.

त्या क्षणीं आम्ही त्या शहराच्या अगदीं मध्यभागावरून चाललों होतों. त्याचं नांव आमच्या पंडीतानीं आंम्हांला सांगितलं होतं, आणि माझी स्मृति जरी उत्कृष्ट असली तरी तें मी विसरलों आहे एवढं मात्र खरं. पण असं जरी असलं तरी त्या शहराचे कांही विशेष मी आपल्याला वर्णन करुन सांगणार आहें. त्यांवरून तुम्हांला कदाचित त्याची ओळख पटेल.

शहराच्या मध्यभागीं असलेल्या टेकडीभोंवती एक रुंद दंतुर असा तट उभारलेला होता आणि त्यावरील कित्येक बुरूज खालीं अगदी नदीच्या पात्रालाच जसे भिडले होते. या तटांच्या नि नदीच्या मध्यें अनेक सुंदर हिरवींगार कुरणं नि वृक्षांच्या राई पसरल्या होत्या. तटांच्या मागे नि त्या मोकळ्या आंतील बाजूच्या मध्यभागीं सोनेरी छपराचा एक प्रशस्त वाडा उभा होता आणि या वाड्याच्या सभोंवार अगणित देवळांचें उंच घुमट, यांतलाच एक साऱ्या शहरांत अत्युच्च असा होता, विखुरले होते. याच अत्युच्च घुमटावरील घंटेचा तो मधुर झंकारत असलेला नाद, इतर सर्व आवाजांना जसे पार बुडवून टाकून आमच्या कानीं आला होता. आमचे बाबासुद्धां, सगळयांचं लक्ष वेधण्यासाठीं आमच्या मंडळाच्या बैठकींत, अगदीं अशाच खणखणीत पण नादमधुर आवाजांत सुरवात करीत.

हें शहर जरी खूपच मोठं होतं तरी तें ओलांडायला आम्हांला फारसा वेळ कांही लागला नाहीं, आणि सायंकाळपर्यंत आम्ही खालीं न उतरल्यामुळें त्या दिवशीं आणखीं अनेक शहरं नि गमतीदार देखावे आम्ही पाहिले. आणि जेव्हां केव्हां मी या साऱ्या दृश्यांची आमच्या मायदेशाशीं तुलना करतों--पण काय हो, कसली तुलनाच मुळीं होणं शक्य नाहीं इथे. कारण आमचा तो उदास पाणथळ प्रदेश, पासापुरतेंहि गूण मिळवूं शकत नव्हता ! आपल्या 'मायभूमी'विषयीं जो तो बोलत असतो, पण मायभूमी म्हणजे काय ? आंधळ्या योगायोगानें पदरांत पडलेलं कुठलं तरी ठिकाण. मग तें एवढं प्रिय कां असावं ? आणि इथे नजरेस पडत असलेलं प्रत्येक ठिकाण, प्रत्येक बारीकसारीक गोष्ट त्यापेक्षां इतकीं सुंदर नि छानदार आहे कीं, आपल्या जन्मभूमीबद्दल होत असलेला हा गाजावजा मला तर मुळीं कळतच नाहीं.

'पुढें कळेल तुला तें,' एक वृद्ध करकोंचा म्हणाला.

त्याच्या त्या उद्गारानें मला स्वतःची लाज वाटली. माझं हें स्वगत असं मोठ्यानेंच चाललं होतं म्हणूनच नव्हे, तर आंतून माझ्या अंतरंगांतूनहि मला कोणी सांगत होतं कीं माझी ही विचारसरणी पार चूक होती नि शिवाय वेडगळपणाचीहि होती.

: : ६ : :

त्या दिवशीं आम्हीं जें अंतर तोडलं तें पहिल्यापेक्षां बरंच कमी होतं असं आम्हांला वाटलं. पण आम्ही पाहिलेल्या अनेक मनोवेधक गोष्टींमुळेंच आम्हांला असं हें स्थलकालाचं भान उरलं नव्हतं. सायं-काळच्या सुमारास एका विस्तीर्ण अशा कुरणावर ॲस्पनच्या राईंत आम्ही उतरलों.

कांही विलक्षणच शांतता या ठिकाणीं नांदत होती.

आमच्या टेहेळ्यांच्या म्हणण्याप्रमाणें, अगदीं जवळची मानवी वस्ती दोनएक मैलावर होती आणि ॲस्पनवृक्षांनीं रस्त्याच्या बाजूला आमच्या भोंवतीं जसा अभेद्य कोटच उभारला होता. कुरणाच्या मधून एक ओहोळ वहात होता, आणि आमचा त्रिकोन खालीं उतरतांक्षणींच, रात्रीच्या मुक्कामासाठीं आलेला प्लव्हर्सचा एक थवा, घाईघाईनें त्याच्या कांठावरून वर उडाला.

त्यांना आश्वासन देण्यासाठीं बाबा ताबडतोब त्यांच्याकडे गेले आणि आमच्या संरक्षणाखालीं राहून शांतपणें झोंपीं जाण्यासाठीं त्यांनीं त्यांना आमंत्रण दिलें. आमचं तें आमंत्रण त्या चिमुकल्या पाखरांनीं आनंदानें स्वीकारलं आणि त्यासाठीं कृतज्ञपणें आमचे ऐसपैस आभारहि मानले.

' इतक्या लौकर आम्ही तुम्हांला येऊन गांठूं अशी आमची कल्पना नव्हती. आम्हांला वाटलं होतं तुमची आमची दक्षिणेला बरीच खालीं अशी गांठ पडेल,' लॉंगनोझ त्यानां म्हणाले.

' प्रयोजन काय घाई करण्याचं ? ' एका प्लव्हरनें उत्तर केलं. ' हवा अजून चांगली गरम आहे आणि सगळीकडे किड्यांची पण सुबत्ता आहे, म्हणून आपले आस्ते कदम चाललों आहोंत. '

' तुमचा हा वेडेपणा आहे असं वाटतं मला, ' आपली नापसंती दर्शवीत आमचे प्रमुख म्हणाले. ' तुम्ही इथ रेंगाळतांहांत तोंच हिमकणांची बरसातहि यायची एखादेवेळीं. मग काय करणार आहांत तुम्ही ? तुम्ही सारे गारठून मराल. आलांत कुठून तुम्ही ? '

एका प्लव्हरनें कांहींसं नांव सांगितलं. तें एकून लॉंगनोझ अतिशय चकीत झाल्यासारखे दिसले.

' असं ! आम्ही कालच आलों त्यावरून. आणि तुम्ही निघालांत कधीं ? '

' सहावा दिवस आजचा. आम्हांला जलद नाहीं जातां येत हें माहीतच आहे तुम्हांला. '

' तरी देखील तुम्ही घाई केलेली बरी–आम्ही जातों इतके लांब, तुम्ही नसलां जात तरी, ' माझे बाबा म्हणाले आणि त्यांच्याशीं आमची तुलना करीत असल्याप्रमाणें त्यानीं आमच्यावरून आपली दृष्टी मोठ्या अभिमानानें फिरवली. ' डॅन्यूबच्या मुखाशीं तुम्ही बहुधा आपला हिंवाळा काढतां हें मला माहीत आहे. पण तुम्ही जर चपळाई नाहीं केलीत तर मला वाटतं हिमवर्षाव तुम्हाला स्टेप्सच्या गवताळ भागांतच गांठील. '

' हं, खरंच, कराच जलदी तुम्ही, ' ट्रायफ्लर मधेंच बोलला; ' त्या बस्टार्डसवर एकदां असाच भयंकर प्रसंग ओढवला होता. मी स्वतः तें पाहिलें नाहीं; पण मी ऐकलं आहे त्याबद्दल. '

' हे बस्टार्ड कोण ? ' आमच्या ताईनें विचारलं.

' एका जातीचे पक्षी आहेत ते, बाळ, देशांतर करणारे पक्षी. हं, हे बस्टार्ड एकदां मोठ्या चमत्कारीक प्रसंगांत सांपडले होते; म्हणजे एका आकस्मिक हिमवर्षावांत ते सांपडले. सारी रात्र तो पाऊस कोसळत होता आणि त्यांचे पंख भिजून पार चिंब झाले. तरी

रात्रीं त्यांनीं झोंप काढलीच आणि मग सकाळीं पडले हिमकण, अगदी भयंकरच पडले. त्यांचे पंख गोठले नि बर्फानें गेले झांकून; म्हणून त्यांची हालचालदेखील करता येईना त्यांना. आणि मग एकाएकीं कांहीं धनगर आले तिथें—'

'अरे बापरे!' श्रोत्यांपैकीं बरेचजण गडबडून ओरडले.

'त्या बस्टार्डनीं पळून जायचा केला प्रयत्न, पण थिजलेल्या पंखांनीं जलद उडणार कोण हो? आणि ते सारेच जीवंत पकडले गेले!'

'गरीब बापडे!'

'नि मग अशी कांही न भूतो न भविष्यति कत्तल झाली सुरू आणि मी जर नसतों—'

'अं, तें कसं बुवा, तुम्ही जर तें समक्ष पाहिलं नाहीं म्हणतां तर?' बाबा हंसत म्हणाले.

'मी—. असं बोललों काय मी? मला काय म्हणायचं होतं कीं, सूर्य उगवून त्यांच्या पंखांवरचं बर्फ जर नसतं वितळलं, तर तो सारा कळप गारद झाला असता. कुणींतरी मला सांगितली ही सारी हकीगत, किंवा खरं म्हणजे, माझ्या चुलतकाकांनी सांगितली होती म्हणा—तुम्हांला असतीलच आठवत ते, ते सुप्रसिद्ध क्रॅक-डान्सर, माणसांच्या तुरुंगवासांत दोन वर्षं काढलीं होतीं त्यांनीं, आणि दर आठवड्याला त्यांचे पंख कापीत असत तरी ते निसटलेच, कुत्र्याचं सोंग घेऊन—'

इथे मात्र आम्हां पोरासोरांनादेखील कळून चुकलं कीं हे गप्पीदास आपल्या बातांच्या चक्रव्यूहांत घसरले, आणि आम्ही इतक्या मोठ्यानें होहो करून खिदळत सुटलों कीं, रात्रीच्या धुक्या-मुळें आम्हांला आतां दिसत नसलेल्या, अॅस्पनच्या राईपलीकडील मोकळ्या जागेंत त्या हंशाचा प्रतिध्वनि उमटला.

'झोंपा!' आमच्या वाटाड्याचा इशारा खणखणला. 'झोंपा!' त्रिकोनाच्या म्होरक्यांनीं तो इशारा आपल्या त्रिकोनांत पोंचवला.

'होय, होय, महाराज!' दोन एकशें कंठांतून प्रत्युत्तर आलं, आणि लगेच त्या दोनएकशें चोंची डाव्या पंखाखालीं खुपसल्या गेल्या आणि सुखद भविष्याच्या गुलाबी स्वप्नसृष्टींत आम्ही गढून गेलों.

'हुश्शार!' पहारेकऱ्यांच्या दिशेनें आवाज आला.'

'हुश्शार!' फर वृक्षांजवळ प्रतिध्वनि झाला. 'हुश्शार!' दुरून अस्पष्ट आवाज आला आणि मग पुन्हा तें चक्र सुरू झालं.

आमचे ते जागरूक पहारेकरी, आपल्या कर्तव्याला जागरूक राहून पहारा करीत होते.

....

:: ७ ::

लॅंगनोझच्या सुटलेल्या हुकूमाच्या आवाजानें मी जागा झालों तों सभोंवार अजून काळोखच दिसत होता. पण हुकूमाच्या शेवटल्या शद्वांनीं माझं अंग आनंदानें थरारलं.

' ताबडतोब मागें या म्हणजे सूर्योदयापूर्वीं आपल्याला वाटाण्यांजवळ जातां येईल. अर्ध्यातासापेक्षां अधिक नाहीं वेळ लागतां कामा. नीट सावध रहा नि डोळे नीट उघडे ठेवा. '

आमच्या ताईनें पण ते ' वाटाण्यांजवळ ' हे शद्व ऐकले होते आणि ती झोंपेतच जिभल्या चाटीत होती, आणि माझ्याहि तोंडाला पाणी सुटलं होतं हें कबूल केलंच पाहिजे.

' वाटाणे! मिळणार म्हणायचे एकदांचे! ' वाटाण्यांच्या गोडीबद्दल आम्ही आत्तांपर्यंत अनेकवेळां ऐकलं होतं पण त्यांचा आस्वाद घेण्याची संधी कांहीं अजून मिळाली नव्हती. पण आतां आमच्या चतुर सेनापतींच्या हुकूमानें ती चिरवांछित मेजवानी आम्हांला नक्की मिळणार असं झालं.

आणि मग ताईला नि मला झोंप येणं कांहीं शक्य नव्हतं हें कुणालाहि सहज पटेल.

मी पहात होतों तों टेहळणीसाठीं एक पांचांची नि दुसरी तिघांची अशा दोन तुकड्या वर उडून काळोखांत दिसे नाहींशा झाल्या. दोन्ही तुकड्यांचं उड्डाण एकाच दिशेला चाललं होतं.

आळस नसलेली आमच्या ट्रायपलरचीहि स्वारी त्यांच्या मागें निघाली.

' तुम्ही थांबलांत तर बरं, ' बाबा त्यांना ओरडले.

'साऱ्याचा ते गोंधळ करतील, अशी धास्ती वाटते मला,' आमचे हे स्वयंसेवक म्हणाले.

'तुम्ही नका गोंधळ करूं म्हणजे झालं.'

'तुला आठवतं का रे, आई म्हणाली होती तें,' ताई माझ्या कानांत हळूच पुटपुटली, 'कीं यांची चव बार्लीपेक्षां सुरेख असते म्हणून?

'मी काय करणार आहें आहेना माहीत,' मी म्हणालों. 'खा खा असं जितकं खाववेल तितकं खाणार मी, नि मग करून ठेवीन सांठा—म्हणजे काय, गालांमागें तोंड भरून घेणार मी आपलं. कसे ग दिसत असतील हे वाटाणे, अं?'

वाटाण्यांच्या रंगरूपाची नि चवीची आमची अशी चर्चा चालली असतांच टेहेळ्यांचं एक पथक परत आलं.

त्यानीं अशी माहिती आणली कीं यावर्षीं वाटाणे गावाच्या जास्त नजीक लावले आहेत, पण त्यांच्या बाजूला गवताच्या गंजींची रांग असल्यामुळें आडोसा चांगला आहे. तर आपण जर तिथे लौकर गेलों तर सूर्योदयापूर्वी आपल्याला पोटभर खाऊन घेतां येईल.

त्यांच्या पाठोपाठ दुसरी तुकडीहि आलीच.

'ट्रायफ्लर कुठे आहे?' बाबानीं काळजी वाटून विचारलं.

'तो म्हणाला, तुम्ही येईपर्यंत मी तिथेंच पहारा करतों.'

'अरे कर्मा, संकट घेणार ओढवून तो,' लॉंगनोझ आपल्याशींच मोठ्यानें पुटपुटले. 'चला निघा!' त्यानीं हुकूम सोडला.

आम्ही जरी अगदीं गुपचूप उड्डाण केलं तरी त्यानें झोंपेंत असलेल्या प्लव्हर्सची घाबरगुंडी उडवलीच. आम्हांला आतां थोड्या अंतरावरच जायचं असल्यानें आम्ही त्रिकोन न करतां लहान लहान गट करून निघालों होतों.

थोड्याच वेळांत शेणखताचा वास येऊं लागला नि चिमण्यांचा धूरहि दिसूं लागला; आणि आम्ही समजलों कीं मानवी वस्तीच्या आपण जवळ येऊन पोंचलों.

शेतकऱ्यांच्या घरांच्या कृष्णाकृती आतां क्षितिजाजवळ मोठ्या कष्टानेंच दिसत होत्या आणि जवळच असल्या तरी मोठमोठ्या काळ्या राशी आमच्यापुढे उभ्या होत्या.

'गवताच्या गंजी आहेत या,' टेहेळयांपैकीं एक जण हळूच बाबांना म्हणाला नि तो आम्हांला तिकडे वाट दाखवीत निघाला. 'इकडे, असे तुमच्या डावीकडे, मित्रानों!'

आम्ही खालीं उतरूं लागलों. तेवढ्यांत माझे पाय, मऊ मऊ नि पायांत गुंतणाऱ्या अशा कशांत तरी अडकले, नि मीं आपली चोंच जमीनींवर टेंकली.

'हं, जरा हळू!' बाबा माझ्या मदतीला येत म्हणाले. 'हेंच तें'.
'ते कोण ?'

माझी छाती धडधडत होती. मी घाईघाईनें आपले पाय सोडवले.
'वाटाणे.'

होय, वाटाणेच होते ते! आणि आमच्या साऱ्या कल्पना म्हणजे काहींच नव्हत्या त्यापुढे, असं दिसलं. या विलक्षण रोपट्यांचे लांब लांब गुंतलेले देठ भरदार दाण्यांच्या शेंगांनीं जसे लहडले होते. त्यांची गोडी मोठी चविष्ट होती नि शेंगांत मधूनच सांपडणारी आळी तर दाण्यांहूनहि गोड होती!

आम्ही सगळ्यांनीं शेंगांवर एकदम हल्ला चढवल्याबरोबर शेंगा फोडतांना होणारा आवाज आणि वेलांची खसखस यांच्या आवाजानें सभोंवारचं वातावरण मोठं मजेशीरपणें निनादत होतं.

'नुसतं गिळूं नका गटागट. सावकाशपणें चालूं दे तुमचं.' लाँगनोझ आम्हांला सूचना देत होते. 'सूर्य उगवायला पुष्कळ अवकाश आहे अजून. शेतकरी नि त्यांचे कुत्रे अजून झोंपेंतच आहेत.'

आमचे हे सेनापति आमच्यासाठीं पहारा करीत होते. जवळच्या एका गंजीवर उभ्या राहिलेल्या त्यांची डौलदार रेखाकृती, त्या मागील आकाशाच्या फिकट पार्श्वभूमीवर आम्हांला स्पष्टपणें दिसत होती. असला जागरूक नेता असल्यावर सृष्टीदेवतेचा हा खाऊ कोणीहि निःशंकपणें मनमुराद खावा !

एक त्या ट्रायफ्लरच्या गैरहजेरीमुळेंच काय ती थोडी काळजी लागली होती नि आमचा आनंद किंचित गढूळला होता. आम्ही त्याला इकडे तिकडे शोधला नि त्याला हांका मारण्याचाहि प्रयत्न केला, पण त्या काळोखांतून कुठूनहि प्रत्युत्तराचा पडसाद उमटला नाहीं.

तेवढ्यांत अगदीं आकस्मिकपणेंच त्याची किंकाळी गांवाच्या बाजूनें आम्हांला ऐकूं आली. प्राणांतिक दुःख नि भीति त्या किंचाळींत मूर्तिमंत उमटली होती. हो--अगदीं शंकाच नव्हती त्यांत ! आमच्या त्या निष्काळजी दोस्ताचा आवाज आम्ही ओळखला.

गंजीवरून धोक्याची सूचना दिली गेली आणि आमचा सगळा कळप अव्यवस्थितपणें एकदम वर उडाला आणि 'असे इकडून, माझ्या मागून या !' असं ओरडत असलेल्या माझ्या बाबांच्या मागून आम्ही निघालों.

त्या दरीवरून नि तीमधून झुळझुळत असलेल्या एका ओहोळावरून आम्ही उड्डाण केलं, नि पलीकडे एका झुडुपांत दडून बसलों.

दरम्यान आतां प्रकाश वाढूं पहात होता. पण आमचं आश्रयस्थान तसं सुरक्षित असल्यामुळ सकाळ होईपर्यंत तिथेंच थांबण्याचा आम्ही निश्चय केला. तोंपर्यंत आमच्या दोस्ताची हालहवालहि कदाचित

समजेल. आणि नाहींतरी त्याच्या मदतीसाठीं कांहींतरी हालचाल केल्याशिवाय आम्हींतरी तिथून हलणं कसं शक्य होतं?

तें निद्रामग्न गांव आतां थोडीफार हालचाल करूं लागलं होतं. कुठेकुठे खिडक्यांत दिवे दिसूं लागले होते. कुत्र्यांचं भुंकणं जोरात सुरू झालं होतं नि एकमेकांना साद प्रतिसाद घालीत ते गोळा होत होते. उघडल्या दारांची करकर होऊन पायाखालच्या फळ्यांवर मोठ्यानें आवाज करीत गाईघोडे बाहेर पडत होते. मोठ्या मोठ्या चेंडूसारख्या दिसणाऱ्या काळ्या कुरळ्या लोंकरीच्या मेंढ्या जशा कांहीं गडगडतच बाहेर रस्त्यावर येत होत्या नि आनंदानें ओरडत होत्या. धुराड्यांतून धुराचे लोट बाहेर उसळत होते, विहीरींवर रहाटांची करकर होत होती, नि मुलं नि आया, आंगांभोंवतीं मेंढकातडीं गुरफटून नि आळसटत जांभया देत घराबाहेर पडत होतीं.

आसमंतांत चांगला प्रकाश पडल्यावर दोन अनुभवी नि तीक्ष्ण-दृष्टि असे करकोचे गांवावर घिरट्या घालून खालीं काय चाललं आहे याचं निरीक्षण करण्यासाठीं म्हणून आम्ही रवाना केले.

ते निघाले नि वर उंच जाऊन थांबले आणि तिथून वर उंचावरून शांतपणें गावाच्या मध्यभागीं घिरट्या घालीत राहिले. खालून येणाऱ्या सूर्यकिरणांनीं उजळल्यामुळें आम्हांला ते चांगले स्पष्ट दिसत होते. त्यानीं उंचावरूनच एक दोनचार घिरट्या घातल्या नि मग थोडं अंतर खालीं येऊन गावांतल्या एका रस्त्यावरून त्यानीं फेरी मारली. आम्हांला ते खूप खालीं उडत असल्यासारखे दिसत असल्यामुळ त्यांच्या जीवाची आम्हांला जरा धास्तीच वाटत होती. मग ते परत एकदां उंच उडाले नि गावाच्या दुसऱ्या एका भागावर खालीं येऊन फिरूं लागले. असा प्रकार ते बराच वेळ करीत होते नि मग अखेरीस ते परत फिरले.

काय सांगणार असतील ते आतां ?

ट्रायफ्लरचं अगदीं नेमकं काय झालं असावें, हें आमच्या या टेहेळयांना कांही सांगतां येईना. पण पाद्री बोवांच्या घरापुढे खूप गर्दी गोळा झालेली त्यानीं पाहिली होती नि कोणींतरी दोरी कात्री आणा, असं ओरडत असल्याचंहि त्यानीं ऐकलं होतं.

'कुलक्षण आहे हें,' एक वृद्ध क्रौंच म्हणाला.

'सुटका अशक्य,' दुसऱ्याचं मत पडलं,

'माझ्या प्रिय दोस्तानें,' आमचे वृद्ध सेनानी दुःखानें पण कणखरपणें म्हणाले, 'आतां अधिक वेळ दवडणं इष्ट नाहीं. आपल्या त्या प्रिय पण निष्काळजी बंधूचं भवितव्य आतां सर्वस्वीं परमेश्वराच्याच हातीं आहे. आपण कांहीच करणं शक्य नाहीं. या कठोर घटनेपासून आपण योग्य तो धडा घेऊन कृतीपूर्वीं विचार करायला आपण शिकं या. हं, त्रिकोन तय्यार ! देव आपलं रक्षण करो !'

आणि मग जड अंतःकरणानें नि वाटाण्यांनीं जड झालेल्या पोटानें, आम्ही तिथून प्रयाण केलें; आणि आमच्या मनांत, ऐहिक सुखोपभोगांचा क्षणभंगुरपणा, हाच विचार सामान्यपणें--पण विशेषतः आमच्याच आनुषंगानें, सारखा चालला होता.

: : ८ : :

तो सारा दिवस आमचा प्रवास जड हृदयानेंच चालला होता. आमचा दोस्त ट्रायफ्लर याला झालेला हा अपघात हें आमच्या या प्रवासांतील आमच्यावर आलेलं पहिलंच संकट. नाहींतर आतांपर्यंत आमचा प्रवास अतिशय मजेनें नि अगदीं सरळ असा चालला होता.

तशांत आतां भरीस भर म्हणूनच जणूं काय हवा एकदम पालटली. उत्तरेकडून येणारे काळे कभिन्न मेघ आमच्या अगदीं पाठीशीं येऊन भिडूं लागले, राखी रंगाचं धुकं साऱ्या आसमंतांत भरलं आणि पावसाला सुरवात झाली. सभोंवारच्या वायुमानाप्रमाणेंच खालील पृथ्वीतलाचं दृश्य उदास निरानंद असं दिसूं लागलं नि पीक कापून नेलेल्या उजाड जमिनी नि ओसाडी, निर्तुटक अखंड पसरलेल्या सारख्या अशा दिसूं लागल्या. यापूर्वीं ढगांचे लांब लांब पट्टे ओलांडून प्रसन्न सूर्य प्रकाशित असा अवकाश गांठून, त्या प्रकाशांत आमचीं ओलीचिंब गात्रं सुकवणं आम्हांला अनेक वेळां शक्य होत होतं. पण आतां यावेळीं सारंच आकाश काळंमिट्ट झालं होतं नि तें केव्हां तरी निवळण्याचीहि कोणतीच आशा दिसत नव्हती. अखेरीस दिवस मावळण्यापूर्वी रात्रीचा विसावा घेण्यासाठीं एका दलदलीच्या झुडुपांजवळ एका प्रशस्त पिवळ्या कुरणांत अगदीं श्रांत झालेले असे आम्ही खालीं उतरलों. या दलदलीच्या कांठाजवळच कांहीं दहा वीस खेडवळ झोंपड्याहि दिसत होत्या.

पण संथपणें घिरट्या घेत घेत आम्ही खालीं कुरणांत उतरतांच आमच्या ट्रायफ्लरची स्वारी कुंपणाच्या आसऱ्यानें फेऱ्या मारीत, वर आकाशाकडे, आमचीच वाट पहात असल्यासारखी, पहात असलेली पाहून आम्हांला काय आश्चर्य वाटलं असेल, याची कल्पना करा !

‘कोण, तूं! चांगला झोडपला पाहिजे तुला!’ त्याच्या अंगावर धाऊन जात आमचे सेनापति ओरडले.

‘हो, झोडपलाच पाहिजे त्याला,’ बाबानीं दुजोरा दिला,

‘तें काय म्हणून?’ आपले ओले पंख उडवीत ट्रायफ्लरनें विचारलें.

‘कां! आम्हां साऱ्यांना त्रास दिल्याबद्दल!’

‘पण मी काय सांगतों त्यावर विश्वास ठेवा माझ्या दोस्तानों, तुमच्याहून मलाच जास्त झाला त्रास,’ ट्रायफ्लर म्हणाला.

‘खरंच? मग सांग पाहूं घडलेली हकीगत! कुठं होतास हा सारा वेळ?’

‘अहो, मोठी हकीगतच आहे ती. मी सांगेनच ती सारी तुम्हांला; पण आत्तां ताबडतोब नाहीं मात्र. आधीं खूपशी विश्रांति घ्या नि चांगले सुखासीन व्हा, आणि मग, आतां ऐका हं लक्षपूर्वक, मीच सांगेन तुम्हांला बरं का, दोस्तानों.’ असं म्हणून ट्रायफ्लर-बुवांनीं आपली मान एकदां उंच उडवली आणि आपले डोळे साऱ्यां-,वरून फिरवले.

होय, सभ्य स्त्रीपुरुष हो, मी जो प्रसंग अनुभवला तो अगदीं असामान्य होता, आणि केवळ माझ्या मुरब्बीपणामुळें नि प्रसंगावधानानें नि दैवाच्या विलक्षण मदतीनेंहि, मी हा असा आत्तां पुन्हां तुमच्या संगतींत बसलों आहें. नाहीं तर पंख पार तोडून टाकलेला असा तुरुंगांत खितपत नि त्या गचाळ गांवढळ पोरांच्या टिवल्या बावल्या पहातच मला कायमचं राहावं लागलं असतं—’

‘सारं खुलासेवार असं झटकन सांगा पाहूं!’ ताई उतावीळपणें ओरडली.

पण ट्रायफ्लर कशालाच बधेना आणि आम्ही दम टाकून नीट सुखासीन असे बसल्यावर नि आमची सर्वांची पंखांची साफसुफी

उरकल्यावर आम्ही त्याच्या भोंवतीं वर्तुलाकार असे जेव्हां बसलों, तेव्हां कुठे ते महाराज पुढे येऊन स्थानापन्न झाले आणि जरा वेळ छाती वर काढुन आमच्या सर्वांकडे एकदां दृष्टी टाकल्यावर त्यानीं सुरवात केली.

'सभ्य स्त्रीपुरुषहो ! तुम्ही ज्या वेळीं त्या वाटाण्यांवर ताव देत होतां--कारण खरं सांगायचं म्हणजे मला त्यांची एवढी ओढ वाटतच नाहीं. आणि शिवाय खजूर नि खोबरं--'

'तें काय असतं ?' ताईनें विचारलं.

'मध्येंच नको बोलूं !' मी तिला डिवचून म्हणालों.

वक्तेमहाशयांनीं आमच्याकडे मूकपणें पाहिलं आणि आम्ही दोघंहि लाजेनें चूर झालों.

'हां, तर--तुमचं तें वाटाण्यावर हात मारणं चाललं असतां, मी त्यां गावांत चक्कर मारण्यासाठीं म्हणून निघालों. कारण मला लोकांच्या नि तज्जातीय प्राण्यांच्या चालीरीतींचा अभ्यास करायचा मोठा शौक आहे; आणि म्हणून केवळ त्याच उद्देशानें त्यांच्या आंगणा-बिगणांतून नि तशाच त्यांच्या खिडक्यांतूनहि मी डोकावत होतों. एक खिडकी मला अर्धवट उघडी सांपडली आणि तिच्या आंतून ताज्या ब्रेडचा खरपूस खमंग वास येत असल्यानें माझीं पावलं तिकडेच वळलीं. मी तसाच पुढ मग जवळ गलों, मान आंत खुपसली आणि चौफेर दृष्टिक्षेप केला. झोंपडींत आंत काळोखच होता आणि आंत झोंपलेल्या कितीतरी लोकांच्या घोरण्याचा आवाज मला ऐकूं येत होता. शेगडीच्या आसपास डुकराचीं लहानलहान पोरं कुरबुरत हिंडत होतीं. माझ्या अगदीं जवळ असलेल्या टेबलावर, वर स्वच्छ टॉवेल घातलेला असा एक मोठा ब्रेड, मीठाची एक ऐटदार लांकडी पेटी नि कोरीव कांतीव असे कितीतरी चमचे इतस्ततः टाकलेले

दिसत होते. आठवण म्हणून त्यांतला एक चमचा उचलण्याचा मी विचार केला—'

'दुसऱ्या शब्दांत म्हणजे, तुला तो चोरायचा होता!' लॅंगनोझ त्याची निर्भत्सना करीत कठोरपणें म्हणाले.

'चोरायचा! काय भाषा ही! इंग्रजांनीं जेव्हां ईजिप्तमधून क्लिओपाट्राची नीडल सबंधच्या सबंध उचलली ' तेव्हां त्यांच्या त्या कृत्याला कांही हा शब्दप्रयोग करण्याचा विचार कोणाच्या कधीं मनांत नाहीं आला! ' ट्रायफ्लरनें टोला दिला. ' आणि त्या सबंध दगडी मनोऱ्यापुढे लांकडी चमचा तो काय? '

'हं, चालूं द्या पुढे,' बाबानीं खुणावलं.

' बरं तर! तो चमचा उचलण्यासाठीं मला आपली मान अधीक थोडी आंत घुसवायला हवी होती. तसं करून मी तो चमचा उचलतांच ती भिकारडी खिडकी खालीं आदळली नि त्याखालीं माझी मान चेंगरली--'

' हरे राम! हरे राम! ' आम्ही उद्गारलों.

' त्या कळातर अगदीं विलक्षणच असहनीय. मला वाटलं माझ्या मानेचा तुकडा पडला. त्या वेदनांनीं अगदीं वेडापिसा होऊन, माझ्यांतला सारा जोर खर्च करून मी मोठ्यानें किंकाळी फोडली, आणि त्याखालून सुटण्यासाठीं म्हणून फाडफाड पंख आपटीत मी धडपडूं लागलों. खिडकीची कांच निखळून कोसळली आणि त्या आवाजानें झोंपडींतले लोक जागे झाले. एक कुत्रा भुंकत ओरडत माझे पाय नि शेपूट धरायला पहात होता, पण मी अशा कांहीं जोरानें तंगड्या झाडीत होतों कीं त्याला मुळी माझ्या आंगाशीं भिडतांच यईना.

' एवढ्यांत कोणींतरी खिडकीशीं दिवा घेऊन आलं.

' " अस्सं, हे आले आहेत होय! " " पकडा त्याला, पकडा, मारा ठार ! " ' अनेकजण ओरडले.

' " कां, मारता कशाला ? जीवंतच पकडा, " माझ्यावतीनें दुसरा कोणीतरी म्हणाला.

' तावडतोब माझे कोणीतरी पाय नि पंख मागुन धरले नि त्या खिडकीच्या कचाट्यांतून मी सुटलों. पण कोणींतरी मला आपल्या गुडघ्यांमधें घट्ट पकडलं होतं आणि एक घाणेरडं पोतं त्यानीं माझ्या डोक्यावर घातलं. मी बंदिवान झालों होतों.

' माझ्या मानेंतल्या तीव्र वेदनांमुळें, व पुरेशी हवा मिळत नसल्यानें आणि आतांपर्यंतच्या धडपडीमुळें मला ग्लानी येऊन माझी शुद्धी गेली; आणि जरा वेळानें शुद्धीवर आलों त्यावेळीं पाहिलं, तों कोणींतरी मला घेऊन चाललं होतं नि माझ्याबद्दलची चर्चा नि वाद अगदीं रंगांत येऊन चालला होता.

' " पाद्र्याकडे चला घेऊन त्याला. त्याबद्दल आपल्याला थोडी व्होडका देईल तो. "

' "हं ही चांगली आहे कल्पना, त्यांच्याजवळ पहिला आहेच एक, म्हणजे हा होईल त्याला जोडीदार."

' " काय लेकाच्याचा धीटपणा तरी! मला आरंभीं तें लांकडी भूतच वाटलं, पण छे ! दुसऱ्यांच्या खिडक्यांतूत डोकं खुपसणारं पाखरूं तें.! "

' " बाई, बाई, काय मेल्यानें घाबरवलं अगदीं मला! " एक शेतकरीण किंचाळली. " माझे पाय आंखडून नि मला जागचं हालतां येईना कीं कुणाला हांक मारतां येईना? दळभद्रें पाखरूं मेलं! "

' " अँटिपका! व्हँका! ग्रुंका! अग या लौकर! –हा करकोंचा भरला आहे बघा त्यानीं! " मुलं ओरडून सांगत होतीं.

' " अरे पाद्रीबुवांचा असेल तो ? "

' " अं हं, रावटी आहे तो! "

' मग कुठलं तरी दार करकरलं, माझ्या डोक्यावरचं ते गोणपट दूर झालं, नि मी आपल्या पायावर परत उभा राहिलों. मी खूप दमलों होतों नि मला वाईटहि वाटत होतं, तरी माझ्या सभोंवारच्या त्या नवीन वातावरणाबद्दल मला कुतूहल असल्यामुळें मी सभोंवती निरखून पहात होतोंच. एका प्रशस्त अशा जागेंत मी होतों नि त्याचं दार आत्तां माझ्या पाठीमागेंच बंद झालं होतं. आंत कितीतरी पिपं, टब्स, पेट्या, चाकं नसलेली एक बाबागाडी, कांहीं कपन्नशा, गाडगीं मडकीं, नि घोड्याचं खोगीर वगैरे सामान भितींवर खुंट्यांवरून लोंबतं असं दिसत होतं.

' " हॅलो, दोस्त! " कुणीं तरी म्हणालं.

' माझं आंग शहारलं आणि ती खेळीमेळींतली सलामी आली होती त्या दिशेला मी दृष्टी फिरवली. तों काय आश्चर्य! –आणि आनंदहि वाटला ब्रं का –आपलाच एक जातभाई शांतपणें नि खिन्नपणें माझ्याकडे टक लाऊन पहात होता!

' " तूं बंदीवान झाला आहेस, माझ्या दुर्दैवी बंधो, बंदीवान झाला आहेस तूं. " आपली मान हलवीत तो म्हणाला.

" पण तुम्ही कसे आलां इथे ? "

' "तीन वर्षांपूर्वी त्यांना रानांत सापडलों मी नि त्यानीं मला इथे आणलं. मी आजारी पडलों आणि म्हणून आमच्या त्रिकोनाबरोबर त्या प्रवासांत मी टिकूं शकलों नाहीं. "

' "तुम्हांला निसटतां नाहीं आलं इथून ? "

' "निसटतां! माझे हे पंख कापलेले आहेत. त्यामुळें तर वर उडतां येत नाहीं. तुझेहि पंख ते असेच कापतील; कसं वाटतं मग तें कळेलच आतां तुला!" माझा तो विषण्ण घरधनी म्हणाला.

'सभोंवारचं जग माझ्या डोळ्यापुढे गिरगिरूं लागलं; मला भोवळ आली. पण इतक्यांत दारामागून आलेल्या कोणाऱ्या तरी आवाजानें मी भानावर आलों.

' "कुठे आहे तो नवा करकोंचा ?" कुणीतरी विचारलं.

' "या इकडे, या शेडमधें फादर. तुमच्या पहिल्याजवळच ठेवला आहे त्याला, आणि दोघे अगदीं एकसारखे आहेत !"

' "मित्रा, माझ्या डोक्यांत एक सुंदर कल्पना आली आहे'," माझा तो सहबंदी घाईघाईनें म्हणाला. "एकदोन क्षणांतच ते आंत येतील. तुझे पंख हे ते कापणारच. तर मी सांगतों तसं कर कीं तूं निसटलास समज."

' "निसटलों--जर शक्य झालं तर--!"

' "बरं हें बघ. ते आंत आले कीं तूं आहेस तिथेंच थांब नि माणसाळलेल्या पक्षासारखा वाग आणि मी होईन रानटी, नवीन पकडल्यासारखा. कळलं !"

' "हो, कळलं."

' मग तें दार उघडलं नि लोक आंत येऊं लागले. सर्वांच्यापुढे, आंगांत एक राखी पायघोळ आंगरखा नि केस मागे सारून घट्ट वेणीसारखे बांधलेले, असे एक वृद्ध गृहस्थ आंत आले. हे गावपाद्री, यांच्यामागें लाल दाढीवाले दोन शेतकरी नि त्यांच्याहि पाठीमागें कांही टोप्या घातलेलीं तर कांही बोडकीच अशीं कितीतरी डोकीं

दिसलीं, नि मग डोक्यावर भडक रुमाल बांधलेल्या बाया आणि पांढरी भुरकीं मुलांचीं डोकीं.

'या साऱ्या प्रेक्षक समुदायामुळें दारांत काळोख दिसूं लागला आणि आंत तर अंधुकच उजेड होता. माझा उपकारकर्ता आपले पंख फडफडवीत त्या खोलीभर पिसाटासारखा धांवत होता, नि मी, त्यांच्या उपदेशाबरहुकूम, एका पिंपावर शांतपणें बसलों होतों आणि तो सर्व प्रकार बारकाईनें पहात होतों.

' "–हा आमचा लाडका," माझ्या डोक्यावरून हात फिरवीत तो पाद्री म्हणाला. मी मुळीं देखील हालचाल केली नाहीं.

' "पकडा, पकडा त्याला, ए पोरानों ! त्या कोपऱ्यांत कोंडा त्याला !" "मोठा अचपळ आहे नाहीं बेटा ! कसा पिसाट दिसतो आहे पहा."

'माझा तो थोर, उदारहृदयी मित्र, आपल्याला पकडणाऱ्यांच्या हातांतून सुटण्यासाठीं जसं जीवाचं रान करीत होता.

' "भले शाबास !" माझा तो दोस्त अखेरीस कोपऱ्यांत डांबला जातांच तो पाद्री उद्गारला. "ए, इकडे या कुणीं ! ॲरिष्का, घरांत पळ चटकन ! एक दोरी नि कात्री दे आणून मला."

' "हं, आतां निसट !" माझा तो थोर उमदा दोस्त सुस्कारला.

'वेळ अगदीं अनुकूल होती. एक क्षणहि दवडणं आतां इष्ट नव्हतं. सारे शत्रु आपल्या 'नवीन' बंदीवानाभोंवतीं गुंतले होते आणि कोणाचच लक्ष माझ्याकडे नव्हतं. शेडचं दार उघडं होतं. दोनच उड्यांत मी शेड बाहेर पडलों, आणि दोरी नि कात्री घेऊन आलेल्या ॲरिष्काला जवळ जवळ खालीं पाडून, मी वर आकाशांत झेंप घेतली.

' "गुड–बाय, फ्रेंड !" माझ्या प्राणदात्याला मी आरोळी दिली. "तुमचं नांव इतिहासांच्या पानांवर नोंदलं जाईल."

'तसा भराऱ्या मारीत मी वर आकाशांत झेंपावत असतां, काय झालं याची कल्पना येऊन त्यांचीं तोंडं कशीं झालीं असतील तें मला दिसतं तर मोठी मौज झाली असती !

'पण मागें न पाहतांच मी उडत होतों. इतक्या वेगानें साऱ्या जन्मांत कधीं मी उडालों नव्हतों. तुम्ही कुणीं मला जर पाहिला असतात त्या वेळीं, तर करकोंच्याऐवजीं मला तुम्ही स्वॅलो अथवा निदान गरुड तरी समजलां असतां. आरंभाला एकदां एका फरवृक्षावर माझा कपाळमोक्षच होत होता. नि मग अधिक उंचावर जाऊन मी एका ढगाला भिडलों नि त्याच्या पार चिंध्याच उडवल्या, नि तरीहि माझी भरारीवर भरारी सारखी चाललीच होती. पण भयानें त्रेधा उडून माझं हें सारं चाललं होतं असं मात्र कृपा करून समजूं नका हं. हे–काय खुळेपणा ! भय हें करकोंच्याला सामान्यपणें अज्ञातच आहे नि मला तर अगदीं आहेच आहे. आतां माझ्या मनांतलं म्हणाल, तर पुढे काय काय घटना होतात हें पहाण्यासाठीं थोडा अधिक वेळ मी तिथें मोठ्या आनंदानें काढला असता; पण मी तुमचा विचार केला कीं माझी स्वाभाविकपणेंच तुम्ही काळजी करीत असाल. आणि म्हणून वेळ न गमावतां तुम्हांला गांठण्यासाठीं मी निघालों. एका गोष्टीचा मात्र मला उलगडा नाहीं होत. तुम्हांला वाटेंतच न गांठतां तुमच्यापुढे मी कसा आलों ! तुम्ही कुठल्या मार्गानें आलांत ?'

सहजपणाचा बुद्धिपुरस्सर आव आणून आम्हांला त्यानें हा प्रश्न टाकला नि सर्वांवरून एकदां डोळा फिरवला.

'मोठं शौर्याचं नि थोरपणाचंच कृत्य तें ! ' पंडीत लाँगनोझ म्हणाले.

'अतीशय उज्ज्वल ! नि आपल्या थोर नि उदारमनस्क जातीला अगदीं साजेसंच, ' बाबानीं संमति दाखवली.

'मला वाटतं आहे,' गर्वानें फुगून ट्रायफ्लर हेल काढीत म्हणाला, 'कीं तुम्हांला माझी गोष्ट खोटी वाटते आहे नि माझी चेष्टा करतां-हांत तुम्ही.' त्या बिचाऱ्याला वांटत होतं कीं हा स्तुतिवर्षाव आपल्यासाठींच आहे.

'तुझ्याविषयीं कोणींच बोलत नाहीं आहे,' आमचे वृद्ध प्रमुख त्याला गप्प बसवीत म्हणाले. 'तूं एक अत्यंत बेअकली प्राणी आहेस. पण दैव मात्र शिकंदर आहे तुझं. आम्ही त्या दुसऱ्याबद्दल बोलतों आहोंत. तो तीन वर्षं बंदींत आहे म्हणालास नव्हे?'

'होय तीन वर्षं,' बावरलेला ट्रायफ्लर हळूच पुटपुटला.

'माग फिरून आपण सोडवूं या चला त्यांना!' आमची मायाळू ताई उद्गारली.

आम्हीं सर्व तरुण मंडळीनीं तिला एकदम दुजोरा दिला.

'त्यांना सोडवायचं!' लाँगनोझ खिन्नपणें पुटपुटले. 'पंख कापलेल्या करकोंच्याला स्वातंत्र्य व्यर्थ आहे. माणसाच्या संरक्षणाशिवाय तो जगणं अशक्य आहे आतां.'

'शिवाय, त्या खेडवळांना त्याचा अतिशय उपयोग आहे,' ट्रायफ्लर मध्येंच म्हणाला .त्याचा नेहमींचा आत्मविश्वास आतां जागेवर आला होता. 'त्या पाद्र्याजवळ तो कारणावांचून नाहीं रहात. अहो, लोकांना तो नमुनेदार जीवनाचा आदर्श घालून देतो आहे. आणि त्यानें मला म्हणून आपलं गुपीत सांगितलं कीं त्या पाद्र्याची सारीं प्रवचनं नेहमीं तोच करतो तयार. आणि मग ते पाद्रीबुवा तीं फक्त पाठ करतात नि आपलीं प्रवचनं म्हणून लोकांपुढं ऐटीत झोडतात.'

'मारली पुन्हां थाप! अगदीं नालायक!' बाबा त्याचं तोंड बंद करीत म्हणाले चला रे, ए पोरानों!' आपल्या त्या थोर जातभाईच्या

सन्मानार्थ आपण गंभीरपणें नाच करूं या. फॉल इन! बिगिन!' त्यांनी हुकूम सोडला.

आणि मग एका ओळींत गोळा होऊन आमचा एक सर्वोत्कृष्ट नाच आम्हीं केला, आणि रात्रीच्या मुक्कामालाच पाऊस आलेला जरी दिसत होता तरी आमचा नाच चालूच राहिला.

प्रत्येक गंभीर प्रसंगाचं परंपरागत प्रतीक असलेल्या आमच्या या सामुदायिक नाचांत थकव्याच्या सबबीखालीं ट्रायपलरनें मात्र त्या रात्रीं भाग घेतला नाहीं.

: : ९ : :

सकाळच्या सुमारास मात्र पाऊस थांबून आकाश स्वच्छ झालें आणि मग थंडगार असा जोराचा वारा सुरू झाला नि त्या बस्टार्ड-पक्षांवर आलेला भयंकर प्रसंग आम्हांला आठवला. आंगांत ऊष्णता आणण्यासाठीं आम्हांला एकसारखी हालचाल करावीच लागत होती नि आमच्या अवघडलेल्या पंखांत चैतन्य आणण्यासाठीं त्यांना काम द्यावं लागत होतं. नि शिवाय त्या ठिकाणीं खायलाहि कांहीं म्हटल्या कांहीच नव्हतं. त्या भिकार खेड्याच्या सभोंवारची थोडीं वैराण अशी शेतं कुणींतरी चाटून पुसूनच जशीं साफ केलीं होतीं, नि खाण्या-लायक अशी एकहि वस्तु अगदीं दृष्टी पोंचत होती तेवढ्या सगळ्या टप्यांत कांहीं दिसत नव्हती.

पण आमच्या हुशार वाटाड्यांनीं आम्हांला धीर देऊन सांगितलं कीं आपण लौकरच आतां अधिक समृद्ध अशा भूभागावरून प्रवास करूं. आम्हांलाहि त्यानें धीर येऊन निघण्यासाठीं आम्ही आधीर होऊन गेलों.

आम्ही आपला मोर्चा दक्षिणेला फिरवला आणि सृष्टीचं स्वरूप पालटलं. आम्हांला अत्यंत प्रिय असलेल्या फर वृक्षांच्या काळसर गडद हिरव्या राई आतां दिसत नाहींशा झाल्या, नि आमचं तें उत्तरचं सौंदर्यनिधान—ते बर्चवृक्ष—देखील क्वचितच दृष्टीस पडूं लागलं. त्यांच्या जागीं आतां घनदाट ओकवृक्षांचीं जंगलं आपलं सारं शरद् सौंदर्य आमच्यासमोर मिरवीत खालीं दूरवर पसरलीं होतीं. सोनेरी पिवळा, अनल ज्वालेसारखा लाल, नि जुनाट ब्रॉंझ अशा तीनही रंगांचं मोठं सुंदर असं मिश्रण तिथे शोभत होतं. ओलसर कुरणांचे रसरशीत हिरवे हिरवे गालिचे नि त्यांवरील उशीरां फुललेल्या फुलांचे लाल

लाल बुंद, त्या राईंत मधून मधून विखुरलेले दिसत होते. रस्ते आतां धुळीनें भरलेले नि राखी असे दिसत नव्हते--ते आतां रुंदनिंद, तुकतुकीत काळे नि त्यावरून आणकुचीदार शिंगांच्या बैलजोड्या लावलेल्या गाड्यांच्या माळांची ये जा चालली होती. गाडीवानांच्या डोक्याला मेंढ्यांच्या केंसाळ कातडी टोप्या नि आंगांत पांढरे शर्टस दिसत होते, आणि त्यांचे पायज़मे तर कांहीं भलतेच सैल दिसत होते. त्या बहुतेक सर्वांच्या तोंडांत तंबाकूच्या नळ्या होत्याच आणि त्यांच्या त्या गाड्या रस्त्यावरील काळ्या चिकट चिखलांतून हळूहळू नि आळसटल्या सारख्या रेंगाळत अशा चालल्या होत्या.

आतां आम्हांला वाटेंत लागणारीं खेडीं देखील आम्ही मागें पाहिलेल्यापेक्षां वेगळीं होतीं. या खेड्यांतून मागल्यासारख्या त्या मजेदार लॉगकॅबिन्स नि कॉर्निसवरील त्यांचं तें नक्षीदार खोदकाम दिसून येत नव्हतं. तासून बारीक केलेल्या शेंड्यांचीं लांकडी कुंपणं इथे कुठल्याच घराला दिसलीं नाहींत, नि फळ्यांवरून चकचकीत खिळे ठोकलेली अशीं अंगणाचीं कवाडंहि कुरकुरतांना कुठे ऐकूं येत नव्हतीं.

या खेड्यांतलीं घरं ठेंगणीं नि मातीचीं; भिंती सफेती केलेल्या; खिडक्या लहान नि घरांवरून पुढे आलेलीं अशीं गवती छपरं.

या खिडक्यांच्या खालीं असलेल्या बांकांवरून हातांतल्या काठी-वर भार देऊन पांढऱ्या पांढऱ्या दाढीमिशांचे म्हातारे बसले होते. काळसर रंगाचीं बालकं चोंहीकडे धांवत पळत होतीं. कांहींचा खेळ चालला होता नि कांही, आतां उन्हांत चमकत असलेल्या पावसाच्या पाण्यांतून नाचत होतीं. विहीरीवर बायकांची गर्दी उसळलेली दिसली. आणि आम्हांला चोंहीकडे दिसल्याप्रमाणें, याहि अत्यंत चपलजिव्ह अशाच दिसल्या. गावापासून थोड्या अंतरावर पवन-चक्क्यांची रांग उभी होती नि त्यांचे जुनेपुराणे विशाल हात मोठे

भयानकपणें गिरगिरत होते. यांच्याजवळच पांढऱ्या पांढऱ्या गोणांनीं भरलेल्या बारदानी गाड्या खड्या होत्या आणि त्यांचे सोडलेले बैल रवथ करीत सुस्तावले होते. पिवळ्या धमक दाण्यांच्या गंजींमागून गंजी कितीतरी दूरपर्यंत गावाभोंवतीं सारख्या विखुरल्या होत्या. त्याच्याहि पलीकडे असंख्य कापलेलीं शेतं आणि नुकतेच नांगरलेले पट्टे पसरले होते नि कांहींतील नांगरांना जुंपलेले बैल आम्ही त्यांच्यावरून उंच आकाशांतून भरारत असतां, अंधुक अशा ठिपक्या प्रमाणें दिसत होते.

खालीं लांबवर पसरलेली ती सुपीक माती, सतत अखंडपणें गरगरत असलेल्या त्या पवनचक्क्या, एकरचे एकर विखुरलेल्या त्या सोनेरी धान्याच्या गंजी, आणि लोकांची ती मंद सुस्त अशी हाल-चाल देखील--हीं सारीं जशीं विपुलतेचीं, सुबत्तेचीं, सुखवस्तुपणाची नि भरपूर मोकळ्या वेळाची एकमुखानें ग्वाही देत होतीं.

'या विपुलतेंतून आपल्यालाहि आपला भरपूर भाग उचलतां येईल असं दिसतं आहे,' बाबा म्हणाले नि त्यानीं इतर त्रिकोननायकांशींहि विचारविनिमय केला.

त्या सर्वांनीं मग ठरवलं कीं गांवापासून चांगलं दूर असे आपण त्या कापलेल्या शेतांत उतरूं, कारण तिथे गळलेल्या धान्याचे दाणे राहिलेल्या लोंब्या, किंवा अजून उचलायचे असलेले गव्हांचे कांहीं भारे देखील आपल्या पुरेसे खास मिळतील.

आम्ही मग मोठ्या आनंदानें आपल्या पंखाचा फडफडाट करीत नि विश्रांतीच्या खुणेचा चीत्कार करीत असें तरंगत तरंगत खालीं उतरलों नि एकदम फराळालाच जुडलों.

एक ट्रायफ्लरच काय तो रोजच्या सारखा खुशींत दिसत नव्हता. आपल्या नेहमींच्या गोष्टी आज आम्हांला तो सांगत नव्हता नि दोन

चार वेळां जमीनींत चोंच मारल्यावर तो कुंपणाकडे जाऊन त्यानें पाय लांब केले.

'कांही बरंबिरं का नाहीं वाटत आज तुम्हांला ?' त्याच्याजवळ जाऊन आमच्या मायाळू मातेनें प्रश्न केला.

'मला वाटतं माझ्या पायांना झालं आहे कांहीतरी, ट्रायफ्लरनें उत्तर केलं, 'नि माझी ही मानहि विलक्षण दुखते आहे. मला डोकंहि फिरवतां येत नाहीं आहे माझं,'

'मानेवर ती खिडकी पडल्यामुळें होतं आहे तुम्हांला तसं,' कोणीतरी म्हणालं.

'हं, तेंच असलं पाहिजे. त्यावेळच्या एकंदर धडपडींत नि घाईत इतकंसं कळलं नाहीं मला तें. पण आतां--अग आईग, काय कळ येते आहे! आणि ही सूज बघा किती आली आहे ती!'

आम्ही सारे आतां त्या गरीब बापड्याभोंवतीं गोळा झालों. आम्हां सगळ्यांनाच त्याची कींव येत होती, पण त्याचं दुःख कमी करण्यासाठीं काय करावं याची मात्र आम्हांला एकालादेखील कल्पना नव्हती.

'असा आजारी नको पडूं बाबा, लॅंगनोझ त्याला म्हणाले. 'जर मागें राहिलास तर नाश हा नक्की.'

'तोच विचार छळतो आहे हो मला. पण देवराया दयाळू आहे! नि ही हवा अशीच गरम राहिली तर!'

आमच्या वृद्ध मंडळींनी मग ठरवलं कीं आघाडीला उडायाची कामगिरी कष्टाची असल्यानें त्याला तें काम देऊं नये, नि ट्रायफ्लरनें आतां या पुढे पिछाडीलाच रहावं. मग लॅंगनोझ त्याच्याजवळ गेले नि कांही वेळ त्याच्याकडे ते नीट बारकाईनें असे पहात होते.

त्या वेळीं ट्रायफ्लरनें असा कांहीं मलूलपणाचा आंव आणला होता कीं मला त्याची अतीशय कींव येऊन माझ्या डोळ्यांना तर पाणीच आलं.

मग आमच्या त्या वृद्ध सेनानींनीं बाबांना बाजूला घेतलं नि त्यांचा मधून मधून त्या आजाऱ्याकडे पहात कसला तरी खल सुरू झाला. त्याच्या बद्दलच त्यांचा खल चालला होता यांत शंका नाहीं.

आमच्या चौकस बहीणाबाई, दाणे वेंचीत असल्याचं मीष करून, हळूच त्या दोघांच्या जवळ सरकल्या, नि मग डोळे अगदीं खुललेले, अशा पळत पळतच आम्हांला बातमी द्यायला आल्या.

'ठाक ठीक आहे सारं.' ती गडबडीनें म्हणाली. ' लाँगनोझ म्हणाले कीं तुमच्या पायाचं नि मानेचं दुःख कांहीं मोठं विशेष नाहीं. आत्तां जरी ते दुखत असले, तरी थोड्या दिवसांत होतील ते ठाक-ठीक. तुमचे पंख दुखावले असते तर गोष्ट वेगळी होती, ते म्हणाले. पण आतां तुमच्यासाठीं म्हणून आपला पल्ला ते जरा लहान कर-णार आहेत नि विश्रांतीचा काल वाढवणार आहेत. आणि लाँगनोझ असंहि म्हणाले कीं आत्तांपर्यंत आपण इतका पल्ला मारला आहे कीं आतां थोडं सावकाश जाण्यांत कांहींच नुकसान नाहीं.'

'हं, तुझी बडबड पुरेकर आतां, ए मॅगपाय, '(कोळीण पक्षी)' आमच्याजवळ येऊन नि आपल्या चोंचीचा ताईच्या पाठीवर फटका देत बाबा म्हणाले.

'हें हो काय बाबा! लागलं की माझ्या!' ताई रागानें किंचाळली. 'मी मॅगपाय! नि मग तुम्हीं, तुम्हीं म्हातारे स्पॅरो! (चिमणा)' आम्ही सारेजण मोठ्यानें खिदळलों.आमच्या बाबांसारखा उंच निंच, डौलदार नि सुरेख असा क्रौंच नि चिमणा?–हे : अगदींच वेडपट!

आमची ताई बरं का आम्हीं साऱ्यांचीच मोठी लाडकी होती नि आमच्या कडक शिस्तीविरुद्ध तिनें कांहींहि केलं, तरी तें तिला माफ असे.

आमच्या या मुक्कामांत आम्हांला स्टॉर्क जातीची एक मोठी सुंदर जोडी भेटली होती. मोठे मोहक होते ते स्टॉर्क. लांब लांब पाय, लांब चोंच, पांढरं पांढरं आंग, काळी शेपूट, पंखांना काळे काळे काठ नि चोंच नि पाय लाल भडक. त्यांचा घरटा, गांवाच्या कडेला असलेल्या एका घराच्या छपरावर धुराड्याच्या नजीक होता. आम्हा दोघां बहीण भावंडांएवढंच त्या दोघांचंहि वय होतं, नि त्यांची देखील आपल्या पहिल्याच दक्षिण प्रवासाची तयारी चालू झाली होती. आमच्या सारख्या 'नामवंत परक्यांची'–त्यांचेच शद्व आहेत हे–ओळख करून घेण्यासाठीं आपल्या साऱ्या जमातींतून ते दोघेच काय ते आमच्याकडे आले होते. त्यांची सारी जमात तिथेच त्या खेड्याच्या आसपासच रहात होती.

ते दोघेहि खरेच मोठे सुरेख नि सुसंस्कृत असे पक्षी दिसत होते. आमच्या त्या खेळीमेळीच्या संभाषणांत विरोधी सूर असा फक्त एकदांच निघाला. त्यांचं म्हणणं कीं, माणसं हीं अतिशय शांतताप्रिय नि मोठे गोडे प्राणी आहेत; नि ते स्टॉर्क जातीशीं खूपच सलोख्यानें असे वागतात. आणि त्यानीं सांगितलं कीं, आम्ही स्टॉर्क हे आपलीं घरटीं बहुतेक या मानवी प्राण्यांच्या घरांवरच बांधतों; देवळांच्या घुमटावर नि क्रूसावर देखील, आणि खूप ऊन येतं त्याच बाजूला मात्र.

'तें गचाळ दमट सांवट आम्हाला डोळ्यांसमोर देखील नको असतं, ते म्हणाले.'

'माणसं खात नाहींत तुम्हांला?' आमच्यांतल्या एकानें विचारलें.

'नि खमंग लागावं म्हणून तुमचं मांस खारवीत नाहींत ते?' दुसऱ्यानें पुढें चालू केलं.

'छे, कधींच नाहीं!' त्यांच्यांतल्या एकानें जोरानें सांगितलें. आमच्या विषयीं त्यांना खूप आदर आहे नि असला विचार देखील

ते मनांत आणणार नाहीं कधीं–नि शिवाय आम्ही त्यांच्या अनेक प्रकारानीं उपयोगी पडत असल्यानें त्यांना आमच्या बद्दल कृतज्ञता वाटते आणि आम्ही त्यांचं कधींहि कसलंच नुकसान करीत नाहीं, म्हणून ते आमचे आभारी आहेत.'

'त्यांचं कोणतं विवक्षित काम करतां तुम्ही ?' माझं कुतूहल जागृत झालं होतं.

'त्यांच्या घराजवळ येणाऱ्या साऱ्या गचाळ प्राण्यांचा आम्ही नाश करतों, आम्ही साप मारतों--'

'त्यांच्या शेताभातांना आम्ही कधींच स्पर्शकरीत नाहीं--'

'याचा अर्थ तुम्हांला चांगल्या वस्तूंची चवच नाहीं,' आमच्या जवळ येऊन आमचा आजारी दोस्त खवचटपणें म्हणाला.

'ज्याची त्याची आवड गोड,' नम्रपणें मान झुकवीत त्यांतला एक स्टॉर्क म्हणाला. 'तें कांहीहि असलं, तरी माणसांबद्दलची तुमची आढी ही निराधार आहे. त्यांच्या रस्त्यांतून आम्ही मोकळेपणें हिंडतों. त्यांचे कुत्रेदेखील आम्हांला कधीं शिवत नाहींत. आमच्या घरट्यांची कोणीं मोडतोड करीत नाहींत आणि हिवाळ्यांत आमच्या गैरहजेरीमुळें झालेली पडझडदेखील ते ठाकठीक करून देतात. आणि वसंत सुरू होतांच आम्ही जेव्हां परत येतों--अहो, तुम्ही तरी बघायला पाहिजे त्यांना काय आनंद होतो तो ! आमचं तें स्वागत पाहून कुणाला वाटेल कीं त्यांना तो मोठा सणच वाटतो.'

'तुमची जात वेगळी--आमची वेगळी,' बाबा म्हणाले. त्यानीं हा वेळपर्यंत एक शब्दहि उच्चारला नव्हता.

'आतां थोडंफार आम्हांला तुम्हांलाहि सांगूं द्या.' ट्रायफ्लरनें एकदम आपल्या संतापाला वाट करून दिली. तो चिडला होता नि

त्याचा त्या घमेंडखोर स्टॉर्कला जरा खालीं खेंचण्याचा निश्चय दिसला. 'दोस्त, तुम्ही एक तऱ्हेनें माणसांना मदत करतां, यांत मुळींच शंका नाहीं. पण मुद्दा तो नाहीं. माणूस स्वार्थी आहे नि तो कृतज्ञ तर मुळींच नाहीं. तुमच्या सुरक्षितपणाचं कारण माणसाची स्वार्थी वृत्तीच आहे.'

'ती कशी काय ?'

'कां, अगदीं उघड आहे तें ! तुम्ही स्टॉर्क सर्व प्रकारच्या गचाळ घाणीवर जगतां नि त्यामुळें तुमचं मांस इतकं कांहीं—माफ करा हं माझ्या शब्दांबद्दल--कीं सैतान देखील त्याला बोट नाहीं लावणार. उलटपक्षीं आमचं मांस, आमच्या शाकाहाराचा परिणाम बरंका, जर तें नीट खारवलं नि पद्धतशीर शिजवलं तर मोठं मोहक, चविष्ट असं पक्वान्न होतं तयार; आणि त्यामुळें--'

'तुमचं मांस दुसऱ्या कोणाच्या तरी पोटाला मानवतं याचा तुम्हांला अभिमान दिसतो !' नि त्या स्टॉर्कनें आपले पंख तिरस्कारानें उडवले.

'मोठीच बढाई मारण्यासारखी गोष्ट !' दुसऱ्यानें पुरती जोडली.

'मी बढाई नाहीं आहे मारीत; पण आपल्या या जीवनांतल्या कांही नीति-नियमांचं स्पष्टीकरण करतों आहें फक्त. माणसांबरोबर असलेली तुमची मैत्री नि तुमची सुरक्षितता यांच्या मुळाशीं काय आहे, हें तुम्हांला दाखवण्याचा हा प्रयत्न आहे माझा. प्रत्येक गोष्टीला कारण हे असतंच. उदाहरणार्थ हे डॉ पक्षी घ्या. त्या पाखरांपेक्षां अधीक क्षुद्र असं काय असेल या जगांत ? पण तरी देखील तीं सुद्धां माणसांच्या बरोबर त्यांच्याच छपराखालीं सुखानें राहूं शकतात.'

पण बाबानीं आतां पाहिलं कीं संभाषणाला आतां घातकी असं वैयक्तिक वळण लागतं आहे नि म्हणून ते मधें पडले.

' दोस्तहो, हे थोर स्टॉर्क या घटकेला आपले पाहुणे आहेत, हें विसरूं नका--'

त्यांनीं जर त्यांना बोलूं दिलं असतं, तर बाबानीं त्यावेळीं मोठं युक्त नि कौशल्यपूर्ण असं भाषण केलं असतं. पण एका स्टॉर्कला शब्दच्छल करण्याची लहर आली.

' ते कसं काय, सांगाल का मेहेरबानी करून ? ' तो कडाडला. ' मी म्हणतों कीं या ठिकाणीं तुम्ही पाहुणे अहांत आणि आम्ही यजमान. या भागांतला भोंवतालचा सारा प्रदेश आमच्या गांवच्या मालकीचा आहे, हें आहेका तुम्हांला माहीत. ? '

' सद्गृहस्थहो, मला वाटतं हा वाद थांबवावा,--' योग्यवेळीं बाजू राखणारे हे आमचे लाँगनोझच--'आणि इथल्या या साऱ्या आसमंतावर आपल्या या स्टॉर्क मंडळाचीच सार्वभौम सत्ता आहे हें मान्य करून, आपण त्यांच्याकडून या एका दिवसाच्या पाहूणचाराची मागणी करूं या नि आमचा इथला हा विश्रांतिकाल आम्हांला शांतपणें त्यानीं लाभूं द्यावा अशी त्याना विनंति करूं या. आपल्याला मान्य आहेना माझं म्हणणं. ? '

'अर्थातच,' ते स्टॉर्क म्हणाले. त्या वेगळचा कलाटणीमुळें समाधान पाऊन लाँगनोझच्या शब्दांनी ते हुरळूनहि गेले होते. 'आम्हींहि आपल्या प्रवासाची तयारीच करतों आहों.'

'कुठे कैरोला ? '

'होय आणि कदाचित त्याच्याहिपुढे.'

'आमच्याच रस्त्यानें ?'

' आम्ही आपल्याच मार्गानें जातों. गुड-बाय, सद्गृहस्थहो, वदेसाथी ! '

' गुड-बाय. '

ते स्टॉर्क दिसेनाहींसे झाल्यावर बाबा कुरबुरले : ' चला निघा,' नि मग रागानें पुढे म्हणाले : ' त्या मिजासखोरांना चांगला धडाच शिकवायला पाहिजे होता ! '

'धोक्याचं आहे तें,' लॅांगनोझ म्हणाले.

' मी शाबूत असायला हवा होतों ! ' ट्रायफ्लर गुरगुरला.

'धोक्याचं आहे तें,' आमचे ख्यातनाम सेनानी पुढे म्हणाले, 'कारण, या पोरांतल्या एकाला आपण जर नुसता स्पर्श केला असता तर त्यांच्या संरक्षणासाठीं एक प्रचंड जमाव गोळा झाला असता आणि मग विषम असंच युद्ध आपल्याला झुंजणं भाग पडलं असतं.

' आणि शिवाय, माझा आजार--त्यामुळें आपलं सामर्थ्य बरंच कमकुवत झालं आहे, ' ट्रायफ्लरनें वक्तव्य केलं.

' असं खरं कांहींसं, ' लॉंगनोझ हंसून म्हणाले. ' पण अधिक महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे स्टॉर्कच्या चोंची आपल्यापेक्षां जास्त लांब नि बळकट असतात. म्हणून, दोस्तांनों, मी काय सांगतों ते नीट ऐका. या जगांत सर्वोत्कृष्ट नियम हाच कीं, तहाची शक्यता असेल, मग तो कसाहि असो, त्यावेळीं युद्ध टाळणं हेच शहाणपणाचें आहे. चला, आतां निघूंया आपण. '

आम्ही वर उड्डाण केलं आणि तो मोठा गांव नि त्याचा सर्व आसमंत मग आम्हांला सुस्पष्टपणें दिसूं लागला. स्टॉर्कचा एक भला मोठा जमाव त्या पवनचक्क्यांजवळ गोळा होत होता. त्यांच्यांत एकच धूम उडालेली दिसत होती नि त्यांच्या युद्ध घोषणा आमच्या कानांवर येत होत्या.

' आपण अगदीं योग्य वेळींच निघालों असं दिसतं,' आई म्हणाली. ' त्यांच्याकडे पहा जरा ! केवढा प्रचंड जमाव ! '

पिछाडीला उडत असलेला ट्रायफ्लर, क्षणाक्षणाला घाबरल्या-सारखा मागें पहात होता आणि आघाडीवरच्या लोकांना जलदी करा म्हणून सारखा सांगत होता. आजारामुळें त्याचं धैर्य विचलित झालं होतं, आणि आमचा हा वीर पांढरं निशाण दाखविण्याच्या बेतांत आला होता.

सूर्यास्ताच्या थोडं पूर्वी एका अफाट नदीचं पात्र आमच्याखालीं तळपतांना आम्हांला दिसलं. एक तीर खडकाळ नि उंच असा होता; दुसरा जसा अगदीं पाण्याच्या पृष्ठभागाबरोबर नि घनदाट अशा वृक्ष राईनीं पार झांकून गेलेला. तीरावरील असंख्य लहान मोठ्या उथळ नि खोल भाटी त्यांच्या कांठावरील वेत, लव्हाळे नि अॅस्पन यांची दाटी नि त्यांमधूनच चमचमणारं डोहाचं पाणी त्या काळ्या पार्श्वभूमीवर मोठं उठून दिसत होतं. लांबच लांब वाळूचे बंधारे दुतर्फा पसरले होते आणि बदकं, हंस, प्लव्हर्स नि इतर जल पक्षांचे प्रचंड समूह, यांमुळें हे पुलिनप्रदेश अगदीं गजबजून गेले होते.

'ए, पोरानों! ही ड्नीपर नदी बरंका,' बाबानीं आरोळी दिली. 'आपल्या सारख्याच देशांतर करणाऱ्या त्या असंख्य बांधवां-कडे पहा--केवढा समुदाय हा! साऱ्यांचंच मुक्कामाचं हें एक महत्त्वाचं ठिकाण आहे. आपणहि या ठिकाणीं आजची रात्र नि उद्यांचा सारा दिवस मुक्काम करूं.'

'हॉल्ट!' लॉंगनोझनीं त्या विधानाचा पाठपुरावा केला.

'हॉल्ट! हॉल्ट!' आमच्या त्रिकोनभर तो हुकुम मोठ्या मजेनें खणाणला नि मग तसाच तो इतर त्रिकोनांतहि खणाणत राहिला.

: : १० : :

अरे बापरे! नदीपात्रांतील वाळवंटावर उतरलेल्या त्या असंख्य समूहानें काय काय विचित्र विचित्र आवाज काढून आमचं स्वागत केलं ! केवढं प्रचंड नि विलक्षण स्वरसंमेलन तें!

राखी रंगाचे हजारों टील लव्हाळयांत उतरले होते; जवळच एका डोहांत कलहंसांचा विहार चालला होता. काळे ग्रीब नि पाणबुडे माशांमागून उसळया घेत इतस्ततः भटकत होते. लांब तंगडे हजारो प्लव्हर्स वाळूंत तुरतुरत होते नि पाण्याच्या डबक्यांतून धांवत होते. उजवीकडे, खालीं पाण्यावर ओठंगलेल्या विलोवर तिरसट मुद्रेच्या स्पून बिलचीं पोरं बसलीं होतीं. पलीकडे जरा दूर सेजग्रासच्या पुंजक्यांत बसून बिटर्न एखाद्या बैलासारखे ओरडत होते. असे किती किती म्हणून सांगूं--छे, त्या साऱ्या जमातींची नामावळी सांगणं अशक्य आहे !

आमच्या पूर्वी तिथे येऊन उतरलेल्या पक्षांना त्रास देण्याची आमची इच्छा नसल्यानें पाण्यापासून पन्नास एक कदमांवर असलेल्या कोरडया भागांत तिथल्या उंच सखल हिरवळीवर आम्ही मुक्काम केला. तिथे ब्लॅक बेरीज विपुल दिसलीं नि तीं आम्हाला आवडलीहि नि शिवाय थोडींफार एकॉर्न्स पण होतींच तिथें. हीं एकॉर्न्स जरा मऊसर असलीं कीं खायला मोठीं चांगलीं असतात. पण आतां त्यांच्यापेक्षां उजवं असं खाद्य आमच्या जवळ असल्यामुळें जरा रुचि पालट म्हणूनच आम्ही त्यांचा समाचार घेत होतों.

आमच्या त्या जागेवरून एकूण एक पक्षांचा तो प्रचंड तळ तर आम्हांला दिसत होताच, पण त्याशिवाय नदीच्या पात्राचाहि खूप मोठा भाग आम्हाला पहातां येत होता. आतां यावेळीं एक मोठ

मालवाहू जहाज आपलं शीड उभारून संथपणें खालीं जात होतं जहाजाच्या वरच्या भागावरील माणसंहि आम्हाला दिसत होतीं. नि आमच्या पासून तीं खूपच दूर असल्यामुळें आम्ही अगदी बिनधोकपणें त्यांचं निरीक्षण करीत होतों. आम्ही मुक्काम केलेली जागा जरा खोलांत होतीं नि आमच्या सभोंवार झुडुपांचीहि चांगलीच दाटी असल्यामुळें रात्रीच्या पहाऱ्याचं काम बिकट झालं होतं. म्हणून त्या रात्रीच्या पहारेकऱ्यांची संख्या आम्ही वाढवली.

मी नि माझी ताई अशीं आम्हीं दोघंहि त्या रात्रीं पहाऱ्यावर होतों, आणि ताईला झोंप जरी अगदीं सपाटून लोटली होती, तरी स्वकर्तव्याची नि जबाबदारीची तीव्र जाणीव तिला कसलीहि कुचराई करूं देणं शक्य नव्हतं. पहारेकऱ्यांना सगळ्या आवश्यक त्या सूचना दिल्या गेल्या होत्या, नि पहाऱ्याच्या जागांची आखणीहि दिवसा उजेडींच पुरी झाली होती. त्यामुळें काळोख पडण्यापूर्वींच आमच्या त्या शिबीराची एकंदर बैठक नि त्याचा आसमंत हा आम्हांला नीटपणें पाहून ठेवतां आला.

सूर्यास्त होतांच शिबीरांतील सर्व आवाज शांत झाले, आणि सभोंवार गडद धुकं पसरून दूरचा तो खडकाळ तीर तर आम्हांला पार दिसे नाहींसा झालाच, पण आमच्या शेजारची ती ओकवृक्षांची राईहि त्या पडद्याआड अदृश्य झाली.

आसमंतांतील वातावरणांत कितीतरी गूढ असे उदासवाणे आवाज घुमत होते, नि आगामी प्राणसंकटाची पूर्वसूचनाच जणुं ते आम्हांला देत होते. किंवा पहाऱ्यावरील माझी ती पहिलीच रात्र असल्यामुळेंहि कदाचित मला तसं वाटत असेल.

पण तेवढ्यांत, माझ्या शेजारच्याच जागीं असलेली माझी ताई एकदम माझ्याजवळ आली.

' कां ग, जागा कशी आलीस सोडून तूं ? ' मी विचारलं.

' मला भीति वाटते आहे एकटीला , ' तिनें सरळ कबूली दिली.

मध्य रात्रीच्या सुमारास धुकं वितळलं नि वरील कृष्णवर्ण तारांकित आकाश आम्हांला दिसूं लागलं. रात्र चांगलीच गारठ्याची होती.

नदीचं तें विशाल भव्य पात्र संथपणें आपला प्रवास करीत चाललं होतं नि त्याचा तो पलीकडील दूरचा तटप्रांतहि आतां आम्हांला अंधुकपणें दिसत होता.

जरा वेळानें कांहीतरी काळे काळे पदार्थ नदीपृष्ठावरून वहात आहेत असं माझ्या लक्षांत आलं. ते काय आहेत हें निरखून पहाण्याचा मी खूप प्रयत्न केला. पण शंका यावी असं कांहींच मला नीटसं दिसेना. कसल्यातरी झुडुपांचे नि लव्हाळ्यांचे भारेच त्या प्रवाहांतून वहात चालले होते. पण आले कुठून ते ? आणि ते जर पाण्यांतून वहात जात असतील, तर ते हंस नि बदकं झोंपलेल्या त्या डावीकडील घाटाकडे ते असे कां वळत आहेत ? कां बरं ?

माझ्या मनांतील ही शंका मी ताईला सांगितली. तिलाहि ती शंका पूर्णपणें पटली आणि तिनें बाबांना किंवा दुसऱ्या कोणातरी वृद्ध करकोंच्याला हांक मारण्याची सूचना केली, नि लगेच तिकडे गेली देखील ती.

हाच उपाय मला देखील सर्वोत्कृष्ट वाटला. कारण नाहींतरी ते काळे पदार्थ काय आहेत हें कळल्या शिवाय आम्हांला धोक्याची सूचना देतां येतच नव्हती. ते जर नसते लव्हाळ्यांचे भारे असले तर आमची धोक्याची सूचना– फसवी ठरली असती, नि आम्ही किती हास्यास्पद ठरलों असतों!

बाबा तावडतोब माझ्या पहाऱ्याच्या जागीं आले. त्यानीं त्या पुढे येणाऱ्या पदार्थांकडे दृष्टी टाकली नि त्यांचा चेहरा गंभीर झालेला दिसला.

'मला माहीत आहे हें काय आहें तें,' ते पुटपुटले. 'हुश्शार. !' आणि त्यानीं पहिली आरोळी दिली, नि आम्ही पहारेकऱ्यांनी त्याला पुस्ती जोडली.

पण आमच्या आरोळ्यांचा आवाज पुरता विरण्यापूर्वीच त्या धोकेबाज तरत्या काळ्या पदार्थांवरून आगीचे लोळ कडाडत उठले नि धुराचे लोट सर्वत्र पसरले.

मग काय झालं तें भगवान जाणे. 'शिकारी! शिकारी!' प्राणांतक जखमांनी विवळत त्या पाखरांनीं निराशेनें किंकाळ्या फोडल्या. आणि मग तिथला तो निद्राजड सारा जमावाच्या जमाव मोठा भयानक आवाज करीत नि पंखांचा फडफडाट करीत वर उसळून जवळच्या गर्द झाडींत पिसाटा सारखा घुसला.

आम्हीहि सारेजण उठून वर झाडीवर उड्डाण केलं. आतां आम्हांला सारं कांहीं स्पष्ट दिसूं लागलं. तीन होड्या, झुडुपांचा मोठ्या कौशल्यानें आश्रय घेऊन त्या कँपजवळ अगदीं गुपचूप येऊन पोंचल्या होत्या, आणि होड्यांतील शिकारी बदकांच्या त्या घनदाट जमावावर बेदरकार क्रौर्यानें बंदुकी झाडीत होते नि ते गरीब प्राणी वेड्यासारखे सैरावैरा उडत होते !

जखमी नि मेलेलीं बदकं पटापट, आवाजहि न करतां खालीं पाण्यांत पडत होतीं, नि त्यांच्या आंगांतून गळलेल्या रक्ताचीं वर्तुळें पाण्यांवरून तरंगत तरंगत जात होतीं. कत्तल झालेले असंख्य मृतदेह असे प्रवाहाबरोबर वहात उथळ भागांकडे चालले होते. एक खूप मोठा राखी रंगाचा हंस, पंखांतून गोळी गेल्यामुळें, जीवाचा अगदीं

आटापीटा करून एका झुडुपाकडे चालला होता. पण आणखीं एका गोळीनें त्याचा वेध केला आणि, त्या बापड्यानें केविलवाणा स्वर काढीत अंतराळांत एक गिरकी मारली नि तो खालीं धाडकन जमीनीवर कोसळला. पण शिकाऱ्यांची फैर अजून झडतच होती.

अखेरीस, त्या दाट राईंत आपण शिरलों तरच आपला तरणोपाय आहे हें त्या बदकांच्या ध्यानांत आलं आणि ते सारे त्या दिशेनें उडाले. गोळ्यांचा वर्षाव थांबला.

मग शिकाऱ्यांनीं आपलीं तीं विजयचिन्हं गोळा करून आपल्या होड्यांत त्यांची रास रचण्यास सुरवात केली. आणि त्यांच्या अनेक बळींची प्रेतं पाण्यांत जरी वाहून गेलीं होतीं नि कित्येक गवताच्या नि झुडुपांच्या गुंताळ्यांत जरी तशींच पडलीं होतीं तरी त्यांच्या होड्या जशा शीग लागल्यासारख्या भरल्या होत्या. अत्यंत भीषण, निर्घृण असाच तो संहार होता!

ते शिकारी आतां नदी किनाऱ्यावर आले आणि त्यानीं एक शेकोटी पेटविली. शेकोटीच्या त्या लाल प्रकाशांत त्यांची हालचाल आम्हांला नीट दिसत होती. नि आम्ही पाहिलं तों एकजण एका गरीब टीलचीं पिसं उपटित होता तर दुसरा एक पाण्याचं भांड शेकोटीवर ठेवित होता. इतर कांहींजण आपली आंघोळ उरकीत होते.

त्यांच्या डोक्यावर घिरट्या घालीत असतां आम्ही हे सगळं पहात होतों,

'चला, जाऊं या आपण इथून, ' कितीएक कांपरे आवाज बोलले.

'जायचं ? कुठें ?' नापसंतीच्या स्वरांत बाबा म्हणाले. 'आपण सुरक्षित आहोंत इथें, पण त्याचा काय नेम ? आपण इथून उडून

जाऊं नि दुसऱ्या जास्तच भयानक अशा धोक्याच्या जागीं जाऊनच नेमके उतरूं. '

आणि तसंच दिसत होतं. खालीं आणखी थोडं पलीकडे ते आगीचे लोळ पुन्हां चमकले. शिकाऱ्यांची आणखी एक तुकडी दुसऱ्या एका प्रवासी तळावर हल्ला करीत होती.

आणखीं बळी, आणखीं रक्तपात!

दिशा उजळूं लागल्या, नदीच्या त्या खडकाळ तीराकडे आम्हीं उडालों नि आपली एक तुकडी शत्रूवर पहारा करण्यासाठीं मागें ठेवली. नदींत थोडावेळ पोहून आमचे शत्रू आनंदानें हंसत खिदळत नि गप्पा छाटीत पोटपूजेला लागले. आणि मग आपल्या होड्यां-कडे परत फिरून एका शहराच्या रोखानें त्यांनी होड्या वल्हवल्या. दुरून तरी तें शहर, सभोंवारच्या फळबागांमुळें मोठं सुंदर दिसत होतं.

आमच्या पुढाऱ्यांनी आपली बैठक भरवली नि ठरवलं कीं आपल्या शिबिरस्थानीं परत जायचं. ' आतां मुळींच धोका नाहीं तिथें, ' लाँग नोझ आम्हांला म्हणाले. ' त्या शिकाऱ्यांची नक्की खात्री आहे कीं, त्यांच्या हल्ल्यामुळें भेदरून उडालेले पक्षी परत कधींच यायचे नाहींत.'

सूर्योदयाच्या थोडें आधीं असे आम्ही आपल्या मुक्कामावर आलों. एखाद्या रणक्षेत्राचं स्वरूपच त्याला आलं होतं.

' इकडे ये ! ' बाबांनी मला हांक मारली, ' नि तूंहि येग, ' ते ताईला म्हणाले. आम्ही दोघंहि चोरट्यासारखीं त्यांच्याजवळ गेलों. तरी देखील मला वाटत होतं कीं मी आपलं कर्तव्य बजावलं होतं आणि त्या बाबत माझं मन निःशंक होतं.

त्यांचं बोलणं कुणी ऐकूं नये म्हणून बाबानीं आम्हांला जरा बाजूला घेतलं.

'काम करण्याचे वेळीं वेळ गमावला कीं काय होतं, हें कळलं नारे आतां पोरांनों? तुम्हांला संशयित वाटणारे ते गोळे नदीवर तुम्हांला वाहात असतांना दिसतांक्षणींच तुम्हीं जर धोक्याची सूचना दिली असतीत तर त्या शिकाऱ्यांचे दांत पडले असते नि रक्ताचा सडा मुळींच पडला नसता. पण त्याऐवजीं, तुम्ही नुसते नवल करीत नि चर्चा करीत बसलांत नि मला बोलवायला आलांत आणि अमूल्य वेळ फुकट घालवलात.'

'पण बाबा,' मी म्हणालों, 'खोटी सूचना द्यायची मला भीति वाटली. त्यांच्या टिंगलीचा विचार--'

'टिंगल! त्यानें काहींच इजा होत नाहीं. त्यानीं तुमची चेष्टा केली असती यांत कांही शंका नाहीं, पण त्याचं काय मोठं? तिचा त्यांना विसर पडलाच असता आणि आतां, या साऱ्या विधवांकडे नि पोरक्या पोरांकडे पहा--'

'पण बाबा, आपलीं सारीं सुखरूप आहेत,' मी मधेंच बोललों.

'आपलीं!' रागानें भडकून जाऊन बाबा मला वेडावीत म्हणाले. 'काय अर्थ या 'आपलीं'चा? सारेजण आपले आहेत, निदान असले पाहिजेत. आपला नि लोकाचा हा बेवकूफपणाचा शोध फक्त माणसंच लावतात. वेगवेगळे गुणदोष नि स्वाभाविक संवयी यांमुळें वेगवेगळे वंश नि जाति उत्पन्न झाल्या आहेत, हें खरं आहे; पण जनन मरणाच्या बाबतींत सर्वजण एकच आहेत.'

'बाबा,' माझ्या ताईनें विचारलें, कारण बाबांशीं बोलतांना माझ्यापेक्षां तिला कमी भीति वाटायची, 'बाबा त्या बदकांनीं नि हंसांनीं आपली कां नाहीं काळजी घेतली? त्यांचंहि रक्षण आपण काय म्हणून करायचं?'

'ते करतातच आपलं स्वतःचं संरक्षण, नि आपल्याचसारखे ते पहारेकरीहि उभे करतात; पण त्यांना तें नीटसं कसं करावं हें कळत नाहीं. आपल्या करकोंच्यापेक्षां त्यांना ही जिन्नस पुष्कळच कमी मिळालेली आहे,' ताईच्या डोक्यावर चोंचीनें हळूच टपली देऊन बाबा म्हणाले.

'आणि परमेश्वरानें जर आपल्याला अधिक बुद्धी नि दुसरे गुण दिले असतील, तर आपल्याच प्रमाणे त्या आपल्या लहान नि कमताकद बांधवांच्या कल्याणासाठीं देखील त्यांचा उपयोग आपण केला पाहिजे. हें असं केलं तरच आपण ज्यानें आपल्याला ही जास्त बुद्धि दिली त्या परमेश्वराचे उतराई होऊं. समजलं ?'

'होय बाबा,' आम्ही दोघानीं एकदमच उत्तर दिलं.

'बरं, मला वाटतं आतां पुरे झाली त्यांची हजेरी,' आई म्हणाली. 'या पहिल्याच रात्रपाळीमुळें दमलीं असतील पोरं नि त्यांनीं काय पाहिलं तेवढी शिक्षा पुरी आहे त्यांना तर तुमचं आतां व्याख्यान त्यांना ऐकवण्या ऐवजीं, एकदोन तास विश्रांति घेऊं देत बिचारीं.'

'असंच पाहिजे होतं त्यांना,' बाबा हंसून म्हणाले नि ते लाँगनोझकडे गेले. जवळच एका झुडुपांत दडलेल्या आजारी ट्रायफलरचा क्षेम समाचारहि त्यांना घ्यायचा होताच.

दुपार होईपर्यंत सारं कांहीं शांत शांत होतं नि आम्हांला सुंदरशी विश्रांति मिळाली. मग आईनें आम्हांला जागं केलं नि सांगितलं कीं आपला विश्रांतिकाल थोडा कमी करायचं ठरलं आहे आतां. त्या भीषण घटनेचा आमच्यावर जबरन परिणाम झाला होता. त्या भागांत राहाण्याचा विचार कोणालाच रुचत नव्हता. म्हणून तिसरे प्रहरीं तिथून निघण्याचा हुकूम दिला गेला.

ड्नीपर नदीच्या अनुरोधानें खालीं दक्षिणेकडे, कीव्ह शहराकडे आम्हांला आधीं जायचं होतं, नि मग तिथून पश्चिमेकडे डॅन्यूबच्या मुखाच्या दिशेला आम्हांला प्रवास करायचा होता.

:: ११ ::

प्रशांत वातावरणांत, तिचा जलप्रवाह मुक्तबंध नि सलील असा रानावनांतून नि पर्वत प्रदेशांतून वहात असतां ड्नीपर मोठी मोहक दिसते.... पण हें माझं नाहीं हं. एका प्रसिद्ध ग्रंथांतील ही उसनवारी आहे माझी. कोणत्या ग्रंथाची ? तुम्हांला आहे माहीत?

पण ड्नीपर मोठी विलक्षण आहे यांत मात्र कांही शंका नाहीं. आणि तिच्या तटप्रांतांतून कोणता अधिक मोहक आहे हें सांगण मोठं कठीण आहे--उजवा, त्याचा तो उंच उंच, खालीं घसरत येऊन तिच्या अथांग नोल उदरांत उडी घेणारा खडकाळ धस, कीं तो, एखाद्या उंची अत्यंत विशाल अशा गालिच्यासारखा, तिकड दूर अनंत नीलिम्यांत मिळून जाणारा सपाट डावा ? या तटप्रांतांत दक्षिणची हीं चित्र विचित्र खेडीं मधून मधून इतस्ततः विखुरलीं आहेत, त्यांतलीं तीं सफेती दिलेलीं घरकुलं आपआपल्या बग़ीच्यांत गुडुप झाल्यासारखीं दिसताहेत, नि त्यांतील तीं देव मंदिरें नि संपन्न श्रेष्ठींचे उध्दत प्रासाद, नि जीवन चैतन्यानें जशीं सळसळत असलेली तीं बंदरें....आणि त्या विशाल नदीच्या वक्षावरून लहान मोठीं कितीतरी मालवाहू गलबतें नि आगनावा माल भरभरून खालीं वर संथपणें किंवा चपळाईनें पळत आहेत. पांढरे गल पक्षी, वर आकाशांत भरारत आहेत, मधेंच आपल्या पंखांनीं खालच्या पाण्याला स्पर्श करीत किंवा मधेंच बुडी घेऊन रजतधारेसारखे तळपत परत वर येत आहेत--नि चोंचींत पकडलेला मासा.

पिवळसर ऊन पडलेल्या त्या वाळवंटांत बरीच धांवपळ चालली होती. एकीकडे कोळी आपलीं जाळीं पसरीत होते, तर दुसरीकडे आपल्या ढेरपोटच्या बार्जांचा तळ राळ-डांबरानें माखीत होते, किंवा

लांब लांब ओंडक्यांचा तराफा तयार करीत होते. पलीकडे तिकडे, पाण्यावर आलेला गाईंचा कळप, पुढें आलेल्या खडकाच्या छायेंत विसांवा घेत होता. नि त्याच्याहि पलीकडे, जलविहारासाठीं आलेल्या बायका मुलांमुळें तो भाग मोठा सुरेख दिसतो आहे.

तापदायक गोमाशांपासून दूर असा, उंच शिंगांच्या बैलांचा एक कळप शांतपणें जलस्नानाचा आनंद लुटीत होता.

दऱ्याखोऱ्यांतून असंख्य निर्झर निर्झरणी घोंघावत येऊन विशाल ड्नीपरच्या पात्रांत घुसत होत्या. विहीरींवरील राहाटांची करकर एकसारखी चालली होती नि प्रार्थनामंदिरांतील घंटा दूर अंतरावर निनादत होत्या. त्याच दूर दिशला, उंच मठांच्या अंधूक रेखाकृति नि एका विशाल नगरांतील देव मंदिरें धुक्यांतून डोकं उचलून पहात होतीं.

' तें कीव्ह बरं का, ' लाँगनोझनीं जाहीर केलं. ' शतकांमागून शतकं तें त्या ठिकाणीं उभं आहे. आमचे वडील नि त्यांचेहि पूर्व पूर्वज दक्षिणेला जातांना याच नगरावरून जात असत. क्रौंच्यांच्या हजारों पिढ्या यावरून उडून गेल्या आहेत, आणि त्यानीं नेहमीं याच स्थानावरून वायव्येकडे तोंड फिरवून डॅन्यूबच्या मुखाकडे उड्डाण केलं आहे. '

' मोठी प्राचीन नगरी आहे ही, ' बाबानीहि सांगितलं.

' फारच रम्य नगरी! ' ताई उद्गारली पण ही ड्नीपर जर त्या दुसऱ्या शहरांतून वाहिली असती—तें खूपशीं देवळं असलेलं नि तें सोनरी छपराचं घर असलेलं, आठवतं ?—नि तिथली नदी या इथे वहात असती, तर, तर—'

' आणि तुला जर मोराचा पिसारा असता, ' ट्रायफ्लर हंसून मधेंच म्हणाला, ' नि रेनडिअरचीं शिंगं तुझ्या डोक्यावर असतीं,

तर काय झालं असतं, देवाला माहीत. पण आजच्या सारखी सुंदर डौलदार अशी क्रौंचकन्या कांहीं तूं दिसली नसतीस हें मात्र नक्की.'
ताई रागावलीच होती बहुतेक, पण त्या शेवटल्या वाक्यानें ती खूष झाली नि ती नाचरी पोर हांसली.

'नेहमीं कांहींतरी गंमत करीत जा तुम्हीं!'

हा वेळ पर्यंत त्या सुंदर शोभिवंत शहराच्या आम्ही जवळ आलों होतों. ड्नीपरच्या उंच खडकाळ कांठावर कीव्ह वसलं होतं नि त्याचे उतरते बांधीव उंच ओटे पायऱ्यांसारखे नदीपात्राला येऊन भिडले होते नि त्यांचं प्रतिबिंब पाण्यांत आरशांतल्या प्रमाणेंच स्वच्छ असं उमटलं होतं. त्या राजशाही सौंदर्यानें आम्ही चकित होऊन गेलों. डोंगर माथ्यावर मुकुटांसारखे विलसणारे ते प्राचीन मठ नि मंदिरें नि त्यांचे ते सोनेरी नि विविधरंगी घुमट नि विलक्षण नाजुक खोदकाम केलेले क्रूस, हें सारं आकाशाच्या त्या रसरशीत निळ्या पार्श्वभूमीवर अतीव मोहकपणें रेखाटलेलं दिसत होतं. उतारांवरून विखुरलेलं नि कड्या कपारींना आलिंगून खालीं आलेलं बागांचं तें हिरवं हिरवं उसळतं सौंदर्य, मग प्रशस्त अशा चौकांतून नि उद्यानांतून विहरत खालच्या राजरस्त्यांमागें येऊन स्थिरावलेलं, मोठं सुंदर दिसत होतं.

नदीवरील दोन झुलत्या पुलांनीं शहराचं खालील सखल प्रदेशांशीं स्नेहबंधन घडवलं होतं. त्यांतल्या एकावरून रेलगाडीचे डबे धडाडत धांवत होते. नि दुसऱ्यावरून अनेक प्रकारचीं वाहनं नि पाठीवर झाडाच्या सालींच्या पिशव्या घेतलेल्या पदातींच्या रांगा लागल्या होत्या.

हे सारे यात्रेकरू होते, नि आपल्या मायभूमीच्या चारी कोपऱ्यांतून जमा होऊन कीव्ह मधील प्राचीन मंदिरांना नि पवित्र अवशेषांना

भक्तिभावानें वंदन करण्यासाठीं ते चालले होते. शहराच्या उंच परिसरांतील मठमंदिरांच्या दगडी भिंताडांपर्यंत, या भाविकांची एक लांबच लांब ओळ सारखी लागल्यासारखी दिसत होती. कांही भाविकांचे गट त्या विशाल भिंताडांच्या सांवलींत विश्रांतिसाठीं बसले होते तर कांहींची पुढें मागें होत त्या काळोखी कमानदारांतून झुंबड लागली होती.

कांहींचे लांब काळे आंगरखे नि उंच काळे शिरोवेष, यात्रेकरूंच्या भडक मेळाव्यांत उठून दिसत होते. त्यांची हालचाल मोठ्या गंभीरपणें नि सावकाश अशी होत होती. आणि त्यांना इतरांकडून कांहीं भलताच मान मिळत होता असं दिसलं.

शहरा पलीकडे आम्हांला एक लष्करी छावणी आणि त्यांतील पांढऱ्या तंबूंचे शिस्तबद्ध आंखीव चौरस दिसले. बंदूकांचीं टोंकं चमकत होतीं आणि तिकडून बंदुकांचे आवाजहि आम्हांला ऐकूं येत होते. आरंभीं आम्ही अर्थातच घाबरुन गेलों. पण ते बार आमच्यावर उडत नाहींत असं कळून आल्यानंतर आम्ही तिकडे दुर्लक्ष केलं, आणि छावणीवरून उडत असतां, त्यांच्या इशाऱ्याच्या बिगुलांना आम्हीहि उच्च स्वरांत चीत्कारून प्रतिसाद दिला.

पण मग थोड्याच वेळांत शहरावरून उठणारा धुळीचा लोट नि तें राखीरंगी धुकं आमच्याखालीं पसरून तें मोहक अंतरिक्षदर्शन अदृश्य झालं. शहरांतील गजबज कमी कमी होऊं लागली नि मग एकदम शांत झाली. ड्नीपरची ती नीलवर्ण फीत आमच्या दक्षिणेकडे निघून गेली आणि मग ती अनंत, क्षितिजापर्यंत पसरलेली मैदान जमीन नि सरळ सोट राजमार्ग फिरून एकदां दिसूं लागले.

आम्ही तेव्हां खूपच उंचावरून उडत असलों पाहिजे. कारण सूर्याचं चकचकीत बिंब आम्हांला अजून क्षितिजावरच दिसत होतं

पण खालीं मात्र संधि प्रकाशाच्या गडद पडद्यानें चर्चवरील क्रूसांची झळाळी केव्हांच पोटांत घेतली होती नि ड्नीपरच्या पात्रावरील सोनेरी कांतीहि मंदावली होती.

आम्ही परत एकदां खालीं एका खुरट्या गवताळ भागांत उतरलों. तो प्रदेश अगदीं खुला निर्वृक्ष असल्यानें पहारा करणं सुलभ होतं आणि म्हणूनच तो पूर्ण सुरक्षित असाच होता.

खालीं उतरतांच आम्ही तावडतोब झोंपी गेलों, नि झोंप इतकी गाढ लागली कीं, जेव्हां मी डोळे उघडले त्यावेळीं अर्धं अधिक आकाश चांगलंच उजळलं होतं, शेवटचे तारे क्षीणतेज असे झाले होते नि ते उगवत्या प्रकाशसागरांत अंतर्धान पावत होते.

'आपल्या प्रवासाचा हा सहावा दिवस,' लाँगनोझ म्हणाले. 'कणखर जवान हें इतकं अंतर झपाटू शकतात. गत वर्षापेक्षां किती भिन्न! आपली कामगिरी उत्कृष्टच झाली आहे यंदां!'

'मागच्या वर्षीं आपण या मुक्कामावर नवव्या दिवसाच्या अखेरीस येऊन पोंचलों होतों,' बाबा म्हणाले.

'पण बळी किती जणांचा द्यावा लागला आपल्याला,' आई सुस्कारत म्हणाली.

'तुम्ही योग्य रीतीनें उडत राहिलांत म्हणजे तुमचा प्रवास पूर्ण यशस्वी होतो,' वृद्ध क्लू क्लू काका म्हणाले. 'पण एक गोष्ट जरा चमत्कारीक वाटते आहे मला--दुसरे कोणीच क्रौंच दिसत नाहींत इथें आलेले; विशेषतः ते ऊरल पर्वताकडचे. खरं म्हटलं म्हणजे ते यायलाच हवे होते हा वेळपर्यंत. आपण थांबायचं का त्यांच्यासाठीं?'

'आपल्या पुढेंहि गेले असतील कदाचित ते. आपण तपासच करूं या त्यांचा,' बाबा म्हणाले.

' जरूर जरूर. ते पलीकडे उडत असलेले बस्टार्ड याच भागांतले दिसताहेत. त्यांना असेलच माहीत. '

' चला, बघूं या. '

जवळच बरेच मोठे नि अवजड असे पक्षी इतस्ततः उडत होते. त्यांतील कांहींनीं आपलीं डोकीं उंचावलीं आणि मोठ्या कुतूहलानें आमच्याकडे टक लावली. तित्तिर पक्षांचे थवेच्या थवे त्या खुरटलेल्या गवतांत धांवपळत होते आणि त्यांचे गोड आवाज चोंहीकडे ललकारत होते.

मधूनच खणखणीत तोटक्या शीळा खणखणत होत्या आणि आमच्या दृष्टीस आंगावर ठिपके ठिपके असलेले कांहीं छोटे प्राणी पडले. आपल्या मागल्या तंगडयांवर ते उभे रहात, शीळ घालीत, नि मग पटकन आपल्या बीळांत अदृश्य होत; नि मग परत बाहेर येऊन त्यांचा तोच क्रम सुरू होई.

' ते मॉरमॉट--एक प्रकारचे उंदीर--पहा किती गोळा झाले आहेत ते, ' करू काका म्हणाले. ' या बेट्यांनीं पीकांचा चांगलाच नाश केला असेल. '

बाबा, एकदोन जवान करकोंचे घेऊन ऊरेली क्रौंचांची माहिती काढण्यासाठीं त्या बस्टार्डकडे गेले. आम्ही शांतपणें इकडे तिकडे हिंडत होतों नि आमच्या अनेक विषयांवर गप्पा चालल्या होत्या. इतक्यांत एक मोठा राखी रंगाचा प्राणी एका विवरांतून बाहेर आला नि मोठ्या सावधपणें आपल्या दोन्ही आंगाला पहात, शेतांतून धांवत निघाला. त्याच्या त्या ताठ उभार कानांवरून, त्याच्या त्या क्रूर लाल डोळयावरून नि त्याच्या त्या विवक्षित दातांवरून आम्ही त्याला ओळखला. लांडगा होता तो. तो खूप दमला असावा. कारण तोंडाच्या एका बाजूनें त्याची जीभ बाहेर लोंबत होती नि पांढरा फेंस खालीं

गळत होता. आणि त्याची शेपटी तर गळून पार खालीं जमीनीलाच भिडली होती.

तिथून पलायन, हाच विचार पहिल्यानें आमच्या डोक्यांत आला. पण त्याची कांहीं आवश्यकता नाहीं, हें तावडतोब आमच्या लक्षांत आलं. स्वतःच्या संरक्षणा व्यतिरिक्त दुसरा कसलाच विचार तो लांडगा करण्याच्या स्थितींत दिसत नव्हता. त्यानें आतां मान मागें वळवली नि त्याच्या डोळ्यांत आम्हांला भय नि दीर्घ द्वेषच दिसला. मग तो जरा थांबला आणि एका कुंपणाजवळील उंच गवतांत घुसून त्यानें खालीं अंग टाकलें. जोराजोरानें धांपा टाकीत, आपली मागली तंगडी तो चाटीत होता.

आतां आमच्या लक्षांत आलं कीं, दुरून तिकडून ठिपक्यासारखं असं कांहीतरी आमच्या दिशेनेंच पळत असल्यासारखं येत होतं, कोणीतरी घोडेस्वार आपले घोडे चौखूर उडवित आमच्या जवळ जवळ येत होते. प्रत्येकाजवळून चार चार कुत्रे पळत होते नि स्वारांच्या पाठीवर कांहींतरी धातूचा पदार्थ लटकत होता.

'बंदुकी ?' आमच्या मनांत आलं.

'अरे तीं ब्यूगल्स,' आमची ती अस्वस्थता लक्षांत येऊन लाँग-नोझनीं आम्हांला धीर दिला. 'त्यांना भिण्याचं कारण नाहीं आपल्याला. पण तिकडे लपलेला तो बदमाष मात्र घड्याजीवानीशीं निसटेलसं दिसत नाहीं.'

'त्यांना नाहीं दिसला तो तर बरा,' त्याची दया येऊन मी म्हणालों.

'पण त्यानीं आधींच पाहिला आहे त्याला. पाहिलंत ! त्याचा परतीचा मार्ग बंद करण्यासाठीं ते उजवीकडे वळताहेत बघा.'

त्या लांडग्याची आतां घडगत नाहीं हें उघड दिसत होतं. पुढें सात आठ कुत्रे, असे आणखीं दोन स्वार आतां दिसूं लागले. त्या लांडग्यानें त्यांना पाहिलं नि तो पळत सुटला. त्या स्वारानीं कुत्रे त्याच्या मागोमाग सोडले नि तेहि दौडत त्यांच्या मागें निघाले.

आम्ही डोळ्यांत तेल घालून अगदीं तयार होतों. पण त्याचं पर्यवसान अखेरीस काय होतं हे पहाण्यासाठीं आम्ही आपली जागा मात्र सोडली नाहीं.

लांडगा कुंपणाच्या आडोशानें पळत होता. पण त्यामुळें उडणारी धूळ त्याची दिशा बरोबर दाखवीत होती. शिकारी तावडतोब तिकडे घुसले.

कुत्र्यांच्या पहिल्या जोडीनें त्याच्यावर हल्ला चढवला. पण मग त्यांतला एक वेदनानीं किंचाळत उडी मारून बाजूला झाला. लांडगा सपाट्यानें निसटला आणि आतां तो खूपच लांब गेला.

"देवाळाच काळजी ! आतां निसटणार तो !" ताई उद्गारली.

पण मग त्या गरीब बिचाऱ्या गाईचा नि तिच्या वांसरांचा विचार आमच्या मनांत आला, नि मग त्यांच्या मृत्यूचा आतां हा न्याय्य सूड घेतला जातो आहे, असं आम्हांला वाटल्यावाचून राहिलं नाहीं.

आतां मात्र लांडगा चांगलाच कचाट्यांत सांपडला होता खास. त्या कुत्र्यांतला सगळ्यांत मोठा कुत्रा, जसा वीजेसारखा पळत आला. तो बदमाष लुटारू क्षणभरच जमीनीला चिकटला, त्याचे दांत वाजूं लागले, नि मग, एकदम सारी शक्ति एकवटून त्यानें झेंप घेतली, आणि त्या शेतांतून तो सुसाट निघाला. एक सुंदर काळा चपळांग कुत्रा त्याच्या अंगावर तीरासारखा धांवला आणि त्यानें त्याचा कान पकडला. दुसऱ्यानें मोठ्या जोरानें त्याच्या ढुंगणावर

तडाका दिला, आणि मग ते तिघेहि खालीं धुळींत लोळले. दुसरे कुत्रेहि आंत घुसले. अखेरीस एक स्वारहि त्या जागीं आला आणि, खालीं उडी घेऊन, त्यानें आपला शिकारीचा चाकू उपसला. एक कर्कश किंकाळी वर उठली नि विरून शांत झाली.

मग दुसरे शिकारी येऊन त्यानीं तो मेलेला लांडगा उचलला आणि ते सारेजण निघून गेले.

बस्टार्ड पक्षांची गांठ घेऊन बाबा परत आले नि म्हणाले कीं त्यानीं अजूनपर्यंत तरी दुसऱ्या कुठल्या क्रौंच तुकडया पाहिल्या नाहींत. पण ते आज उद्यां येऊन पोंचतील अशी बातमी मात्र त्यांच्या कानांवर आहे. कारण त्या रानकबूतरांनीं, या वाटेनें ते जात असतां, तीन दिवसांपूर्वी ते क्रौंच पाहिले होते, असं त्यांना सांगितलं आहे.

' एकंदरींत हें असं आहे, ' बाबा म्हणाले. 'आणि इथूनची काय आहे हालहवाल ?'

'आम्ही एक लांडग्याची शिकार पाहिली. ते पहा चालले आहेत ते तिकडे.'

' वा, ठीक ! '

' आतां याला काय म्हणायचं सांगा आजोबा ? ही लुटारूगिरी कीं उद्योगगिरी ?' ताईनें मिस्कीलपणें विचारलं.

' अग फाजीले, ' आजोबा लाँगनोझ हंसून म्हणाले. ' ही–हं–ही उद्योगगिरी. तुला वाटलं तर, किंवा लुटारूगिरी, दरोडेखोरी, नि गळेकापूगिरी यांची शिक्षाच म्हण; कठोर पण न्याय्य अशी शिक्षा.

'काय भयंकर ग बाई ! '

'होय, पण ज्यांना परिचित नाहीं त्यांना,' ड्रायफ्लर हेटाळणीच्या स्वरांत म्हणाला. ' मी ईजिप्तमध्यें होतों, तेव्हां मी माणसं

एकमेकांना ठार करतांना पाहिली. मारणारे लोक आपादमस्तक वस्त्रें घातलेले असे गोरे लोक होते, नि जे मारले गेले ते नग्न आणि कृष्णवर्णी लोक होते. दुसऱ्या एका ठिकाणीं हे नागडे काळे लोक पांढऱ्या, कपडे घातलेल्या लोकांना ठार मारीत होते. मोठं भयंकर दृश्य होतं तें, यांत शंका नाहीं.'

' पण त्यानीं एकमेकांना ठार कां मारलं ? ' आम्हांला नवल वाटत होतं.

' कांही तरी कारण असलंच पाहिजे त्याला, पण मी तें शोधून काढण्याचा प्रयत्नच नाहीं केला मुळीं. '

' पुरे करा तुमच्या या खुनांच्या गप्पा, नाहीं तर पोरांना झोंपा नाहीं लागायच्या, ' आई म्हणाली. 'दुसऱ्याचं असं रक्त सांडणं हें देवाघरीं मोठं पाप आहे आणि, आपल्या क्रौंचकुळींत हें पातक कधींच घडत नाहीं, हे देवाचे उपकार आहेत मोठे. '

' होय, पण त्या स्टॉर्कना संवय आहे याची, ' ट्रायफ्लरनें परत तोंड उघडलं. ' मी स्वतःच पाहिलं – '

' या माणसांजवळूनच शिकले असतील ते. नाहीं तर त्यांच्यांत मोठा सुंदर एकोपा असतो, ' आई सपाट्यानें म्हणाली.

' त्या बस्टार्डनीं मला सांगितलं कीं काल संध्याकाळीं त्यांच्यांतले कांहीजण गमावले—शिकाऱ्यांनीं चौघांना ठार केले त्यांच्यातल्या, ' बाबा सांगू लागले. ' मोठ्या चमत्कारीक तऱ्हेनेंच झालं सारं तें, अनुभवानें शहाणे होत जगणं हेच खरं. दोन घोडा भरलेल्या गाड्या रस्त्यावरून त्यांच्या दिशेला वळल्या. त्या बस्टार्डनीं त्याची कांही फिकीर केली नाहीं आणि त्या गाड्या त्यांच्याजवळून जात असतां, ते आपले वेडपटासारखे पहात राहिले. पण त्या गाड्या त्यांना फेरी घालीत असतां, एक शिकारी उडी मारून खालीं आला आणि त्यानें

बंदुक झाडली. ते बस्टार्ड एकदम पलीकडे घुसले, पण तिकडे उंच गवतांत छपलेल्या दुसऱ्या शिकाऱ्यांच्या सरळ तावडींतच सांपडले ते. असे त्यांच्यांतले चारजण त्यानीं गमावले. "आतां आम्ही नक्की अधीक काळजी घेऊं," त्यानीं सांगितलं.

'तसे ते काळजी घेतातच,' लॉंगनोझ म्हणाले, 'पण मोठ विसराळू नि अवधानशून्य आहेत ते.'

'मी त्यांचा एकदां सबंध थवाच्या थवा वांचवला आहे,' ट्रायफलरनें मधेंच तोंड घातलं. 'आणि तुम्ही आत्तां आम्हांला सांगितलीत, अगदीं तशीच परिस्थिती होती त्यावेळीं. पण माझ्या तें सारं लक्षांत आलं आणि मी त्यांना मोठ्यानें ओरडून म्हणालों--"हुश्शार! अरे चाललांत कुठें तुम्ही? इकडे या!" आणि देवदयेनें माझं ऐकण्याची त्यांनाहि बुद्धी झाली.'

'प्रत्येक वेळेला साजेशी अशी गोष्ट बरी तुझ्या खिशांत तयार असते नेहमीं,' लॉंगनोझ हंसून म्हणाले. 'बरं, बरं, आणि तसं जरी खरंखुरं कधींच घडलं नसलं, तरी घडणं शक्य आहे नि मग मात्र तुझं हें कृत्य मोठं उमदं दिसलं असतं यांत शंकाच नाहीं, हं.'

'यांत असंभाव्य असं कांहींच नाहीं आहे,'--ट्रायफलरला थोडा राग आलेला दिसला--"आणि तुमचा यावर विश्वास कां बसूं नये, हें मला नाहीं कळत. आतां उदाहरणार्थ आणखीं एक गोष्ट घ्या, त्यावर विश्वास ठेवा अगर ठेऊं नका, पण ती झाली मात्र नक्की. एकदां एका गाढ झोंपलेल्या शिकाऱ्याच्या जवळ मी हळूच गेलों. मला वाटतं तो दारूनें गुंग होता, कारण व्होड्क्याचं पिंप जवळच रिकामं पडलं होतं. जवळची भरलेली बंदुकहि पाहिली मी. वा, हें छान, मी आपल्याशींच म्हणालों आणि ती बंदुक उचलून मी वर आकाशांत उडालों. माझ्या मानानें ती फार जड होती म्हणा, किंवा

मी ती उलटीच धरली होती म्हणा, पण जरा नीट धरावी म्हणून मी ती धरण्याची जागा पालटून पहात होतों. आणि हें करीत असतां मी कदाचित त्याचा चाप ओढला असावा. कारण ती बंदूक आप-सुखच उडाली. पण हें एवढंच कांही मोठं उल्लेखनीय असं नसतं वाटलं, पण काय आश्चर्य !..एक मोठा गरुड बाजूनें उडत चालला होता नि आपल्या पंजांत त्यानें एक तित्तिर पकडला होता. ती गोळी सरळ त्याच्या डोक्यांतून आरपार गेली. त्या गरुडानें एक किंकाळी फोडली नि हवेंत उलटा होऊन, खालीं जमीनीवर इतक्या सपाट्यानें तो हापटला कीं त्याचीं सारीं पिसं इतस्ततः पिस्कारून पडलीं. त्याच्या मागोमाग मी अगदीं सपाट्यानेंच खालीं आलों. आणि आश्चर्य असं कीं ती तित्तिर पक्षीण जीवंत होती ! तिनें आपले नाजुक डौलदार पंजे माझ्यापुढे पसरले नि ती म्हणाली : ‘थँक यू, माझ्या थोर, उदार रक्षणकर्त्या ! तुला शतशः धन्यवाद ! शंभर नि सत्तावीस पिलांच्या मातेला तूं आज जीवदान दिलं आहेस !” आणि खरोखरच तो सारा थवा गवतांतून धांवत धांवत बाहेर आला. मी तीं मोजलीं--अगदीं बरोबर शंभर नि सत्तावीस पिलं होतीं तीं; आणि तीं सारीं चिवचिवत म्हणत होतीं, “थँक यू ! थँक यू !’ मी अगदीं गहिंवरून गेलों नि माझ्या डोळ्यांत अश्रु दाटले. मी त्यांना म्हणालों : बाळांनो, देव तुम्हांला सुखांत ठेवो. मी काय, आपलं कर्तव्यच फक्त केलं आहे मी यांत !” ’

‘आहे कीं नाहीं मोठा गंमत्या हा बाळ्या !’ बाबा मोठ्यानें हंसत म्हणाले. ’ याच्या गोष्टी ऐकण्याचा कंटाळा नाहीं यायचा कधीं कुणाला !’

‘खरी आहे ही गोष्ट ? ’ कथेकरी बोवांकडे काकुळतीनें पहात ताईनें विचारलं.

' जसा मी कधीं खोटंच सांगतों ! दिसतों का मी तसा--'

' बरं, बरं. ' ताईनें आपल्या चोंचीनें ट्रायफ्लरचा पंख हळुवारपणें कुरवाळला,

' हं ! ' आई उद्गारली आणि तिनें सहेतुकपणें बाबांकडे दृष्टी टाकली.

बाबांनीं पण दोनदां हुंकार दिला, आणि ते पुढे हळूच म्हणाले, पण आम्हां सर्वांनां ऐकूं जावं अशाच बेतानें, ' नॉन्सेन्स ! '

: : १२ :

त्या कबूतरांचं म्हणणं खरं होतं. पहांटेच्या सुमारास, आम्हीं आपला आसरा सोडून उठण्यापूर्वी, स–स–स असा परिचित नाद आणि जोरदार पंखांचा फडत्कार आम्हांला ऐकू आला––आणि आमच्या पासून जवळच एक मोठा असा करकोंच्यांचा थवा खालीं उतरला.

पुष्कळसे करकोंचे, बहुतेक पुढारीच, तावडतोब पुढे झाले, आमच्या तुकडींतून सामोरे गेलेल्यांत, लाँगनोझ, बाबा नि ट्रायफ्लर, –कारण तो मागे राहाणंच अशक्य होतं–असे तिघे होते.

हे नवीन आलेले करकोंचे, आम्हांला सांगितल्याप्रमाणें, ऊरल-पर्वत नि कामानदी या दोहोंवरून आलेल्यांचं एक संयुक्त पथक होतं; त्यांची गांठ मॉस्कोला पडली नि तिथून ते एकत्रच प्रवास करीत निघाले होते. आमची नि त्यांची जात कुळी अगदीं एकच होती, आणि आमच्यांतल्या प्रौढ करकोंच्यांत आपले जुने परिचित नि स्नेही त्या नवागतांत भेटले––विशेषतः आमच्या प्रौढप्रताप लाँगनोझनां. त्या नवागतांतील एक बराच वयातीत असा क्रौंच पुढे येऊन त्यानें आमच्या सेनानींचं चुंबनच घेतलं नि मग ते दोघेहि. आपल्या त्या परत भेटीच्या सन्मानार्थ म्हणून, अगदीं पंखाला पंख भिडवून असं क्रौंच नृत्य करूं लागले. दोघेहि मोठ्या डौलदारपणें नाचत होते हें खरं, पण तरीहि आमचे लाँगनोझ अधिक डौलदार दिसले. नृत्यानंतर लाँगनोझनीं आपल्या मित्राची, माझ्या आई-वडीलांशीं, ' दि वाइज विंगफ्लॅप, (चतुर पंख) ' अशी ओळख करून दिली, आणि त्या कामी–ऊरल क्रौंचनेत्यानें मोठ्या डौलदारपणें त्यांना अभिवादन केलं.

' होय, प्रिय दोस्त, या आयुष्यांत आपण दोघांनीं अनेक सुख-दुःखाचा एकत्र अनुभव घेतलाच आहे ! ' आमचे वृद्ध नेताजी म्हणाले.

' यांत कांहीच शंका नाहीं, ' त्यांचा दोस्त सुस्कारला. ' पण तुमची या वर्षींची ही नवी प्रजा मोठी गोड दिसते आहे बुवा ! चांगली धष्टपुष्ट नि भरभक्कम ! आणि आतांपर्यंतच्या प्रवासाचा यत्किंचित्हि श्रम त्यांच्या तोंडावर दिसत नाहीं आहे. पण असंहि खरंच, कीं तुमच्या सारखा नेता असल्यावर, त्यांना फिकीर तरी कसली ! '

' आणि तुमचे बाबालोक--त्यांचीहि तयारी उत्कृष्टच दिसते आहे ! तुमचं नेतृत्वांतलं कौशल्य अजोडच आहे ! '

' जाऊं द्या, जाऊं द्या तें ! तुमची काय हाल हवाल ? तुम्ही फारच विनयशील आहांत, म्हणूनच म्हटलंत तसं. '

' नाहीं, खरं तेच सांगितलं मो. कांहीं गळती झाली येतांना ? '

' होय, झाली थोडी. प्रवासाच्या तिसरे दिवशीं, दोन पोरांनीं कांही भलतं-सलतं खाल्लं नि मरून गेलीं. त्यानंतर मग एक तीन वर्षाच्या उमरीचा एका गोळीला बळी पडला. '

' अरेरे ! पण हे कसं झालं ? '

' लांब पल्ल्याच्या बंदुकीनें घेतला त्याचा बळी. आणि ती गोळी कुठून आली याचा पत्ता कांही आम्हांला लागू शकला नाहीं. अलीकडे या असल्या बंदुकी लोक बाळगूं लागले आहेत नि त्यानें आपले सगळे बेत फिसकटून जातात. '

आमच्यांतील मोठ्यांच्या पावलावर पाऊल ठेऊन आम्हीं तरूण मंडळींनींहि एकमेकांच्या ओळखी करून घेतल्यां आणि थोड्याच

वेळांत आमचा स्नेहहि जमला. त्या रात्रीं, आमच्या त्या प्रचंड मोठ्या क्रौंच छावणींत जिकडे तिकडे गप्पागोष्टींना मोठाच रंग भरला होता.

गेली सारी रात्र या नवागतांनीं प्रवास केला असल्यामुळें त्यांना एका सबंध दिवसाच्या विश्रांतीची आवश्यकता होती. आणि या पुढील प्रवास आम्ही एकत्र करायचा असं ठरवलं असल्यानें आम्हां-लाहि थांबणं भागच होतं.

त्या दिवशीं आनंदी आनंद होता. माणसांनीं आम्हांला त्रास दिला नाहीं, किंवा तसं म्हटलं तर दुसऱ्याहि कोणीच दिला नाहीं. त्या दिवशीं, अनेक गिधाडं नि गरूड आमच्या डोक्यावर घिरट्या घालीत होते, हे खरं. पण आमचा तो एकंदर जमाव पाहून खालीं उतरण्याची त्यांची छाती मात्र केव्हांच झाली नाहीं.

आमचे ट्रायफलर महाशय सारा दिवस त्या नवागतांत रेंगाळत होते. आपल्या पोतडींतल्या गप्पाच त्यांना तो सांगत असणार खास. पण आमची ताई मात्र यामुळें जरा चिडल्यासारखी झाली. पण मग सायंकाळच्या वेताला आमचे हे गप्पीदास परत फिरले--आणि सूर्यास्तापर्यंत आमच्यांतच होते ते. आमच्या कंपूतहि तो मग नाचला आणि वर आणखीं आमच्या त्रिकोनाची आज पहाऱ्याची पाळी होती तरी त्यानेंहि पहारा करण्याची तयारी दाखवली. आणि आंख-लेल्या कार्यक्रमांत यामुळें कांही गोंधळ होत नसल्यामुळें तशी परवानगीहि त्याला मिळाली नि तो खूष झालेला दिसला.

दिशा उजळतांच, त्या प्रदीर्घ विश्रांतीमुळें पूर्ण ताजेतवाने होऊन आम्ही निघालों. मोठं भव्य नि कुतूहलजनक असं दृश्य होतं तें. राजरस्त्यानें जाणारे येणारे पांथ देखील आपलीं वाहनं थांबवून उभे राहिले होते, नि डोळ्यांवर येणाऱ्या सूर्य किरणांना हातानें आडोसा

करून, आमचा त्रिकोनामागून त्रिकोन त्या पिवळट करड्या शेतांतून अलग होऊन, सलील गतीनें पण रेखीव शिस्तबद्ध असा वर हवेंत उड्डाण करून, मग त्या विशाल ब्रह्मांड कटाहाचा अर्धा अधिक भाग व्यापलेल्या त्या प्रचंड राक्षसी अशा पाचरींत--उडत असलेल्या त्रिकोनांत--आपली जागा घेत असतां, तिकडे अनिमिष नेत्रांनीं पहात होते.

सकाळच्या त्या ताज्या टवटवीत अशा वातावरणांत, आमच्या तुताऱ्यांच्या ताफ्याचा खणखणीत असा नाद घुमत होता. आणि आमच्या बाबांचा तो रणभेरीसारखा आवाज या सर्व आवाजांवर उठून निनादत होता. ते बस्टार्ड–माळढोक पक्षी–देखील निघण्याची तयारी करीत होते आणि आमच्या त्या उड्डाणाकडे कांहीशा असूयेनेंच पहात होते. गरीब बापडे !

त्या दिवशीं आम्हीं एक रानांतला वणवा पाहिला. अरे बापरे ! काय दुःखदायक दृश्य तें !

तो वणवा प्रथम एका मोठ्या रुंद मोकळ्या जागेंत सुरू झाला आणि मग तो तसाच जमिनीवरून दूरवर पसरत चालला. मधूनच एखादं जुनाट झाड त्या अग्निजिव्हांनीं वेढलं जाई नि मग तें शेंड्यापर्यंत एकदम सपाट्यानें भडके आणि आगीचा एक मोठा थोरला सुंदर खांबच जसा उभा केल्यासारखा तो दिसे; आणि त्याचा तो शाखापर्णांचा विस्तार, त्या वेदनांनी जणुं थरथरत थरथरत अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडे. अनेक वृक्षांचा कडाडणारा भयानक आवाज नि अग्निज्वालांची गर्जना आसमंतांत दूरवर घुमत होती. जोरदार वाऱ्यामुळे जळत्या फांद्या नि अनंत ठिणग्या सैरावैरा उडत होत्या आणि जळत्या राळीच्या धुराचे काजळी लोट दाटत्या वातावरणाला विषारून टाकीत होते.

किती असंख्य लहान लहान प्राणी नि चिमुकली पांखरं, त्या धुरानें गुदमरून नि जीव बचावणं अशक्य होऊन, त्या सर्वभक्षक अग्निकटाहांत असहायपणें बळी पडत होतीं !

तिकडे रानाच्या सीमेवर असलेला एक लहान वृक्ष आतां पेटला होता. मदतीसाठीं कुणाच्या तरी किंचाळचा नि आक्रोश तिकडून आतां आम्हांला ऐकूं येत होता. त्या घनदाट धुराच्या मधून कुठून तरी धोक्याची घंटा एकसारखी खणखणत होती. शेंकडो लोक इकडे तिकडे घाईघाईनें धांवत होते आणि आपलं खेडं त्या पुढें पुढें सरकणाऱ्या अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडूं नये म्हणून त्या भोंवतीं मोठमोठे चर खणीत होते, पण त्याचवेळी घरांतून सामान बाहेर काढून तें बारदानी गाड्यांवर चढवण्याची कामगिरी ते अतिशय चपळाईनें उरकीतच होते.

गुदमरून जाण्याची भीति असल्यानें आम्हांला आपल्या मार्गापासून थोडं बाजूला सरून जाणं भागच होतं. धुराचा तो तीव्र धुंद वास सायंकाळ होईपर्यंत आमच्या जसा पाठीसच लागला होता नि त्याचा परिणाम म्हणून दुसरा सबंध दिवस आमचा घसा खवखवत होता. तें विशाल अरण्य नि त्याचा परिसर आम्ही आतां खूप मागें टाकला होता. आतां भूभागाचा सारा तोंडवळा पालटला. वृक्षहीन गवताळ मैदानें, जणूं अनंतालाच भेटायला निघाल्यासारखीं, दृष्टीच्याहि टप्यापलीकडील थडीकडे विस्तारल्यासारखीं आतां दिसत होतीं. पण तें निळसर कडवट धुकं इथें देखील सर्व कांहीं झांकून पसरलंच होतं.

प्रखर सूर्यकिरणांनीं भाजून निघालेलीं नि तुरळक वस्ती असलेलीं हीं स्टीप्स–गवताळ मैदानें–आतां चैतन्यशून्य, रुक्ष, भणभणीत अशीं दिसत होतीं. अखंड महासागरासारखा हा प्रदेश विस्तारला होता नि त्यांमधून एकादीच खोल तुटकी दरी दृश्यमान होत होती. चुना

सफेती केलेलीं लिटल् रशिअनांचीं घरकुलं, त्यांचे ते पिवळे धान्याचे वावर नि राजरस्ते, यांमुळेंच काय त्या एकरंगी भूप्रदेशाला वैचित्र्य येत होतं तेवढंच.

या भागांतल्या विहीरी मोठ्या चमत्कारीक दिसत होत्या. त्यांच्याकडे बोट दाखवून ट्रायफ्लर म्हणाला : 'अगदीं हुबेहूब आपल्यासारख्या दिसताहेत या! नाहीं?'

'म्हणजे काय बुवा?'

'म्हणजे त्यांतला श्लेष असा कीं यांना या भागांत क्रेन्स म्हणतात. हा–हा–हा,' ट्रायफ्लरनें हास्याची फैर सोडली. 'पण त्यांच्यांत नि आपल्यांत साम्य मात्र अगदीं शून्य––एक भिकार विडंबन.'

मला मात्र ट्रायफ्लरचं म्हणणं पटलं, हे सांगतों. कारण पाणी काढण्याचं काम चालू असलं कीं ही हुकटी, पाण्यात चोंच खुपशीत असलेल्या पक्षासारखी नक्कीच दिसते. त्यांना क्रेन्स म्हणण्याचं कारण मात्र मला नाहीं कळत, पण त्यांच्यामुळें स्टॉर्क नि हेरन (बगळे) यांची मात्र पुष्कळशी आठवण होते यांत मुळीच शंका नाहीं.

या विहिरींच्यासभोंवतीं बें बें करीत ओरडत असलेल्या मेंढरांचे मोठाले कळप दाटीदाटीनें उभे होते नि आंगांत फाटके तुटके कपडे असलेले मेंढपाळ, शिव्यागाळी करीत आरडाओरडा करीत होते.

आतां वाटेनें कलिंगडांचे नि खरबुजांचे प्रशस्त मळे आम्हांला लागत होते. त्यांचे कोरडे कोरडे वेल, एकमेकांत गुंतल्यासारखे जमिनीवर पसरले होते नि फळांचे ते काळसर हिरवे, पिवळे नि चांगले पांढुरके असे जड जड गोळे सूर्यप्रकाशांत चमकत होते. यांत चोंच खुपसून आंतलं अमृत चाखणं कांहीं औरच असतं, असं बाबा सांगत होते.

'योग्य वेळीं आपणहि पाहूं त्याचा नमुना,' लाँगनोझनीं आम्हांला आश्वासन दिलं. 'बहुतेक या पुढल्या मुक्कामांतच म्हणा.'

आणि त्याप्रमाणें त्यांनीं आपला शब्दहि पाळला. आम्ही केला मग त्यांवर प्रयोग. चवीला मोठीं गोड नि खायला अगदीं मऊ अशीं जरी हीं फळं लागत असलीं तरी पोटभरीपेक्षां तहान शांत करण्या-लाच त्यांचा उपयोग जास्ती वाटला आम्हांला. त्यांतल्या त्यांत टरबूजं पोटभरीला जरा उजवीं होतीं.

आतांपर्यंत अनेक शहरं नि गांवं, बरींच खेडीं नि वाड्या आम्ही पाहिल्या होत्या नि दुरून निळ्या निळ्या दिसणाऱ्या पर्वतश्रेणीहि आम्ही डोळ्याखालीं घातल्या होत्या. पण आतां कीव्ह पासून तीन दिवसांचा पल्ला मारल्यानंतर, आतां पुढें आपल्यासमोर काय पस-रलं आहे त्याचं नीट अवलोकन करा हं, असं बावांनीं आम्हाला सांगितलं.

आम्हीं पाहिलं तों एक अमर्याद जलविस्तार, एका तिकोनी, वेत लव्हाळ्यांनीं घनदाट भरलेल्या नि लांबरुंद किंवा निमुळत्या चिंचोळ्या अशा असंख्य जलप्रवाहांनीं वेड्या वांकड्या भरलेल्या, अशा अथांग प्रचंड अशा दलदली भूभागांत शिरत असलेला असा आम्हांला दिसला.

'डॅन्यूब नदीचं हे मुख,' लाँगनोझनीं सांगितलं, 'आपल्या सारख्या पाण्यांत फिरणाऱ्या पक्षांना नि पाण्याचा तिटकारा नसलेल्या दुसऱ्याहि पक्षांना, हे जणुं काय दुसरं नंदनवनच आहे, बरं कारे.'

'आणि ते, पलीकडलं ?' क्षितिजावर दिसणाऱ्या एका नील-वर्ण पट्टीकडे बोट करून मी विचारलं. तिकडून कांहीतरी एक चमत्कारीक असा ध्वनी ऐकूं येत होता. एकाद्या मोठ्या शहरांतल्या गोंगाटासारखा, किंवा दुरून येणाऱ्या वादळाच्या सोसाट्यासारखा

मात्र हा कांही आवाज नव्हता किंवा तसलाच एकादा परिचित असाहि तो ध्वनी वाटत नव्हता.

‘ तो काळा समुद्र. ’

‘ ओहो–ओहो–ओहो ! ’ आम्ही सारे तरूण उद्गारलों.

आम्ही सर्वजण मग मोठ्या आदरानें नि मनांत कांहीसा दबदबा· वाटून त्या दूरस्थ नीलपट्ट्याकडे पहात होतों. काळा समुद्र–आपल्या स्वतःच्या पंखांच्या सामर्थ्याविषयीं खात्री असल्यावाचून हा अमर्यादा जलविस्तार ओलांडणं तुम्हांला अशक्य आहे. पंखांना थोडी क्षणभर कच खाऊं दे––कीं खालीं त्याच्या पोटांत गडप झालांतच तुम्ही. आणि त्याच्या पोटांत गडप होणं एवढंच दुर्दैव नाहीं तुमच्यासाठीं तिथे टपलेलं––एखादा मोठा मासा तुम्हांला जीवंतच गट्ट करील· असं अनेक वेळा होतं, असं आईनें आम्हाला सांगितलं होतं. आम्ही करकोंचे कांही हा समुद्र कधींच ओलांडण्याची आशा नाहीं. इकडून प्रवास करतांना आम्ही शक्यतों किनाऱ्या जवळूनच नेहमीं उडत असतों.

पण, छे, डॅन्यूबचं तें मुख कांही विलक्षणच ! देशांतर करणाऱ्या सर्व तऱ्हेचा पक्षांचा केवढा प्रचंड मेळावा तो ! ड्नीपर नदीच्या भागांत आम्ही पाहिलेले ते प्रचंड थवे, या मेळाव्यापुढें म्हणजे कः-पदार्थ होते. प्रचंड जमाव करून उडण्यांतले फायदे, हा अजस्र मेळावा पाहून फक्त इथेंच पूर्णपणें कळणं शक्य आहे. या विलक्षण राक्षसी पक्षि-समुदायांत आपण आपलं स्वतःचं अस्तित्वच पार विस-रतों यांत शंका नाहीं.

आपल्या आयुष्यांत इथें अगदीं पहिल्यानेंच आम्ही पेलिकन्स पाहिले. गुलाबी पांढरा रंग, विशाल देह, भल्या सपाटच्या चोंची नि खालच्या जबड्याखालीं पिशवीसारखा भाग, असे मोठे ऐटबाज

पक्षी होते हे. आतां ते मासे मारण्यांत गुंतले होते, आणि त्या-जागीं मासेहि विपुल असल्यानें, ते पेलिकन्स एकसारखे मासे गट्ट करीत होते नि त्यांच्या त्या पिशव्या मासे भरून भरून जड होऊन चांगल्या खालीं लोंबत होत्या. हे पक्षी स्वभावानें तुसडे म्हणून नांवाजलेले असल्यामुळें आमच्याशीं गप्पा गोष्टी करण्यांत त्यानीं फारसा भाग घेतला नाहीं. पण ते मोहक हंस मात्र आमच्याजवळ मोठ्या मजेनें गप्पा छाटीत होते. किंवा आपलीं सुंदर पीसं शीडा-सारखीं उभारून नि पंख फडफडावीत खोल पाण्यांत ते विहरत होते.

आम्हीं घेतलेल्या जागेसाठीं कांही पन्नास साठ बगळे मूर्खासारखे भांडणाच्या बेतांत आले होते. पण आमचं तें संख्याबल पाहून त्यांनीं मग माघार घेतली.

आम्हीं मुळीं एक सबंध बेटच आपल्या कबजांत घेतलं होतं नि काळोख पडेपर्यंत तिथे राहाणंहि सोईचं होतं. ती जागा मोठी चित्त-वेधक होती, पण एक माशांव्यतिरिक्त तिथे दुसरं कोणतंच खाद्य म्हणून नव्हतं. आणि मासे तर आम्हांला नापसंत ! म्हणून थोड ा वेळानंतर जवळच्या खेड्यांतील शेतांत जाऊन आम्हांला पोटपूजा उरकायची होती. पण अडचणींत भर म्हणून या शेतांभोंवतीं ताटयांची दाट भिंत उभारलेली होती. हें सारं लक्षांत घेऊन आमच्या वृद्ध मंडळींनीं आमच्या साऱ्या कंपनीचे लहान लहान गट पाडले. आणि या गटांनीं आळीपाळीनें त्या धान्याच्या शेतांत जाऊन यायचं होतं. मोठ्या जमावाच्या एकदम जाण्यानें होणारा गोंगाट नि बाळगावी लागणारी जास्त सावधगिरीहि यामुळें वांचणार होती.

पण एकंदरीनें, भात शेतीची जरी विपुलता असली तरी आमचा अन्न पुरवठ्याचा प्रश्न अधिकाधिक बिकट होत चालला होता, हें कबूल करणंच भाग आहे.

'एक सामान्य नियम म्हणून हें नीट लक्षांत ठेवा बरँ कां रे.' बाबा म्हणाले, 'कीं उत्पन्न जेवढं अधिक तेवढे लोक जास्त कंजूष नि त्यांची आपल्या माल मिळकतीची राखण जास्त कसोशीनें केलेली. एका अर्थी त्यांचं करणं युक्त आहे. आणि आतां लक्षांत ठेवा कीं, आपण आपल्या समृद्ध अशा देशाच्या बाहेर पडतों आहोंत.. मुबलक नि चविष्ट असं अन्न आतां संपलं. आपल्या लेंटचा उपास नाईलच्या मुखापर्यंत चालायचा आहे. तिथें मात्र आपल्याला पुन्हां मुबलक अन्न मिळेल.'

'नाईल आली जवळ इतक्यांत ?' ताईनें विचारलें. तिनें तो 'नाईल' एवढा शब्द पकडला होता नि ती पाय उंचाऊन उभी राहिली. आम्ही सर्वांनीं त्या गाजल्या वाजल्या नदीबद्दल इतकं कांहीं ऐकलं होतं कीं, तिचं नुसतं नांव ऐकूनच आमच्या अंगावर जसे रोमांच उभे राहात.

'अंहं, इतकी नाहीं कांही जवळ,' बाबांनीं सांगितलं. 'पण आतां अन्नाची दुर्मीळता लक्षांत घेऊन आपल्याला जास्त झपाट्यानें उडालं पाहिजे, म्हणजे तीनचार दिवसांत आपल्याला नाईल नदी, तीं भकास ओसाड वाळवंटं, पिरॅमीड, ओबेलिस्कस्, स्फिंक्स आणि आणखींहि कितीतरी विलक्षण गोष्टी आपल्याला दिसतील. पण त्यांच्याविषयीं आजच न बोलणं बरं, मला वाटतं. कारण म्हणजे मग तुमच्या मनावर त्यांच्या दर्शनामुळें अगदीं सुस्पष्ट नि रेखीव असंच चित्र उमटेल.'

आतां काळोख पडला आणि आमची पहिली तुकडी त्या शेतांत भोजनासाठीं निघून गेली नि थोड्याच वेळांत सुखरूप परतहि आली. आमची तुकडी सहावी होती.

शेतांत पोंचतांच, जवळच्या घरांतून दिव्यांचा चांगला स्वच्छ उजेड जरी आम्हांला दिसत होता नि त्यांतील मोठ्यानें चाललेलं बोलणंहि आम्हांला ऐकूं येत होतं--आज बिचारे कां जागत होते कोण जाणे--तरीहि आमच्या पोटांत चांगलीच आग पेटली असल्यानें, मनांत जरी भीति वाटत होती तरी आम्ही त्या पिकलेल्या भरघोंस कणसांवर चोंचीनीं हल्ला चढवून नि सालपटें काढून आंतल्या गुलगुलीत दाण्यांवर घाईघाईनें हात मारलाच.

'हे दाणे सुरेख आहेत, पण ते जास्तच खुमासदार लागतात हं!' आमची गोडबोली ताई म्हणाली.

'नि हे कुठे वाईट आहेत?' मी म्हटलं.

पण आमच्या ट्रायफ्लरची,--आमच्या ताईच्या गोड सहवासासाठीं सारे हुकूम बिनबोभाट पाळण्याचं मान्य करून आमच्या तुकडींत येण्याची परवानगी या पठ्ठ्यानें बाबांकडून आतां मिळवली होती --एक सबंध कणीसच्या कणीस तोडण्याची खटपट चालली होती.

'इतका आधाशीपणा नको रे करूं,' आमच्यांतल्या एका करकोंच्यानें त्याला हळूच सांगितलं.

'माझ्या स्वतःसाठीं नाहीं आहे हें,' डोळा मिचकावीत ट्रायफ्लर म्हणाला आणि अखेरीस त्यानें तें सबंध कणीस तर तोडलं.

लोकांना ऐकूं जाऊं नये म्हणून आमचं बोलणं कुजबुजत चाललं होतं. पण तिथल्या कुत्र्यांच्या डोळ्यांत धूळ टाकणं अशक्य होतं. म्हणूनच ते त्वेषानें भुंकत आमच्या अंगावर येत आणि आम्हांला थोडावेळ उडून जावं लागे. असं आमचं जेवण चालू होतं.

पण मग इकडे येणाऱ्या सातव्या तुकडीच्या पंखांचा आवाज आमच्या कानांवर येतांच आम्ही ताबडतोब त्यांना जागा दिली

आणि, आपली नेहमींची लष्करी शिस्त पाळीत आम्ही आपल्या बेटावर परत आलों. शिस्त नि नियमपालन हीं यशाचीं हमखास साधनं आहेत, हें आम्हीं शिकलों होतों--विशेषतः घरादारापासून दूर नि एवढ्या मोठ्या जमावानें उडत असतां, ती यशाची गुरु-किल्लीच आहे.

त्या दिवशींची रात्र अतिशय काळोखी होती नि अनंत ताऱ्यांनीं आकाश तेजाळलं होतं. आकाशगंगा, आकाश द्विखंड करून इतकी स्पष्ट नि रेखीव अशी उभी राहिली होती कीं तिचं इतकं रेखीव नि संपूर्ण दर्शन या पूर्वीं मला कधींच झालं नव्हतं. सागराचं घनगर्जित आमच्या कानांवर आदळत होतं; इतकंच काय पण आपल्या वालुकामय किनाऱ्यावर आदळत आपटत नि मंद गुरगुरत असलेल्या लाटांचा आवाजहि आम्हांला तिथे ऐकू येत होता.

: : १३ : :

हा पहा, आम्ही गांठलाच तो अखेरीस --- हा काळा समुद्र ! आमच्या समोर, दूरच्या क्षितिजांत विलीन झालेला नि किनारा म्हणून कुठेंच दिसत नसलेला तो हेलावणारा गर्द नील जलविस्तार आतां खडा होता, आणि त्याच्या अथांग उदरावरून उड्डाण करण्याच्या आमच्या धीट आव्हानाचा धिक्कार करीतच तो जणुं गुरगुरत होता.

आमच्या खालीं लहान मोठे गल्पक्षी, लाटांच्या त्या फेनशुभ्र माथ्यांवरून अलगद उड्डाण करीत होते, आणि मधूनच माशांमागें पाण्यांत उडी घेत आपल्या चीत्कारानें वातावरण भरून टाकीत होते.

तुकतुकीत काळे डॉलफिन मासे वर उड्या मारीत स्वच्छंद खेळत होते नि लहान माशांची शिकारहि करीत होते. ती खारी हवा शीतल वाटत होती. तुफान वाऱ्याचे अग्रदूत, तीं फुटकळ लहान मोठीं बोजड मेघखंडें, आकाशांतून झपाट्यानें फिरत होतीं. कांही-तरी अज्ञात, गूढ नि भयद असं पूर्वेकडून येऊं पहात होतं नि मध्यान्हाच्या सुमारास उग्र वादळ उठवण्याची भीति घालीत होतं.

आमच्या उजवीकडे एक निरुंद किनाऱ्याचा कांठ दिसत होता; त्या पलीकडे एका किल्ल्याची रेखाकृती नि भयसूचक दीप, अगदीं बारीकशा ठिपक्यांसारखे असे ओळखूं येत होते, डॅन्यूबचं मुख आतां खूपच मागे राहिलं होतं.

किनाऱ्या किनाऱ्यानें उडण्या ऐवजीं, समुद्र पृष्ठावरूनच आम्ही उडत असल्यानें आम्ही खूपच अंतर वांचवलं होतं, आणि म्हणून आमच्या उजवीकडे, त्या ढगांच्या पसाऱ्यांतूनहि कुठल्या तरी उत्तुंग अशा पर्वत राजीचं नील दर्शन आम्हांला थोड्या वेळानेंच झालं.

'ही बाल्कन पर्वतांची रांग,' जुन्या मंडळींनी सांगितलं. आणि तिकडे समुद्राच्या मध्यभागीं एक मोठं शहर असल्यासारखं आम्हांला वाटलं. एका दीपस्तंभांतून पांढऱ्या शुभ्र किरण शलाका चौफेर उजळत होत्या. समुद्रांत दूरवर घुसलेल्या एका लांबच लांब दगडी भिंतीच्या आंत, डोलकाठ्या नि शीडं यांचं जणुं एक भलं सपाट रानच सुरक्षित असं खडं असल्यासारखं दिसत होतं. खालीं तो काळा समुद्र गर्जना करीत होता आणि एकाहुन एक उत्तुंग अशा लाटा रागानें उसळत नि एकमेकींचा चुराडा करीत पुढे पुढे धांवत चालल्या होत्या. पण तिकडे, त्या लांब तटाच्या आंत, त्यांचा पृष्ठ-भाग अगदीं पूर्णपणें नितळ नि शांत असा दिसत होता. आंत उभीं असलेलीं जहाजं थोडींसुद्धां डोलत नव्हतीं आणि हजारों होड्या, आंत पेट्या नि पिंपं भरून, आणि पांढरी पागोटीं किंवा लाल फेज टोप्या घातलेल्या लोकांना घेऊन मोठ्या सलील गतीनें इकडून तिकडे हिंडत होत्या.

'हें व्हर्ना,' लाँगनोझनीं आम्हांला सांगितलं. 'तें ओलांडलं कीं आपण किनाऱ्याकडे वळूं. कारण विश्रांतीसाठीं आपल्याला एक चांगलं ठिकाण आहे तिथें.'

ही बातमी म्हणजे खूषखबरच होती! कारण त्याचीच आवश्य-कता होती आम्हांला. कारण या शेवटल्या उड्डाणामुळें, आजपर्यंत पडला नव्हता इतका ताण आम्हांला सर्वांना पडला होता. आमच्या गतीला अडथळा करणाऱ्या वाऱ्यावर ट्रायफ्लरनें याचं टेपर ठेवलं होतं. आणि हें लक्षांत येण्यासारखं होतंहि खरोखरच. कारण वारा एका बाजूनें सारखा वहात राहून त्यानें आम्हांला आमच्या मार्गा-पासून आंत बरंच उजवीकडे असं ढकललं होतं. प्रवासाच्या अगदीं आरंभींच वारा जर असा लागला असता तर त्याला तोंड देणं आम्हांला खात्रीनें अशक्यच झालं असतं. पण आतां आमच्या पंखांचं

सर्व सामर्थ्य प्रकट झालं असल्यामुळें, या कसोटीला आम्ही यशस्वी तोंड दिलं. आणि शिवाय आम्ही किनाऱ्यापासून फार दुरून जात नसल्यामुळें पुष्कळच धोका आम्ही टाळला होता.

व्हर्ना ओलांडल्यानंतर आम्ही आपलं सारं सैन्य, पुढें निरुंद नि मागें विस्तार असं पंख्यासारखं तयार केलं आणि मग आम्ही किनाऱ्याकडे तोंड वळवलं. असा हुकूम देण्याचं कारण म्हणजे या देशांत लोकवस्ती फारी दाट असल्यामुळें आमच्या एवढ्या मोठ्या जमावासाठीं विश्रांतिस्थान शोधून काढणं कठीण होतं. शिवाय सुरक्षिततेचा विचार हा करायलाच हवा होता. रात्रीचा तो घनदाट सुरक्षित असा काळोख नि त्याच्या आनुषंगानें आमचं उदरभरण, अजून बरंच लांब होतं, आणि आत्तां फक्त आमच्या श्रांत, वाऱ्यानें सतावलेल्या पंखांना विश्रांति देण्यासाठींच आम्हीं खालीं उतरलों होतों.

आगगाडीच्या एका रस्त्यानजीक, एका नापीक, रुक्ष अशा पर्वताच्या उतारावर आमची तुकडी उतरली. एक आगगाडी, मोठा खडखडाट करीत नि जड पायांनीं अशी आमच्या जवळून धुराचे भपकारे सोडीत निघून गेली. करकर आवाज करणाऱ्या दोन चाकी, टोणगे जोडलेल्या बारदानी गाड्यांची एक रांग—हळू हळू चढ चढत होती. आमच्या जवळच—बकऱ्यांचा एक छोटासा कळप चरत होता—आणि त्यांची रखवाली एक सुंदरशी छोकरी करीत होती. आपल्या मोहक कुरळ्या केसांत लाल फुलांची माळ तिनें घातली होती नि एका राखी रंगाच्या छोट्या गाढवावर ती आरूढ झाली होती. तिचें तें वाहन तें खुरटलेलं कांटेरी गवत खुडीत फिरत होतं

आम्हांला तशी भूक लागली होती असं कांही नव्हे, पण आतां कांही तोंड चालवायला मिळालं तर चालेल, असं आम्हांला वाटू म:त्र लागलं होतं. बाबांचाहि, कुठे कुरण किंवा एखादी बाग दिसते का तें पहाण्यासाठीं, कुणी टेहेळे पाठविण्याचा विचार चालला होता.

‘ हें तुझ्या साठींच बरं का सुंदर मुली, ’ ट्रायफ्लर म्हणाला नि त्यानें धान्याचं एक सुंदर कणीस ताईच्या पायाशीं ठेवलं.

डॅन्यूबच्या मुखापासून इथपर्यंतचं सारं अंतरभर त्यानें तें वाहून आणलं होतं.

ताई लाजल्यासारखी झाली नि तिनें प्रश्नार्थक नजरेनें आईकडे पाहिलें. ती होकारार्थी हंसली नि बाबांना म्हणाली: ‘ आहे कीं नाहीं बघा ! आपला हा ट्रायफ्लर बायकोची चांगली काळजी घेई-लसं दिसतं, हं ! ’

‘ हो, पण आपला गाढवपणा सोडलान तर, ’ बाबांनीं अनु-मति दाखवली.

ताई आपला कांहीं संबंध नसल्या सारखंच दाखवीत होती आणि आम्हांला सर्वांनांच ते सुंदर दाणे द्यावे म्हणून तें सोलण्याचं काम आपल्या चोंचीनें ती मोठ्या डौलांत करीत होती.

‘ तुम्ही देखील घेतले पाहिजेत थोडे यांतले, बरं का, ’ ती ट्रायफ्लरला म्हणाली, ‘ नाहींतर मी देखील स्पर्श नाहीं करणार त्यांना. ’

‘ हो. हो, जरूर, ’ ट्रायफ्लर म्हणाला नि उडी मारून पुढे येऊन त्यानें सगळ्यांत लहान नि सुका असा दाणा उचलला.

हें सारं मोठं चित्तवेधक होतं, नि आपण कां नाहीं असं कांही केलं असं वाटून मला स्वतःचा खूप राग आला. दुसऱ्या कोणाचाहि विचार कधीं मनांतहि न आणतां मी कां एवढं खात सुटलों होतों ? आईला नि बाबांना किती बरं वाटलं असतं तें पाहून.

पण खरं खुरं सांगायचं तर, माझ्या आई वडीलांप्रमाणे दुसऱ्या कुणा एकाला तरी खाऊं घालण्याचा सुखद विचारहि माझ्या

डोक्यांत आल्यामुळें, मला स्वतःचा विशेषच राग येत होता. हो, तसंच म्हणायचं तर आमच्या भेटीच्या अगदीं प्रथमक्षणींच माझं भान हरपणाऱ्या एका तरुणीचा विचार माझ्या डोक्यांत आत्तां चालला होता. तिच्या विषयीं मला माहिती अशी एवढीच होती कीं ऊरल क्रौंचांपैकीं ती होती. पण आत्ता या क्षणीं ती कुठें होती, याची मात्र मला कांहीच कल्पना नव्हती. मी आपला एकच आशेवर जगत होतों, कीं नाईलच्या मुखाजवळील भागांत आम्ही प्रवेश केल्या-बरोबर आम्ही सारीं पुन्हां एकदां एकत्रच मुक्काम ठोकूं आणि मग --आणि मग--ओः ! मी सुद्धां मग या तोरा मिरवणाऱ्या ट्रायफ्लर इतकीच हुषारी नक्की दाखवीन; आणि मी सुद्धां मग ऐटबाज बनून तिच्या डोळ्यांत कसं भरायचं नि तिला ओढ कशी लावायची, हें बघेनच बघेन.

आणि मग भविष्य काळांतील आमच्या मीलनाच्या त्या सुवर्ण घटिकेच्या स्वप्न सृष्टींत मी अगदीं मशगुल होऊन गेलों, आणि अनवधानतेनें धान्याचे दाणे असे कांहीं गपागप गिळीत सुटलों कीं अखे-रीस आमच्या ताईनें आपल्या चोंचीनें दोन तीनदा मला ढोसलें; नि ती रागानें म्हणाली, ' ए आधाशा दुसऱ्यांची आठवण नको विसरूं !

' काय हवं तेवढं खाऊं दे त्या पोराला, ' ट्रायफ्लर माझी बाजू घेऊन मधेंच म्हणाला. ' त्यांच्या वयाच्या बच्चांची भूक अशी खव-खवलेलीच असते नेहमीं. '

त्यांच्या त्या मानभावी शब्दाची मला ताईच्या शब्दापेक्षां जास्त चीड आली नि आपल्या त्या वकील महाशयांना एक चांगला तडाका लगवावा असंच मला वाटलं.

आमचे टेहेळे आतां येऊन पोंचले आणि त्यानीं सांगितलं कीं त्यांना एक द्राक्षाचा मळा दिसला, पण लोक त्यावर एकसारखं

काम करीत असल्यामुळें त्याच्या जवळ जाणं कांही त्यांना शक्य नाहीं झालं. पण स्थानिक चिमण्यांनीं त्यांना सांगितलं कीं इथून दोन एक मैलांवर अंबाडीचीं शेतं आहेत आणि बल्गेरिअन भाजी-पाल्याच्या बागा आहेत नि त्यांत वाटाणे नि मसूर पण खूप आहे आणि गांव जरी या बागायतींजवळच असलं तरी त्याच्या एकंदर विवक्षित रचनेमुळें वेळ आलीच तर काळोखांत निसटून जाणं आपल्याला शक्य आहे.

आम्ही थोड्याच वेळांत मग त्या शेतांजवळ जाऊन पोंचलों. तिथून आम्हांला तीं बल्गेरिअन घरकुलं नि त्यांचीं गवताचीं छपरं आणि एका मनोऱ्यावरील पांढरा घुमट आम्हांला दिसत होता. पण त्याचबरोबर स्टॉर्क्सचीं पुष्कळशीं केसाळ, खरखरीत अशीं घरटींहि आम्हाला दिसल्यामुळें आमचा खूपच विरस झाला. जिकडे तिकडे दिसत होती तीं घरटीं--अगदीं प्रत्येक छपरावर. त्या मनोऱ्यावर तर त्यांचा एक भला मोठा पुंजकाच्या पुंजकाच दिसत होता, आणि जवळच्या त्या स्मशान भूमींतील साऱ्या उंच क्रूसांवर नि स्मशान-भूमी सभोंवती असलेल्या साऱ्या सायप्रस वृक्षांवरहि तीं सर्वत्र दिसत होतीं. आणि अस्तास जाणाऱ्या सूर्यकिरणांनी लालीलाल दिसणाऱ्या छपरांभोंवतीं उडत असलेले खुद्द स्टॉर्कहि आम्हांला दिसतच होते.

आम्ही त्याना खरंच दिसलों नव्हतों, कीं तसं ते फक्त ढोंगच करीत होते, हे नक्की सांगतां येत नव्हतं; पण अंबाडीच्या त्या शेतांत उतरून वाटाण्यांच्या वेलांकडे जायला आम्हांला कांहींच अडचण आली नाहीं, एवढं खरं.

आमच्या उत्तरेंतल्या सारखे या बाजूला मुळीं संधि प्रकाशच रहातं नाहींत. इतका विलक्षण फरक आहे दोघांत. सूर्य मावळला रे

मावळला, कीं इथे लगेच अगदीं मिट्ट काळोख पडतो नि आम्हींहि त्या क्षणाची वाट पहात होतोंच.

आम्ही चांचपडत वाटाण्यांच्या वेलींकडे गेलों नि खायला सुरवात केली. पण एकत्र राहाण्यासाठीं म्हणून हलक्या आवाजांत एकमेकांना हांकाहि मारीत होतों. ट्रायफ्लरचं अनुकरण करून मी एक शेंगानीं लहडलेली सबंध वेलच उपटली आणि तिचं आपल्या माने भोंवती एक कडं घातलं.

'पुरे करा,' इशाऱ्याचा आवाज झाला आणि आम्ही मागें शेतांकडे वळलों. पण काळोख इतका विलक्षण असा मिट्ट होता कीं आपल्या छावणीकडे सैरावैरा उडत जाण्यापेक्षां दिशा उजळेपर्यंत आम्ही त्या ठिकाणींच थांबण्याचं ठरवलं.

दिवस उजाडण्याच्या वेळीं, स्टॉर्क्सच्या संतापी किंचाळ्यानीं आणि आमच्या स्वतःच्या युद्धसूचक आरोळ्यांनीं आम्हीं जागे झालों. गांवाजवळ कुठेंतरी मोठी धुमश्चक्री माजली होती.

तिकडून किंकाळ्या नि आरडाओरडा आतां वाढत्या प्रमाणावर चालला होता, आणि पंखांची होत असलेली झडप नि जखमी प्राण्यांचं कण्हणंहि आतां आम्हांला ऐकूं येत होतं.

आम्ही ताबडतोब युद्धासाठीं आपला व्यूह रचला. आणि आपल्या मित्रांच्या मदतीला अगदीं वेगानें धाऊन गेलों.

'साऱ्यांसाठीं एक ! नि एकासाठीं सारे !' बाबानीं गर्जना केली.

त्या युद्ध भूमीवर आम्ही अगदीं योग्य वेळींच गेलों. आमच्या एका ऊरल त्रिकोनावर एका सबंध स्टॉर्क सैन्यानें अगदीं आकस्मिक घाला घातला होता; आणि एकास पांच एवढी त्यांची संख्या

होती. पण तरी देखील ते ऊरल क्रौंच मोठ्या धडाडीनें लढत होते. पण त्यांची हानी मात्र खूपच झाली होती, नि अनेक जखमी क्रौंच असहाय असे खालीं गवतांत पडले होते.

आम्ही आपला युद्ध घोष करीत शत्रूवर एकदम मोठ्या आवेशानें तुटून पडलों आणि त्यांचा एकच गोंधळ उडवून दिला. ट्रायफलरनें माझ्या अगदीं डोळ्यासमोरच एक स्टॉर्क खालीं लोळवला आणि तो लगेच दुसऱ्याच्या आंगावर धांवला. बाबांनीं तर आपल्या दोन्हीं अंगाला आडवे करीत जाण्याचा सपाटाच चालवला होता. तरी पण देखील शत्रूची संख्या भलतीच विषम होती आणि नवीन तुकड्याहि त्यांच्या मदतीला चोंहीकडून धांवत होत्या. पण आमच्या पराभवाची चिन्हं दिसूं लागूं लागलीं. त्याच वेळीं आमच्या दोस्तांच्या सुखदायी गर्जना आमच्या कानीं आल्या. आमचे आणखी त्रिकोण आमच्या मदतीला धांऊन येत होते आणि त्यांच्या आघाडीला वाइज विंगफ्लॅप दिसत होते. आमच्या या नवीन मदत तुकड्यांनीं त्या साऱ्या स्टॉर्क सैन्याचा ताबडतोब धुव्वा उडवला आणि त्यांना रणांगणावरून माघार घ्यायला लावली. पुन्हां एकदां हल्ला चढविण्यासाठीं म्हणून स्मशान भूमी जवळ ते आपलं सारं सैन्य आतां एकवटूं लागले.

'परत फिरा!' विंगफ्लॅपचा हुकूम दुमदुमला.

'कां? कसं शक्य आहे' असंतुष्ट तरूणपिढी कुरकुरली.

'हुकूम ऐकतांच कुरकुरल्या खेरीज एकदम मागें फिरा!' बाबांनीं गर्जना केली. 'थांबा, ए पोरांनों! एकदम मागें! काय करायचं तें सेनापतींना कळतं आहे! त्यांना वरून जास्त चांगलं दिसतं आहे!'

आणि खरोखरीच आम्हांला आतां ओरडा ऐकूं आला, नि वर मान करून पहातांच, दोन त्रिकोन एक करून आलेले आमचे लॉंग-

नीज्ञ आम्हांला दिसले. अगदीं खालच्या सुरांतील घशांतील कठोर आवाज करून नि खुणा करून आम्हांला ते वर डोक्यावर घिरट्या घालीत घालीत धोक्याची सारखी सूचना देत होते. आम्हीहि मग माघार घ्यायला सुरवात केली आणि थोड्याच वेळानें आम्ही पाहिलं कीं लांबलांब बंदुकी घेतलेले लोक आमच्या युद्ध भूमीकडे धांवत येत होते. त्या नंतर मग लगेच बंदुकींची फैर झडली नि पुष्कळशीं विरळ धूम्रवलयें खालून वर उठलीं. अनेक गोळ्या आमच्या जवळून सणसणत गेल्या--पण सुदैवानें आम्हांला कोणालाच इजा झाली नाहीं.

आम्ही माणसांचे दोस्त आहोंत, अशी त्या स्टॉर्कनीं आमच्या समोर कितीहि जरी बढाई मारली असली तरी त्या बंदुकींच्या आवाजानें आमच्या इतकीच त्यांचीहि घाबरगुंडी उडून गेली नि आमच्या पाठलागाची कल्पना देखील मनांत न आणतां दूर पळून जाऊन सांपडेल त्या जागेंत ते दडून बसले.

परत एकदां सुरक्षित अशा ठिकाणीं आम्ही येतांच लढाईच्या कारणांची चौकशी सुरू झाली. त्या स्टॉर्कनींच लढाईला सुरवात केली असंच त्या चौकशींत दिसून आलं. दुसऱ्याच्या जागेंत आम्ही अशी लूटमार करणं बरं नाहीं, असा त्यांनीं आव आणला. पण खरं म्हणजे, आमचा अपमान करण्याची ते फक्त कांहीं तरी सबबच शोधीत होते; आणि अपमान सोसणं तर आम्ही शक्यच नव्हतं. झालं, नि मग लढाई जुंपली नि तिची अखेर रक्तपातांत झाली. आणि मदत जर योग्य वेळीं आली नसती तर सबंध त्रिकोनच्या त्रिकोन खलास होण्याचीच वेळ होती. पण आतां मात्र आमच्यांतले फक्त चौघेंच कामास आले होते. नि दहा एकजण जाया झाले होते. नि हे सारं कशासाठीं ?

'वाटाण्यांसाठीं,' कुणींतरी उत्तर दिलें.

'अं हं, असंच नाहीं केवळ. स्टॉर्क वाटाणे कांहीं खात नाहींत. आम्ही सारं शेत फस्त करून टाकलं, तर त्यानां काय पंचाईत? पण ते माणसांच्या लाभासाठीं झगडत होते, आणि त्यांचं कृत्य एकंदरींत रास्त होतं,' क्लू क्लू काकांनी आपला निर्णय दिला.

'हे वाटाणे नि इतर भाजीपाला हा परमेश्वरानें आपल्या उपयोगासाठीं उत्पन्न केला आहे. आतां, हे वाटाणे या माणसांनीं लावले होते आणि ते त्यांचीच खाजगी मत्ता आहे, हें खरं. पण दुसरे कसले तरी दाणे--उदाहरणार्थ, रान वाटाणे--इथे आसपास कुठेंच नाहींत, हा कांहीं आमचा दोष नाहीं. आम्हांला खायला हें पाहिजेच, आणि हीं माणसं जर आम्हा करकोंच्याशीं इतक्या द्वेषभावनेनें वागत नसतीं तर आम्ही देखील आमच्याकडून त्यांना खात्रीनें काहीं तरी मदत देऊंच; उदाहरणार्थ--उदाहरणार्थ--'

इथें बावा योग्य उदाहरण न सांपडून अडखळले. पण मग लाँगनोझ त्यांच्या मदतीला आले.

'आपले दोस्त क्लॅरिअन, यांनीं आपल्याला एक मोठं असं सत्य आत्तां सांगितलं आहे. आपल्याला खायला हें पाहिजेच. आणि यांत सर्व कांहीं आलं.'

आम्हां सर्वानां तें पटलं आणि आम्ही ठरवलं कीं या दृष्टीनें आमचं कृत्यं अगदीं न्याय्यच होतं.

'एकाद्या भीषण युद्धानंतर लोक जेव्हां त्या विषयीं चर्चा करूं लागतात नि आपल्या कृत्याचं समर्थन करूं पहातात, त्यावेळीं या लोकांचं देखील नेहमीं असंच होतं;' वाईज विंगफ्लॅप म्हणाले. 'त्या चर्चेत असं निष्पन्न होतं कीं दोन्हीहि पक्ष बरोबरच होते. मागें मी एकदां याच देशांत झालेली अत्यंत भीषण, रक्ताचा पूर

वाहिलेली अशी लढाई समक्ष पाहिली होती. निळा पोषाख केलेल्या नि लाल फेझ घातलेल्या लोकांची सैन्यें, पांढऱ्या टोप्या नि धुरकट कपडे घातलेल्या माणसांवर चालून गेलीं. दोन्हीं सैन्यें आम्ही 'खऱ्या परमेश्वरासाठींच' लढतों आहोंत असं जाहीर करीत होतीं. आणि त्या एक परमेश्वराचं नांव घेऊनच त्यांनीं लढाई सुरु केली. आणि काय भयंकर हो लढाई ती ! दोन्ही पक्षांचा एक मेकांच्या हातानें अगदीं सर्वनाश झाला. आणि दोन्हीहि पक्ष सत्याचेच होते आणि दोघांचाहि स्वतःच्या सच्चेपणावर इतका प्रांजल विश्वास होता कीं त्यासाठीं त्यांनीं आपल्या जीवाची आनंदानें कुरबानी केली. आणि त्यांतून जे जगले त्यांचा त्यावर आजतागायत अगदीं संपूर्ण विश्वास आहे आणि आपला तो विश्वास आपल्या पुढील पिढ्यांनाहि ते वारसा हक्कानें देतील--कशासाठीं लढले मग ते ? खरंच त्या खऱ्या देवासाठीं ? मुळींच नाहीं, पण त्यांना नाहीं तें एवढ्यांत कळणार--माझा असा विश्वास आहे कीं, धारातीर्थीं पडलेले ते दोन्ही पक्षांचे योद्धे तिकडे पल्याड एकमेकांना भेटतील नि खरं खुरं सत्य त्यांना तिथेंच सांपडेल. पण इथें, आपल्या या पृथ्वीवर मात्र, काय चाललं आहे याचं कुणालाहि कधींच कसलंहि ज्ञान होणार नाहीं. पण हें काय बुवा ?' आणि त्या वृद्ध तत्त्वज्ञानें माझ्याकडे बोट केलं- 'आजच्या सकाळच्या युद्धांतला हा वीर-पुंगव, कीं आणखी कांहीं ? कसलीं भूषणं आहेत हीं ?'

सगळ्यांचेच डोळे आतां माझ्याकडे लागले आणि मी इतका गोंधळलों कीं मला काय करावं तें सुचेना. माझ्या मानेभोंवतीं मी गुंडाळलेल्या वेलीकडेच ते सारेजण पहात होते. मग ट्रायफ्लर माझ्याजवळ आला आणि आपल्या चोंचीनें मला प्रेमानें थोपटीत तो म्हणाला : 'फारच छान. चांगल्याचं नेहमींच अनुकरण करीत जा

म्हणजे तुझी चूक कधीं व्हायची नाहीं. हा वेल त्या कणीसापेक्षां उचलून न्यायला खूपच सोपा.'

सूर्यबिंब आतां वर आलं होतं आणि आमची निघण्याची वेळ झालीच होती. लोक आतां जागे होत होते. त्यांच्या धुराड्यांतून धूर केव्हांच निघूं लागला होता नि उठून आपले दैनंदिन व्यवहार त्यानीं आतां चालू केले होते.

झालेल्या नुकसानीमुळें खिन्न होऊन नि मृतांच्या आठवणी काढून बोलत बोलत आम्ही आपले त्रिकोन बनवले नि तिथून निघालों.

पण तिथून प्रयाण करण्यापूर्वीं, माझ्या हृदयांत स्थान मिळविलेली ती ऊरल सुंदरी मला भेटून, तिला ते वाटाणे अर्पण करण्याचा ब्रह्मानंद मात्र मला मिळाला.

: : १४ : :

समुद्रावरून आमचं उड्डाण परत चालू झालं. पण या खेपेला शहरं, लहान गांवं आणि बागा यांनीं जशा दाटर भरून गेलेल्या किनाऱ्या जवळूनच आमचा प्रवास चालला होता. आमच्यासमोर दुसरा एक तीर, उंच नि खडा असा कांहीं अंतरावर अंधुक असा दिसत होता. या दोन तीरांमध्यें तो अरुंद जलमार्ग पसरला होता नि त्या जलमार्गावर कांहीं तरी पांढरं नि सोनेरी असं सूर्य प्रकाशांत मंदपणें चमकत होतं.

समुद्राच्या पृष्ठभागावर पसरलेल्या धुक्यांतून सूर्यकिरण आतां आरपार घुसूं लागले नि तें धुकं वितळूं लागून आमच्यासमोर एक मोठं सुंदर भव्य असं दृश्य दिसूं लागलं. तो निरुंद जलमार्ग आतां रुंदाऊं लागला नि एका संरक्षित संयोग भूमीचं प्रवेशद्वार आम्हांला दिसलं. प्रवेशद्वाराजवळील त्या छोट्या उदास किल्ल्याची अवजड तटबंदी नि तटांवरील जंजिऱ्यांत दडून बसलेल्या अजस्त्र तोफा आणि त्या संयोगभूमीच्या सुंदर अशा दोन्ही तटांवरील डौलदार भक्कम कोट नि ऐसपैस पसरलेले बंगले नि बागा बागांतील रस-रशीत पर्णराजी नि कुंपणांवरील नि बंगल्यापुढील कठड्यांवर लोळत असलेल्या मोहक फुलवेली यांचा विरोध मोठाच उठून दिसत होता. त्या संयोगभूमींतूत अनेक जहाजं नि आगनावा इकडून तिकडे धांवत होत्या किंवा धक्क्याच्या आश्रयानें चित्रविचित्र असे गट करून स्वस्थ-पणें उभ्या होत्या. त्यांची ती प्रचंड संख्या पाहून जगांतल्या साऱ्या समुद्रांवरील आगनावाच जणूं या ठिकाणीं एकवटल्या आहेत असं भासत होतं. आणि हें अगदीं शक्य होतं. या मोहक संयोगभूमीच्या प्रवेशद्वाराशीं अगडबंब अशीं लढाऊ जहाजंहि आतां तिच्या संर-

क्षणासाठीं सज्ज अशीं उभीं असलेलीं दिसत होतीं. याहि पलीकडे एका शहरानें आपली बैठक घातली होती. या नगरींतल्या इतके मोहक मनोरे नि डौलदार असे भव्य घुमट मी साऱ्या जन्मांत कधीं पाहिले नव्हते. शहरांतील गजबजीचा तो मजेदार आवाज दुरून मंद असा आमच्या कानांवर येत होता. पण त्या युद्धनौकांच्या आसमंतांत मात्र सर्व कांहीं उदास नि स्तब्ध असं दिसत होतं. जणू कांहीं त्या लोहवस्त्रधारी राक्षसांनीं सभोंवारचं सारं चैतन्य नि सारा सारा आनंदच जसा त्यांना भेवडावून तिथून पार पिटून लावला होता.

संयोगभूमीच्या दुसऱ्या तटाकडील भागांत जास्त भरदार अशा बागा, पातळांग सायप्रस वृक्षांच्या रांगा, आणि लहान लहान आटोपसर बंगले नि त्यांतील जाळीदार सज्जांवरून लोळण घेत असलेल्या आयव्हीच्या वेली नि तऱ्हतऱ्हेची फुलें यांची एकच गर्दी उडालेली होती.

पण दोन्ही तटांवरील लोकवस्ती मात्र एकच संस्कृती नि एकच प्रकारचं जीवन जगत असलेली अशी दिसली.

'झारिग्रॅड !' बाबांनीं जाहीर केलं, 'किंवा, इतर कांहींच्या म्हणण्याप्रमाणें कॉन्स्टॅनटिनोपल; आणि हें,' डावीकडे बोट करून, 'स्कुटारी.'

खालीं उतरून हें खालचं सगळं वैचित्र्य नीट पहाण्याची आम्हांला जर परवानगी मिळती तर आम्ही आपला जीवदेखील त्यासाठीं ओवाळून ठेवला असता, पण आमच्या सरसेनापतींच्या आज्ञेप्रमाणें आम्ही पुढेंपुढे चाललों होतों आणि तें सारं जादूचं जगत नि त्यांतील कुतूहलपूर्ण जीवन पार मागें पडत होतं.

आतां आम्ही दुसऱ्या एका समुद्रावरून चाललों होतों--मार-मोराचा समुद्र ! त्याच्या मोहक नीलवर्ण पाण्याचं त्या जातीच्या

संगमरवराशीं तिळमात्र साम्य नाहीं. पण त्या समुद्रांत संगमरवरी दगडांच्या खाणी असलेलीं कितीतरी लहान बेटं विखुरलीं आहेत. त्यावरूनच त्याला तें नांव पडलं असावं. वायव्येकडून आग्नेयीकडे असा आम्ही तो समुद्र उल्लंघित होतों, आणि आम्हांला आता जरी खूपच थकवा वाटूं लागला होता तरी खालीं उतरून विश्रांति घेण्यासारखी जागा कांही आम्हांला दिसत नव्हती. पण सुदैवानें मंद सुगंधित अशा अनुकूल वायुलहरींच्या मदतीनें आमचा प्रवास सुलभ होत होता. सायंकाळच्या सुमारास आशियांतील दुसरं एक चित्रासारखं शहर--ब्रूसा, आम्ही गांठलं. तो भूभाग चांगला डोंगराळ असा दिसला आणि आमच्या समोरील विरळ ढगांतून एक प्रचंड पर्वतशिखर आम्हांला आतां दुरून दिसत होतं. ब्रूसाच्या विस्तारावरून आम्ही जात असतां मुआझिननें भाविकांना दिलेली करुण उदास अशी बांग आमच्या कानीं आली. त्या विशाल पर्वतशिखराकडे आम्ही आतां आपलं तोंड फिरवलं नि त्याच्या पायथ्याजवळील एका खडकाळ, नापीक अशा मोकळ्या दरींत खालीं उतरलों. त्या ठिकाणीं फारसं कांहीं खायला मिळेल अशी आमची कल्पना नव्हती. पण तिथें निदान विश्रांति तरी आम्हांला निर्वेधपणें मिळाली असती. माणसांची वस्ती अशी कांहीं त्याठिकाणीं आमच्या दृष्टिपथांत येत नव्हती. मात्र धनगरांच्या थोड्याशा झोंपड्या एका झऱ्याजवळील खूप शाखा विस्तार असलेल्या अशा एका जुनाट सिकॅमोर वृक्षाखालीं दाटीवाटीनें वसलेल्या दिसत होत्या.

आम्ही ज्याच्या पायथ्याशीं तळ ठोकला होता त्या पर्वताचं नांव केशिश–डाग असं होतं. तिथून एक तासाच्या मार्गावर दोन साधारण मोठीं अशीं सरोवरें रात्रीच्या धुक्यांतून मिणमिणतीं अंधुक अशीं दिसत होतीं. पण त्यांच्या सभोंवारची जागा दुसऱ्या कांहीं भिन्न

जातीय अशा पक्षानीं आधींच अडवलेली दिसत होती, म्हणून कांहीं नवीन मारामारी उत्पन्न होईल या भीतीनें, आम्हीं उतरलों होतों, त्याठिकाणींच राहून आसपासच्या कडेकपारांवरून वाढलेल्या थोडया-फार खुरट्या रान रासबेरींवरच समाधान मानण्याचं आम्ही ठरवलं.

शुक्लपक्ष नुकताच सुरू झाला असल्यानें, चंद्राची कृश कोर, त्या काळ्या कभिन्न आकाशांत थोडा वेळच भीत भीत डोकाऊन गेली.

शरद् ऋतूंतील ती दीर्घरात्र, किंवा जिला आम्ही उत्तरेकडे उन्हाळी रात्र असं म्हटलं असतं, ती दीर्घ रात्र अगदीं शांत नि निर्विघ्नपणें उलटली.

माझी झोंप चालू असतां त्या उरल सुंदरीचे विचार माझ्यां डोक्यांत घोळतच होते. ' कुठे असेल आत्तां ती ? ती काय करीत असेल ? तिला खायला पुरेसं मिळालं असेल का ? ती शांत झोंपली असेल ना ? ' पण ती खुद्द वाइज विंग फ्लॅंपच्याच, तोच तिच्या त्रिकोनाचा प्रमुख असल्यानें, संरक्षणाखालीं सुरक्षित आहे. हा विचार मनांत येऊन मला बरें वाटलें. कुठें बरं आहेत आत्तां ते ?

' आपल्या दोस्तांना जागा चांगली मिळाली असली तर बरी, ' माझे विचारच जणुं ओळखून ट्रायफ्लर म्हणाला. ' ते किनाऱ्या-किनाऱ्यानें उडत असल्यामुळें त्यानीं आतां मिटिलीन ओलाडलं असेल.'

' तें कुठेंसं आहे ? '

' किनाऱ्याजवळचं एक बेट आहे तें. मी होतों तिथे एकदां. आंत बेटाच्या पोटांत घुसलेल्या त्यांतल्या त्या विलक्षण उपसागराबद्दल त्याची प्रसिद्धी आहे. कारण बाहेर समुद्र कितीहि खवळला असला तरी तिथे आंत अगदीं फार फार शांत असतं, जुन्या काळांत चांचे लोकांचं मोठं आवडतं ठिकाण होतं तें. '

'दयाघन प्रभो ! आणि ती असल्या ठिकाणीं !' भयानें मी एकदम चीत्कारलों.

'ही 'ती' कोण ?'

झालं, गेलों सपशेल घसरून.

ट्रायफ्लरनें हास्याची फैर सोडली.

'असं वेडपटासारखं नको करूं. करकोंच्यांना चांचे कांहीं त्रास नाहीं देत. पण तूं म्हणतोस ती कुमारी मात्र खरीच मोहक आहे. ब्लॅकनेक--कृष्णकंठी--तिचं नांव. कालच भेटले होते तिचे आईवडील मला.'

अस्सं ! या बुवांना तिचं नांव गांव नि कुलशील ठाऊक आहे तर ! पण मी असा गप्पाघोळ घालीत कां बसलों ! त्यानें एवढी चपळाई नि उत्साह कां दाखवला, नि मी-छट् करकोंच्याचं नांवच नाहीं शोभत मला. एखाद्या घुबडासारखाच अजगरपणा दाखवला मी ! मला स्वतःचा इतका राग आला होता त्या वेळीं नि मी इतका चिडल्यासारखा झालों होतों कीं नेहमींप्रमाणें म्हणजे मी कांहीतरी कठोर असंच बोलून गेलों असतों. पण त्याचं बोलणं इतकं मना-पासूनचं दिसलं कीं त्यावर असं चिडणं मूर्खपणाचंच दिसत होतं. म्हणून मी आपला राग आवरला आणि खिन्नपणें 'ब्लॅकनेक-ब्लॅक-नेक !' अशी फक्त माळ ओढीत बसलों.

'हां हां, ब्लॅकनेक. आतां तुझ्या बहिणीशीं तिची तुलना होऊंच शकत नाहीं, तरी पण मोठी सुरेख छोकरी आहे ती आणि मी तुझं अभिनंदनहि करतों.'

'आपल्याला कधीं भेटतील ते ?' आशाळभूतपणें मी विचारलं कारण त्याला सारी माहिती आहे असं आतां मला वाटत होतं.

तो गोंधळल्यासारखा दिसला. गंभीर चेहेरा करून त्याने मग आपल्या चोंचीनें वाळूवर कांही दुर्बोध अशा खुणा नि रेघा ओढल्या.

‘ या इथें, ’ अखेरीस तो म्हणाला. ‘ हें बघ, आपण हे इथे आहोंत--हा आपला पर्वत, इकडे डावीकडे हा मार्मोरा समुद्राचा किनारा. मग तो दक्षिणेकडे वळतो आणि इथून या बिंदूतून, ’ त्यानें आपली चोंच वाळूंत खुपसली, ‘ ही दार्दानेलीस जाते. मग तो किनारा परत पूर्वेकडे फिरतो आणि एक मोठें असं आखात त्यानें तयार होतं. या आखाताकडे तोंड करून हें मिटीलीन बेट आहे; मी मागें सांगितलं तें, तिथून मग किनाऱ्याजवळून छोटया बेटांचो एक माळच लागते. हीं बेटं, तशीं लहान असलीं तरी त्यांचा उपयोग विश्रांतीची ठिकाणं म्हणून चांगला होईल. आणि आपण जर मधल्या वाटेनें जायचं धाडस केलं तर अंतरहि बरंच कमी होईल, आणि वारा जर अनुकूल मिळाला आपल्याला तर आपण अगदीं सरळ दोरीसूत असे सायप्रसला जाऊं शकूं. पण माझ्या मतानें आपल्याला काय करावं लागेल तर, थोडं उत्तरेला असं अलेक्झँड्रेटाचं आखात ओलांडायचं आणि मग तिथून मजेनें तरंगत तरंगत असे दक्षिणेकडे बीरुट, दमास्कस, जरुशलेम, पोर्ट सय्यद, अलेक्झँड्रिया असं करीत मग अखेरीस त्या विशाल नाईलच्या दुआबांत ! ’

आपल्या विद्वत्तेचं माझ्यासमोर असं प्रदर्शन करीत असतां ट्रायफलरची स्वारी इतकी रंगांत आली कीं माझा प्रश्न तो मुळीं पार विसरूनच गेला. त्यानें उल्लेखिलेली ती भौगोलिक नामावली ऐकून माझा तर पार गोंधळ उडाला, आणि त्यानें वाळूवर रेखाटलेल्या त्या छोटया आलेखावरून मला कसलाच बोध होईना. म्हणून अखेरीस धीर करून मी त्याला थांबवला नि आपला प्रश्न त्याला परत विचारला.

' अरे हो, ' तो म्हणाला, ' अजून नाहीं वाटतं मनांतनं गेलं ते; वरं; पण नाईलचा मुखाजवळील भाग आपण गांठींपर्यंत त्यांची भेट आपल्याला होईलसं मला नाहीं वाटत. इथला हा प्रदेश कांहींसा रूक्ष आहे आणि आपण जर आणखी आंत शिरलों तर फारच आंत आपण जाऊं नि तिथे उन्हाळा तर फारच कडक. या किनार पट्टीवर वस्ती फारीच दाट आहे. पण आपण जर इथून सायप्रसला गेलों, तर तिथे मात्र चांगली विश्रांती मिळेल आपल्याला. '

' म्हणजे सायप्रसला भेट होऊं शकेल कदाचित ? '

' हो, बहुंशीं. '

' पण मला सांग, ही एवढी बारीक सारीक, सारी माहिती कशी बुवा तुला ? नाहीं तर मी उदाहरणार्थ आपण पाहिलेल्या ठिकाणांची मला कांहीच माहितो नाहीं सांगतां यायची. माझ्या मनावर विशेष परिणाम केलेल्या कांहीं एकदोन गोष्टी आठवतात मला, पण त्यांचा नकाशा कांही मला कधींच नाहीं काढतां येणार. '

' सरळच आहे, कारण तुझी पहिलीच खेप आहे ही. त्यामुळें प्रत्येक गोष्टच तुला नवीन आहे नि म्हणून तुझं लक्ष फांकलं जातं. पण माझी गोष्ट निराळी आहे. मी खूप दूरवर प्रवास केला आहे आणि निरीक्षण करण्याचीहि मला संवय आहे. कधीं कधीं मी टिपणहि करतों त्याचं. जरा थांब, माझ्या एवढा प्रवास होऊं दे तुझा. कीं मग तुलाहि...... '

' आणि अशा किती खेपा केल्यास तूं ? '

ट्रायफलर जरा घोंटाळला, पण स्वतःला लगेच सावरून घेऊन तो कांही तरी एक दोन अनिश्चित असे आंकडे पुटपुटला--मग तो तीन होता कीं तीस होता कोण जाणें !

' तीन वेळा नाहीं का ? ' मी मुद्दाम खवचटपणें विचारलं,

' आज रात्र काय सुंदर पडली आहे ! ' ट्राफ्लर सुस्कारत म्हणाला. ' तुझी ताई गाढ झोंपलीच असेल. ठीक, गुडनाईट तर, दोस्त, पण मला मात्र झोंप येतच नाहीं, आहे---मी एक चक्कर मारतों जरा, आपला थोडा कल्पना विहार ! '

त्यानें मग एकदां मान उडवली, पंख फडफडवले, वरच्या रत्नखचित नीलाकाशाकडे दृष्टिक्षेप केला नि एक सुस्कारा सोडून हळूहळू पावलं टाकीत त्या दरीभागांतील काळोखांत तो अदृश्य झाला.

आणि चमत्कार असा कीं आमच्या ताईसाहेब पण जाग्या होऊन उठल्या नि त्याच दिशेनें चालूं लागल्या पण आपल्याला काय करायचं आहे, असा विचार करून मी आपला पंखाखालीं डोकं खुपसून झोंपी गेलों. आपण सायप्रसला गेलों तर काय बहार ! त्या मजेदार बेटाबद्दलच मला मग रात्रीं स्वप्नें पडत होतीं. स्वप्नंतें बेट मी कधींच पाहिलं नव्हतं तरी---पण माझी कल्पनाशक्ती मात्र या लोकींचं नंदनवन, असंच त्याचं चित्र माझ्या डोळ्यांपुढे उभं करीत होती.

प्रवासाचा पुढला टप्पा कांहीं तसा विशेष लक्षांत ठेवण्यासारखा नव्हता. तुरळक वस्तीच्या पठाराच्या प्रदेशावरून आम्ही उडत होतों. भिकार नि तुरळक अशीं खेडीं, थोडीशी शेत जमीन नि त्याहुनहि कमी प्रमाणांत दिसणारं असं घाट-खिडींजवळचं बागाइत. पण तिथल्या अनेक लोकांच्या हातांत हत्यारं दिसत असलेलीं पाहून मात्र आम्हांला मोठं नवल वाटलं. मला वाटतं बहुतेक प्रत्येक माणसाच्याच हातांत बंदुक असेल, आणि म्हणूनच अनेक भीषण चकमकीहि उडत असलेल्या आम्हांला दिसल्या. कांही लोक

रस्त्याच्या बाजूच्या खडक कपारींच्या आड दडून राहून येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांवर हल्ला करून त्यांना लुटीत होते नि त्यांना ठारहि करीत होते. पण पुष्कळशा वेळी, ते प्रवाशांना नुसती दमदाटी करून त्यांचें घोडे, गुरं ढोरं नि उंट लुबाडून घेत होते. अगदींच खराब देश बुवा !

‘ इथे शिस्त बिस्त कांही नाहीं ! सर्व अराजक --एका शब्दांत म्हणजे तुर्कस्थान ! ’ आमचे बाबा म्हणाले.

जरा वेळानें, त्या खडकाळ भागांत एक सुंदर असं सरोवर पाहून विश्रांतीसाठीं आम्ही खालीं उतरलों. इथे दुसऱ्याहि बऱ्याच तुकड्या आम्हांला भेटल्या, पण दुर्दैव ! वाइजविंग फ्लॅपची तुकडी काहीं त्यांत दिसली नाहीं मला.

‘आपण बहुतेक सायप्रसला जाणार आहों, असं दिसतं,’ ट्रायफ्लर माझ्या कानांत पुटपुटला. आपण सरळ आडालिया आखाताच्या रोखानें चाललों आहोंत, नाहींतर आपण पूर्वेच्या बाजूलाच वळलों असतों. आणि शिवाय, समुद्रावरून उड्डाण करायला ही हवा पण फारच सुंदर अशी आहे.’

सकाळीं तिथून आम्ही निघालों आणि एका लांबलचक दरी भागावरून जात असतां त्यांतून वळणं घेत घेत वहात चाललेला एक अरुंद नदीप्रवाह खडकांवरून फेंसाळ उड्या घेत घेत जात असलेला आम्हांला दिसत होता. आणि मग, समूद्राच्या त्या गर्द नील पार्श्व भूमीवर, एका टुमदार धवलवर्ण नगरीची रेंखीव रेखाकृती आम्हांला दिसली.

हें आडालियाचं आखात. किनाऱ्याच्या बाजूबाजूनें आम्ही खूप उंचावरून, अगदीं डोंगरमाथ्यांच्याहिवरून, असे आतां आम्ही उडत होतों, आणि दिवस संपतां संपतां अनामूर भूशिराजवळील रुक्ष अशा किनाऱ्यावर आम्ही खाली उतरलों. एक फक्त दगडगोट्यांनीं नि खेंकड्यासारख्या प्राण्यांनींच काय तो हा किनारा भरला होता.

: : १५ : :

ट्रायफ्लरचं म्हणणं खरं होतं. तडक सायप्रस गांठायचंच आमच्या नेत्यानीं ठरवलं होतं. हा टप्पा तसा कांही फार मोठा नव्हता. पण या भागांत नेहमीं आकस्मिक उठणाऱ्या अशा वादळांचीच मोठी भीति होती. असलीं वादळं, त्यांच्या मदतीला जोरदार उलटा किंवा किनाऱ्याकडून वाहाणारा असा वारा जर असला, तर विलक्षणच घातकी ठरतात. पण आजच्या एकंदर चिन्हांवरून हवा सुंदर राहील असंच दिसत होतं. तरीसुद्धां, कुठल्या मार्गानें जावं याबद्दल आमच्या वृद्ध मंडळींत मतभेद होता. कांहींचं म्हणणं असं कीं, या भागांतली ही वरवर अनुकूल दिसणारी हवा, ही कांही विश्वास ठेवण्यांतली नाहीं, आणि म्हणून अलेक्झँड्रेटा आखाताच्या किनाऱ्याकिनाऱ्यानें जावं असा त्यांचा आग्रह. पण, बहुमत सायप्रस मार्गाच्या बाजूला पडलं आणि मग तसा निर्णय ठरल्यानंतर, आम्हां सर्व तरुण मंडळीला–माझी तर गोष्टच सोडा–ब्रह्मानंदच झाला.

काय गंमत होईल वाइज विंगफ्लॅपचा त्रिकोन सांपडला तर! सभोंवारचे वाचाळ सीगल, मला शपथ घेऊन सांगत होते कीं, त्यानीं सायप्रसकडे चाललेले करकोंचे कालच पाहिले होते. पण ते कुठले कोण, याचा मात्र त्यांना पत्ता नव्हता. पण खरं सांगायचं तर या वेडपट सीगलसपासून कधीं कसलीं माहिती कळणंच शक्य नव्हतं मळीं.

'ते आपल्यापैकीं असतीलसं मला नाहीं वाटत,' ट्रायफ्लरनें आपलं मत दिलं. 'ते बऱ्याच दूरच्या रस्त्यानें गेले आहेत, म्हणजे आपल्या ते पुढें जाणंच शक्य नाहीं.'

'अगदीं बरोबर,' बाबानीं त्याला पुष्टी दिली.

आमच्या मुक्कामाची जागा मोठी सुखावह होती आणि आमच्या विश्रांतींत कसला व्यत्ययहि नाहीं आला. समुद्र पक्षांचे कर्ण-कटु चित्कार आणि खळबळत्या लाटांची अखंड गर्जना यानींच सभोंवारच्या शांततेचा काय भंग होत होता तेवढाच. सूर्याच्या त्या प्रखर, भाजून काढणाऱ्या किरणांपासून स्वतःचा बचाव करण्यासाठीं म्हणून, किनाऱ्यावरील त्या उंच उंच खडकांच्या छायेचा आसरा आम्हीं घेतला होता. आणि मनरंजनासाठीं म्हणून एका जागेवर उभं राहून आम्ही उड्या मारीत होतों, किंवा खडकांवर आपटल्या-मुळें लाटांच्यावर उडणाऱ्या तुषार झोतांत, खालीं पळत जाऊन आम्हीं शीत स्नानाची मजा लुटीत होतों किंवा प्रत्येक लाटेनें आणून किनाऱ्यावर फेंकलेल्या खेंकड्या कावलांकडे गंमतीनें पहात होतों.

सायंकाळच्या सुमारास, करकोंच्यांच्या इतर कांहीं तुकड्या येऊन जमा होऊं लागल्या. त्यांच्या जवळून आम्हांला समजलं कीं, आपल्या तुकडींतल्या पोरासोरांचा कमताकदपणाचा सहानुभूतीनें विचार करून, विंग फ्लॅपनीं समुद्रावरून उडण्याचं साहस न करण्याचं ठरवलं आणि ते थोडे उत्तरेकडून किनाऱ्याकिनाऱ्यानें असे अलेक्झॅन्ड्राच्या रोखानें निघाले आहेत.

झालं! सायप्रस बेटाचं सारं आकर्षणच आतां माझ्या लेखीं मातीमोल ठरलं.

आपण पार थकलों आहोंत असं ढोंग करण्याचा दुष्ट अधम विचारहि एक क्षणभर माझ्या मनांत आला. माझ्यासाठीं हे मार्ग बदलतीलहि कदाचित्! पण माझी विवेकबुद्धी बंड करून उठली आणि माझा अभिमान असली नामुष्की पत्करायला कबूलच नव्हता. म्हणून आपल्या दुर्दैवापुढें मोठ्या जड अंतःकरणानें मी मान वांकवली.

'आतां नाईल गांठीपर्यंत नाहीं हं,' ट्रायफ्लर सहानुभूतीनें हंसत म्हणाला.

तो प्राणी माझ्या मनांतला प्रत्येक विचारच मुळीं ओळखीत होता.

त्या रात्रीं आणखी दोन त्रिकोन आम्हाला येऊन मिळाले. त्यानीं तर्क केला होता कीं बहुसंख्य क्रौंच हे वाईज विंगफ्लॅपच्या मार्गानेंच जातील.

पण हवा तशीच सुरेख, शांत अशी राहिली आणि आमचा विचार बदलेल अशी कोणतींच चिन्हं मुळीं दिसून आलींच नाहींत.

आम्हीं आणखी एक सबंध दिवस नि रात्र, पूर्व दिशेला पहिली पांढरी छटा दिसू लागेपर्यंत विश्रांती घेतली.

अजूनहि काळोखांत दडलेला किनारा आतां झपाट्यानें आमच्या दृष्टीआड झाला. पर्वताची शिखररेषा केव्हांच लाल झालर मिरवूं लागली होती, नि त्यामुळें त्या काळ्या सांवळ्या उदास पार्श्व-भूमीवर वेडीवांकडी अशी एक विलक्षण रेषा रेखाटल्यासारखी दिसत होती.

ट्रायफ्लर सांगत होता कीं किओनिस्ट्रो पर्वताचा–त्या बेटाच्या मध्यावरील एक विशाल पर्वत – माथा त्याला केव्हांचा दिसत होता, पण आम्हीं प्रयत्न करून करून देखील त्यासारखं असं आम्हांला कांहींच दिसत नव्हतं. आम्ही जे कांहीं पाहिलं तें एवढंच कीं, आमच्या समोर एक पुढें सरकत असलेलं एक निळं ढग दिसतं आहे नि मग तें उगवत्या दिवसाच्या नीलीम्यांत वितळूनहि गेलं आहे. किनाऱ्याची रूपरेषा आमच्या दृष्टी पुढून आतां कायमचीच अदृश्य झाली आणि आम्ही जणु काय एका प्रचंड अथांग अशा पोकळींत भ्रमण करीत आहोंत असं आम्हाला वाटलं. खालीं समुद्र एखाद्या आरशासारखा नितळ असा दिसत होता. त्याचा तटप्रांत आकाशांत विलीन झाला होता. वर, तोच तो अनंत अवकाश, खालच्या समुद्रा-इतकाच नितळ, प्रशांत, नि नील असा विस्तारला होता. सूर्यप्रकाश

डोळे दिपवून टाकीत होता नि खालील नितळ समुद्रांतील त्याचं प्रतिबिंब तर अधिकच प्रखरपणें झळाळत नजर ठरवूंच देत नव्हतं. आणि असं वाटत होतं कीं, हें खालून नि वरून बरसणारे सूर्यकिरण म्हणजे जीवनदायी, चैतन्यदायक, उबारा नि प्रेम यांचे सारखेच सामर्थ्य संपन्न, असे पर्जन्य झोतच जणू आमच्या अंगावर असे एक-सारखे उधळींत आहेत.

किती सहज, विनासायास नि अगदीं मजेंत आमचं उड्डाण चाललं होतं! या मार्गाची एवढी कां भिती नि शंका वाटली होती पण त्यांना! आमचा आपल्या नेत्यांवर इतका गाढ विश्वास होता कीं आमच्या आंवती भोंवतींच्या त्या आवकाशाचं प्रचंड विशालत्व आमच्या मनांत भीतीचा लेशहि उत्पन्न करूं शकत नव्हतं. आम्हीं अजून थकलों नव्हतों, आणखी एक सबंध दिवस आम्हीं उडत राहिलों असतों, पण आम्हीं आपलं ध्येयहि बहुतेक गांठलंच होतं. आमच्या समोर, अगदीं सुस्पष्ट, जणू पाण्यांतूनच वर येत असल्या सारखा आणि क्षितिज रेषेपासून एक बारीक काळचा रेषेनें विभक्त, असा किओनिस्ट्रो, आतां उभा होता.

जरा वेळानें मग दुसरीं कमी उंच शिखरं दिसूं लागलीं – आणि मग ती किनाऱ्याची रेषा नि तिची फेंसाळ लाटांची पांढरी झालर. आतां परत एकदां लाटांच्या गुरगुराट नि गर्जना नि गल पक्षांचे चीत्कार आम्हांला ऐकूं येऊं लागले आणि खडकांवरून लोंबत अस-लेल्या रान आयव्हीचे वेलहि आम्हांला दिसूं लागले. आतां फार तर तासा पाऊण तासाचा प्रवास कीं परत निर्धोक जमिनीवर.

पण आतां सूर्य मध्यान्हीला येऊन पोंचला होता, नि म्हणून, लेव्हकोझीआचं सुंदर शहर नि तिथले द्राक्षांचे मळे ओलांडून, आम्ही विश्रांतीसाठीं खालीं उतरलों.

जिथे आश्रय मिळण्याची शक्यता नाहीं, अशा उघडचा समूद्रावरून

यशस्वीपणें उड्डाण केल्यानें आमचा आत्मविश्वास दुणावला, आणि मग याहून दुप्पट अंतरावर असलेल्या बीरूटच्या पुढल्या प्रवासाचा विचार आम्ही निःशंकपणें करूं लागलों.

आमची रात्रहि अगदीं शांत अशी गेली. हवेंत कांही बदल होणार असं कांहींच चिन्ह दिसत नव्हतं, आणि दिशा उजळतांच आम्ही निघालों. आमच्या अनुकूल दैवावरचा आमचा विश्वास आतां वाढला होता आणि या प्रवासाचा शेवटहि सुखाचा असा आम्हांला दिसत होता.

पण मध्यान्ह झाली तरीहि जमीनीची कोणतीच निशाणी आमच्या दृष्टीच्या टप्यांत अजून दिसत नव्हती. खालीं, समुद्राचा पृष्ठभाग आतां अशुभपणें हालत डोलत होता. जणूंकाय दीर्घ निश्वासानें त्याची छाती खालींवर होत होती. पण त्याची सारी हालचाल मात्र अगदीं एकदम निःस्तब्ध होती. लाटांच्या आपटाआपटी सारखी त्यांच्या क्षुब्धपणाची कोणतीच निशाणी अजून मुळींच दिसत नव्हती.

'जलद, वेग वाढवावा,' आघाडीवरून हुकूम सुटला.

'वेग वाढवा!' प्रत्येक ओळी ओळींतून तो शब्द भिरभिरला.

आम्ही आतां इतक्या झपाट्यानें चाललो होतों कीं आमच्या पंखांचा सणसणाट अवकाशांत घुमत होता.

समुद्र आतां अधिकाधिक वेगानें उच्छ्वास टाकूं लागला. पण वारा मात्र मुळींच नव्हता. वातावरणांत शांततेचंच आधिराज्य चालूं होतं. आमच्या खालीं आपलीं सारीं अवजारं उभारून एक जहाज स्तब्धपणें उभं होतं; आतां तें करकरत डोलत होतं. मधूनच केव्हां त्याची नाळ तर केव्हां सुकाणू पाण्यांत खोल असं बुडत होतं, डोक्यावर लाल फेझ घातलेले, अर्धवस्त्रावृत असे बारीक लोक शिडांची आवराआवर करीत डेकवरून इकडे तिकडे धांवपळत होते. त्यांच्या मधूनच वाजत असलेल्या शिट्या नि सुटणारे हुकूम आम्हांला ऐकूं येत होते,

'मला कांहीं हें बरं नाहीं आहे दिसत,' ट्रायफ्लर हलक्या आवाजांत म्हणाला आणि त्यानें त्रिकोनांतील आपली जागा शांतपणें बदलली. आतां तो माझ्या पुढल्या बाजूला आणि ताईच्या बरोबर पाठीशीं असा उडत होता.

'डावीकडे पहा' तो पुन्हां कुजबुजला.

अर्ध्या अधिक क्षितीज भागाचा ग्रास केलेलं असं कांहीं तरी प्रचंड आणि भयंकर असं मला दिसलं; प्रतिक्षणीं विस्तारत नि अवजड असें मेघ आपल्या पुढें ढकलीत ढकलींत तें आमच्याचकडे येत होतं.

'वेग वाढवा!' पुढील बाजूनें पुन्हां एकदां आरोळी आली.

पण आम्ही आत्तांच कमाल वेगानें उडत होतों, आणि आमचे पंख दुर्दैवानें थकव्याची निशाणी दाखवूं लागले होते. समुद्रावरून आतां असंख्य शुभ्रफटांचे सर्पराज अस्वस्थपणें हिंडूं फिरूं लागले होते. आम्ही पाहिलेलं तें जहाज आतां कुठेंच दिसत नव्हतं. वाऱ्याचा पहिला सोसाटा आतां एकदम अवचितपणें आमच्या आंगावर आला आणि त्रिकोनांतील आमच्या सरळ ओळी पार वेड्यावांकड्या होऊन गेल्या.

पण तरीहि आम्ही आपला क्रम कायम ठेवला होता आणि पंख जोराजोरानें हालवीत होतों. तरी देखील, अश्चर्याची गोष्ट म्हणजे आम्ही पुढें जात असल्याचं कांहीं दिसत नव्हतंच, पण आम्ही उजवी-कडे मात्र असहायपणें वाहवत होतों, एकसारखे वाहवत होतों. आणि मग मेघांचा एक प्रचंड कानठळ्या बसवणारा, अगदीं पार गर्भगळीत करून सोडणारा असा आकाश फाडीत आवाज झाला नि त्याच-बरोबर सारं आकाश झळाळून काढणारी वेडीवांकडी विद्युत रेषा सळसळली नि मग चोंहीकडे काळोख पसरला. सूर्य बिंब जरी अजून दिसत होतं, तरी त्यांतून प्रकाशकिरण फांकत नव्हते; तो फक्त एक निः प्रकाश असा काळसर लाल गोळाच दिसत होता.

'एकमेकांच्या जवळ रहा! वाऱ्याबरोबर चला!' बाबांचा आवाज मंदपणें ऐकूं आला.

पण आतां त्यांचा हुकूम पाळणं शक्य नव्हतं. माझ्या जवळून कांहींतरी अवजड असं घोंघावत गेलं,नि मी जवळजवळ कोलमडलोंच. त्रिकोनांतून जसा फाडून ओढल्यासारखा नि वाऱ्याबरोबर सपाटयानें वाहवत सुटलेला, तो एक आमच्यांतलाच करकोंचा होता. तो एकाद्या चिंधीसारखा असहायपणें हवेंत गिरगिरत होता. आणखी एक क्षण दोन क्षण तो दिसत होता. नि मग तो त्या काळोखांत गडप होऊन गेला. . . . . आणखी एक बळी वाहवत गेला. मग माझी ताई केविलवाण्या स्वरांत ओरडूं लागली. ती खालीं खालीं पडत होती. तिनें आपलं सुंदर मस्तक उडवलं नि अंतराळांत, आंगांतली अगदीं उरली सुरली सारी शक्ति खर्च करून आवेशानें पाय झाडले. मीं पाहिलं तो ट्रायफ्लरनें बुडी मारल्यासारखी झटकन खालीं झेंप घेतली. मग तीं दोघंहि जण, त्या तूफानी वावटळीशीं जीवाचा आटापीटा करून झगडत झगडत खालीं खालीं कोसळूं लागलीं निं अखेरीस पार दिसेनाशी झालीं.

आतां मला देखील आपण अधिक वेळ तग धरूं, असं वाटत नाहीं आहे. अं हं, अशक्य ! आतां अशक्य ! ! माझा विनाश जवळ आला. माझ्या सभोंवारचं मला कांहींच दिसत नाहीं आहे– मी पूर्ण एकाकी आहें. मी वर उडतों आहे कीं पुढें चाललों आहें? कांहीं कळत नाहीं. मी संज्ञाशून्य झालों आहे. ही काळी ढगं मला दडपताहेत. खालीं पाताळांतला कोणी राक्षस, कोणी तरी भेसूर प्राणी गर्जना करतो आहे. थंडगार पाण्यानें मी एकदम ओला चिंब झालों आहे. माझे कान फणफणताहेत. एक प्रचंड हिरवा डोंगर आपलं फेसाळ मस्तक माझ्यावर उभारीत आहे–– खालीं एक मिट्ट तोंड वासलेली खोल दरी! आंगांतलं सर्व सामर्थ्य एकवटून मी वर उठलों. मी उडतों

आहे कीं काय तें नाहीं सांगतां येत, पण मला आतां कुणीं तरी एकदम कठीण पण लवचिक अशा कशावर तरी चांगलं झपाट्यानें आदळलं आहे; नि मी बेशुद्ध झालों.

मी शुद्धीवर आलों तेव्हां माझ्या भोंवतीं कृष्णवर्ण असे मानवी चेहेरे मला दिसले आणि कुणाचा तरी खडबडीत असा हात माझ्या पाठीवर होता. मी एकदम निराश झालों.

'तुरुंगवास', माझ्या मस्तकांत चमकलं आणि त्याच्या पाठोपाठ माझ्या स्मृतींत तुरुंगवासाशीं नेहमीं संबद्ध असलेले ते भयंकर शब्द 'कात्री' आणि 'दोरी' माझ्यासमोर उभे राहिले.

'होय, जीवंत आहे हा,' कोणीं तरी बोललं.

'गरीब बिचारे पक्षी !' दुसरं कोणीतरी मोठ्या गोड नि सुरेल अशा बायकी आवाजांत म्हणालं.

'पडूं दे त्याला स्वस्थ, म्हणजे येईल त्याला हुशारी,' तिसरा एक म्हणाला.

मी मग एकटाच होतों नि मग जरा वेळानें हळू हळू मी आपल्या आसपासहि नीट बघूं लागलों.

आकाशांत तारे चमकत होते, नि कांही चुकले माकले काळे ढग इतस्ततः भटकत होते. माझ्या डोक्यावर एक मोडकी डोलकाठी होती नि तिचीं गुंतलेली अवजारं खालीं लोंबत होतीं. कांहीं माणसं त्याच्या भोंवतीं कांहीतरी करीत धडपडत होतीं. आणखींहि एक डोलकाठी मला दिसली– ही चांगली शाबूत होती. एका वारा भरल्या शीडावर लाल प्रकाश पडला होता; त्याच्याहि पलीकडे दुसरींही कांही शीडं दिसत होतीं.

कुठल्या तरी गलबतावर दिसतों आहे मी— अवजारांच्या या

अस्ताव्यस्त पसाऱ्यांत. त्यावरले लोक कामांत गढले होते. त्यांच्या बोलण्याचा नि त्यांच्या कुऱ्हाडीचा आवाज मला ऐकू येत होता. तो उजेड खालून, एका फुटक्या तावदानाच्या खिडकींतून, आल्यासारखा दिसत होता. आतां कांहीतरी धाडकन वर फेंकून दिलेलं दिसतं आहे. त्यानीं एक दोरखंड खेंचलं, मी त्यांत सांपडलों नि उलटलों. मी वेदना होऊन कण्हलों आणि हालचालीसाठीं धडपड केली नि मग एके ठिकाणीं घट्ट बांधलेल्या एका पिंपाला मी ओठंगलों.

आपली पुरी पुरी दैना उडाली नि आतां कसलीच आशा नाहीं, असं मला वाटलं.

मरण, आलं तर बरं,' निराश होऊन माझ्या मनांत आलं. पण मग मी लगेच त्या विचाराविरुद्ध बंड करून उठलों. मरायचं कां? मी परत चांगला बरा होईनहि किंवा मला कदाचित फारशी इजा नाहींच झालेली नि माझे पंख फक्त थकले आहेत नि मोडले कांहीं नाहींत. त्यांना जर मी विसांवा दिला तर ते पुन्हा करतीलहि काम. त्या निर्दय कात्रीच्या तडाक्यांतून वटावलों मात्र पाहिजे! पण माझी ब्लॅकनेक कुठे असेल? नि माझ्या आईबापांची काय आहे हालहवाल-नि माझ्या ताईची? ट्रायफ्लर शेवटपर्यंत राहिला असेल का तिच्या बरोबर?

आणि त्या दोघांनाहि एकदम खालीं कालमुखांत उडी घेतांना पाहिलेला तो भीषण क्षण, एकदम माझ्या डोळ्यांपुढे उभा राहिला. मी स्वतः खालीं कोसळण्यापूर्वीं एकदोन क्षणच नाहीं का तें? कुठे आहेत आतां तीं सगळीं?

माझ्या विचारांचा मग गोंधळ उडाला; नि कांहीं अनिवार्य अशा गुंगीनें मी हतबल झालों. जीवंत असल्याचा आनंद माझ्या अंगांत आतां उबारा आणीत होता. कांहींहि कुठें दुखत ठणकत नव्हतं. पण मला हालवतहि नव्हतं– डोकं उचलण्याची मला ताकद नव्हती, कीं पाय लांब करण्याची.

'कात्री! ... ... इथून जर निसटतां ... ..'

मला झोंप लागली आणि मी किती तास झोंपलों होतों हें कळण्याचा कांहीं मार्गहि नाहीं माझ्याजवळ.

मग, जागा झाल्यावर नि आंगांत चांगली हुशारी नि ताकद आली असं वाटूं लागून मी आसपास पहातों, तों ट्रायफ्लरची स्वारी माझ्या पासून चार दोन पावलांवरच दुसऱ्या एका पिंपाच्या आडून माझ्याकडे डोकावून पहातो आहे, असं मला दिसल्यावर, मला किती आश्चर्य वाटलं असेल, नि काय आनंद झाला असेल, याची नुसती कल्पना करा! तो मला कांहींतरी खुणा करीत होता, पण त्याचा अर्थ मला मात्र नीटसा कळत नव्हता.

'माझी ताई?' माझ्यानें किंचाळल्याशिवाय राहवेना.

'शू: शू:! स्वस्थ पडून रहा नि विश्रांती घे आणि आपली ताकद कमाव; मात्र खूप आजारी आहेस असंच दाखव हं– आपला जीव बचावण्याचा तेवढा एकच आहे मार्ग. तुझी ताई पण इथेंच आहे आणि देवदयेनें तिला कांहीं इजाहि झाली नाहीं. पण काय भयंकर रात्र बाबा ती! कांहीं हरकत नाहीं. पण, धीर धर आतां, बऱ्याचशा गोष्टी मी आतांपर्यंत पाहून ठेवल्या आहेत, नि आपलं नशीब जोरावर आहे असं दिसतं', ट्रायफ्लरनें सांगितलं.

सूर्यबिंब आतां वर येत होतं. समुद्रहि आतां मवाळूं लागला होता. डेकवर फक्त आतां दोनच माणसं दिसत होतीं; त्यांतला एक चांगला उंच असा डोक्याला लाल फेटा आणि अंगांत रेनकोट घातलेला वृद्ध, तो दुसरा अर्धवट उघडा वाघडा, पायांत कांहीं नाहीं नि डोक्याच्या तेलकट लाल फेझला एक लांब काळा गोंडा. तो वृद्ध एका लहानशा उंच पुलावर उभा राहून दुर्बीणींतून पहात होता. तो दुसरा एका दोरखंडाच्या गुंडाळ्यावर बसला होता नि हातांतल्या चिलमींत

तंबाखू भरीत, जांभया देत, आळसटल्यासारखा हातपाय लांब करीत होता.

'इतर सगळे झोंपले आहेत', ट्रायफ्लर माझ्या कानांत कुजबुजला. 'आपल्या आंगांत आत्तां उडण्याची ताकद असती तर रे! पण आहे या स्थितींत कांहींच करतां येणं शक्य नाहीं आहे. धीर, बरं का दोस्त फक्त धीर धर!'

'आपण कुठेंसे आहों ;'

'पुण्यभूमीकडे यात्रेकरू घेऊन निघालेल्या गलबतावर आहोंत आपण, आणि ही मोठी भाग्याचीच गोष्ट आहे. हे यात्रेकरू मोठे दयाळू असतात आणि आपल्याला जायचं आहे त्या दिशेलाच ते जवळजवळ चालले आहेत. जाफा बंदराला जायचं आहे हें गलबत. खुद्द कप्ताना. जवळूनच कळलं मला तें.'

गलबत कुठें जायचं होतं हें कदाचित ट्रायफ्लरला कळलं असेल, पण ती माहिती मात्र कप्तानाजवळून त्याला नक्कीच कळली नव्हती, आपले थोरांमोठ्यांशी संबंध आहेत अशी बढाई मारण्याची नि खोटें बोलण्याची त्याची स्वाभाविकपणेंच मुळीं प्रवृत्ती होती आणि ती आत्तांसारख्या बिकट प्रसंगींसुद्धां त्याला सोडून जाणं शक्यच नव्हतं.

'मला भयंकरच तहान लागली आहे बाबा' मी म्हणालों.

'त्या पलीकडच्या दोरीजवळ जातां येईल बघ तुला; ती चोख. पावसाच्या पाण्यानें भिजली आहे ती, त्यामुळें पाणी गोड आहे तें; पण त्याला थोडा तेला डांबराचा वास येईल मात्र. पण त्यानें कांहीं इजा नाहीं व्हायची'.

त्याच्या सूचनेप्रमाणें मी केलं आणि आपली कोरडी पडलेली जीभ नि घसा ओला केला. आणि मग आपल्याला किती भूक लागली आहे याची मला खरी कल्पना आली. अन्नाचे एक दोन तुकडे मिळाले आत्तां

तर किती बरं होईल! एखादा मेलेला मासा मिळाला तरी देखील समाधान होईल असं वाटलं मला! पण आसपास खाण्यासारखं असं कांहींच दिसत नव्हतं नि म्हणून शांतपणें तें दिव्य करणंच भाग होतं मला.

दरम्यान, सूर्योदयाबरोबर, आणखी कांही लोक डेकवर आले, आणि त्यांत कांहीं बायका आणि मुलं दिसत होतीं. त्या साऱ्यांनीं क्रूसाची खूण केली आणि ते समुद्राच्या दिशेला मोठ्या उत्कंठेनें असे पाहूं लागले.

'आमचीं करकांचीं कुठे आहेत?' इकडेतिकडे पहात एक वृद्ध स्त्री म्हणाली.

ते सारे जण मग आमच्याभोंवतीं जमले. अत्तां मी आपली ताई पहिल्यानें पाहिली. एका लांब काळा झगा घातलेल्या वृद्धानें तिला आपल्या हातांत घेतली होती आणि तो तिला प्रेमळपणें कुरवाळीत होता. ताई मधूनच त्याच्या हाताला चावण्याचा प्रयत्न करीत होती, पण तो हात चटकन काढून घेई.

'अं हं असं नको करूं,' ट्रायफलर तिला म्हणला. 'वेडपणा आहे तो.'

'या, ह्याच्याकडे पहा! यांच्यापेक्षां याची दुर्दशा जास्त झालेली दिसते आहे,' दुसरा एक कृष्ण वेशधारी माझ्याकडे पाहून म्हणाला. 'गरीब बिचारे, त्या भयंकर तुफानानें, आणले नाहीं रे असे तुम्हांला वाहवत!'

'मोठं आश्चर्य आहे हें!' ताईला हातांत घेतलेला तो वृद्ध म्हणाला. 'त्या सर्वसंरक्षक प्रभूचा हात हा! अनंत असा हा समुद्र नि हें ठिपक्याएवढं तरंगतं जहाज या तुफानी समुद्रांत. पण तरीहि त्या सर्वेश्वरानें आपली अथांग दया या पाखरांना दाखवली, आणि त्या रौद्र तुफानाच्या प्रक्षोभांत वाहवत सुटलेलीं, असहाय, गलितगात्र नि कालमुखांत शिरत असलेलीं हीं बापुडवाणीं पाखरं, त्या दयामय प्रभूनें,

शांतिमुक्तीच्या जणु ओटींत आणून घातल्यासारखीं अगदीं सरळ या गलबतांतच आणून सोडलीं, पहा !'

'तो सर्वसाक्षी, सर्वज्ञप्रभु!' दुसरा एक कृष्णवेश भाविक उद्गारला.

'करकोंचीं, आमचीं सुंदर करकोंचीं,' मुलं म्हणत होतीं.

एक सुंदर केसांची चिमुरडी मग मांडी ठोकून खालीं बसली नि मोठ्या हळुवारपणें मला कुरवाळूं लागली.

ट्रायफ्लर आमच्यापेक्षां खूपच जलद सुधारला होता. तो आतां उठून उभा राहिला नि त्यानें आपले पंख फडफडावले.

'ओ: !' एक छोटा बच्चा घाबरून उडी मारीत उद्गारला.

'अरे, भिऊं नको त्याला. मोठं सुरेख पाखरूं आहे तें.'

आमच्या ट्रायफ्लरबुवानीं आपल्या दोन्ही आंगांना पहात एकदां सर्वांना अभिवादन केलें, आणि मग मोठ्या डौलदारपणें, किंवा निदान तसं करण्याचा प्रयत्न करीत, त्यानें एकदोन पावलें टाकलीं, पण तें त्याला शक्य होईना आणि तो खालीं डेकवर जवळ जवळ कोसळलाच. त्याचा थकवा अजून बराच होता नि त्याचे पाय लटपटत होते.

पण त्याच्या प्रेक्षकांनीं मात्र त्याच्या त्या अवसानाचं कौतुक केलंसं वाटलं. ते सारेजण हंसले, नि तो काळा काळा खलाशी देखील, आपले चकचकीत पांढरे दांत दाखवीत खदखदून हंसला. आणि, आपल्या त्या उंच कमानीवरून हें खालचं दृश्य पहात असलेला तो वृद्ध कप्तान, तिथूनच आनंदानें ओरडला. 'अरे आपल्या या नव्या उतारूंना कांही खायला कां नाहीं घालीत तुम्हीं ? है ! स्वयंपाक-गृहांतून थोडा भात ये घेऊन !'

किती शहाणपणाचं बरं हें ! किती समंजसपणाचं ! नि कसं अगदीं योग्य वेळीं !

'चला रे, आपल्या या नव्या उतारूंना, या करकोंच्यांना खायला घालूंया. हा-हा-हा !' जिकडून तिकडून आवाज आले.

आम्हीं मग त्या साऱ्यांच्या लक्षाचं जसं केंद्रच बनलों. पण त्या कोणाच्याहि करण्यांत आम्हांला शत्रुभाव कांही दिसत नव्हता. उलटपक्षीं, ते सारे मोठ्या प्रेमानें नि अपुलकीनेंच आमच्याकडे पहात होते !

'यानां जर निखाऱ्यांवर भाजले चांगले, तर मोठे खुमासदार लागतील– सूपदेखील छान होईल यांचा.' कुणीं तरी आमच्यावर वज्राघातच केला आणि भीतीनें आम्हीं थंडगार पडलों. आणि हें बोलणारी व्यक्ती–डेकवरील खालीं माल सोडण्याच्या एका भोंकांतून, खालून भुयारांतून आल्यासारखी, डोक्याला पांढरी टोपी नि आंगांत मळवस्त्र घातलेली एक क्रूर मुद्रेची असामी वर आली. त्याच्या कमरेला दोन भयंकर सुऱ्या लोंबत होत्या, आणि त्या माणसाच्या हातांत तें भातानें भरलेलं भांडं जर नसतं, तर त्याचा तो एकंदर अवतार, मूर्तिमंत क्रौर्य नि मृत्यु यांची मूर्ति असल्यासारखंच दाखवीत होता. पण तो भात – त्या भातामुळें त्याला थोडं मार्दव आलं होतं, आणि तो मजेदार भात अगदीं खास आमच्याच हवालीं त्यानीं केला.

आम्ही खूप घाबरलों होतों खरे, पण आम्हांला भूकहि तितकीच सपाटून लागली असल्यानें, भीतीला बाजूला सारून भूकेनें त्या भातावर एकदम हल्ला चढवला – पण डोळे त्या सुरीवाल्या माणसावर ठेऊनच हं ! त्यानें आपली तंबाकूची नळी पेटवली आणि, पाय फांकून उभा राहून, आपले शब्द त्यानें पुन्हा उच्चारले. 'हो, भाजून मोठे खुमासदार लागतील हे.'

'पण हे खातात का कोणीं ?' हातांत मूल असलेल्या एका कृश बाईनीं विचारलें, 'बगळे कांही नाहीं खात. घाण खाऊन जगतात ते.'

'करकोंचे आहेत हे, बगळे नव्हत. अगदीं वेगळी जात आहे ही.' आपल्या लांब नाकावरील चष्मा सांवरीत एक गृहस्थीबाण्याचे वाटणारे गृहस्थ म्हणाले.

हं, हें पसंत ! आमच्यासारख्या थोर करकोंच्यांना भिकारडे बगळे समजणं, म्हणजे कोण उद्धटपणा ! आमच्या सहनशीलतेच्या पलीकडे होतं हें, आणि आम्हीं जर त्याचा निषेध नसला केला तर, त्या भातांत आमचं सारं लक्ष गुंतलं होतं, म्हणूनच फक्त !

आमचं मांस खायला योग्य, कीं अयोग्य, या प्रश्नामुळें आमचं मन मात्र अतीशय व्यग्र झालं. आमच्या दृष्टीनें तो प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे हें आमच्या ध्यानांत आलं. तरी देखील, आमचं मांस खाण्यासारखं जरी असलं तरी तें चिवट नि चवीला खराब असतं, असं कोणीतरी ठांसून सांगितल्यामुळें, आमच्या स्वाभिमानाला डंख केल्यासारखं मात्र आम्हांला वाटलंच.

'तें अगोदर खारवून ठेवावं,' मी चटकन बोलून गेलों.

'शिकव त्यांना ! ए मूर्खा' ! ट्रायफलरनें माझ्या कुशींत ढोसलं.

सुदैवानें माझ्या त्या मुर्खपणाचा कांहीं परिणाम नाहीं झाला. आमच्या मांसाचा नमुना चाखण्याची ती कल्पना चेष्टेवारीच नेली गेली, नि आम्हांला इजा करण्याची कल्पना कोणाच्याच डोक्यांत आली नाहीं. परमेश्वरी कृपेचा उल्लेख ज्यानीं केला होता, त्या वृद्ध गृहस्थांच्याच संरक्षणाखालीं आम्ही पूर्णपणें होतों, असं दिसलं आणि जमीनीवर उतरतांच आम्हांला मुक्त करण्याचा त्यांचा इरादा होता.

'खुद्द परमेश्वरानेंच त्यांना जीवदान देऊन त्यांचं रक्षण केलं आहे तर त्याच्या पवित्र इच्छेच्या विरूद्ध जाणं हें आपलं काम नव्हे याच्याच इच्छेप्रमाणें होऊं दे'; तो वृद्ध म्हणाला.

'तथास्तु', त्याचे यात्रेकरू बांधव उद्‌गारले.

असं आमचं भवितव्य निश्चित झालं एकदांचं.

गलबताचा प्रवास चालला असतां, ते यात्रेकरू एकमेकांना सांगत असलेल्या गोष्टी आम्ही ऐकत होतों. आम्हीं ऐकलं कीं असल्या वादळांत कधीं कधीं वेगवेगळ्या पक्षांचे सबंध जमावच्या जमाव या गलबतांकडे वहात येतात; एकदां हजारों चिमण्या याच दयाळ गलबतावर येऊन पडल्या होत्या आणि त्या यांनीं सुरक्षितपणें किनाऱ्यावर नेऊन सोडल्या होत्या; एका नासधूस करणाऱ्या गिधाडाला देखील एकदां इथें आसरा मिळाला होता. नि त्यानें जर कप्तानाचं पाळलेलं कबूतर नीचपणें फाडून काढलं नसतं, तर त्यालाहि कुणीं हात नसता लावला. ह्या दुष्कर्म्याला देहांत शासनाची शिक्षाच योग्य– त्याला गोळी घालूनच ठार केलं !

अशा अनेक गोष्टी आम्ही एकल्या नि आमचा वेळ मोठ्या मजेंत गेला.

या काळांत, आम्हीं तिघंच काय तीं सुदैवानें वांचलों, ही एकच गोष्ट आम्हाला छळीत होती. नि आम्ही बेचैन होत होतों. इतरांची काय झाली वाट ? ते कुठें आहेत ? ते सर्वजण नाश पावले कीं आम्हांला वांचविणाऱ्या त्या दयाघनाच्या हाताचा त्यांनाहि आसरा मिळाला ? दुसऱ्या एखाद्या गलबताच्या डेकवर किंवा एखाद्या बेटावर ते सुरक्षित असतीलहि कदाचित.

'ढग पूर्वेकडून पश्चिमेला जात होते,' कसलातरी हिशेब करीत ट्रायफ्लर पुटपुटला. 'वादळाने आपल्याला लारनाका आणि बीरुट यांच्या निम्या वाटेवर गांठलं. तेव्हांपासून वारा जर बदलला नसता, तर काय झालं असतं पहा. या दिशेला अथांग असं पाणीच पाणी. आपल्या करकोंच्यानीं खुद्द नाईलचं मूख देखील ओलांडलं असतं आणि तिथें थांबणें अशक्य होऊन, वाऱ्यानें त्यानां ढकलीत पुढें नेलं असतं. नि तें मात्र फारच भयंकर झालं असतं!'

'हो फारच भयंकर झालं असतं !–,' ताई चिवचिवली.

पण माझ्या मनांत असले भयंकर विचार कधींच आले नाहींत. त्या वृद्ध गृहस्थानें उच्चारलेले परमेश्वरी कृपेचे ते शब्द माझ्या मनांत खोलवर जाऊन रुजले होते. माझ्या मनाची पूर्ण खात्री होती कीं आमचे करकोंचे वांचले आहेत, आणि डोळे मिटून मी एकदम स्वप्न-सृष्टींत मुळीं उडीच घेतली. त्या दिवशींचा तो फराळ नि त्यानंतरची विश्रांती यामुळें माझी शक्ती परत येत आहे असं मला आतां वाटत होतं नि त्यामुळेंहि मनाला समाधान लाभत होतं.

गलबत किंचित डोललं आणि आणखी कांही शिडं उभारलीं गेलीं. त्यांची थंडगार अशी लांब रुंद सांवलीहि आतां डेकवर पसरली. खालून कुठल्या तरी एखाद्या स्वर्गीय वाद्यावरून छेडल्या सारख्या कांही विलक्षण अशा स्वरांचा नाद आमच्या कानांवर आला. गलबतावरचे ते लोकहि इतके सुस्वभावी नि मायाळू दिसले कीं त्यानीं आम्हांला त्या, डूनीपर नदीच्या भाटांत आमच्यावर बंदूकी झाडणाऱ्या क्रूर माणसांचा विसरच पडला.

'जाफा!' गलबताच्या नाळीकडून कुणीतरी आरोळी दिली.

'जाफा!' ट्रायफ्लरनें आम्हाला समजाऊन दिलं.

त्यांच्या आवाजानें जाग येऊन, मी पाहिलं तों ट्रायफ्लर कप्ताना-च्या पुलावर मोठ्या रुबाबांत फेऱ्या मारीत होता, आणि तिथला जुना पुराणा वडा रहिवासी असल्यासारखाच मधून मधून एखादा झोंकदार नाचहि तो नाचत होता.

त्याच्याकडे पहात असलेले खलाशी मोठ्या भलेपणानें हांसत होते.

आपल्या आंगांतील सारी शक्ती आतां परत आली असं मला वाटलं. मी ताईला उठवली आणि आम्ही दोघंहि डेकवरून फेऱ्या मारूं लागलों. गुंडाळून ठेवलेल्या दोरखंडावरून, आणि वाऱ्यानें तरा-रलेल्या शीडांच्या सांवलींत डेकवर पसरलेल्या मऊ रगांवर पडून त्या थंडगार छायेचा आस्वाद घेत झोंपलेल्या लोकांच्या पायांवरून,

देखील आमचं फेऱ्या मारणं चाललं होतं.

आम्ही दृष्टीस पडतांच ट्रायफ्लर त्या पुलावरून उडी मारून खालीं उतरला नि आमच्या जोडीला आला.

'हें पहा,' तो म्हणाला, 'आतां वेळ गमाऊं नका. आपण भरपूर विश्रांती घेतली आहे. दैवानेंहि आपल्याला हात दिला आहे. पण दैवाचा किंवा देव देवांचा फाजील फायदा कुणी घेऊं नये. हे लोक आतांपर्यंत आपल्याशीं दयाळुपणें वागले. पण त्यांचं शील एखादे वेळीं पालटेलहि. किनाराहि आतां नजीक दिसतो आहे. त्या पांढऱ्या फुटऱ्या लाटा दिसतात तिकडे? त्यांच्या पलीकडे एक वाळूचा बंधारा पसरला आहे. त्यावर एक दीपगृह आहे. एक, दोन, तीन! चला, या माझ्या मागें! देव आपलं भलं करो!'

आम्ही एक क्षणभरहि घुटमळलों नाही आणि ट्रायफ्लरचं अनुकरण करून, दोन चार उड्या घेतल्या, गलबताच्या अवजारांतल्या रुंदांत रुंद अशा जागेंतून भरारी मारली नि वर हवेंत उंच उड्डाण केलं.

गलबतावर कुणींतरी मोठ्यानें ओरडल्याचं आमच्या कानीं आलं. 'आपलीं करकोंचीं गेलीं उडून!' आणि मग त्याच्या मागोमाग मुलांच्या ओरडण्याचा आवाज आला. मी मान वळवून पाहिलं, ते यात्रेकरू डेकच्या अगदीं कडेला गोळा झाले होते आणि त्या सर्वांच्याहि डोक्यावरून उंचावलेला असा त्या वृद्धाचा तो हात आम्हांला आशीर्वाद देत होता.

मला आपले अश्रु आवरतना. मनांत आल्यावर माणसं किती चांगली होऊं शकतात! पण असं नेहमींच कां नाहीं बरं त्यांना चांगलं व्हावंसं वाटत!

पण त्यांच्या पासून दूर असणें हेंच सर्वांत जास्त सुरक्षित!

: : १६ : :

हवेंत वर खूप उंच उड्डाण केल्यावर, आम्ही उपजत बुद्धीच्या जोरावरच जाफा पासून दूर वळालों. आम्ही आपले उजवीकडूनच उडत होतों आणि मग जरा वेळानें त्या फुटऱ्या लाटांचा भाग ओलांडून आम्ही खालीं वाळूवर उतरलों. तिथून कांही अंतरावर एका विरळ खजुरीच्या राईंत एक पांढरें संगमरवरी कारंजें दिसत होतें. खालीं छायेंत एक कृष्णवर्ण स्त्री आपलं लहान मूल घेऊन बसली होती. नि पाण्यानें भरलेला मातीचा एक उंच खुजा तिच्या जवळ दिसत होता. पलीकडे तसेंच पाण्याचे खुजे घेतलेल्या आणखींहि कांही स्त्रिया दिसत होत्या. आणखीं पलीकडून घंटांचा आवाज कानीं येत होता आणि लाल धुळीचे लोट वर उडतांना दिसत होते. बरोबर सशस्त्र पहारेकरी घेऊन जात असलेला तो एक उंटांचा काफीला होता.

हें सारं आम्हांला एकदम नवीन नि मजेदार वाटलं.

आम्ही खालीं उतरतांच त्या लबाड ट्रायफ्लरनें आपला नेता निवडण्याची सूचना केली. त्याला नक्की माहीत होतं कीं नेतृत्वाचा निर्विवाद हक्क आपलाच आहे, पण आमच्या कायद्याप्रमाणें निवडणूक होणं जरूर असल्यामुळें, त्यानें त्याचा आग्रह धरला होता. निवडून येण्याच्या आनंदाचा उपभोग घ्यावा हीच त्याची उत्कट इच्छा होती, हें अगदीं स्पष्ट होतं.

आम्ही मतं दिलीं आणि ट्रायफ्लर 'एक मतानें' आमचा नेता म्हणून निवडला गेला! त्यानें मात्र मला मत दिलं होतं.

'आतां, दोस्त, संपूर्ण आज्ञा पालनाची शपथ तुम्ही घ्यालना ?– आमच्या त्या नव्या नेत्यानें विचारलं. ' राणी साहेब, खुद्द आपल्या जवळून देखील या शपथेची आवश्यकता आहे,' असं म्हणून त्यानें

मिस्कील पणें ताई पुढें मान झुकविली. 'माझ्या मित्रांनों, पहिली गोष्ट म्हणजे आपण संख्येनें तीन आहोंत – म्हणजे आपल्याला आपला त्रिकोन तयार करतां येईल. हेंच जर आपण फक्त दोनच जण असतों तर अशक्य झालं असतं.'

आणि हा अविवाद्य मुद्दा सिद्ध करण्यासाठीं त्याने वाळूवर कांहीं आकृती रेखाटण्यास सुरवात केली.

'तूं आणि मी,' तो मला म्हणाला, 'आळीपाळीनें रात्रीं पहारा करूं आणि त्रिकोनाची आघाडी पण अशीच राखूं. आपण, बाईसाहेब, या किचकट कामांतून मुक्त अहांत.'

आमच्या कायद्याप्रमाणें, हें अगदीं हुकूमशहा सारखंच वागणं होतं, पण त्याबद्दल कांही न बोलणंच बरं, असं मला वाटलं, आणि याला विरोध करण्याची, ताईला तर माझ्यापेक्षांहि कमीच इच्छा होती.

ट्रायफ्लरनें मग थोड्याच वेळांत त्या नवीन भू भागाची माहिती मिळविली आणि आमच्या पुढील प्रवासाच्या विचाराला तो मग ताबडतोब लागला. त्यानें सांगितलं कीं, आपला पुढला प्रवास 'किनाऱ्या किनाऱ्यानें असा तडक पोर्ट सय्यद, डॅमिएटा आणि मग नाईल, असा होईल.' मग त्यानें अशी सुचना केली कीं आत्तां आपण प्रयोगादाखल अशी एक छोटी भ्रमंती करूं या. पहिलं म्हणजे अशासाठीं कीं, इथें लोकांची वर्दळ असल्यानें आपल्याला जरा लांब गेलं पाहिजे, आणि दुसरं म्हणजे, आपल्या पंखांची पहिली ताकद त्यांना आतां परत आली आहे कीं नाहीं, हेंहि पाहिलं पाहिजे.'

आम्ही मग दोन एक तास उडत होतों. आणि मग एका निर्मनुष्य, रुक्ष अशा खोलगट भागांत आम्ही खालीं उतरलों.

सायंकाळच्या सुमारास आपल्याला पुरेसा विसांवा झाला असं आम्हांला वाटलं. खरं म्हणजे नाईल गांठण्यासाठी आम्ही अगदीं अधीर झालों होतों. कारण तिथें गेल्यावर आपले आईबाबा आणि इष्टमित्र

यांचा निदान कांहींतरी तपास आपल्याला लागेल अशी आम्हांला आशा होती. ही आशा आम्हांला स्वस्थ बसूं देत नव्हती. म्हणून प्रवासाचा पहिला टप्पा त्या रात्रींच संपवावा असं आम्ही ठरवलं.

ट्रायल्फर पुढें अग्रभागीं आणि ताई नि मी मागें असा त्रिकोन आम्ही तयार केला होता.

खालच्या निद्रामग्न पृथ्वीवर सुंदर, सुखद, अनंत तारकामय अशा निशेनें आपलं अवगुंठन पसरलं होतं. परत लाभलेल्या स्वातंत्र्याचा तो अस्वाद किती मधूर, किती रोमहर्षक ! अगदीं अतुलनीय असं सुख साम्राज्य! ओ, आतां फक्त आपले आप्तजन सुखी पाहिजेत!

तो सारा प्रवासभर ट्रायल्फर आम्हांला थापा देत होता.

त्यानें सांगितलं कीं, त्या गलबताचा कप्तान त्याला रहायचा आग्रह करीत होता नि आपला दुय्यम म्हणून त्याला तो ठेवणार होता. पण आपण त्रिकोन नेते आहोंत असं सांगून, त्यानें कप्तानाला नकार दिला होता. आणखीं म्हणें, कप्तानाने त्याला त्याचा पंजा हालवून नि 'शुभास्ते पंथानः' असं म्हणून निरोप दिला, आणि शेवटीं त्यानें त्याचं चुंबन घेऊन ट्रायफ्लरला विनंति केली कीं, आम्हांला कधीं विसरूं नको नि शक्य झालं तर परत भेटून जा.

"माझं हें सारं गलबत आणि सगळा भात हा अगदीं तुझ्या दिमतीला आहे," कप्तान मला म्हणाला "त्या आचाऱ्याची नको पर्वा करूं तूं. तो जरी नीग्रो असला तरी आतां चांगला सुधारला आहे आणि आपल्या कप्तानाच्या जिवलग मित्राचा मुरंवा करण्याची त्याची छातीच नाहीं."

आम्ही दोघंही अगदीं खदखदून हंसलो नि त्याच्या साऱ्या गप्पा खऱ्या आहेत असंच आम्ही समजतों आहोंत, असं त्याला दाखवलं. त्यानें त्याला त्यामुळें जास्तच चेव आला आणि त्याचं पुराण सुरू झालं. असंहि ठोकून दिलं कीं, कप्तानानें स्वतःसाठीं दोन अस्सल

क्रौंचांचें पंख इंग्लंडांतून कुठून तरी मागवले आहेत, कारण सेवानिवृत्त झाल्यावर त्याच्या मनांतून आम्हांला येऊन मिळायचं होतं. आणि तो असंहि म्हणाला कीं, आपण आपल्या समाजांत माझी ओळख पाळख करून द्यालच, ट्रायफ्लर.

पहांटेच्या वेळीं, आमच्या समोर आम्हांला एक चमकती उजेडाची ठिणगी, आतां दिसते तर मग नाहीं, अशी चमकतांना कांहीं अंतरावर दिसली. पोर्ट सय्यदचं तें दीपगृह होतं. समुद्रांत खूप दूर असं तें बांधलेलं होतं.

हीं असलीं दीपगृहें आम्हां करकोंचयांना सामान्यपणें खूप अंतरावरून दिसतात, आणि सभोंवारच्या काळोखी वातावरणांत त्यामुळें मोठी फसगत होते. आपल्याला तो प्रकाश दिसतो नि तो अगदीं जवळ आहे असं वाटतं, पण वस्तुस्थितींत मात्र आपण आपलं एकसारखं उडत रहावं तरी तें दीपगृह गांठीपर्यंत अंतर मात्र संपतां संपत नाहीं, असं अनुभवाला येतं. याही वेळेला तसंच झालं; सभोंवार अगदीं पूर्णपणें उजाडलं तेव्हां कुठे तो दीपस्तंभ बऱ्याच लांब आमच्यासमोर अंधुक असा उभा राहिला. बंदरांत शिरण्याची वाट पहात असलेल्या कितीतरी आगबोटी नि जहाजं, लाटांवर हालत डुलत असलेलीं तिथें दिसलीं. आनंदानें शिट्या मारीत असलेल्या छोट्या टगबोटी नि मोटार बोटी इकडून तिकडे सुळकन पळत जातयेत होत्या.

डावीकडे, कालव्याची ती बाणासारखी सरळ रेषा दिसत होती. कांहीं थोड्या अजस्त्र बोटी, धुराचे काळे लोटच्या लोट मागें सोडीत त्यांतून हळू हळू चालल्या होत्या.

पोर्ट सय्यदच्या पलीकडे सखल भूभाग दूरवर पसरला होता. त्यावर कांहीं ठिकाणीं वेत लव्हाळे, तर कांहीं जागीं नुसता पिवळट रेताड भाग नि मधून मधून पाण्याचे ओहोळ जाळ्यासारखे पसरले

होते. हवा कांहीं चमत्कारीक अशीच दमट वाटली. पोर्ट सय्यद नि पलीकडील तो सखल विभाग यांमध्यें एक वाळूची टेकडी खडी झाली होती.

'नाईलचा मुख प्रदेश! नाईल नदीचा मुख प्रदेश'! ट्रायफ्लर तिकडे बोट दाखवून म्हणाला. 'इथून होतो त्याचा प्रारंभ!'

आमचं हृदय आनंदोत्साहानें धडधडूं लागलं. आशा नि भीति हीं आम्हांला आलटुन पालटून व्याकूळ करीत होतीं. आत्तां आमच्या प्रीतिसंगमाचा आनंद सोहळा आमच्या डोळयांसमोर नाचूं लागे; तर दुसऱ्या क्षणीं, पोरके पडल्याची भीति आणि कटु स्मृति यांचं भूत आम्हांला भेडसावूं लागे.

विश्रांतीसाठीं आम्ही त्या रेताड टेंकडीवर उतरलों होतों. आणि मग मध्याह्नीला त्या भूभागांतून आम्ही वर चालूं लागलों. आमचे डोळे आतां खालीं नि आजूबाजूला असे सारखे खिळल्यासारखे सर्व भूभाग शोधीत होते.

'या इथे!' ट्रायफ्लरनें आनंदानें आरोळी दिली.

आम्ही पाहिलं – एका सुस्तपणें वहात असलेल्या ओढ्याच्या कांठा· वर करकोंच्यांचा एक छोटा जमाव विश्रांती घेत होता.

तो पहातांच आम्ही इतक्या घाई घाईनें तिकडे पळत सुटलों कीं आमची सारी शिस्तबिस्त गुंडाळली जाऊन आमची त्रिकोनाकृति पार विस्कळीत झाली. त्या खालच्या लोकांनींहि आमच्या आरोळयांना मोठ्या आनंदानें ओरडून प्रतिसाद दिला.

आमच्यापैकीं कांहीं थोडे लोकच होते ते– आमच्या पहिल्याच त्रिकोनांतले नव्हे, पण वादळांत सांपडलेल्या आमच्याच तुकडींतले मात्र ते होते. बराच मोठा फटका बसला होता त्यांना. त्यांच्या त्रिकोनांतल्या एकंदर सत्तरांपैकी फक्त सोळाच जण शिल्लक उरले होते आतां. केवळ अगदीं दैवी चमत्कारामळेंच ते वांचले. –वाऱ्यानें

त्यांना जे रेटले ते मुळीं सरळ याच भागांत. काय सपाटा पल्ला तो! बाकीचे समुद्रांत पडून नाश पावले, असं त्यांनीं सांगितलं. त्यांची कांहींच बातमी त्यांना कळलेली नव्हती. बहुतेक अंशीं ते मृत्युमुखींच पडले असावे, अशी त्यांची समजूत होती.

जड, भयभीत मनानें आम्ही त्यांना आमचे बाबा, क्लॅरिअन ट्रंपेटर यांच्याबद्दल विचारलं. पण त्या करकोंच्यांना त्यांची नि त्यांच्या त्रिकोनाची कांहींच माहिती नव्हती. आणि वाऱ्यानें त्यांच्या उडव-लेल्या दैनेमुळें ते अजून देखील गळलेले असेच असल्यामुळें, तपासा-साठीं बाहेर पडणं त्यांना शक्य नव्हतं. पण आपल्यांत येऊन मिळ-ण्याचं त्यानीं आम्हांला निमंत्रण दिलं.

'तुमचा प्रमुख कोण ?' ट्रायफलरनें जसं ताठ्यांतच विचारलं.

नि मग तो त्या मुख्याकडे मोठ्या ऐटींत गेला नि त्याच्याजवळ खालच्या आवाजांत तो बोलूं लागला. मग त्यानें तिथून आपला तळ उठवण्याची अवश्यकता आम्हांला पटवून दिली. कशामुळें तरी त्याला तें ठिकाण नापसंत होतं, आणि त्यानें दुसरं एक ठिकाण आम्हाला सुचवलं. माझ्या मतानें, दोन्ही ठिकाणं अगदीं तंतोतंत एकसारखींच होतीं. मग, त्याच्या सूचनेवरून, आम्ही आमच्यांतील निवडक कर-कोंच्यांची टेहेळणीसाठीं एक तुकडी निवडली आणि त्यांनीं पहांटे-पासून आपल्या कामावर निघावं असंहि आम्हीं ठरवलं.

सायंकाळच्या सुमारास आणखींहि कांही करकोंचे येऊन पोंचले, ते देखील केवळ दैवयोगानेंच बचावले होते. त्यांतल्या एकानें सांगि-तलं कीं, त्यानें माझ्या बाबांना तुफानाशीं मोठ्या शर्थीनें झगडतांना पाहिलं होतं. त्याचा जीव वटावला त्यापूर्वीं एकदोन क्षणांमागेंच त्यानें त्यांना जीवंत असं पाहिलं होतं. यामुळें आमची आशा चांग-लीच वाढली.

आमचे टेहळे बाहेर पडले त्यावेळीं नुकतं कुठं झुंजुरकं सुरू झालं

होतं. आमच्या त्रिकोनाचा प्रतिनिधी म्हणून मला स्वतंत्रपणें या टेहे- ळणींत भाग घ्यायचा होता. कारण, ट्रायफलरच्या, प्रत्येक नव्या येणाऱ्या करकोंच्याला आपल्यांत सामील करण्याच्या उद्योगामूळें, आमचाहि त्रिकोन आतां खूप मोठा झाला होता.

एकंदरींत पहातां, मला एक गोष्ट कबूल केलीच पाहिजे कीं आमचा तरुण पुढारी हा दुसऱ्या पुढाऱ्यांपेक्षां जास्त उत्साही नि कल्पक असा होता, आणि त्यामुळें कांहीं करकोंचे आमच्याकडे मोठ्या असूयेनेंच पहात असत, यांत शंका नाहीं.

मी आपल्याबरोबर एक जोडीदार घेतला होता आणि आमच्या प्रिय आप्तांच्या शोधार्थ आम्ही उड्डाण केलं. आम्ही आपल्या पंखांच्या थोड्या झडपा मारल्या नाहींत तोंच हिरवट काळ्या रंगाचे दोन मोठे पदार्थ, त्या ढणढणीत सूर्यप्रकाशांत खालीं वाळूवर पडलेले माझ्या नजरेस पडले. लाटानीं किनाऱ्यावर आणून टाकलेले दोन ओंडके आहेत ते, असं मी समजलों; कारण त्यांचा पृष्ठभाग, बुरशी चढल्यासारखा कांहीसा दिसत होता. पण ते ओंडके हालूं लागतांच मात्र माझी त्रेधा उडाली. आतां ते रांगत पुढे सरकत होते नि त्यामुळें वाळूवर नांगरल्यासारखे खोल पट्टे उठत होते. त्यांतल्या एकानें मग जांभई दिली आणि त्यांच्या त्या विक्राळ जबड्यांत तीक्ष्ण दातांची जशी दुतर्फा पलटणच खडी होती. ते जबडे इतकें मोठे होते कीं एक सबंध करकोंचाच सा काय पण अेक दोन पेलि- कन पण त्यांत सुखानें मावले असते. मला किंवा माझ्या जोडीदाराला त्या सैतानांची कांहींच माहिती नव्हती आणि जवळपास कुणी विचारण्यासारखं पण नव्हतं.

आरंभीं आम्ही आमच्या तळाच्या अगदीं निकटच्या भागांवरूनच टेहेळणी करीत हिंडत होतों. मग मात्र क्रमाक्रमानें आम्ही आपली वर्तुळकक्षा विस्तारूं लागलों. नि मग, एका दाट झाडी असलेल्या

लहानशा बेटावर आम्हांला एक करकोंच्यांचा जमाव दिसला नि त्यांत माझे प्रिय, अत्यंत आवडते बाबा, क्लॅरिअन ट्रंपेटर-त्यांना पाहून माझं हृदय इतकं तुफान असं कधींच उसळलं नव्हतं !

मी जसा कोलमडतच खालीं आलों, नि पायांनी कांहीतरी पकडीत आपली चोंच मी जमीनींत खुपसली. आणि मग डोळ्यांतून आनंदाश्रु वहात, गुदमरल्यासारखा मी जेमतेम उद्गारलो. 'बाबा ! माझे बाबा !'

बाबांचं आंग भरभरलं आणि माझी अवस्था ध्यानांत न येऊन ते माझ्याकडे स्तिमित होऊन पाहात राहिले.

'आणि तुझी ताई ?' हताश स्वरांत त्यांनीं मला विचारलं.

'माझ्याबरोबर आहे ती आणि ट्रायफ्लर देखील. आमचा प्रमुख म्हणून काम केलं त्यानें' मी गडबडीनें मग त्यांना सारी हकीगत सांगितली.

'प्रमुख म्हणून ?' खिन्नपणें आपली मान हलवीत बाबा उद्गारले. 'तें ठीक, फारच छान. आणि माझ्यानेंहि पुढारीपण रेटणार नाहीं आतां. माझ्या वयामुळेंच असेल तसं..... बहुतेक सारा त्रिकोन मी साफ केला. मला फाजील आत्मविश्वास वाटला. कोणाचा सदुपदेश मी कांहीं ऐकला नाहीं.... पण त्यांतल्यात्यांत एवढंच समाधान, अतिशय समाधान, निरतिशय आनंद असंच म्हटलं पाहिजे, कीं निदान तूं तरी जीवंत आहेस !'

मी बाबांकडे टक लाऊन पहात होतों. शारीरिक थकवा नि दुःख यानीं ते ओळखू न येण्याइतके बदलले होते. मग मी सभोवार पाहूं लागलों.

'तिला नको पाहूं– ती गमावली !' बाबा म्हणाले.

आणि मगच काय ती त्यांच्या नि आमच्या सर्व नाशाची पूर्ण पूर्ण कल्पना मला आली !

आणि मी हमसाहमशीं रडूं लागलों.

'गरीब बिचारी ताई! कशी सांगायची तिला ही दुःखद बातमी!'

...आमची ती टेहेळणीची कल्पना बाबांना एकदम पटली. 'अगदीं योग्य असंच केलंत तुम्ही,' ते म्हणाले, आणि त्यांना अगदीं प्राणांतिक श्रम झाले असल्यामुळेंच ते आमच्या बरोबर त्यावेळीं निघूं शकले नाहींत. पण आमचा तळ कुठे आहे याची त्यानीं अगदीं बारीक-सारीक देखील माहिती विचारून घेतली आणि आपल्या त्रिकोनातलें उरलेसुरले विश्वासु लोक घेऊन त्यानीं आमच्याकडे येण्याचं कबूल केलं.

रात्रीं मी आमच्या तळावर परत आलों. त्या वेळीं त्या दिवसांत किती काम झालं होतं याची मला कल्पना आली–जवळ जवळ शंभर एक करकोंचे तिथं गोळा झाले होते. याशिवाय ज्यांना कसलीच हालचाल अशक्य वाटत होती अशा करकोंच्यांच्या तुकड्या होत्या त्या वेगळ्याच, आणि आतां मात्र आमचं तें मकाण, खरंखुरं तळ पडल्यासारखं वाटूं लागलं.

सभोंवार पिस्कारलेल्या तुकड्या शोधून काढून त्यांना घेऊन येण्यांत–आम्हीं असें तीन एक दिवस खर्च केले.

दुसऱ्या दिवशीं वृद्ध लाँगनोझ आपला त्रिकोन अभंग अशा अवस्थेंत येऊन दाखल झाले. त्यानांहि केवळ दैवानेंच तारलं होतं. आम्ही निघाल्यावर दुसऱ्या दिवशीं त्यानीं बीरुटचा रस्ता धरला, आणि त्यांचा तो प्रवास पूर्ण यशस्वी असाच झाला.

आम्ही पण आणखी बारा तास वेळ काढला असता तर! ओ! किती गंमत झाली असती म्हणजे! कितीतरी जींव बचावले असते! पण आमच्यासाठीं कसलं ताट वाढलं होतं, याची कुणाला कल्पना यायची? एका फक्त परमेशाला–पण त्याची मर्जी तशी होती!

सर्वांच्या हिशेबाप्रमाणें, वेगवेगळ्या त्रिकोनांतून एकूण दोन एकशे करकोंचे सागरास्तृप्यंतु झाले असावे. आमच्या साऱ्या संख्येचा हा पुरा पुरा तिसरा भाग! आमची छाती पार दडपूनच गेली!

तिसरे दिवसाच्या अखेरीस, किनाऱ्या किनाऱ्यानें पुढे प्रवास करीत निघालेल्या वाइजविंग फ्लॅपची आघाडीची तुकडी येऊन दाखल झाली.

आमच्या वृद्ध मंडळीनीं आतां आपल्या सैन्याची पुनर्रचना करण्यास सुरवात केली.

ट्रायफ्लरच्या पुढारीपणावर आतां शिक्का मोर्तब झाला. ज्या त्रिकोनांचे प्रमुख नष्ट झाले होते अशा त्रिकोनांतील अवशेष एकत्र करून त्यांचा एक त्रिकोन त्याच्यासाठी तयार करण्याचा विचार चालू होता. अशा वेळीं आपला पराक्रम सुवर्ण रंजित करून सांगण्यांत ट्रायफ्लरकडून कसूर केली जाणंच बिलकूल शक्य नव्हतं. पण खरं महत्व माझ्या नि ताईच्या साक्षीलाच दिलं गेलं नि त्याची निवड पुरी झाली.

पण आतां आमचे ते शूर नायक अवचितपणें एका चमत्कारीकच खोड्यांत सांपडले.

त्याचं असं कीं, आमच्या कौटुंबिक कायद्यांप्रमाणें मला नि ताईला आमच्या बाबांच्याच त्रिकोनांत रहाणं भाग होत. आणि ट्रायफ्लरला तर त्याची नि आमची, किंवा अगदीं कांटेसूत सांगायचं म्हणजे, माझ्या ताईची ताटातूट व्हायला नको होती. म्हणून आतां आली ही शृंगापत्ती ! – एक तर आपली नायकगिरी सोडायची नि आमच्याजवळ यायचं, नाहीं तर आमची ताटातूट सोसायची. पण यावर तो फार वेळ नाहीं गोंधळला आणि आमच्या ताईसाहेबांच्या घायाळ करणाऱ्या कटाक्षांमुळें तर त्यानें एकदम छातिठोक निकाल दिला.

'आतां हें खरं,' आमचा शूर दोस्त म्हणाला, 'कीं नायकाचा हा हुद्दा हा मोटाच सन्मान आहे, आणि माझ्या या वयाला नायक होणं हें निःसंशय कौतुकास्पद आहे – त्याला मी निःसंदेहपणें लायक आहे, हें अगदीं सत्य असलं, तरी देखील कौतुकावह आहे. पण तो मान आतां नाहीं माझ्यापासून पळून जात. माझ्या सद्‌गुणांचं चीज हें नेहमींच होत राहील. दरम्यान, आपले प्रिय बाबा–कसूर माफ हं महाराज; आपले सन्मान्य मि. क्लॅरिअन, असंच म्हणायचं होतं मला–

आपल्या त्रिकोनांत मला घ्यायला आपली कांही अडचण नसेल मला वाटतं; आणि तिथे आपल्या उदार आश्रयाखालीं -'

बाबांनीं नुसतं 'या तुम्हीं,' असं शुष्क तुटक शब्दांत सांगितलं, आणि तो प्रश्न आमच्या सर्वांच्या मनासारखा निकालांत निघाला.

माझ्या प्रिय, विचारी नि कर्तव्यदक्ष मातेच्या मृत्यूमुळें वृद्ध लाँग-नोझनां फार वाईट वाटलं आणि त्यानीं आपल्या दुःखी मित्राचं सांत्वन करण्याचा आपल्याकडून कसून यत्न केला.

कालांतरानें बोथट होत नाहीं असं या जगांत कोणतंच दुःख नाहीं – आणि खुद्द मृत्यूंतूनच जसं नवजीवन उत्पन्न होतं, तसाच नवीन आनंदहि या दुःखांतूनच जन्म घेत असतो,' ते म्हणाले.

आतां माझ्याविषयी म्हणाल तर त्या उरल सुंदरीकडे मी इतका जोरानें खेंचला जात होतों कीं, आमच्या ट्रायफ्लरनें तिच्या त्रिकोनांत आपली बदली करून घेण्याचा मला सल्ला दिला. पण वाइजविंग फ्लॅपनीं हा प्रश्न मोठ्या सुंदर रीतीनें निकालांत काढला. एक दिवस असे संध्याकाळीं ब्लॅकनेकला घेऊन ते आमच्याकडे आले, आणि हंसत हंसत बाबांना सरळ म्हणाले; 'हें पहा, दोस्त! या मूर्ख पोरटीला घ्या तुमच्या त्रिकोनांत नि करा तिला बरी; घेता का? अगदीं विलक्षण आजारी आहे ही पोर– तिला भूक लागत नाहीं, झोंप लागत नाहीं, वगैरे, वगैरे; आणि माझी खात्री आहे कीं तुमच्या त्रिकोनांत तिचा रोग पार पळून जाईल. माझ्या परिचयाचा आहे हा रोग. खूप दिवस झाले त्याला– अगदीं खूप खूप झाले दिवस — मी पछाडलों होतों या रोगानें. पण तरी देखील, त्याची निशाणी, त्याच्या खाणाखुणा आठवताहेत मला, तर माझ्या सांगण्याप्रमाणें या पोरीला घेतलीत आपल्या ताब्यांत तर बरं होईल.'

बाबांनीं संमति दिली, आणि त्या सायंकाळपासून ती ऊरल निवासिनी, माझी सुंदर ब्लॅकनेक, आणि मी यांचा कधींच वियोग झाला नाहीं.

: : १७ : :

नाईलचा हा मुखाजवळील भाग देखील कडक थंडीचा नसल्यानें, हिमवर्षावापासून इथे आम्ही सुरक्षित होतों आणि वसंतऋतूच्या आगमनापर्यंत तिथे मुक्काम करण्यास प्रत्यवाय नव्हता, असं दिसलं. पण त्या भागांत मनुष्य वस्ती दाट असल्यामुळें आम्ही आपला प्रवास खालीं आणखीं दक्षिण दिशेला चालू ठेवला. आम्ही आतां स्वच्छंद नि आस्तेकदम असे, नाईलच्या एकदां उजव्या, तर एकदां डाव्या किनाऱ्यावर मुक्काम करीत होतों आणि वैभवशाली गतकाल असलेल्या त्या देशांतील चमत्कार पहात नि त्यांची सर्व माहिती गोळा करीत होतों.

आम्ही पहात असलेल्या प्रत्येक गोष्टीची आमच्यांतले वयोवृद्ध, त्यांनीं तो देश अनेकदां पाहिला असल्यामुळें आम्हांला माहिती पुरवीत होते. इतिहासांतले अनेक प्रसंग ते आम्हांला समजाऊन सांगत होते, आणि आपल्या या देशाच्या आठवणींची भरहि ते त्यांत घालीत होते. गतकालांतील हा इतिहास, बापाकडून लेकाकडे, असा अनेक पिढ्या आमच्यांत चालत आला आहे.

इथे एक सांगितलं तर आश्चर्य वाटेल, पण ट्रायफ्लर अलीकडे थापा फारच कमी मारीत असे. किंबहुना एका जागरूक श्रोत्याचं नि सूक्ष्म निरीक्षकाचं असं जोडकामच हल्लीं तो करीत होता, आणि त्याचं नि ताईचं असं दोघांचं पूर्ण मतैक्य झाल्याचं दिसून येत होतं. ब्लॅकनेक आणि मी अशीं आम्हीहि दोघं अतिशय सुखी होतों, आणि आम्हांला अनेक तापदायक, हाल विपत्तींना जर तोंड द्यावं लागलं नसतं, तर आमचा तो प्रवास–स्वर्गसुखावह असाच झाला असता. पण आमचं प्रवाससूत्र क्रमवार पहाणंच बरं.

आमच्या मार्गावरचं पहिलं आश्चर्य म्हणजे कैरो–धाब्याच्या घरांचं

मोठं विलक्षण शहर हें, इमारती सुंदर आणि नाईल नदीचं अद्वितीय असं दर्शन.

त्यांतल्या एका उंच मनोऱ्याचा सोनेरी माथा ट्रायफ्लरनें मला दाखवला. मागें एका संस्मरणीय प्रसंगीं त्यानें याच ठिकाणावरून चिमण्यांची नि कबूतरांची दाणादाण उडवली होती.

शहरांतले रस्ते अरुंद नि अंधारी दिसले पण लोकांच्या गर्दीमुळें मात्र जसे जीवंत असल्यासारखे. पांढरे नि भडक रंगाचे कपडे घालून लोकांनीं आतां चौकांत नि बाजारांत एकच गर्दी केली होती तर कांही चित्रविचित्र अशा गटागटानीं झाडांच्या सांवलींत बसले होते आणि लहान लहान कपांतून कांहीतरी पीत होते, आणि हुक्क्यांतून धूम्रपान करित होते.

तोंडावरून बुरखा घेतलेल्या स्त्रिया रस्त्यांवरून फिरत होत्या किंवा आपल्या हलक्या गाड्यांतून हिंडत होत्या, आणि त्यांच्या डोक्यावरून वर आकाशांत भरारत असलेल्या लक्षावधि चिमण्यां-सारखाच त्यांचाहि सारखा चिवचिवाट चालला होता.

आम्हां करकोंच्यांसारखेच दिसणारे कांही पक्षी, रस्त्यावरून निर्भयपणें हिंडत होते. प्राचीन ईजिप्तमध्यें पूज्य मानले गेलेले हे इबिसिस. आमच्या स्टॉर्कपेक्षां सुद्धां हे माणसांचे जिवलग दोस्त. या स्टॉर्कचीसुद्धां इथे खूप वस्ती दिसत होती. पण काय सुंदर दिसत हे इबिसिस ! आम्ही पहिल्यानें त्यांना पाहिले, त्यावेळीं नदींतील भाटाच्या काठांजवळ, एका ओळींत ते अगदीं ताठ उभे होते. मग, कशानें तरी घाबरून ते वर उडाले आणि, आपलं सर्वांग पूर्ण ताठ करून जात असल्यानें, त्या गदगदणाऱ्या सायंतन वातावरणांत, लालभडक प्रचंड क्रूसांसारखे ते भासले. आमच्यापेक्षां ते खूपच मोठे आहेत. त्यांची मानदेखील जास्त लांब, आणि त्यांचीं चोंच तर

आमच्यापेक्षां अगदींच भिन्न, कांहीशी आंखूड, भरीव आणि चमच्या-सारखी आकारांत वांकडी.

नाईलच्या डाव्या तीरावरील वाळवंटाकडे आम्हीं दोनचार फेऱ्या टाकल्या आणि त्यावरील पिरॅमिडच्या भव्य अशा रांगा पाहिल्या. शिवाय आम्ही तिथे मानवी चेहेरा मोहोरा असलेलं असं एक प्रचंड अजस्र असं दगडी मस्तक पाहिलं. त्यावरील नाक फुटकं नि चपटं होतं; नि त्याच्या त्या चमत्कारीक शिरोभूषणामुळें दोन भले सपाटे कान त्याच्या दोन्हीं बाजूला लोंबताहेत असं वाटत होतं. तें शिला-मस्तक वाळूंतून वर उठलं होतं नि म्हणून त्याचा बाकीचा देह, खालीं-वाळूच्या खालीं दडला असावा असं भासत होतं. हें सारं एवढं प्रचंड, अवाढव्य होतं कीं त्याच्या तुलनेनें, केवळ माणसंच काय पण ते उंटदेखील क्षुद्र चिलटांसारखे वाटत होते. तीं उंच खजूरीचीं झाडं, नि त्यांवर भराभर चढत जाऊन त्याच्या माथ्या-वरील दाट झुबक्यांतून पक्व, स्वादिष्ट, मधुर अशा फळांचे घोस तोडून घेणाऱ्या माणसांची चपळाईहि आम्ही पाहिली. खालीं जमीनीवर खजुराचा जसा सडा पडला होता. म्हणून मग आमच्यानें कांही त्यांचा आस्वाद घेतल्याशिवाय राहवेना. आणि वरून झाडा-वरूनदेखील तीं फळं चटचट तोडण्यांत गंमत असल्यामुळें आम्ही तोहि प्रकार केलाच.

ओसाड, निःप्राण असं तें वाळवंट त्या पिरॅमिडसच्याहि पलीकडे लांबवर पसरलं होतं. अहं, पण इथेसुद्धां चैतन्याचं अस्तित्व होतंच. आंगांत पांढरे, वाऱ्यावर उडणारे असे झगे घातलेले कृष्णवर्ण लोक, चपलचरण उंटांच्या पाठीवर आरूढ होऊन झपाट्यानें चालले होते. कारवानांचे हे तांडे इकडून तिकडे जात होतें, आणि वर हवेंत उंच गिरक्या घेत, या देशांतले मांसभक्षक मोठे पक्षी--बझर्ड--

एखादा मृत प्राणी दिसतो कीं काय पहात, खालील सपाट वालुका मैदानावर जागता पहारा करीत होते.

एकदां एक रात्रीं, त्या नीरव वालुका प्रदेशावर पूर्णचंद्र आपले शीत किरण वर्षत असतां, विपुल सुंदर आयाळ असलेला असा एक प्राणी आमच्या दृष्टीस पडला. मांजराच्या निःशब्द चपलगतीनें तो हिंडत होता नि त्याची दीर्घ छाया वाळूवर पसरली होती. मग आणखी एक तसलीच छाया दिसूं लागली, आणि त्या पहिल्यासारखाच अगदीं हुबेहूब असलेला, पण आयाळ नसलेला एक प्राणी तिथे आला. एकमेकांजवळ येऊन त्यानीं परस्परांना हुंगलं, आणि आपल्या शेपट्या हलवल्या.

'हे सिंह—साऱ्या प्राण्यांत अत्यंत ऊग्र,' ट्रायपलरनें आम्हांला हळूच सांगितलं. 'माणसंदेखील यांना घाबरतात, आणि हे गर्जना करूं लागले कीं दूर मेघांचा गडगडाटच होतो आहे, असं वाटतं ! अत्यंत ऊग्र, छातीचा थरकांप उडवणारे ! आपल्याला-करकोंच्यांना मात्र यांची भीति बाळगण्याचं कारण नाहीं, पण मी माणसांना नि इतर प्राण्यांना मात्र यांच्यापासून दूर रहा, असंच सांगेन.'

त्यानंतर मग, रात्रीच्या वेळीं 'सिंहांची गर्जना' आम्ही अनेक वेळां ऐकली, आणि त्यांच्या त्या गुलामी अनुचरांचं, त्या पाजी कोल्ह्यांचं 'हुकीहुकी' असं किंचाळणहि ऐकलं. अगदीं नीचातला नीच प्राणी आहे तो—भेकड भुरटे चोर लेकाचे !

' अरे यांत कांहींच नाहीं,' आपली भटकंती संपवून परत आल्यानंतर नि आम्ही सर्व कांही त्यांना सांगितल्यावर लाँगनोझ म्हणाले, 'नाईलचा उगमाकडला भाग आपण गाठीपर्यंत दम धरा— तिथचे ते नीलपर्वत नि समुद्रासारखीं विशाल सरोवरं पहा तर खरीं एकदां.'

आमची उत्सुकता अर्थातच मग वाढली आणि त्या घटकेची आम्ही अगदीं अधीर आतुरतेनें वाट पाहूं लागलों.

आणि मग, दक्षिणेकडील तें नेत्रदीपक सृष्टिसौंदर्य, नि त्या भूप्रदेशांतील इतर अनेक आश्चर्यकारक दृश्यें पाहून आमच्या मनांतील तें साधं भोळं आमच्या दलदली घरांचं चित्र, पारच पुसून गेलं. .... कृतघ्न ! आम्ही आपला मायदेश विसरलों !

माझ्या या 'आम्ही' याचा अर्थ आम्ही तरणे करकोंचे. आमच्या वृद्धांबद्दल बोलायचं, तर ते एकत्र बसून, परत जायला दिवस किती उरले, याचीच मोजदाद करीत बसत. त्यांचं संभाषण आमच्या त्या पाणथळीं भोंवतींच सारखं फिरत असायचं. आतां तिकडे काय चालल असेल, याचीच चित्र ते आपल्याशीं रंगवीत आणि त्याचा उल्लेख करतांना, 'आपल्याकडे,' असं ते म्हणत; आणि सध्या आम्ही ज्या मोहक प्रदेशांत होतों त्याचा उल्लेख ते 'इकडे नाईलवर' असा करीत.

या नाईलवरील प्रवासाच्या तिसरे दिवशीं, आम्ही पुराणकाळाचे भग्न अवशेष आणि मेमनॉन्सच्या स्मारकांतील पुतळे पाहिले. हे म्हणजे सौंदर्यहीन, माणसाशीं अगदीं दूरचं असंच साम्य दर्शविणारे, रोड, खालीं बसलेले असे भयानक प्राणी होते. नाईलच्या पात्रांत प्रतिबिंबित होऊन, ते तिचं संरक्षण करीत बसले आहेत. त्यांच्याहि पुढे खजूरीचे घनदाट माथे पुष्पगुच्छांसारखे पाण्याच्यावर उभे आहेत. त्याच ठिकाणीं आम्हीं एक खांबांची रांग, अर्धवट पडक्या अशा कमानीची सरळ आकृती दर्शवीत उभी असलेली पाहिली; आणि ऑबेलिक्स–मनोऱ्यांचे सुईसारखे शेंडेहि आम्ही पाहिले. या सर्वांवर–कितीतरी वर्षांपूर्वींच्या चमत्कारीक गूढ अशा शिलालेखाकृति रेखाटलेल्या होत्या.

सर्वांपेक्षां या शिलालेखांनीं मला जास्त मोहनी घातली. तें प्रत्यक्ष काय आहे हें न समजूनहि मला असं वाटलं कीं, नुसत्या

शोभाकृतिपेक्षां त्यांना कांहींतरी अधिक अर्थ आहे. एका प्रसंगीं मी एका पडक्या दगडी कंगोऱ्याला टेंकून त्या बद्दलच्याच विचारांत गढून गेलों होतों. मी अगदीं एकटा होतों, सभोंवार सर्व कांहीं शांत शांत होतं आणि माझी विचारसमाधी लागली होती. त्या कंगोऱ्या वरील–,कॉर्निस वरील गूढ चिन्हांबद्दल मी विचार करीत होतो नि त्यांच्या अर्थाची फोड करण्याचाहि प्रयत्न करीत होतों.

' अहो, तुम्ही, छोटे तत्वज्ञानी ! ' माझ्या जवळच कुणाचा तरी आवाज झाला.

मी दचकलों.

' अहो, चिरंजीव, ही कांहीं ऑस्टॅशकोव्हो दलदल नाहीं, वरं का, ' माझ्या पाठीवर थोपटीत लाँगनोझ म्हणाले, ' त्या तिकड पहा नीट. तो मगर पहा कसा जिभल्या चाटीत तुझ्याकडे पहातो आहे तो पाहिलास ? या दगडाबद्दल समाधीं कशासाठीं लावली आहेस ? लक्ष वेधण्यासारखं असं काहीं सांपडलं आहे का तुला ? '

माझ्या मनांतले विचार मी त्यांना सांगितले.

त्यानीं त्या लेखाकडें पाहिलं, नि मग कसली तरी आठवण झाल्यासारखं करून, त्यानीं माझं पूर्ण समाधान केलं, ' हो, अरे हो, अगदींच सोपं आहे तें. '

' मग, सांगा ना आजोबा मला काय ते ! –'

' बरं. ती पहिली खूण पाहिलीस ? कशासारखी दिसते ती ? '

आतां मला स्पष्टपणें दिसलं कीं ती खूग म्हणजे कुणी तरी एका प्राचीन अज्ञात शिल्पकाराचा, सिंह रेखाटण्याचा प्रयत्न होता. एकाद्या पोरानें रेखाटल्यासारखं नि चुकीचं असं जरी तें चित्र होतं तरी तो सिंह मात्र स्पष्टपणें ओळखल्यासारखा होता.

आतां ट्रायफ्लर नि माझी ताई आम्हांला येऊन मिळालीं. मग आणखीहि पंखांचा फडत्कार झाला–माझे बाबा नि आणखीं पांचसहा

जण येऊन दाखल झाले होते. माझी ब्लॅकनेक पण येऊन पोंचली– लाँगनोझचं भाषण तिला मोठं प्रिय होतं. थोडक्यांत म्हणजे, आमच्या त्या विख्यात प्रोफेसरांना आतां बराच श्रोतृवृंद लाभला होता. आणि त्यामुळें तेहि खूष होते.

‘ बरं तर, ’ ––त्यानीं चालू केलं, ––‘लायन–त्याचं आद्याक्षर आठवतं ? ’

‘ एल् ’ –ब्लॅकनेक उद्गारली नि मग गोंधळल्या सारखी झाली.

‘ झेड कां नाहीं ग ? ’ आमच्यांतल्या एकानें तिला चिडविलें.

‘ अं हं, थट्टा नको आतां ! ’ बाबांनीं त्याला दाबलं. ‘हं, चालूं दे दोस्त; मजेशीर वाटतं आहे हे मोठं. आतां पुढें चला. लायन. एवढं कळलं. तो सिंह आहे. ’

‘ही दुसरी खूण, एका चमत्कारीकशा दिसणाऱ्या पिरॅमीड- सारख्या माथ्याच्या दांड्यांची दिसते. इकडे या बाजूला दिसतात तसे.’

‘ ओबेलिस्क–मनोरा स्तंभ, ’ मी सुचवलं.

‘ आपण ओ धरूं मनांत. ’

‘ तिसरं ? ’

आतां मात्र बऱ्याच करकोंच्यांनीं ते चित्र नीट पाहून सांगितलं, ‘ नेल—खिळा! –– ’

‘ बरोबर ! ही चवथी खूण एका प्राण्याची आहे. त्याच्या शिंगावरून तुम्ही सगळ्यांनीं ओळखला आहे तो––बोकड आहे तो. गोट, म्हणजे चवथं अक्षर ‘ जी; ’ त्यानंतर––’

पण इथे आम्ही सारेच जण एक सुरांत ओरडलों, ‘ नोझ ’ आणि स्तिमित होऊन एकमेकांकडे मग पाहूं लागलों.

हा काय प्रकार ? केवळ योगायोग, कीं––

आमचे ते परमपूज्य पितामह, मस्तक नम्र करून, जणुं एका पवित्र गतस्मृतिसमोर मूकादरानें उभे राहिल्यासारखे, खडे होते.

' आजोबा, तुम्हींच ते. तुमचंच नांव हें. हें कसं पण ? ' माझ्या ताईनें भीतभीत विचारलं.

' अं हं, माझं नाहीं तें नांव माझ्या एखाद्या पूर्वजांचं असांवं तें--आपल्या क्रौंच कुलांत आमचं लाँगनोझ घराणं हें अत्यंत प्राचीनापैकीं एक आहे. पण मोठं विलक्षण आहे हें--मोठंच विलक्षण आहे, आणि मीं खरोखर कधींच अपेक्षा केली नव्हती ह्याची ! '

या संशोधनामुळें, आमचे ते सूज्ञ पण विनयशील वृद्ध आजोबा, खरोखरीच पार गोंधळून गेले होते. मी नेमकं याच शिलाखंडासमोर उभं राहावं, लाँगनोझनीं मला तसं तिथे बघावं, आणि तें विलक्षण अद्भूत असं स्पष्टीकरण ऐकण्यासाठीं आमचा इतका मेळावा गोळा व्हावा, हें सारच मोठं विलक्षण वाटत होतं !

पण त्या साऱ्या संशोधनामुळें आम्ही सारेजण अगदीं फुगून गेलों होतों आणि आमच्या त्या वृद्ध सेनानींबद्दल आम्हाला आतां निरतिशय आदर नि अभिमान वाटूं लागला.

' इकडे या ! इकडे या ! ' आम्हांला ट्रायफ्लरचा आवाज ऐकूं आला. आम्ही सारे स्तिमित झालों होतों. त्याच वेळीं तिथून तो निघून गेला होता.

आम्हांला वाटलं याला कांही तरी मजेदार असं सांपडलं आहे आणि म्हणून आम्ही सारेजण सुसाट तिकडे पळालों. कसलं तरी अगदीं बारकाईनें निरीक्षण करीत असल्यासारखा, आपली चोंच खालीं वाळूला टेंकून तो उभा असलेला आम्हांला दिसला.

वाळूच्या त्या नितळ गुळगुळीत पृष्ठभागावर आम्हांला कांही खुणा दिसल्या. ट्रायफ्लरचं त्यांचच असं कसून निरीक्षण चाललं होतं.

'तुम्हांला काय वाटतं, सद्गृहस्थ ? ही आकृति एखाद्या झाडाची अस समजायचं का ?' त्यानें विचारलं.

'कां बरं, हरकत नाहीं पण. समजूं या तें झाड आहे असं,' मी म्हणालों.

'ही दुसरी खूण एका प्राण्याची आहे--त्याचा वरचा ओठ पाहिलात ?--गेंडा आहे तो; ती तिसरी आहे–'

'आयव्ही !' कुणींतरी किंचाळलं.

नि मग यावर, आम्ही सारेजण इतके कांहीं विलक्षण खदखदून हांसलों कीं आमच्या वृद्ध लॉंगनोझनांदेखील आमच्यावर हंसल्यावांचून राहावेना.

'हद्द आहे कीं नाहीं याच्यापुढे ! हा–हा–हा !' बाबांच्या हास्याची तुफान गर्जना आमच्या साऱ्यांवर ताण करीत होती.

'मला आालं खरंच वाटलं हें,' ताई हळूच म्हणाली. 'आजोबांच्या धवल कीर्तीची असूया वाटून आमच्या सर्वांची टिंगल करण्याचा विचार होता वाटतं आपला !'

'असं कसं वाटलं तुला ! मला ओळखीत का नाहींस तूं !' ट्रायफ्लरनें तक्रार केली.

'अहो महाराज !' बाबांना अजूनहि हांसं आवरत नव्हतं आपलं नांव लोकांनीं आठवावं असं जर तुम्हांला वाटत असलं, तर कांही चिरस्थाई कार्य केलं पाहिजे तुम्हीं, समजलं का !'

'पण वाळूवर चिरस्थाई अस कांहींच नाहीं बांधतां येत,' दुसऱ्या एकानें चेष्टा केली.

'त्यापेक्षां एक चांगलासा कठीण दगड घ्या आणि त्यावर करा खोल खोदायचा प्रयत्न. वाळू काय, वाऱ्याची पहिलीच झुळूक

येईपर्यंत धरील दम. किंवा इथं फिरायला आलेल्या पहिल्याच चिमणुबाईचा पाय पडेपर्यंतच म्हणा फार तर ! '

'किंवा त्याहूनहि बरं म्हणजे, कारण या साऱ्या दगडांपेक्षां तेंच जास्त वेळ राहील,' आमचा हंशा ऐकून इकडे आलेले वाइज विग फ्लॅप मधेंच म्हणाले; ' सर्वांत उत्तम वस्तु म्हणजे, करकोंच्याचं किंवा दुसरं कोणाचंहि हृदय, तुमचीं सत्कृत्यें तुमच्या समकालीनांच्या हृदयांवर इतकीं खोल उमटूं द्या कीं त्यांचा कधींहि न पुसला जाणारा ठसा, विनाशी अशा स्मारकांच्या मदतीशिवायच--कारण कितीहि भव्य असलीं तरी स्मारकं ही विनाशीच आहेत--पिढ्यानुपिढ्या-पुढीलांच्या हातांत दिला जाईल, आणि त्यामुळें त्यांना आपल्या सूज्ञ, दयार्द्र अशा पूर्वजांबद्दल अत्यंत अभिमान वाटेल. दोस्त लाँगनोझ, मी आपलं मनःपूर्वक अभिनंदन करतों !'

मग जरा वेळ, आमच्या प्रिय वृद्ध सेनानींच्या सन्मानार्थ कांही खेळ नि नाच केल्यावर, स्नानासाठीं म्हणून आम्ही नदीच्या पलीकडील तीरावर निघालों. पण वाटेंत एक उद्वेगजनक असं दृश्य पाहिल्यामुळें आम्ही आपला विचार बदलला.

नदीकांठाला वाढलेल्या उंच उंच वेतांमध्यें आम्हांला आतां कांही घोडेस्वार दिसले. त्यांना पाहून आमच्या मनांत भीति कांही उत्पन्न झाली नाहीं. त्यांच्याजवळ बंदुकी नव्हत्या आणि आपल्या हातांत त्यानीं बंदिवान केलेले पक्षी घेतले होते. हे पक्षी कोण होते हें कांही आम्हांला सांगतां येत नव्हतं. कारण त्यांची डोकीं लाल टोप्यांनीं आच्छादलेलीं होतीं. त्यांच्या पीसांवरून पहातां ते मांसाहारी पक्षी दिसत होते आणि म्हणून आम्हांला त्यांची काडीमात्रहि कींव येत नव्हती. आणि अखेरीस ते पक्षी, स्वजनद्रोही नि माणसाचे त्याच्या दुष्कृत्यांत मदत करणारे असेच ठरले.

तेवढ्यांत त्या उंच वेतांचा माथा हलूं लागला नि त्यांचा खसखस असा आवाज होऊन एक हिमधवल हंस, आपले सुंदर, ऐटबाज पंख फडफडावीत वर दिसूं लागला. तो वर उंच उडणार तोंच ते स्वार ओरडले आणि त्यानीं आपल्या हातांतले ते लाल टोप्यावाले तरनेज बदमाष वर सोडले. दोन ससाणे हवेंत वीजेसारखे भरारले. त्यांतला एक त्या भेदरलेल्या हंसाच्या डोक्यावर घिरट्या घालूं लागला नि दुसरा, त्याचा पाण्याकडील नि लव्हाळ्यांकडील मार्ग बंद करीत त्याच्या खालून उडूं लागला. आपल्या शिकाऱ्यांपासून सुटण्यासाठीं तो हंस आपला वेग झपाट्यानें वाढवूं लागला. त्यानींहि त्याची पाठ वेगानें धरली नि ते त्याच्या जवळजवळ येऊं लागले. आम्ही तें सारं पाहिलं आणि त्या हंसाला मदत करण्यासाठीं निघालों. पण त्याचा आतां उपयोग नव्हता.

त्यावरून उडणाऱ्या ससाण्यानें खालीं झेंप घेतली नि त्याला वरून सपाटा दिला. हंसाच्या त्या सुंदर शुभ्र पिसाऱ्याला तो इतका घट्ट चिकटला होता कीं तो ओळखणंहि आम्हांला कठीण गेलं. दुसऱ्या ससाण्यानें खालून हल्ला चढवला आणि मृत्युवेदनांनीं तळमळून त्या हंसानें केलेलं करुण आर्त आंक्रंदन आमच्या कानीं आलं. अखेरीचा निर्वाण प्रयत्न करीत तो आपलें रक्तलांछित पंख फडफडवीत जमीनीवर अवजडपणं घुसला. पण त्याचे शत्रु त्याला तसेच अजून चिकटले होते.

ते घोडेस्वारहि मग आवेशानें ओरडत दौडत तिकडे निघाले.

' व्यर्थ आहे आतां ! ' बाबा आम्हांला म्हणाले, कारण त्या हंसाला तसाच असाहाय्य सोडायला आम्हीं नाखूष होतो. ' मागे फिरा ! योग्य वेळीं त्याला मदत पोंचवणं आपल्याला अशक्य झालं --आतां आपल्याला कांहीं करतां येणार नाहीं. ए, बच्चा, आतां नको परीक्षा पाहूं ! '

तो इशारा अगदीं योग्य वेळीं आला. त्या घोडेस्वारांनीं आम्हांला पाहिलं होतं आणि ते आमच्या दिशेला बोट दाखवीतच होते. त्यांतल्या एकानें खालीं उडी मारली आणि त्या ससाण्यांना त्या हंसाजवळून त्यानें दूर केले नि त्यांच्या डोक्यावर त्या लाल टोप्पा परत चढवल्या.

आम्ही त्या तीरावरून मग निघालों नि नदीच्या पात्रावरून उड्डाण करूं लागलों.

खालून एक टग रेंगाळल्यासारखा आपल्या मागून दोन मोठ्या बोटी ओढीत चालला होता. पांढरीं शिरस्त्राणं नि पोपटी बुरखे घातलेल्या सशस्त्र लष्करी शिपायांनीं त्या बोटी भरल्या होत्या. तिथून आणखी थोड्या अंतरावर असल्याच कांहीं बोटी दिसत होत्या आणि आंखूड डोलकाठ्यांच्या हलक्या जहाजांचा तो काफिला आपल्या अतिशय लांब, बारीक, लवचींक काठ्या नि शीडें, यांमुळें प्रचंड अशा पाकोळीच्या पंखासारखा भासत होता.

: : १८ : :

नाईलच्या उगमाकडे आम्ही जसजसे जाऊं लागलों तसतसं माण-सांचं दर्शन आम्हांला कमी कमी असंच होऊं लागलं. सृष्टिसौंदर्याचं स्वरूपहि आतां पालटत होतं. क्रांतिवृत्तांतील उष्णता ज्यावेळीं आपली शीग गांठते त्या काळांतील ते दिवस. भाजून काढणाऱ्या ओसाड वाळवंटाच्या सांनिध्यामुळें, उष्ण कटिबंधांतील ती अखंड उष्णता आतां अधिकच वाढत होती आणि मधूनच भेटणाऱ्या समृद्ध अशा लागवडींना ती करपून टाकीत होती.

'आणि काय गंमत पहा. आपल्या घराकडे आतां खरा खुरा हिंवाळा झाला सुरू;' बाबा म्हणाले. 'दोन तीन चांगलें हिम-वर्षावहि झाले असतील तिकडे, आणि सारा वस्तुजात खोल बर्फा-खालीं पार दडपला असेल. फक्त कावळे नि चिमण्या यांना सोसते ही थंडी. पण आपण जर राहिलों तर आपण गारठूनच मरूं!'

त्यानीं मग आमच्या या दक्षिणेकडील वार्षिक स्थलांतराचं कारण आम्हांला समजाऊन सांगितलं आणि ज्यांच्या बळावर आम्हांला सदैव वसंताचा उपभोग घेतां येतो असले सामर्थ्यवान पंख आम्हांला दिल्याबद्दल आम्ही परमेश्वराचे आभार मानले.

पण आतां या ठिकाणीं राहाणं अगदीं अशक्य होत होतं. अती कोणतंहि वाईटच. दोन्हीहि वाईटच--अतीशय थंडी किंवा अतीशय उष्णता–दोन्हीहि सोसणं कठीण. दक्षिणेकडे आणखी खालीं, त्यानीं आम्हांला सांगितलं, यापेक्षां सुखावह आहे. तिकडे आपण घनदाट अरण्य नि बर्फाच्छादित शिखरांचे उंच पर्वत असलेल्या प्रदेशांत आपण प्रवेश करूं. तिकडे हिमनद्या नि मोठमोठीं विशाल सरोवरं, यांच्यामुळें उष्णतेची तीव्रता खूपच कमी झालेली आहे.

त्यानंतर जवळ जवळ एक सबंध आठवडा, नाईलच्या फेंसाळ, उसळत्या वेगवान अशा पात्रावरून आम्ही जात होतों, आणि आड-

मुठे नावाडी आपल्या बोटी खडकांवर आदळून फुटल्यामुळें प्राणास मुकत असलेलेहि आम्हांला मधून मधून दिसत होते. तिथून मग नाईल ज्या ठिकाणीं दुभंग होऊन, तिचा एक विशाल ओघ--आंतबारा, डावीकडे वळतो, नि दुसरा वाहरेल–अबियाद, हा सरळ समोर वहात जातो, त्या ठिकाणीं येऊन पोंचलों. नदींतले दलदलीचे सदा धुक्यानें आच्छादलेले भाट एका शहराभोंवती वेढा घालून बसलेले असे आम्हीं पाहिले. हें खारटूम शहर. त्या दिशेनें बंदुकीचे बार एकू येत असल्यानें त्या भागावरून शक्य तितक्या त्वरेनें निघून जाणं आम्हांला बरं वाटलं. आम्हाला समजलं कीं तीन वंशांचा झगडा त्या ठिकाणीं चालला होता. काळे, तपकिरी आणि गोरे. त्यांचं युद्ध कशासाठीं चाललं होत हें कांहीं आम्हांला कळलं नाहीं. ट्रायफलरनें आपल असं खास स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला, पण तें तितकंसं पटण्यासारखं असं कांही आम्हाला वाटलं नाहीं.

त्यानें सांगितलं कीं ते तपकीरी, म्हणजे ईजिप्शिअन लोक, आपले शेजारी काळे अदमी असावेत, याला विरोध करीत होते. पण त्यांचा तो काळा रंग धुऊन काढण्याला मूळीं उपायच नव्हता. पण तेवढ्यावरच ते थांबायला मात्र तयार नव्हते. ते आपले त्यांना ओपवून पांढरे करण्याचा उपाय अजून शोधीतच होते. उत्तरेकडले गोरे लोक या ईजिप्शिअन लोकांना मदत करण्यासाठीं मग इकडे आले. आपल्या कामाचा दाम त्यांना पाहिजे होता. पण ते काळे लोक काळेच राहिल्यामुळें ईजिप्शिअन त्याला नकार देत होते. म्हणून मग त्या गोऱ्यांनीं आपल्या आपणच पैसा गोळा करण्याचं ठरवलं आणि ते सर्वजण मग आपसांतच लढूं लागले.

ट्रायफ्लरचं स्पष्टीकरण हें असं होतं. पण तें खरं असं समजून नाहीं चालायचं मात्र.

आम्ही आपल्या निरीक्षणानें फक्त एकच गोष्ट निश्चितपणें ठरवली होतीं. ती म्हणजे, हे तीनही वंश एकसारखे लढत होते, हीच.

एकदां आम्ही एका विशाल दाट अरण्यावरून उडत असतां खालीं आम्हांला आवाज ऐकूं आले म्हणून आम्ही पाहिलं तों कांही माणसं जंगलांतील पाय वाटेनें जात असलेलीं आम्हांला दिसलीं. ते बहुतेक सर्व काळे, नग्न किंवा अर्ध नग्न असे लोक आपल्या पाठीवरून नि डोक्यावरून पांढरे सुळे, पाण्याचे माठ आणि तांदुळाचीं पोतीं अशीं घेऊन चालले होते. त्यांतल्या कांहींच्या पायांत बेड्या होत्या आणि तपकिरी लोक हातांतल्या चाबकांनीं त्यांना हांकलींत होते.

या विलक्षण प्रवाशांना, रानाच्या टोंकाला त्यांच्यावर टपुन बसलेल्या गोऱ्यांची बहुतेक कांही कल्पना दिसत नसावी. पण आम्ही तें सारं पाहिल होतं आणि त्यानें आम्हांला थोडंसं समाधान वाटल्याशिवायहि राहिलं नाहीं. 'थांबा हं,' आम्ही म्हणत होतों-तुम्हांला ते गोरे भेटेपर्यंत ते या काळ्यांना नक्की मोकळे करतील, आणि तुमच्या या क्रौर्यासाठीं तुम्हांला चांगली शिक्षा करतील.'

आमचा फक्त एकच मुद्दा खरा ठरला. त्या दोन पक्षांनीं एकमेकांना पहातांच खणाखणीला सुरवात केली. दोन्ही बाजूचे बरेच लोक ठार झाले, पण त्या गोऱ्यांचा जय झाला. दुसरे दिवशीं सकाळीं आम्ही पाहिलं तों कांही तपकिरी झाडांवर फांशी दिलेले आम्हांला दिसले. बाकीचे, काळे नि तपकीरी दोन्हीहि, ते बोजे घेऊन चालले होते आणि ते गोरे त्यांना चाबकांनीं हाणीत चालवीत होते. या देशांत आम्हांला सगळीकडे असंहि दिसलं कीं गोऱ्यानीं काळ्यांचा सबंध जमावच्या जमाव जाळून टाकला होता, आणि काळ्यांनी गोऱ्यांची तीच वाट तशीच लावली होती.

हीं असलीं खेदजनक दृश्यं टाळण्यासाठीं म्हणून आम्ही आपल्या मार्गाची दिशा पालटली आणि अखेरीस, देवदयेनें साऱ्याच माणसांपासून आम्ही पार दूर गेलों आणि गोऱ्या किंवा तपकिरी कोणत्याच मानवी पायानीं कधींच तुडवलं नाहीं अशा एका गहन अरण्यांत आम्ही येऊन पोंचलों.

किती विलक्षण रीतीनें ते अरण्यभाग वाढले होते! वृक्षराज्यांतले किती असंख्य, विशाल देही, अजस्त्र असे वृक्ष, आपले उत्तुंग माथे उंचावरून नि खालीं आसमंतांत प्रचंड छाया पसरून तिथे उभें होते! त्या गहन अरण्याला दुखंड करून वहात चाललेल्या बहारेल–अबिआदला मिळण्यासाठीं संथपणें निघालेल्या शांत झुळझुळत्या निर्झरानीं शीतल बनलेली अशीं किती विलक्षण अद्‌भूत गवताळ कुरणं आम्हीं त्या ठिकाणीं पाहिलीं!

आपल्या भात नि गव्हाच्या शेतांवर बांधलेल्या त्या काळ्यांच्या झोंपड्या किती तुरळक, आणि नदीच्या पात्रावरील त्या नावादेखील किती थोड्या–बाकी जितक्या थोड्या तितकं चांगलंच आम्हांला! विश्रांतीसाठीं सोईस्कर असं एक कुरण तिथे आम्हीं पाहून ठेवलं होतं, पण खालीं उतरण्यापुर्वी त्यावर अंतरिक्षांत जरावेळ घिरट्या घेत राहाण्याची काळजी मात्र आम्ही घेतली. खजुरीच्या एका गर्द राईच्या शेजारालाच तें कुरण होतं आणि त्या राईंत पोपट आणि माकडं यांचीं एकच गर्दी दिसत होती. त्यावेळीं सूर्य नुकताच अस्ताचलावर टेकला होता. या प्रांतांत धवधवीत सूर्यप्रकाशानंतर ताबडतोब मिट्ट काळोख पडत असल्यामुळें, रात्रीच्या विश्रांतीसाठीं पोपटांचे कळप झाडांतून केव्हांच स्थानापन्न झाले होते. त्या राईपलीकडे एक मोठं सरोवर दिसत होतं आणि त्याचे कांठ गर्द झाडीनें पूर्ण आच्छादले होते. असंख्य ओहोळानीं त्या सरोवराचं पाणी नदी प्रवाहाला नेऊन भेटवलं होतं. सरोवराच्या एका बाजूनें पाण्यावर होणारे मंद आघात आणि कुठल्यातरी अजस्त्र देहांतून निघणारे अवजड सुस्कारे आम्हांला ऐकूं येत होते–हे पाणघोडे–अजस्त्र, अवजड, बेडौल शरिराचे हे प्राणी, जमीनीवर अगदीं मंदपणें नि बेढबपणें चालणारे पण पाण्यांत मात्र अतिशय चपळ असे पाणबुडे नि पोहणारे.

या रानाच्या टोंकाला एकएकाकी झाड वाढलेलं दिसत होतं,

आणि त्याच्या फांद्यांना जमीनींवर मुळं फुटल्यासारखीं दिसत होतीं. आत्तां एक चमत्कारीक असा प्राणी त्या झाडाजवळ येत होता. त्याचं शरीर कांहींसं लहानसर नि पाय उंटाएवढेच लांब असे होते. पण त्याची मान कांही भलतींच लांब होती नि त्याच्या शेंड्याला आखूड शिंग नि काळे मोहक डोळे असलेलं लहानखोरंच डोकं होतं,

' हा जिराफ, बरंका रे,' लाँगनोझनीं आम्हांला सांगितलं, ' फार गरीब नि कोणालाही इजा न करणार असा हा गोडवा प्राणी आहे. पण त्याच्यासाठीं हें संकट पहा जसं टपून बसलेलं दिसतं आहे; तर मी त्याला आतां सावध करतों पहा हं · · '

त्यानीं मग बाबांना आपल्या बरोबर यण्यासाठीं हांक मारली आणि ते दोघेहि एकदम वर उठले आणि त्या जिराफाकडे त्यानीं झेंप घेतली आणि आपल्या पंखांनीं त्याला जातां जातां चटकन स्पर्ष केला.

त्यानीं वेळ अगदीं बरोबर गांठली होती. त्यांच्या त्या पंखाच्या स्पर्शामुळें तें जिराफ दचकलं आणि बाजूला उडी घेऊन लांब पळून गेलं. आणि मग–त्या एकाकी झाडाच्या बुंधाजवळून एक प्रचंड सर्प पुढे आला; तो क्षण दोन क्षण मग सळसळला, नि मग त्या झाडाला विळखे घालून मूळांच्या त्या दाट झाडीखालीं दिसे–नाहीसा झाला.

असल्या चोरट्या, अदृश्य संकटांनीं इकडल्या रात्री जशा भरपेट भरलेल्या असतात. आणि रात्रीच्या मिट्ट काळोखांत दडलेली हीं कालमुखं ओळखायचीं तरी कशीं ? आमच्या पहारेकऱ्यांचं काम देखील या मिट्ट काळोखामुळें मोठं बिकट होऊन बसलं. आणि रात्र वद्य पक्षांतली असल्यामुळें चंद्रप्रकाशाची मदत आम्हांला मध्यरात्रीं-नंतरच काय ती मिळाली.

रात्रीचा काळोख पसरल्याबरोबर लक्षावधी काजवे, चहूंकडून चमचमू लागले–कधीं वर भिरभिरत–अनंत तारकांसारखे ते झळा-

ळत, तर कधीं खालीं गवतातर असंख्य अग्निकणांसारखे ते निश्चल असें बसून रहात. जंगलांत त्या काळोखांत दोन हिरवट वाटोळे ठिपके, मधूनच निखाऱ्यांसारखे चमकत होते. झाडफांद्यांतून विसावलेल्या रानमाकडांची चित्त्याच्या दर्शनानें घाबरगुंडी उडल्यामुळें चाललेली चुळबूळ आम्हांला कधी ऐकूं येत होती. नदीच्या लाटांत सुसर मगरांची चळवळ चालली होती. सरोवराचा नितळ पृष्ठभाग वरील आकाशांतील तेजोगोलकांच्या प्रतिबिंबानीं उजळून निघाला होता. कुणाच्या तरी अवाढव्य अवजड आकृती, या उजळलेल्या पार्श्वभूमीवर आतां प्रवेश करीत होत्या—हे हत्ती आतां पाण्यावर आले होते. सूर्यप्रकाश थोडा फार शिल्लक असतानांच आम्ही यांना पहिल्यानें पाहिलें होतें कशामुळें तरी अत्यंत संतप्त होऊन जंगलांतून त्या वेळीं ते पळत निघाले होते, कारण आपल्या शुंडा उंचाऊन ते हवा आंत घेत होते आणि मग आगबोटीच्या भोंग्यासारखे कटु आवाज काढीत, ती हवा सपाट्यानें बाहेर सोडीत होते.

थोडच्याच वेळांत पाण्यावर होत असलेल्या आघाताचा थाड थाड असा आवाज आणि वेतलव्हांळच्यांचा खसखसाट आमच्या कानीं आल्यामुळें, तो हत्तींचा कळप जलक्रीडेसाठीं आतां सरोवरांत उतरला आहे, असं आम्ही समजलों. गर्द नारिंगी चंद्रबिंब मग क्षितिजावर दिसूं लागलं, आणि मग थोडच्याच वेळांत त्याच्या चकचकीत प्रकाशानें त्या जंगलांतले वृक्षमाथे उजळले.

किती सुंदर नि मोहक दृश्य! निसर्गांचं केवढं अथांग अनंत वैभव!

पण जवळच कुठेतरी भीषण झटापटीचा कल्लोळ उसळला, नि आम्ही तत्क्षणी वर उठून झपाट्यानें भरारी मारली.

चित्त्याची एक भयानक आरोळी सभोंवार घुमली नि त्याच्या पाठोपाठ भयभीत मांकडांचा चिकचिकाट. आणि मग एकच गोंधळ नि दंगल उडाली! कुणींतरी साहाय्याची याचना करीत असल्यासारखा करुण क्रंदन ध्वनि आम्हांला ऐकूं आला. वाऱ्याच्या वावटळी झोतासारखं मार्गातील साऱ्याचा चुराडा उडवीत ते हत्ती पळत

निघाले. आम्हीहि तिथून दूर, आणखीं दूर असे उडत निघालों आणि दिशा उजळेपर्यंत विश्रांतीसाठींदेखील खालीं उतरलों नाहीं.

अंहं, उत्तरेंतील आमच्या त्या पाणथळींइतकी शांत निःसंकोच झोंप इथे कधीं मिळणंच शक्य नाहीं ! त्यामुळें पण नेहमीं कसं पेंगुळल्यासारखं नि श्रांत श्रांत असं वाटतं. रात्रंदिवस डोक्यावर लटकत असलेली ही संकटांची तलवार तुम्हांला थकवा आणते. आत्तां पडल्याबरोबर आलीच झोंप--पण हुश्शार ! ते मगर कसे चोरपावलांनीं आपल्याकडे येताहेत. आणि आपला सारा धीर, आपल्या त्या हुशार पहारेकऱ्यांच्या सावधपणावरच !

या प्रदेशांत, रात्रीपेक्षां दिवसच विश्रांतीला नि मोकळेपणाला जास्त अनुकूल असा आहे. आणि म्हणून सभोंवारच्या नव्या परिस्थितीला जुळतं करण्यासाठीं आम्हांला आपल्या उत्तरप्रांतीय संवयी बदलाव्या लागल्या.

आणि आमच्यांतील माद्या आपलीं अंडीं तिकडे उत्तरेंतच कां उबवतात याची कारणमीमांसा मला अत्तां कुठें समजूं लागली. या देशांत, आपल्या स्वतःच्या जीवरक्षणापलीकडे दुसरा कसलाचं विचार करणं कुणालाहि अशक्यच आहे. मग अंडीं घालून तीं उबवण नि राखणं हें अतिशय श्रमाचं नि मेहेनतीचं काम तर दूरच राहिलं. पण इथले हे करकोंचे कसं काय करीत असतील हें काम ? कोण जाणें ! पण ते इथलेच रहिवासी असल्यामुळें त्यांची कांही तरी याला युगत असणारच—आमच्यासारख्या भटक्या पाहुण्यांना ती कशी कळणार !

उगीच नाहीं तर आमच्यांतले जाणते क्रौंच 'आपला देश,' 'आपला देश' असा उत्तरेचा उल्लेख करीत. अगदीं योग्य आहे तें! पण इथल्या अनूभवानें माझ्यासारख्या तरण्या पिढीच्यांतल्यालादेखील त्या शब्दांचं स्वारस्य आतां कळूं लागलं, आणि दक्षिण देशच्या त्या मुग्ध करणाऱ्या सौंदर्याची जादुगिरी क्रमाक्रमानें हतप्रभ अशी होऊं लागली.

———

: :१९: :

नाईल नदीच्या या परिसरांत खाण्यापिण्याचा मु ळीं प्रश्नच नव्हता. कुठेंहि गेलं तरी त्याची आपली समृद्धीच होती, पण निवांत-पणें विश्रांति घेतां येईल अशा जागा मात्र फारच थोडचा. त्या भागांतून म्हणूनच आम्ही लांब लांब असा पल्ला मारीत नव्हतों, तर लहान लहान टप्पे करीत आम्ही सुरक्षित अशी जागा सांपडतांच-तिथें कधीं कधीं आठ आठ दिवसहि मुक्काम करीत आम्हीं चाललों होतों.

अखेरीस पण, त्या दूरस्थ पर्वताची अंधुक, मृदु अशी उच्चनीच रेखाकृती समोर दिसूं लागली. आरंभीं ती आम्ही ढगंच समजलों. तो पर्वतावली प्रत्यक्ष गांठण्यापूर्वीं आठ दिवस आधीं आम्हांला त्याच तें अंधुक दर्शन झालं होतं. यावरून त्यांच्या प्रचंड उंचीची कल्पनाच करा !

त्यांच्या शिखरांना ग्रासून राहिलेलं तें बर्फाचं माळरान गांठणं आम्हांला अशक्य होतं. खुद्द गरुड नि बझर्ड देखील जेमतेम तितक्या उंचीवर जाऊं शकत होते. मग, तितक्या उंचीवर, ढगांच्याहि वरून त्या बर्फाळ भागाला जसा खेंटून चाललेला एक विचित्र आकृतीचा प्राणी आम्हीं जेव्हां पाहिला, तेव्हां आश्चर्यानें स्तिमित होऊन आमचा आमच्या डोळ्यांवर विश्वासदेखील बसेना.

एक प्रकारच्या फुग्याची पिशवी होती ती, आणि आम्हांला जरी ती साध्या गाजराएवढी दिसत होती, तरी ती चांगली अजस्त्रच असली पाहिजे. त्याच्या खालीं एक टोपली बांधली होती.

असली वस्तु असाधारण मानवी बुद्धिमत्तेखेरीज कांहीं नाहीं तयार व्हायची, हें आम्हीं पटकन ओळखलं. होय, माणसंच; पण

परमेश्वरानें मात्र खैर करून आमच्या शांति नि सुरक्षिततेसाठीं त्यांना पंख बहाल केले नाहींत ! तरी देखील, जमिनीवर खुरडण्यासाठींच उत्पन्न केलेले हे मानव, आमच्या या राखीव प्रांतांत आतां स्वारी करून निघाले आहेतच. गरीब बिचारे पक्षी !

पर्वताच्या दऱ्याखोऱ्यांतून नि खिंडींखिंडारांतून पांच दिवस उड्डाण केल्यानंतर, आम्ही बरेचसे पर्वतमाथे ओलांडले आणि त्या गिरिमालिकेचा पलीकडील भाग गांठला. त्या ठिकाणीं, एका जणू परतीरच नसलेल्या अशा अमर्याद सरोवराचा अथांग असा जलविस्तार पसरला होता आणि याच लक्ष योजन लांबीच्या सरोवराच्या कांठांवर, घरीं परतण्याचा काल येईपर्यंत आमचा मुक्काम व्हायचा होता.

घर ! किती विलक्षण, सामर्थ्यसंपन्न शब्द !

‘ इथें एकहि क्रॅनबेरी कुठें दिसत नाहीं, हें नवलच नाहीं, गडे ? ’ ब्लॅकनेक मला म्हणाली. ‘ चहूंकडे धुंडलं मी त्यासाठीं, पण एक देखील फळ सांपडलं नाहीं मला ! आणि तें देखील इथें अगदीं अगणित जातींचा अमूप भाजीपाला असतांना ! आणि सांगतात काय तर, कांहींहि मिळतं तुम्हांला इथें ! ’

‘ अंहं, बाईसाहेब, ’ ट्रायफ्लर हंसून म्हणाला, ‘क्रॅनबेरी नाहीं मिळायची इथे. इथले लोक अजून त्या पूर्णावस्थेला नाहीं जाऊन पोंचलेले. क्रॅनबेरींचीं ती नाजूक, स्वादिष्ट चव या रानांवनांत काय कळायची ! ’

‘ हें नाहीं बाई चांगलं ! ’ आणि ब्लॅकनें आपले पंख उडवले. ‘ मी तरी इथला हा सारा खजूर, केळी नि कवचीचीं फळं, यांवर क्रॅनबेरीसाठीं आनंदानें लाथदेखील मारीन ! ’

‘ तुम्हांला जें कधीं देतां येणार नाहीं, तेंच या बायकांना नेहमीं

कां हवं असतं, देव जाणें बुवा ! ' माझ्या मनांत आलं. ' तिचं लक्ष दुसऱ्या कुठेतरी गुंतवलं पाहिजे मला. '

पण हा वेळपर्यंत ब्लॅकनेक तें विसरली होती. तिला एक गळून पडलेला तयार नारळ सांपडला होता. पडतांना दगडावर आपटून त्याचीं दोन छकलंच झालीं होतीं. म्हणून आपली चोंच तिनें त्यांत ताबडतोब खुपसली आणि आंतलं पाणी ती मिटक्या मारीतच पिऊं लागली. आवडलेलं दिसत होतं तिला तें.

आमच्या कँपपासून थोड्याच अंतरावर काळ्या लोकांची एक वस्ती होती. झोपड्यांचा एक लहानसा गट आणि त्या भोंवतीं एक उंच अणीदार लांकडाचं कुंपण. आंतल्या त्या झोंपड्या पिपांसारख्या वाटोळ्या नि चिखलानें लिंपलेल्या नि त्यांवर शंखाकृती उंच छपरं. त्यांचीं मक्याची शेतं सभोंती पसरलीं होतीं नि त्यांच्याहि भोंवती संरक्षणासाठीं कुंपण. घर नि शेतं यांच्या मधल्या जागेंत गुरांचे कोंडवाडे. यांचीं कुंपणं जास्तच उंच आणि आमच्या चोंची-पेक्षांहि लांब लांब कांटे असलेलीं कांटेरी झुडपं, त्या कुंपणाच्या टोंकावर लावलेलीं. ही काळजी त्यानीं चित्ते नि सिंह आंत येऊं नये म्हणूनच घेतली होती.

या खेड्यांतील लोक नग्नावस्थेंतच इकडे तिकडे हिंडतांना दिसले. त्यांच्या हातांत बंदुकी दिसल्या नाहींत म्हणजे आमच्या दृष्टीनें ते कमी धोकेबाज होते. कमी धोकेबाज, असं म्हटलं मी, म्हणजे धोका हा होताच. कारण ते उत्कृष्ट तिरंदाज होते आणि बरचीचा उपयोग तर ते इतक्या कुशलतेनें करीत कीं त्यांच्या जवळपास जाणं सुरक्षित असं आम्हांला कांही वाटलं नाहीं.

यांच्यावर फाजील विश्वास ठेवल्यामुळें दोन करकोंचे या पूर्वीच आपल्या प्राणास मुकले होते. त्यांच्या मृत्यूचं दुःख अजून ताजंच होतं. पण त्या दोन तरुण पोरांच्या मृत्युपेक्षा वृद्ध क्लु क्लु काकांचा

मृत्यु हा अत्यंत आश्चर्यजनक-वयोवृद्ध नि जगाचीं सारीं सोंगं ढोगं पाहिलेले क्लु क्लु काका, पण बिचारे आपल्याच निष्काळजीपणाला बळी पडले. माझ्या डोळ्यासमोरच तो तीक्ष्ण बाण त्यांच्या आंगांत घुसला, आणि एक काळा आदमी, मोठ्या दिमाखानें त्यांना आपल्या झोंपडींत घेऊन गेला.

पण तीं पुरुष माणसं थोडावेळ घराबाहेर पडलीं आणि फक्त बायका नि पोरं मागें गांवात उरलीं की त्यांच्या त्या शेतावावरांत संशोधन करणं अगदीं सुरक्षित होतं, आणि आम्हीहि कांही आमंत्रणासाठीं अडून नक्कीच बसणार नव्हतों.

या इथे, या खेड्यांत देखील, स्टॅार्क छपरांवरून आपली घरटीं बांधून रहात होते. पण त्यांची वस्ती तशी फारशी नव्हती तिथे आणि आम्ही मित्रभावानेंच त्या ठिकाणीं राहिलों. त्या काळ्या लोकांविषयीं बरीचशी माहितीहि आम्ही त्यांच्या जवळून मिळवली,

आमच्या कडल्या पेक्षां हे स्टॅार्क थोडेसे वेगळे होते. यांचा आकार थोडा लहान आहे आणि हे वर्षभर असेच मनुष्य वस्तीच्या जवळ इथेच रहातात. विशेषतः हिंवाळ्यांत मनुष्य वस्तीची त्यांना जास्त ववश्यकता भासते,

'इथला हिंवाळा म्हटला कीं नुसता पाऊस, पाऊस नि पाऊस. सोसाट्याच्या वादळांनींच त्यांत फक्त खंड पडायचा. आणि या लोकांचं जर आम्हांला सांनिध्य नसलं तर पुष्कळदां आम्हांला चुकल्या चुकल्या सारखं वाटतं;' त्यानीं सांगितलं.

तिथे त्या अजस्त्र मॅराबूंचीदेखील आम्ही ओळख करून घेतली. किती मोहक पक्षी ते! त्यांचीं पीसं इतकीं छानदार असतात कीं लोक त्यांच्याजवळून तीं नेहमीच लुबाडतात. काय उपयोग मग असला सुंदर पिसारा असण्याचा?

ते लोक रोज कांहींतरी बरंचसं ओझं घेऊन घरीं येत असत; बहुतेक हत्तीचे सुळेच त्या ओझ्यांत असत आणि घरीं येऊन त्यांची ते आपल्या झोंपडीजवळ रास करीत. कित्येकदां आपल्या ओबडधोबड होडयांत हे हस्तिदंत भरून खूप लांब असे त्या सरोवरावरून ते जात असत. त्या स्टॉर्कनीं आम्हांला सांगितलं कीं त्या सरोवराच्या पर-तीरावर राहाणारे कोणी लोक ते हस्तिदंत घेऊन त्याबदली दुसरं कांही सामान देतात. आपली ही फेरी उरकून ते काळे लोक परत येत त्यावेळीं ते मोठे आनंदांत दिसत; आपल्या छोटेखानीं पिंपांतून ते कांहीतरी पेय मग पीत आणि त्यानंतर त्यांचं नाचगाणं सुरू होई. घरांतल्या बायकामुलांनाहि त्यांच्या या परत येण्यानें खूप आनंद होई आणि तीहि या आनंदोत्सवांत मग भाग घेत. तींसुद्धां तेंच पेय पीत नि नाचूं लागत. या प्रसंगीं बायका आपल्या अंगावर सर्व तऱ्हेचे बारीकसारींक दागिने चढवीत आणि आपल्या लोंकरीसारख्या केसावर भडक रुमाल बांधीत.

एक दिवस त्या काळचा लोकांची एक तुकडी, शिकारीवरून परत येतांना, आपल्याबरोबर एक कैदी घेऊन आली--हात पिळून मागें बांधलेला असा तो एक गोरा माणुस होता. तो अत्यंत थकलेला असा दिसला आणि त्याला धड -उभंहि राहावत नव्हतं.

त्या काळयांनीं त्याचे हात मोकळे करून त्याला खायला प्यायला दिलं आणि दारावर पहारेकरी ठेऊन त्यानीं त्याला एका गाईच्या गोठयांत कोंडून ठेवलं.

'कशाला घेऊन आले त्याला हे?' एक वृद्ध मॅराबू पक्षी म्हणाला. 'याचं आपल्याला प्रायश्चित्त घ्यावं लागेलच लागेल, हें ध्यानांत कसं नाहीं आलं यांच्या!'

त्याच्या या शब्दांकडे आम्ही त्यावेळी फारसं लक्ष दिलंच नाहीं. पण त्यानंतर थोडयाच दिवसांनीं, अग्निज्वालांच्या कडाडण्यानीं

आम्हीं मध्यरात्रीं जागे झालों, आणि त्या साऱ्या झोंपड्या अग्नीच्या भक्षस्थानीं पडताहेत असं आम्ही पाहिलं. त्यांचवेळीं बंदुकींचा आवाज नि लोकांच्या नैराश्यपूर्ण किंकाळ्याहि आम्हांला ऐकूं आल्या.

गोऱ्यांच्या एका तुकडीनें येऊन त्या खेड्याला वेढा दिला होता आणि त्यांतल्या लोकांवर हल्ला केला होता. आम्ही पाहिलेल्या त्या गोऱ्या कैद्याचं काय झालं तें आम्हांला कधींच समजलं नाहीं, पण सूर्योदय झाल्यावर तिथल्या त्या गांवाचा मात्र मागमूसदेखील दिसून आला नाहीं--राखेचे नुसते ढिगारे त्या जागीं दिसत होते.

त्या गोऱ्या लोकांनीं परत जातांना सारा हस्तिदंत आणि उरलेली गुरंढोरंहि आपल्या बरोबर नेलीं. पण पिकून पिवळ्या झालेल्या त्या शेतांना मात्र आम्हीच आतां एकुलते एक मालक उरलों होतों

ही नवीन परिस्थिती आरंभीं आम्हांला फारच छान वाटली. एक अखंड महोत्सव अशीच आम्हांला ती स्थिति वाटली, आणि आमच्या वांट्याला आलेली ती विपुल खाद्यसंपत्ति नि निर्वेध शांतता आम्ही अगदीं मनमुराद चाखली. तिथले ते स्टॉर्कच फक्त या महोत्सवांत भागीदार नि जोडीदार होते. त्या बापड्यांचे घरटे त्या अग्निप्रलयांत भस्मसात झाले होते. पण मग थोड्याच काळांत तिथे उघड्यावर पडलेल्या त्या प्रेतांमुळें सगळ्या प्रकारचे मांसभक्षक प्राणी त्या ठिकाणीं इतके कांही गोळा झाले, चतुष्पाद, आणि पक्षी कीं, त्यांच्या अखंड लठ्ठालठ्ठीमुळें नि आरडाओरड्यामुळें आम्हांला तिथें राहाणं पार अशक्य होऊन गेलं.

पण त्या कापाकापींतून नि आगीच्या फोफाट्यांतून, दैववशात कसेबसे निसटलेले कांही काळे लोक त्या ठिकाणीं परत आले, आणि त्या भाजून निघालेल्या जागीं त्यानीं घरें बांधण्यास परत एकदां सुरवात जेव्हां केली, तेव्हां एकदांची कुठे तिथली पहिली शांतता त्या जागीं परत नांदूं लागली.

पण, ते सारे जळून मेले अशा कल्पनेनें आम्ही त्यांच्या शतांचा जो पार फन्ना उडवून दिला होता, त्याबद्दल मात्र आम्हाला आतां खराखुरा खेद झाला !

या पश्चातापाच्या उसळींत, आम्हीं त्यांनीं आमच्या क्लू क्लू काकांचा नि इतर कांहीं मित्रांचा केलेला खूनहि त्यांना माफ केला. पण आमच्या अंतःकरणाच्या कुठल्या तरी कोंपऱ्यांत मात्र कुणीतरी असं हुंकारत होतं कीं, अगदीं त्याच पातकाबद्दल परमेश्वरानें त्यांना ही शिक्षा दिली होती.

आणि एकदां त्यांनीं अशी शिक्षा भोगल्यानंतर मनांत कसलंच शल्य न ठेवतां त्यांचं आनंदानें स्वागत करणं हेंच आतां आम्हांला शोभतं.

पण ही नुसती व्याख्यानबाजी झाली, कसंहि करा त्यांचं तुम्हीं स्वागत ! ते लोक तर आलें परत नि त्यांच्या बरोबर त्यांचे पूर्वीचे हेवेदावे पण आलेच परत.

इतक्यांत रागानें सापासारखा फुस्कारत, एक तीर सणाणत आमच्याजवळून गेला आणि माझ्या ल्बॅकनेक जवळ चारदोन पावलां-वरच जमीनींत खोल घुसला !

छट् ! अगदीं निश्चित, सारे मानव--काळेसुद्धां--एक जात सारखेच ! बिलकूल हैवान ! !

---o---

: :२०: :

क्लू-क्लू काकांच्या मागें त्यांची विधवा पत्नी होती आतां. मोठी सुरेख, टापटिपीची अशी मध्यमवयीन स्त्री होती ती, आणि आमच्या बाबांनीं तिला आपल्या आसऱ्याखालीं घेतली होती. आपल्या या नवीन जबाबदारींत ते मग इतके गर्क झाले कीं त्यांना आम्हां दोघां बहीण भावंडांकडे पहायला आतां फारच थोडा वेळ मिळूं लागला, पण त्यानीं मात्र आम्हांला असंच सांगितलं कीं तुम्ही दोघंहि आतां मोठी झालां आहांत आणि म्हणून माझ्या मदतीची तुम्हांला गरजच नाहीं राहिलेली.

पण आमचे वृद्ध पितामह लॅंगनोझ मात्र आपला रिकामा वेळ बहुतांशीं आमच्यासाठीं खर्च करीत असतच. हा प्रेमळ म्हातारा अलीकडे बराच थकलेला दिसूं लागला होता. ते आतां आमच्या भटकंतींत भाग घेत नसत आणि वारंवार असंच म्हणत कीं, माझी त्या दयाघनाजवळ आतां एकच प्रार्थना आहे कीं, माझ्या डोळ्यांना आपला तो मायदेश, ऑस्टॅंशकोव्हो मार्शेस पाहाण्याचं भाग्य फक्त त्यानें द्यावं ; दुसरं कांहीं नाहीं.

फेब्रुवारी आतां संपत आला होता आणि, मोठ्यांच्या चाललेल्या गोष्टींवरून आम्हीं समजलों कीं, आपली परत जाण्याची वेळ आतां जवळ आली. आणि आश्चर्य असं कीं ते अखेरचे दिवस मुळीं संपतां-संपेचनात. वेळ इतका मुंगीच्या पायानीं रेंगाळत असलेला असा आम्हांला आजपर्यंत कधींच वाटला नव्हता !

आम्ही तोंडं वळवलीं आणि खारटूमच्या दिशेनें उत्तरेकडे लहान लहान टप्पे घेत आम्ही निघालों.

फेब्रुवारीच्या अखेरीस नीलनाईलच्या मुखा जवळील त्या विशाल पाणथळीवर आम्ही सारेजण गोळा झालों.

या ठिकाणीं आम्हाला थोडं थांबावं लागलं. कारण आमच्या कांही तुकड्या, अबिसिनियांत नीलनाईलच्या उगमानजीकच्या प्रदेशांत आपला हा हिवाळी मुक्काम ठोकून राहिल्या होत्या. त्या इथं आम्हांला येऊन मिळाल्यानंतरच आम्ही आपला परतीचा प्रवास एकत्र करणार होतों.

' आठ एक दिवस आपण विसांवा घेऊं या ठिकाणीं आणि मग देवावर भार घालून आपण निघूं, ' वृद्ध लाँगनोझ म्हणाले–आणि त्यानीं एक सुस्कारा सोडला.

अलीकडे अलीकडे अनेकवेळां नि विशेषत: रात्रीच्या वेळीं ते असे सुस्कारत असत. त्या विशाल सरोवरांवरून निघाल्यापासून प्रवासाचें हे टप्पे त्यांना त्रासदायकच होत होते, आणि कित्येक वेळां ते मागें पडत नि मुक्कामावर आम्हांला येऊन गांठत.

' धीर असूंदे प्रिय दोस्त ' बाबा त्याना म्हणाले ' चांगली विश्रांती हवी आहे तुम्हांला फक्त, तर इथेच थोडे जास्त दिवस राहूंया आपण. तुम्हांला चांगलं शक्तीवर्धक अन्न देतों मी आणि उगाच कुठे हिंडण्याबिडण्यांत ताकद नका घालवूं आपली. आपलं घर परत गांठण्याइतकी ताकद देव तुम्हांला खास देईल, अशी खात्री आहे माझी.'

' मला शंका वाटते त्याची,' लाँगनोझ सुस्कारले, ' फिलेई गांठली मी तर बहार होईल ! घर नाहीं गांठणं शक्य तर इतर कुठे हाडं पडण्यापेक्षां मला तिथेच मृत्यु यावा अशी इच्छा आहे माझी. '

आम्हां सर्वांना याचं कारण ठाऊक होतं, हें सांगायला नकोच त्या फिलेईतच त्यांच्या पूर्वजाचं तें चित्रलिपींत रेखाटलेलं नांव आम्हांला आठवलं होतं.

'आपण त्या विशाल सरोवरांवरून निघालों तें बरंच केलं. पावसाळा सुरूच झाला आहे तिथे,' वाइज विंग फ्लॅप म्हणाले. 'माझ्या आयुष्यांत फक्त एकदांच मी त्या पावसांत सांपडलों होतों. आमच्या मंडळांत रोगराई झाली होती सुरू. म्हणून इतरांबरोबर आमच्या आजारी करकोंच्यांची शुश्रूषा करण्यासाठीं मी मागें राहिलों होतों. मोठं भयंकरच तें! देव करो नि असला अनुभव पुन्हा न येवो.!'

पण तो तडाखा आम्हांला मिळावा असं भवितव्यतेनें लिहूनच ठेवलं होतं.

नील नाईलवरील त्या पाणथळीवर आम्ही आल्याच्याच चौथ्या दिवशीं, सायंकाळच्या वेताला आसमंतात इतकं भयंकर दाट धुकं पसरलं कीं, समोर आमच्या चोंचीइतक्या अंतरावरदेखील आम्हांला कांहींदेखील दिसेनासं झालं.

ब्लॅकनेक नि मी एका खजुरीखालीं दडलों आणि धुकं वितळेपर्यंत तिथून हलायचं नाहीं असं ठरवलं. साऱ्या जगांत एकटं पडल्यासारखं आम्हांला वाटत होतं. पण तेवढ्यांत थोड्या अंतरावरील ट्रायपलर चा आवाज आम्हांला ऐकूं आला.

'ए है!' तो ओरडून म्हणाला. 'सावध रहा नीट! कांहीं तरी भयंकर असं येतं आहे इकडे!'

'पुरे करा भाकीत तुमचं! मला फार भीति वाटते त्यानें!' ब्लॅकनेक तक्रार करीत म्हणाली.

पण भीति वाटण्यांतलंच कांहीं तरी होतं खास. वीजेनें कोंदाटलेलं ते कुंद, गुदमरवणारं वातावरण नि भकास शांतता हीं त्या घनदाट धुक्यापेक्षांहि अधिक त्रासदायक अशीं वाटत होतीं.

समोर आतां सूर्यास्ताची लाली काळोखाच्या काळ्या पोटांत बुडून जात होती. आणि मग दूर मेघगर्जनेची पहिली गुरगुरती सलामी आमच्या कानांवर आली आणि त्याचा तो मंद प्रतिसाद सभोंवार बराचवेळ रेंगाळत राहिला.

आमच्या डोक्यावर वाऱ्याची झुळूक फडफडली. मग परत एकदां तो मेघांचा सिंहनाद झाला आणि तोहि आमच्या पुष्कळच जवळ. धुक्याचं आवरण अधिकच दाट होत गेलं आणि आमच्या सभोंवार हवेऐवजीं पाणीच पसरलं आहे असा भास आम्हांला होऊं लागला, आणि मग त्या दुसऱ्या मेघगर्जनेच्या पाठोपाठ मुसळधार पावसाचा माराच आमच्या आंगावर सुरू झाला.

'धांवा, धांवा! मी बुडतों आहें!' कुणींतरी केंविलवाणें असें ओरडलें.

पण एक भलीमोठी लाट, देवाला माहीत कुठून ती, आमच्या आंगावर आली. आम्ही वर उठण्याचा प्रयत्न केला, पण त्या पावसाच्या जोराच्या सरींनीं आमचे पंख गलितांग झाले होते, आणि कांही थोडं अंतर काटतांच, आम्ही खालीं कोसळलों—सुदैवानें जमीनीवर मात्र न पडतां, एकमेकांत गुंतलेल्या अशा बारीक झुलत्या फांद्यांत आम्ही कोसळलों होतों. या हालत्या आधारावर, आपल्या पंखांचा नि पायांचा शिकस्तीचा जोर करून आम्ही आपला तोल मोठ्या माराकुटीनें सांवरून मग उभे राहिलों. आमच्या खालीं जलप्रपात फेंसाळत उधळत होते. मोठ्या आणीबाणीची वेळ होती ती.

पण आम्ही एक श्वास घेतों न घेतों तों वीजेच्या एका विलक्षण लोळानें आम्ही पार आंधळे झालो. काय प्रचंड लोळ तो—यापुढे आम्ही त्या तुफानी समुद्रावर पाहिलेला तो वीजेचा झोत, नुसत्या साध्या लवलवण्यासारखाच आम्हांला वाटला. आणि मग त्याच्या पाठोपाठ एवढा प्रचंड कडकडाट आकाशांत उसळला कीं आमचं

सारीं ज्ञानेंद्रियें देखील अगदीं पार सुंद होऊन गेलीं--आम्ही जणुं मूर्छित झालों.

मी भानावर आलों त्यावेळीं, अरेरे, मी एकटाच एका प्रवाहाबरोबर वाहात चाललों होतों. तेवढ्यांत कशावर तरी मी आपटलों, मग परत तसाच वहावत चाललों होतों, आणि अखेरीस एका वेताच्या झाडींत घट्ट अडकून बसलों. पण मग मी आपलं सारं अवसान गोळा केलं. पावसाची मुसळधार तिळमात्रहि न दमतां एकसारखी चालूच होती. वारा मुळींच नव्हता--आणि त्या थंडगार जलधारा वरून सरळ आदळत होत्या. कल्पांतीची जगबुड आल्यासारखंच ते वाटत होतं, नि आकाशाचं परत दर्शनहि होणार नाहीं अशीच माझी कल्पना होत होती. आणि सभोंवतीं एकंदर सारा कोलाहल एवढा माजला होता कीं मी मोठ्यानें शंखध्वनि केला तरी माझा मलाच माझा आवाजही ऐकू येत नव्हता.

वर मेघांचा कडकडाटहि अविरत चाललाच होता. वीजेचा हिरवट चमचमाट एक क्षणाचीहि उसंत घेत नव्हता. आणि मी इतका थकून गेलों होतों कीं माझ्या आंगांतली प्रतिकारशक्ती पार खलास झाली होती; माझीं सारीं गात्रें गारठून ताठरलीं होतीं, आणि मी परत एकदां एका प्रवाहाबरोबर वाहवत चाललों होतों.

'ही अखेरची घटका आली !' माझ्या डोक्यांत चमकुन गेलें.

पण मग अखेरीस एकदां मी घट्ट जमीनीवर आलों आणि जवळ जवळ त्याच क्षणीं ती पावसाची मुसळधारहि एकदम अवचितपणें थांबली. वाऱ्याच्या एका सोसाट्याच्या झोतानें तो मिट्ट काळोख फाटून दुभंग झाला; आणि थोड्याच वेळांत वर डोक्यावर ते तेजोगोल मला परत दिसूंहि लागले.

वाऱ्याचा जोर वाढूं लागला आणि मग त्यापुढें ते कडाडणारे काळे काळे मेघ, वीज नि तो मुसळधार पाऊस दशदिशा पळून

गेले. अयनवृत्तांतील त्या वादळाचा मंद सरता गुरगुराट मात्र अजनहि मधून मधून कानावर येत होता.

' देवाची कृपा, मी तर वटावलों ! पण माझे आप्त ? ' माझ्या लाडक्या ब्लॅकनेकचीं मूर्ती माझ्या डोळ्यापुढे आतां उभी राहिली. ' ती कुठे आहे ? '

पण दिवस उजाडण्यापूर्वी तपासाचा विचार व्यर्थच होता.

उगवत्या सूर्याच्या किरणांनीं मला ऊब आली आणि मी आपलीं सारीं गात्रें एकदां ताणावून आसपास थोडा हिंडलो. एका नापीक अशा बेटाला मी लागलों होतों आणि झाड झुडूपाची इवली देखील निशाणीं त्यावर कुठे दिसत नव्हती. पण पहिलीच दुसरी कोणती गोष्ट जी माझ्या दृष्टीस पडली ती म्हणजे आस्ते कदम माझ्याकडे सरपटत येणाऱ्या एका मगराचा जबडा. मला मूर्च्छाच येत होती. पण तेवढ्यांत दचकून मी बाज्ला उडी घेतली. तो हिडीस प्राणी पायांवर ताठ झाला आणि त्यानें आपला जबडा रागानें काडकन मिटला.

पण माझ्या सुदैवानें एका हरणाचा मृत देह त्या हिडीस सैतानाच्या नजरेंस पडला आणि मी बचावलों.

दोन एक तासात मलाहि मग हुशारी आली आणि दुसऱ्यांचा तपास करण्यास निघण्याइतकी ताकदहि मला आहे असं वाटलं.

थोडा वेळ भ्रमंती केल्यावर मला एक करकोंच्यांचा थवा भेटला आणि त्यानीं आपण मृत्यु मुखांतून जेमतेमच कसे बचावलों याचं वर्णन केलं. त्यांच्यांतले फारसे न दमलेलें असे कांही जण मला मदत करण्यासाठीं माझ्या बरोबर निघाले. आम्ही वर हवेंत उड्डाण केलं आणि क्रमाक्रमानें आपल्या निरीक्षणाचं क्षेत्र विस्तारीत विस्तारीत संथपणें घिरट्या मारूं लागलों.

सर्वांच्या आधीं मला बाबा नि ती क्लू-क्लू ची विधवा अशीं दोघं दिसलीं. त्यांना भेटण्यासाठीं मी तिकडे एकदम धांव ठोकली. त्यांना कसलीहि इजा झाली नव्हती; आणि म्हणून बाबांजवळून कांही सूचना घेऊन मी वेळ न गमावतां परत आपल्या फिरतीवर निघालों.

'आधीं आपल्या त्या रणवीराला काढ शोधून,' मी निघाल्यावर बाबांनीं आरोळी दिली; 'सर्वांत महत्त्वाची गोष्ट तीच आहे.'

माझ्या त्या मोहिमेंत, 'सर्वांत महत्त्वाची गोष्ट' कोणती याबद्दल माझं मत बाबांपेक्षा सामान्यपणें भिन्नच होतं. मला सर्वांत महत्त्वाचीं असलेलीं व्यक्ती मला दुपारच्या सुमारासच सांपडली. देवदयनें माझी ब्लॅकनेक अगदीं सुखरूप होती. पण नदीजवळील प्रचंड शिलाखंडांमधें ती अडकून पडली होती आणि बाहेरील मदती-शिवाय तिला त्यांतून मुक्त होणं शक्य नव्हतं.

'काय भूक लागलीं आहे मला!' माझ्या जवळ तिचा पहिला उद्‌गार हा.

तिच्या त्या पोरकटपणामुळें मला जरी थोडंसं चमत्कारीक वाटलं, तरी तिच्या भेटीचा झालेला आनंद इतका मोठा होता कीं त्यामुळें मी त्याबद्दल तिला कांही एक बोललों नाहीं. तिला घेऊन मी चटकन जवळच्या एका झुडुपाजवळ गेलों आणि आम्ही दोघां-नींहि आपली पोटपूजा उरकली. मग दुप्पट उमेदीनें आम्ही दोघा-नींहि आपला शोध चालू केला.

जमीनीच्या बरीच जवळून अशी एक करकोंची उडत चाललेली आम्ही पाहिली. ती आपल्या आजूबाजूला मोठ्या उत्सुकतेनें अशी पहात पहात जात होती. माझी ताईच ती.

'नि ट्रायफ्लर?' मी आरोळी देऊन तिला विचारलें.

'मला माहीत नाहींत,' तिनें सांगितलें नि ती रडूं लागली.

आम्ही शक्य तितका तिला धीर देऊन तिचं समाधान केलं नि आम्ही आपल्याबरोबर तिला यायला सांगितलं.

आम्ही असे भ्रमण करीत असतां त्या वादळांत प्राणास मुकलेल्या जनावरांची प्रेतं इकडे तिकडे पसरून पडलेलीं आम्हांला दिसलीं. त्यांत कांही मेलेले करकोंचे पण दिसत होते. म्हणून त्यांत कोणी ओळखीचा आहे कीं काय हें पहाण्यासाठीं आम्ही खालीं गेलों. लाँगनोझ नि ट्रायफलर त्यांत नव्हते.

'कुठेतरी सुरक्षितच असले पाहिजेत ते,' आम्ही ठरवलं. ट्रायफलरबद्दल—त्या शूर, उत्साही नि चपलबुद्धी प्राण्याबद्दल, मला मुळींच शंका नव्हती. त्यानें त्या संकटांतून कसा तरी जीव बचावलाच असेल. पण आमचे ते प्रिय, वृद्ध सेनानी लाँगनोझ—आम्हाला त्यांचीच अतिशय काळजी वाटत होती. आमचा तपास अधिक कसून होण्यासाठीं म्हणून आम्हीं मग आपल्या वेगवेगळ्या अशा अनेक तुकड्या केल्या.

बाबानीं सांगितलेल्या एका ठिकाणीं आम्ही असे मध्यान्हीला पूर्वी ठरवल्या प्रमाणें एकत्र आलों. बारा पंधरा करकोंचे त्याठिकाणीं आतां गोळा झाले होते. पण बाबा गैरहजर होते.

'ते त्या वृद्ध गृहस्थांचा तपास काढण्यासाठीं गेले आहेत,' विधवा वलू वलू मला म्हणाली. 'ते सांपडेपर्यंत तोंडांत पाणी देखील घालाला तयार नाहीत ते !'

'अहो, अगदीं स्वाभाविक आहे तें !'

'हे पहा ते आले !' उत्साहानें अनेकजण ओरडले.

आणि खरोखरच, त्या येणाऱ्या करकोंच्याच्या पंखांच्या विवक्षीत आवाजावरून आम्ही ओळखलं कीं ते बाबा नि लाँगनोझच आहेत. ते अगदीं एकमेकांजवळून उडत होते आणि ते खाली उतरत असतां बाबांनीं आपल्या त्या वृद्ध मित्राला आधार दिला.

बाबांनीं सांगितलं कीं त्यानां ट्रायफ्लर भेटला होता आणि तो माझी ताई सुरक्षित आहे असं कळल्यामुळें, दुसऱ्यांना मदत करण्यासाठीं म्हणून थोडा अधिक लांब गेला आहे.

'अगदीं वाईट आहेत नाहीं ते ! ' ताई म्हणाली.

'नाहीं बरं ताईबाई, सद्‌गृहस्थाला अगदीं योग्य असंच वर्तन आहे त्याचं,' लाँगनोझ तिला बोल लाऊन म्हणाले.

'मला पूर्ण पसंत आहे त्याचं कृत्य, ' बाबांनीं त्यांना दुजोरा दिला,

ताईचंहि मग समाधान झालं.

सायंकाळीं आम्हीं परत एकत्र आलों. यावेळीं आमचा नाश कांहीं विशेष नव्हता.

ट्रायफ्लर सगळ्यांच्या शेवटीं आला—त्यानें येतांना आपल्या बरोबर एक जरतारी गालीच्याचा तुकडा आणला होता. तो सांगत होता कीं, यावरून असं स्पष्ट सिद्ध होतं कीं त्यानें ती वादळी रात्र एका हत्तीच्या पाठीवर काढली हें निर्विवाद सत्य आहे. तो गालीच्याचा तुकडा त्यानें तिथूनच त्यावेळेची स्मृति म्हणून आपल्या बरोबर आत्तां आणला होता. तो पठ्ठा आम्हांला सांगत होता कीं, त्या वादळी रात्रीं, पाण्याच्या एका लोंढ्याबरोबर तो वहात चालला होता. पण त्याचं प्रसंगावधान मात्र अगदीं शाबूत होतं. योग्यवेळ येतांच त्यानें झटकन झेंप घेतली आणि चांचपीत चांचपीत वर चढत त्यानें तो खजूरीचा शेंडा गांठला. तिथे त्यानें आधीं खजूरीच्या थोड्या बीया खाल्या, मग आमच्या ताईसाठीं म्हणून तिथून त्यानें खजूराचा एक सबंध घोंसच्या घोंसच तोडला. पण तेवढ्यांत कडाड करून वीजेचा लोळ त्या खजूरीवर आदळला नि सबंध झाड दाणकन खालीं आपटलं. तसाच मग तो एका मगराच्या दाढांतूनहि मोठ्या

माराकुटीनेंच बचावला; खरं म्हटलं म्हणजे त्याचा डावा पाय मगराच्या दातावरच आदळला होता. तो भीषण क्षण त्याच्या स्मृतीतून कधींच नाहीं जाणार! मग त्या खजूरीच्या झाडाबरोबरच तो वहात चालला असतां पाण्याच्या ओघाबरोबर एका गलबतावर तो आपटला. लोकांचं बोलणं त्याला ऐकूं आलं होतं नि गलबतावरचा धूर नि वासहि त्याच्या नाकांत भरला होता. म्हणून त्यानें गलबताच्या डेकवर उडी घेतली आणि लोक काय बोलताहेत तें ऐकण्यासाठीं म्हणून त्यानें कॅप्टनची कॅबीन जवळ जवळ गांठली. पण आपल्याला असलेल्या धोक्याची त्याला जाणीव असल्यामुळें, काय जरा श्वास घ्यायला तिथे तो थांबला तेवढाच–तिथून त्यानें मग उडण्याचा प्रयत्न केला पण त्या मुसळधार वृष्टीला तोंड देण्याइतकी आंगांत ताकद आलेली नसल्यानें तो खाली येऊन कशावर तरी आदळला. कोणातरी भीमकाय अशा प्राण्याची पाठ होती ती. त्याच्या शेपटीवरून ताबडतोब तो हत्ती आहे असं ओळखून तो त्याच्या पाठीवर चढला. कुणा प्रमुख अशा अंमलदाराचाच तो हत्ती–– त्याला याबद्दल मुळींच शंका नव्हती. बहुतेक तो खारटूमच्या गव्हर्नरचाच हत्ती असावा; कारण त्याच्या पाठीवरची झूल नि हौदा मोठा ऐटबाज होता, ट्रायफलरनें त्या हौद्यांत शिरून त्याचे पडदे सोडले आणि त्या भयंकर रात्रीचा उरला सुरला भाग त्या हौद्यांत सुखासीन असा झोंपून काढला. आणि मग सकाळीं पाऊस जेव्हां उडाला तेव्हांच कुठे मग तो त्या हौद्यांतून बाहेर पडला.

'पण बाईसाहेब,' ताईकडे वळून तो म्हणाला, 'एका गोष्टीचं मात्र मला फार फार वाईट वाटतं हं कीं, मनांत असल्याप्रमाणें तो खजूराचा घोंस मात्र मला आपल्याला देतां आला नाहीं. पण त्याचं कारण जर कळलं तुम्हांला, तर मात्र तुम्हांलाहि आनंदच होईल.'

'या भल्या माणसानें मलाच दिला तो खजूर' वृद्ध लॉंगनोझनीं

सांगितलं. ' त्यानें मला पाहिलं त्यावेळीं मी अगदी पूर्णपणें गळून गेलेला, असहाय नि भुकेला असा होतों.'

ट्रायफलरच्या त्या औदार्यानें नि दयावृत्तीनें आम्ही सगळेजणच गहिवरलों; त्याच्या गोष्टीवर आम्ही मान्यतेचा शिक्का ठोकला आणि त्याच्या सत्यतेविषयींची उरलीसुरली शंकाहि आमच्या मनांतून पार निघून गेली. आपल्या हकीगतीला त्यानें थोडाफार मीठ-मसाला लावला आहे हें आम्हांला दिसतच होतं, पण त्यावर विश्वास ठेवण्याची आमची इच्छा असल्यामुळें आम्ही त्यावर विश्वास ठेवलाहि.

आणि मला वाटतं, आपल्याला कुणालाहि असत्य आणि काव्य यांतला फरक ओळखतां आला पाहिजे. आपली विवेकबुद्धी ज्याला दडपून ठेवतां येईल, असा कोणीहि प्राणी असत्य बोलूं शकतो, पण कांही थोड्याच निवडक लोकांना गोष्ट किंवा कथा रचतां येते नि अशा वेळीं कथेतील खरेखोटेपणाला महत्व नसतं, काय हवं असतं तें हें कीं, त्या गोष्टीमुळें तुमचं मनरंजन झालं पाहिजे, तुमचं चित्त वेधलं पाहिजे आणि त्या गोष्टीनें तुमच्या विचारांना नि कल्पनांना उन्नत केलं पाहिजे; बस्स, या एवढ्याचीच काय ती आवश्यकता असते.

कल्पनाशक्तीची जोड नसलेलीं माणसं, सामान्याच्या वर उंच चढूंच शकत नाहींत आणि म्हणूनच खऱ्याखोट्याचा तपशील तपासण्याची त्यानां बहुतेक आवड असते.

या जातींतलीं अनेक माणसं माझं हें प्रवासवृत्त वाचून म्हणतील कीं, कागद नि शाई नसतांना यानें हें वृत्त लिहिलं कसं ? हो, माझी पूर्ण खात्री आहे ते असं म्हणतील अशी !

पण यावरून त्यांच्याजवळ विनोदबुद्धीचा पूर्ण अभाव आहे, एवढं तरी म्हणावंच लागेल. आतां उदाहरणार्थ, आमचीही नवी सावत्र

आई, विधवा वलू-वलूच ध्या. ट्रायफ्लरची ती हकीगत ऐकून ती म्हणाली 'इथून तिथून सारंच खोटं !'

पण तिला हें बोलणं क्षम्य आहे. कारण बोलून चालून अल्पशिक्षित नि सुमार बुद्धीची ती स्त्री. पण म्हणून नव्हता हें बाबानीं तिला आसरा दिला ! काकू तशा सुस्वभावाची नि उत्कृष्ट शीलाच्याच आहेत. पण त्यानीं मारलेल्या त्या शेऱ्याबद्दल बोलायचं, तर मला वाटतं कीं, अगदीं मंदांतलं मंदबुद्धी असं छोटं वदकंदेखील त्या शेऱ्याला कांहीं महत्व देणार नाहीं,

पण त्या रात्रीं, ताईजवळ ट्रायफ्लरनें बोलतां बोलतां मोकळेपणें सांगितलं कीं त्या वादळी रात्रीं प्रत्यक्ष काय काय झालं हें कांहीं त्याला आठवत नाहीं आहे. पण त्याची समजूत मात्र अशीच कीं त्यानें आम्हांला सांगितलं तसंच तें बहुतेक घडलं होतं, आणि कांहीं गोष्टी तर त्याहूनहि जास्तच घडल्या होत्या.

'पण तो खजूर ?' ताईनें विचारलं.

'खजूर ? देवाशपथ खजूर होता तिथे !'

त्या रात्रीं मग आमचा तिथून निघण्याचा दिवस अगदीं निश्चित असा ठरून गेला.

——०——

: :२१: :

दुसरा दिवस आम्ही आपल्या प्रवासाची तयारी करण्यांत घालवला. म्हणजे आम्ही आपल्या सैन्याचे वेगवेगळे गट तयार केले आणि गट किंवा त्रिकोन प्रमुख यांचीहि निवड केली.

वाढतं वयोमान नि शारीरिक थकवा या दोन कारणांमुळ आमच्या वृद्ध पितामहांनीं आपलं सरसेनानीपद सोडलं आणि आमचा कसोशीचा आग्रह, नापसंती नि काकूळतीची विनवणी या कशाचाहि त्यांच्या निश्चयावर परिणाम झाला नाहीं. म्हणून त्यांच्या जागीं माझे बाबा, क्लॅरिअन ट्रंपेटर, यांची एकमुखानें निवड झाली.

आमच्या विभागाचं नेतृत्व ट्रायफलरच्या गळयांत पडलं. त्यानें ही बातमी मोठ्या गंभीरपणेंच ऐकली आणि असाच अविर्भाव दाखवला कीं, ही तर काय अगदीं क्रमप्राप्तच गोष्ट होती. इतकंच नव्हे तर या बाबतींत आम्हीं हा शहाणपणाच दाखवला. आणि त्याची तशी अपेक्षा पण होतीच. आणि निवड होतांच त्यानें मोठ्या तत्परतेनें आधीं आपल्या त्रिकोनांतील लोकांच्या संख्येची नोंद केली कारण आतां इतक्या जीवांची जबाबदारी त्याच्यावर होती ना! या त्रिकोनांत आमच्या एकूण बत्तीस जोडचा होत्या.

हें मोजमाप संपल्यानंतर त्यानें आपल्या भावी धोरणाची रूपरेषा, म्हणजे त्यांतलीं महत्त्वाचीं तत्त्वं, त्यानें आम्हांला थोडक्यांत सांगितली. 'आपल्या या परतीच्या प्रवासांत. माझ्या सामाजिक नि लष्करी कर्तव्यांत मी तसा न्यायानें पण अगदीं कडकपणानें वागणार आहें. पण असं जरी असलं तरी तुम्ही सर्वांनीं मला आपला जुना दोस्त असंच मानावं.'

पण या निवडणुकींत सर्वांत अनपेक्षित आणि कुतूहलाची अशी

गोष्ट म्हणजे माझी प्रमुखपदीं झालेली निवड. या माझ्या नवीन अधिकारामुळें मी नि ट्रायफ्लर आतां एकाच समान भूमिकेवर आलों! आरंभाला माझा यावर विश्वास बसेना, पण मला मिळालेल्या मतांची संख्या इतकी प्रचंड होती कीं त्याबद्दल कांहीं शंका रहाणंच शक्य नव्हतं.

पण त्या वेळीं मला मात्र असंच वाटलं कीं, माझ्या या निवडणुकीचं श्रेय, हा सन्मान, मला बाबांच्या लोकप्रियतेमुळेंच लाभला होता. पण मग मागाहून मला समजलं कीं उमेदवारांच्या नांवांची यादी स्वतः वृद्ध लॉंगनोझनींच केली होती; आणि त्यांचं वजन इतकं मोठं होतं कीं त्यानीं केलेंली भलावणी हीं, लोक पवित्र, वंद्य असा हुकूमच नेहमीं समजत असत.

निवडणुकीनंतर मी भाषण बिषण कांहीं केलं नाहीं. मी फक्त एवढंच सांगितलं कीं, मी आपल्या वडीलांचं प्रत्येक बाबतींत अनुकरण करण्याचा कसून प्रयत्न करणार आहे.

' ठीक, पण त्यांतून आपलं तें समुद्रोल्लंघन वगळणार, ना ? बाबानीं शेरा मारला. ' आपलं ब्रीदवाक्य म्हणून तूं ' जें करायचं तें थोडं–पण परिपूर्ण, ' हे शब्द ध्यानांत धरलेस तर बरं.

दुसऱ्या दिवशीं दिशा उजळतांच आम्ही आपल्या उत्तर प्रवासाला सुरवात केली. थोड्याच वेळांत नाईलच्या उत्तर पात्राजवळील तो प्रचंड वाळवंटी महासागर आम्ही गांठला. आमच्या पहिला रात्रीचा मुक्काम वाडी–हाल्फाजवळ पडला, नि तो मुक्काम निर्विघ्नपणें नि शांतपणें पार पडला,

माझी ब्लॅकनेक माझ्यावर आतां प्रेमळपणाचा नि काळजीचा जसा वर्षाव करीत होती, आणि माझ्या मनांत येत होतं कीं हें मानसन्मानाचं दीप्तिमान आवरण जर माझ्याभोंवती नसतं नि मी एक सामान्य शिपाई गडी असतों, तर तिनें माझी एवढी काळजी घेतली

असती का, माझ्या सुखसोयींना ती एवढी जपली असती का?

आणखीं दोनच पल्ले आणि फिलेई नि त्याजवळचे ते पुरातन अवशेष आम्ही गांठले.

वृद्ध लाँगनोझची शक्ती आतां कमी होत होती. आमच्या पहिल्याच भरारींत ते आमच्या कितीतरी तास मागें पडले, आणि पूर्वी ठरल्यापेक्षां एक जास्त मुक्काम केवळ त्यानीं आम्हांला गांठावं नि त्यांना विसांवा मिळावा एवढ्याचसाठींच आम्हांला करावा लागला. पण फिलेई गांठतांच आमचे ते वृद्ध सेंनानी खालीं जमीनीवर आडवे झाले आणि त्यानीं प्रवास पुढे चालू ठेवण्याचे साफ नाकारले.

ती सारी उदास रात्र आम्हीं आमच्या त्या मृत्यूशय्येवर पडलेल्या वृद्ध मार्गदर्शकाच्या नि नेत्याच्या भोंवतीं जागून काढली. त्यांचं नांव खोदलेल्या त्या भग्न दगडी कॉर्निसच्या शेजारींच ते पडले होते. रात्र चांदणी आणि निःस्तब्ध होती. नदीच्या परतीरावर कोल्ह्यांची हुकी चालू होती आणि मच्छीमारी होड्यांतील लाल दिवे अंधारांत लुकलुकत होते.

आमचे पितामह आतां बोलत होते.

' शांतपणें नि सुखानें नांदा. कुणाचंहि वाईट कधीं चिंतूं नका, आणि कुणीं अपकार केला, तर सूडाचा विचार मनांत आणूं नका—नीट ध्यानांत ठेवा कीं सूडामुळें समाधान लाभत नसल्यामुळें सूड हा निष्फल आहे. कुणालाहि दोष लावूं नका, कारण तुमच्यातला निर्दोष असा कोणीच नाहीं. नेहमीं एकमेकांना धरूनच रहा. तुमचं सामर्थ्य ऐक्यांतच आहे. हें ध्यानांत धरा कीं तुमचं व्यक्तिगत काम हें मागाहून—–आधीं सामाजिक कर्तव्य, आधीं समाजसुख नि मग व्यक्तिसौख्य. प्रेम—–कारण प्रेम म्हणजेच सारं कांही—–ही सर्व ऐहिक सुखांची जननी आहे, सर्व आनंदाची निर्माती आहे. प्रेम हें

मृत्यूहूनहि प्रभावी, सामर्थ्यसंपन्न आहे. आणि आज मला हा मृत्यु शांतपणें नि समाधानानें जर येत असेल, तर त्याचं कारण एकच, कीं अगदीं शेवटचा श्वास घेईपर्यंत मी मनानें तुमच्याबरोबरच वावरणार आहें, माझा आशिर्वाद तुमच्याबरोबरच येणार आहे आणि आपली सुंदर प्रिय मायभूमी तुमच्या परत दृष्टीस पडतांच तुमच्या मनांत उसळणारा आनंद, मी आपल्या मनांत रेखाटीत राहाणार आहें म्हणून.'

'मला आतां फारी ग्लानी येते आहे, माझे डोळे जड झाले आहेत,' अगदीं क्षीण आवाजांत ते पुढे म्हणाले.

दिशा फांकतांच, आम्ही निघण्याची तयारी करून पाहिलं तों आमचे लाँगनोझ जमीनीवर पाय ताठ करून पसरले आहेत आणि त्यांचं तुरेदार मस्तक त्यांच्या पंखाखालीं झांकलं आहे.

आम्ही नीरव शांततेंत वर उड्डाण केलं आणि त्या दिवशींच्या सबंध प्रवासांत तेंच उदास मौन आम्हां सर्वांवर पसरलं होतं....

पण हें कैरो आलंच. नाईलच्या या त्रिभुज भागांतील हीं हिरवीगार मैदानं आतां समोर विस्तारलीं आहेत, आणि भूमध्य समुद्राची ती मोहक नील रेषा ही समोर खडी आहे !

सर्व दृश्य आतां परिचित वाटतं आहे. आमच्या प्रवासाचा आराखडा आमच्या मनश्चक्षूंसमोर आतां सुस्पष्ट नि रेखीव असा रेखाटलेला उभा राहिला आहे. आमच्या मनांतील अधीरता आम्हांला झपाट्यानें पुढे घेऊन निघाली आहे, आणि पूर्वेच्या या साऱ्या साऱ्या सौंदर्यविशेषांवरून आमची दृष्टी तटस्थपणें वावरत असतां, आमचीं तीं घरटीं, आमच्या त्या विशाल, सपाट पाणथळी आणि रसरशीत फुलांच्या बुंदानीं चित्रित झालेले ते बारीक बारीक उंचवटे, आमच्या मनश्चक्षूंसमोर गर्दी करीत राहून त्या सुखस्वप्नांत आम्ही रंगत आहोंत.

डॅन्यूबच्या मुखाजवळ येतांच, वाईज विंग फ्लॅपच्या विभागाचा आम्ही निरोप घेतला.

तो वृद्ध सेनानी बाबांचा निरोप घेत असतांचं दृश्य मोठं हृदयस्पर्शी होतं. माझा हा अखेरचाच प्रवास, असं माझं मन मला सांगत आहे, असं ते म्हणाले.

'पण, प्रिय दोस्त, आपल्या लाँगनोझच्या मृत्यूसारखं सुंदर नि शांत असं मरण पाहिल्यानंतर, तसाच मृत्यु यावा नि त्याच्या मागून जावं, असंच कोणालाहि वाटेल.'

'अहो, असं काय बोलतां ? तुम्हीहि पहालच पुन्हां एकत्र प्रवास करूंच आपण.'

पण, वाईज विंग फ्लॅपचंच म्हणणं खरं होतं. तें आम्हाला परत कधींच दिसले नाहींत.

: : २२ : :

आपआपल्या कंठांच्या पिपाण्या जोरानें वाजवीत वाजवीत आम्ही मोठ्या आनंदानें नि नेटानें, खूप धीर करून उत्तरेंतील त्या घनदाट काजळी जंगलांवरून विलक्षण वेगानें आतां पळत निघालों होतों. मार्च महिन्याची ती अखेर होती.

बर्फाचं अस्तित्व अजून कुठे कुठे दिसून येत होतं. पण हवा मात्र गरम झालीच होती आणि गारठा फक्त रात्रीं नि सकाळींच काय तो वाटे. पण प्रत्येक नवा दिवस अधिकाधिक सूर्यप्रकाश नि ऊष्णता आपल्याबरोबर घेऊन येतच होता.

मग एप्रील, आपले उसळते वासंतिक निर्झर नि निर्झरिणी घेऊन अवतीर्ण झाला. गवताचीं कोंवळीं पानं वर डोकीं कांढू लागलीं नि पांढरी शुभ्र स्नो ड्रॉपचीं इवलालीं फुलं त्यांबरोबर हंसू लागलीं... ....आपलं ध्येय आम्ही जवळ जवळ गांठलंच. प्रवासाचा शेवट दिसूं लागला.

एक नवीनच आनंदानुभव आमची या ठिकाणीं वाट पहात होता. आमच्या सैन्यांत एक नवीन गडी दाखल झाला. ट्रायफ्लरचे प्राण मोठ्या धैर्यानें वांचवणारा तो बंदिवान क्रौंच आम्हाला येऊन मिळाला होता.

त्यानें सांगितलं कीं, तो अतीशय माणसाळला होता आणि त्यानें त्या लोकांचा विश्वासहि खूप संपादल्यामुळें त्या लोकांनीं पुढे त्याचे पंख कापणं सोडून दिलं. आणि तो सारा हिवाळा त्यानें तिथेंच कोंबड्या वगैरेंच्या संगतीत काढला. पण हिवाळा संपतांच त्याच्या कानावर तो दुष्ट शब्द–कात्री–एक दिवस अवचितपणें आला; आणि त्यानें पळून जाण्याचा ताबडतोब निश्चय केला. त्याचे पंख आतां

बरेच वाढले असल्यानें कुंपणांच्या भिंतींवरून उड्डाण करून लहान लहान पल्ला मारीत जाणं त्याला शक्य होतं.

अनुकूल संधीची मग तो वाट पहात बसला नि तशी संधी येतांच त्यानें पळ मारली.

आरंभीं त्यानें कांही दिवस फर वृक्षांच्या रानांत काढले. थंडीनें गारठून किंवा भुकेनें तळमळून मरण्याची त्याला अनेकदां वेळहि आली. कारण गेल्या वर्षींचीं बिलबेरीज, गोठलेलीं नि बर्फांत घट्ट बसलेलीं हीच काय तीं त्याला खायला मिळत होतीं, नि फरच्या बिया. पण यालाहि प्रयास कोण पडत. अखेरीस पण मग हिवाळा कमी होऊन हवेंत गरमा येऊं लागतांच त्याला इतर कांही खाद्य वस्तु मिळूं लागल्या. या दरम्यानच्या काळांत त्याचे पंखहि आणखी लांब वाढले आणि तो त्यांना उडण्याचं कामहि सारखा देतच असे. त्या दिवशीं सकाळीं आमच्या पिपाण्यांचा आवाज जेव्हां त्यानें ऐकला आणि आम्हांला उडतांना पण पाहिलें, त्याबरोबर त्याच्या आंगांत दसपट जोर आला आणि सपाटयानें झेंप घेऊन त्यानें आमचा आघाडीचा त्रिकोन गांठला.

'पण तुम्ही मला घालवून नाहींना लावणार, दोस्त, नाहींना ? तुमच्या मंडळींत कायमचंच रहावं अशी इच्छा आहे माझी.'

आम्हीहि मग अत्यंत उत्साहानेंच त्याचं स्वागत केलं नि त्याच्या आगमनाप्रीत्यर्थ आपल्या पिपाण्या पण जोरसे वाजविल्या, हें सांगायला नकोच.

आणि मग, तो पूर्व बंदिवान क्रौंच नि ट्रायफ्लर यांची झालेली भरत भेट मोठी हृदयस्पर्षी होती.

आतां फक्त तीन चार ताणाच्या भराऱ्या कीं गाठलंच आम्ही मग आपलं घर !

त्या दिवशी आम्ही मास्कोवरुन गेलों. मध्यरात्र होती त्यावेळीं सारं शहर नि विशेषतः प्रार्थना मंदिरें, दीप प्रकाशानें जशीं झळाळत होती. हजारों लोक मंदिरांत गोळा झाले होते आणि मंदिरांची आवारं नि जवळपासचे सारे रस्ते देखील लोकांनीं पार भरून गेले होते. लोकांच्या त्या विशाल समुदायांत कोटयावधि लहान लहान दिवे लुकलुकत होते, आणि तो परिचित घंटानाद आसमंतांत सतत निनादत होता.

कसल्या तरी एका मोठ्या सणांतली रात्र होती ती, आणि त्या साऱ्या मानवी समुदायाच्या अंतःकरणांत त्या क्षणीं हेलावत असलेल्या आनद नि शांति सागरांत आम्ही पक्षीहि कांही काळ आनंदानें डुंबत होतों.

आमच्या मातृभूमीचा तो गोड संदेश होता–मातृभूमी आमचं स्वागत करीत होती !

तिसरे दिवशीं क्षितिज रेषेवर आम्ही ते विशाल ऑस्टॅशकोव्हो मार्शेस पाहिले......आमचे हॅमॉक !

आम्ही आतां खूपच सपाटयानें उडत होतों. मला वाटतं त्या चिरस्मरणीय तुफानांतून निसटण्यासाठीं देखील इतका प्रचंड वेग आम्ही वाढवला नव्हता.

आम्ही येथून निघालों त्या वेळेपेक्षां आमच्या घरादारांची स्थिती आतां अगदींच चमत्कारीक नि विरूप अशी आम्हांला दिसली. वसंत सुरू होऊन फार दिवस कांही अजून झाले नव्हते. बर्फ नुकतंच वितळून गेलं होतं आणि त्या ओसाड शेवाळीमधून वर येत असणाऱ्या गवताचे बारीक नाजूक शेंडे आत्तां कुठे मधूनमधून दृष्टीस पडत होते. पण प्रत्येक नव्या दिवसाबरोबर आपलं पूर्वींचं मोहक स्वरूप तो भूप्रदेश धारण करीत होता, आणि आम्हीहि वेळ न गमावतां, आपल्या वसाहतीचा आराखडा तयार करूं लागलों.

आमचा जुना घरटा अर्थातच कायदेशीरपणें बाबांनीं आणि त्यांच्या नव्या पत्नीनें आपल्या ताब्यांत घेतला. त्याच्याजवळच एक उत्कृष्ट असा हॅमॉक-उंचवटा निवडून मी नि ब्लॅकनेकनी आपलं घर बांधलं. आमच्याहि जरा पलीकडे ताईनें नि ट्रॉयफ्लरनें आपलं घर सजवलं.

आमचं हें काम मोठ्या झपाट्यानें चाललं होतं आणि एका अठवड्यांतच सारं कांहीं पूर्णपणें तयार झालं. काय सुंदर झालीं होती घरं! विशेषतः आमचं! धनगरांनी टाकून दिलेला एक लोंकरी फेल्टचा तुकडा एका शेतांत मला मिळाला होता. मी त्याचे फाडन बारीक तुकडे केले आणि ते थोडे थोडे तिथून घेऊन गेलों. नि इतके सपाटून झाले ते तुकडे कीं, आमचं घर चांगलं मऊ मऊ असं तयार झाल्यावर उरलेल्यांत बाबांचं नि ट्रायफ्लरचं घर देखील तसंच मऊ असं मढवतां आलं आम्हांला.

मग थोड्याच दिवसांनी, आमच्या प्रत्येकाच्या घरट्यांत दोन दोन हिरवट, तपकीरी ठिपक्यांचीं अशीं मोठीं मजेदार अंडीं दिसूं लागली. आम्हां पुरुषांच्या सुरक्षित अशा आसऱ्याखालीं आमच्या जीवन-साथींनी मग शांतपणें नि स्तब्धपणें तीं उबवण्याचं कार्य सुरू केलं.

पण किती लौकर गेले ते अंडीं उबवण्याचे दिवस!

आणि मग एक दिवस कांहीं खायला घेऊन मी जेव्हां परीं आलों त्या वेळीं आमच्या घरट्यांत कांहीं विचित्र दिसणारीं अशीं पिलं माझ्या दृष्टीस पडलीं आणि माझं पितृप्रेम तावडतोब जागं झालं. लगेच मी आपल्या शेजाऱ्याला, ट्रायफ्लरला आरोळी दिली,

'अरे, इकडे वाढ झाली रे आमच्या कुटुंबांत.'

आणि, आतां प्रौढत्वामुळें आपल्या जरा घोगऱ्या झालेल्या आवाजांत उत्तरादाखल तो ओरडला 'हार्दिक अभिनंदन!'

समाप्त



गोष्ट म्हणजे माझी प्रमुखपदीं झालेली निवड. या माझ्या नवीन अधिकारामुळें मी नि ट्रायफ्लर आतां एकाच समान भूमिकेवर आलों! आरंभाला माझा यावर विश्वास बसेना, पण मला मिळालेल्या मतांची संख्या इतकी प्रचंड होती कीं त्याबद्दल कांहीं शंका रहाणंच शक्य नव्हतं.

पण त्या वेळीं मला मात्र असंच वाटलं कीं, माझ्या या निवडणुकीचं श्रेय, हा सन्मान, मला बाबांच्या लोकप्रियतेमुळेंच लाभला होता. पण मग मागाहून मला समजलं कीं उमेदवारांच्या नांवांची यादी स्वतः वृद्ध लॉंगनोझनींच केली होती; आणि त्यांचं वजन इतकं मोठं होतं कीं त्यानीं केलेंली मलावणी ही, लोक पवित्र, वंद्य असा हुकूमच नेहमीं समजत असत.

निवडणुकीनंतर मी भाषण बिषण कांहीं केलं नाहीं. मी फक्त एवढंच सांगितलं कीं, मी आपल्या वडीलांचं प्रत्येक बाबतींत अनुकरण करण्याचा कसून प्रयत्न करणार आहे.

'ठीक, पण त्यांतून आपलं तें समुद्रोल्लंघन वगळणार, ना? बाबानीं शेरा मारला. 'आपलं ब्रीदवाक्य म्हणून तूं ' जें करायचं तें थोडं-पण परिपूर्ण, ' हे शब्द ध्यानांत धरलेस तर बरं.

दुसऱ्या दिवशीं दिशा उजळतांच आम्ही आपल्या उत्तर प्रवासाला सुरवात केली. थोड्याच वेळांत नाईलच्या उत्तर पात्राजवळील तो प्रचंड वाळवंटी महासागर आम्ही गांठला. आमच्या पहिला रात्रीचा मुक्काम वाडी-हाल्फाजवळ पडला, नि तो मुक्काम निर्विघ्नपणें नि शांतपणें पार पडला,

माझी ब्लॅकनेक माझ्यावर आतां प्रेमळपणाचा नि काळजीचा जसा वर्षाव करीत होती, आणि माझ्या मनांत येत होतं कीं हें मान-सन्मानाचं दीप्तिमान आवरण जर माझ्याभोंवती नसतं नि मी एक सामान्य शिपाई गडी असतों, तर तिनें माझी एवढी काळजी घेतली

असती का, माझ्या सुखसोयीना ती एवढी जपली असती का?

आणखीं दोनच पल्ले आणि फिलेई नि त्याजवळचे ते पुरातन अवशेष आम्ही गांठले.

वृद्ध लाँगनोझची शक्ती आतां कमी होत होती. आमच्या पहिल्याच भरारींत ते आमच्या कितीतरी तास मागें पडले, आणि पूर्वी ठरल्यापेक्षां एक जास्त मुक्काम केवळ त्यानीं आम्हांला गांठावं नि त्यांना विसांवा मिळावा एवढ्याचसाठींच आम्हांला करावा लागला. पण फिलेई गांठतांच आमचे ते वृद्ध सेंनानी खालीं जमीनीवर आडवे झाले आणि त्यानीं प्रवास पुढे चालू ठेवण्याचे साफ नाकारले.

ती सारी उदास रात्र आम्हीं आमच्या त्या मृत्यूशय्येवर पडलेल्या वृद्ध मार्गदर्शकाच्या नि नेत्यांच्या भोंवतीं जागून काढली. त्यांचं नांव खोदलेल्या त्या भग्न दगडी कॉर्निसच्या शेजारींच ते पडले होते. रात्र चांदणी आणि निःस्तब्ध होती. नदीच्या परतीरावर कोल्ह्यांची हुकी चालू होती आणि मच्छीमारी होड्यांतील लाल दिवे अंधारांत लुकलुकत होते.

आमचे पितामह आतां बोलत होते.

'शांतपणें नि सुखानें नांदा. कुणाचंहि वाईट कधीं चिंतूं नका, आणि कुणीं अपकार केला, तर सूडाचा विचार मनांत आणूं नका—नीट ध्यानांत ठेवा कीं सूडामुळें समाधान लाभत नसल्यामुळें सूड हा निष्फल आहे. कुणालाहि दोष लावूं नका, कारण तुमच्यातला निर्दोष असा कोणींच नाहीं. नेहमीं एकमेकांना धरूनच रहा. तुमचं सामर्थ्य ऐक्यांतच आहे. हें ध्यानांत धरा कीं तुमचं व्यक्तिगत काम हें मागाहून—आधीं सामाजिक कर्तव्य, आधीं समाजसुख नि मग व्यक्तिसौख्य. प्रेम—कारण प्रेम म्हणजेच सारं कांही—ही सर्व ऐहिक सुखांची जननी आहे, सर्व आनंदाची निर्मिती आहे. प्रेम हें

मृत्यूहूनहि प्रभावी, सामर्थ्यसंपन्न आहे. आणि आज मला हा मृत्यु शांतपणें नि समाधानानें जर येत असेल, तर त्याचं कारण एकच, कीं अगदीं शेवटचा श्वास घेईपर्यंत मी मनानें तुमच्याबरोबरच वावरणार आहें, माझा आशिर्वाद तुमच्याबरोबरच येणार आहे आणि आपली सुंदर प्रिय मायभूमी तुमच्या परत दृष्टीस पडतांच तुमच्या मनांत उसळणारा आनंद, मी आपल्या मनांत रेखाटीत राहाणार आहें म्हणून.'

'मला आतां फारी ग्लानी येते आहे, माझे डोळे जड झाले आहेत,' अगदीं क्षीण आवाजांत ते पुढे म्हणाले.

दिशा फांकतांच, आम्ही निघण्याची तयारी करून पाहिलं तों आमचे लाँगनोझ जमीनीवर पाय ताठ करून पसरले आहेत आणि त्यांचं तुरेदार मस्तक त्यांच्या पंखाखालीं झांकलं आहे.

आम्ही नीरव शांततेंत वर उड्डाण केलं आणि त्या दिवशींच्या सबंध प्रवासांत तेंच उदास मौन आम्हां सर्वांवर पसरलं होतं....

पण हें कैरो आलंच. नाईलच्या या त्रिभुज भागांतील हीं हिरवींगार मैदानं आतां समोर विस्तारलीं आहेत, आणि भूमध्य समुद्राची ती मोहक नील रेषा ही समोर खडी आहे!

सर्व दृश्य आतां परिचित वाटतं आहे. आमच्या प्रवासाचा आराखडा आमच्या मनश्चक्षूंसमोर आतां सुस्पष्ट नि रेखीव असा रेखाटलेला उभा राहिला आहे. आमच्या मनांतील अधीरता आम्हांला झपाट्यानें पुढे घेऊन निघाली आहे, आणि पूर्वेच्या या साऱ्या साऱ्या सौंदर्यविशेषांवरून आमची दृष्टी तटस्थपणें वावरत असतां, आमचीं तीं घरटीं, आमच्या त्या विशाल, सपाट पाणथळी आणि रसरशीत फुलांच्या बुंदानीं चित्रित झालेले ते बारीक बारीक उंचवटे, आमच्या मनश्चक्षूंसमोर गर्दी करीत राहून त्या सुखस्वप्नांत आम्ही रंगत आहोंत.

डॅन्यूबच्या मुखाजवळ येतांच, वाईज विंग फ्लॅपच्या विभागाचा आम्ही निरोप घेतला.

तो वृद्ध सेनानी बाबांचा निरोप घेत असतांचं दृश्य मोठं हृदयस्पर्शी होतं. माझा हा अखेरचाच प्रवास, असं माझं मन मला सांगत आहे, असं ते म्हणाले.

' पण, प्रिय दोस्त, आपल्या लॉंगनोझच्या मृत्यूसारखं सुंदर नि शांत असं मरण पाहिल्यानंतर, तसाच मृत्यु यावा नि त्याच्या मागून जावं, असंच कोणालाहि वाटेल.'

' अहो, असं काय बोलतां ? तुम्हीहि पहालच पुन्हां एकत्र प्रवास करूंच आपण.'

पण, वाईज विंग फ्लॅपचंच म्हणणं खरं होतं. तें आम्हाला परत कधींच दिसले नाहींत.

: : २२ : :

आपआपल्या कंठांच्या पिपाण्या जोरानें वाजवीत वाजवीत आम्ही मोठ्या आनंदानें नि नेटानें, खूप धीर करून उत्तरेंतील त्या घनदाट काजळी जंगलांवरून विलक्षण वेगानें आतां पळत निघालों होतों. मार्च महिन्याची ती अखेर होती.

बर्फाचं अस्तित्व अजून कुठे कुठे दिसून येत होतं. पण हवा मात्र गरम झालीच होती आणि गारठा फक्त रात्रीं नि सकाळींच काय तो वाटे. पण प्रत्येक नवा दिवस अधिकाधिक सूर्यप्रकाश नि ऊष्णता आपल्याबरोबर घेऊन येतच होता.

मग एप्रील, आपले उसळते वासंतिक निर्झर नि निर्झरिणी घेऊन अवतीर्ण झाला. गवताचीं कोंवळीं पानं वर डोकीं काढूं लागलीं नि पांढरी शुभ्र स्नो ड्रॉपचीं इवलालीं फुलं त्यांबरोबर हंसू लागलीं... ....आपलं ध्येय आम्ही जवळ जवळ गांठलंच. प्रवासाचा शेवट दिसूं लागला.

एक नवीनच आनंदानुभव आमची या ठिकाणीं वाट पहात होता. आमच्या सैन्यांत एक नवीन गडी दाखल झाला. ट्रायफलरचे प्राण मोठ्या धैर्यानें वांचवणारा तो बंदिवान क्रौंच आम्हाला येऊन मिळाला होता.

त्यानें सांगितलं कीं, तो अतीशय माणसाळला होता आणि त्यानें त्या लोकांचा विश्वासहि खूप संपादल्यामुळें त्या लोकांनीं पुढे त्याचे पंख कापणं सोडून दिलं. आणि तो सारा हिंवाळा त्यानें तिथेंच कोंबड्या वगैरेंच्या संगतीत काढला. पण हिंवाळा संपतांच त्याच्या कानावर तो दुष्ट शब्द–कात्री–एक दिवस अवचितपणें आला; आणि त्यानें पळून जाण्याचा ताबडतोब निश्चय केला. त्याचे पंख आतां

बरेच वाढले असल्यानें कुंपणांच्या भितींवरून उड्डाण करून लहान लहान पल्ला मारीत जाणं त्याला शक्य होतं.

अनुकूल संधीची मग तो वाट पहात बसला नि तशी संधी येतांच त्यानें पळ मारली.

आरंभीं त्यानें कांही दिवस फर वृक्षांच्या रानांत काढले. थंडीनें गारठून किंवा भुकेनें तळमळून मरण्याची त्याला अनेकदां वेळहि आली. कारण गेल्या वर्षीचीं बिलबेरीज, गोठलेलीं नि बर्फांत घट्ट बसलेलीं हीच काय तीं त्याला खायला मिळत होतीं, नि फरच्या बिया. पण यालाहि प्रयास कोण पडत. अखेरीस पण मग हिंवाळा कमी होऊन हवेंत गरमा येऊं लागतांच त्याला इतर कांही खाद्य वस्तु मिळूं लागल्या. या दरम्यानच्या काळांत त्याचे पंखहि आणखी लांब वाढले आणि तो त्यांना उडण्याचं कामहि सारखा देतच असे. त्या दिवशीं सकाळीं आमच्या पिंपाण्यांचा आवाज जेव्हां त्यानें ऐकला आणि आम्हांला उडतांना पण पाहिलें, त्याबरोबर त्याच्या आंगांत दसपट जोर आला आणि सपाट्यानें झेंप घेऊन त्यानें आमचा आघाडीचा त्रिकोन गांठला.

'पण तुम्ही मला घालवून नाहींना लावणार, दोस्त, नाहींना? तुमच्या मंडळींत कायमचंच रहावं अशी इच्छा आहे माझी.'

आम्हीहि मग अत्यंत उत्साहानेंच त्याचं स्वागत केलं नि त्याच्या आगमनाप्रीत्यर्थ आपल्या पिंपाण्या पण जोरसे वाजविल्या, हें सांगायला नकोच.

आणि मग, तो पूर्व बंदिवान क्रौंच नि ट्रायफ्लर यांची झालेली भरत भेट मोठी हृदयस्पर्षी होती.

आतां फक्त तीन चार ताणाच्या भराऱ्या कीं गाठलंच आम्ही मग आपलं घर!

त्या दिवशी आम्ही मास्कोवरून गेलों. मध्यरात्र होती त्यावेळीं सारं शहर नि विशेषतः प्रार्थना मंदिरें, दीप प्रकाशानें जशीं झळाळत होती. हजारों लोक मंदिरांत गोळा झाले होते आणि मंदिरांची आवारं नि जवळपासचे सारे रस्ते देखील लोकांनीं पार भरून गेले होते. लोकांच्या त्या विशाल समुदायांत कोट्यावधि लहान लहान दिवे लुकलुकत होते, आणि तो परिचित घंटानाद आसमंतांत सतत निनादत होता.

कसल्या तरी एका मोठ्या सणांतली रात्र होती ती, आणि त्या साऱ्या मानवी समुदायाच्या अंतःकरणांत त्या क्षणीं हेलावत असलेल्या आनद नि शांति सागरांत आम्ही पक्षीहि कांही काळ आनंदानें डुंबत होतों.

आमच्या मातृभूमीचा तो गोड संदेश होता–मातृभूमी आमचं स्वागत करीत होती !

तिसरे दिवशीं क्षितिज रेषेवर आम्ही ते विशाल ऑस्टॅशकोव्हो मार्शेस पाहिले......आमचे हॅमॉक !

आम्ही आतां खूपच सपाट्यानें उडत होतों. मला वाटतं त्या चिरस्मरणीय तुफानांतून निसटण्यासाठीं देखील इतका प्रचंड वेग आम्ही वाढवला नव्हता.

आम्ही येथून निघालों त्या वेळेपेक्षां आमच्या घरादारांची स्थिती आतां अगदींच चमत्कारीक नि विरूप अशी आम्हांला दिसली. वसंत सुरू होऊन फार दिवस कांही अजून झाले नव्हते. बर्फ नुकतंच वितळून गेलं होतं आणि त्या ओसाड शेवाळीमधून वर येत असणाऱ्या गवताचे बारीक नाजूक शेंडे आत्तां कुठे मधूनमधून दृष्टीस पडत होते. पण प्रत्येक नव्या दिवसाबरोबर आपलं पूर्वीचं मोहक स्वरूप तो भूप्रदेश धारण करीत होता, आणि आम्हीहि वेळ न गमावतां, आपल्या वसाहतीचा आराखडा तयार करूं लागलों.

आमचा जुना घरटा अर्थातच कायदेशीरपणें बाबांनीं आणि त्यांच्या नव्या पत्नीनें आपल्या ताब्यांत घेतला. त्याच्याजवळच एक उत्कृष्ट असा हॅमॉक-उंचवटा निवडून मी नि ब्लॅकनेकनी आपलं घर बांधलं. आमच्याहि जरा पलीकडे ताईनें नि ट्रॉयफ्लरनें आपलं घर सजवलं.

आमचं हें काम मोठ्या झपाट्यानें चाललं होतं आणि एका अठवड्यांतच सारं कांहीं पूर्णपणें तयार झालं. काय सुंदर झालीं होतीं घरं! विशेषत: आमचं! धनगरांनी टाकून दिलेला एक लोंकरी फेल्टचा तुकडा एका शेतांत मला मिळाला होता. मी त्याचे फाडून बारीक तुकडे केले आणि ते थोडे थोडे तिथून घेऊन गेलों. नि इतके सपाटून झाले ते तुकडे कीं, आमचं घर चांगलं मऊ मऊ असं तयार झाल्यावर उरलेल्यांत बाबांचं नि ट्रायफ्लरचं घर देखील तसंच मऊ असं मढवतां आलं आम्हांला.

मग थोड्याच दिवसांनी, आमच्या प्रत्येकाच्या घरट्यांत दोन दोन हिरवट, तपकीरी ठिपक्यांचीं अशीं मोठीं मजेदार अंडीं दिसूं लागली. आम्हां पुरुषांच्या सुरक्षित अशा आसऱ्याखालीं आमच्या जीवनसाथींनी मग शांतपणें नि स्तब्धपणें तीं उबवण्याचं कार्य सुरू केलं.

पण किती लौकर गेले ते अंडीं उबवण्याचे दिवस !

आणि मग एक दिवस कांहीं खायला घेऊन मी जेव्हां घरीं आलों त्या वेळीं आमच्या घरट्यांत कांहीं विचित्र दिसणारीं अशीं पिलं माझ्या दृष्टीस पडलीं आणि माझं पितृप्रेम तावडतोब जागं झालं. लगेच मी आपल्या शेजाऱ्याला, ट्रायफ्लरला आरोळी दिली, 'अरे, इकडे वाढ झाली रे आमच्या कुटुंबांत.'

आणि, आतां प्रौढत्वामुळें आपल्या जरा घोगऱ्या झालेल्या आवाजांत उत्तरादाखल तो ओरडला 'हार्दिक अभिनंदन!'

समाप्त

परभृत
प्रकाशन

मूल्य २ रु.

